
एवगेनी बोगात
यांच्या Eternal Man
या पुस्तकाचा
संक्षिप्त भावानुवाद



# चिरंजीव माणूस

भावानुवाद
नारायण देसाई

साहित्य-संस्कृति-मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई



नारायण देसाई हे पिंडाचे तत्त्वविवेचक असून त्यांच्या एकंदर साहित्यात एक समर्थ तत्त्वधारा वाहत असते. ती म्हणजे जगताकडे पाहण्याचा त्यांचा तत्त्व वैज्ञानिक दृष्टिकोन. आतापर्यंत त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पैकी 'शास्त्रीय तत्त्वज्ञान', 'समाज क्रांतीच्या प्रकाशरेखा', 'स्वामी विवेकानंद', 'लेनिन आणि आपण', 'मूलगामी मूर्तिमंत'आदी त्यांच्या पुस्तकांना अनेक राष्ट्रीय, आंतर् राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या काही पुस्तकांचे गुजराथी अनुवादही प्रकाशित झालेले आहेत. जगप्रसिद्ध सोविएट तत्त्वचिंतक एवगेनी बोगात यांचे Eternal Man हे पुस्तक राष्ट्रीय प्रबोधनाच्या तसेच २१ व्या शतकाच्या आगमनाच्या दृष्टीनेही अभ्यासनीय वाटल्यामुळे त्यांनी ते प्रस्तुतरुपांत मराठी वाचकांसमोर ठेवले आहे.

अनुक्रमणिका

# चिरंजीव माणूस

अनुक्रमणिका

# चिरंजीव माणूस

[एवगेनी बोगात यांच्या Eternal Man चा संक्षिप्त भावानुवाद]

भावानुवाद

## नारायण देसाई

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
१९८५

अनुक्रमणिका

**प्रथम आवृत्ती :**

मे, १९८५.

**प्रकाशक :**

श्री. सू. द्वा. देशमुख,
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

© **प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**

**व्यवस्थापक,**
शासकीय मुद्रणालय, वाई (जि. सातारा)

**किंमत : रु. २६**

अनुक्रमणिका

# निवेदन

*सर्व मराठी माणसांनी, नव्हे, सर्व भारतीयांनी वाचावे आणि त्यावर मनन करावे अशी जी काही महत्त्वाची पुस्तके जगात निर्माण झाली त्यात "Eternal Man" या पुस्तकाची गणना करावी लागेल. शेवटी माणसामधल्या माणूसकीची जपणूक केली पाहिजे हे सांगणारे जे तत्त्वज्ञान त्याचाच एका वेगळ्या पद्धतीने या पुस्तकात विचार झालेला आहे. त्यामुळे मराठी वाचकांना हे पुस्तक उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. नारायण देसाई यांचे अभिनंदन करावे लागेल.*

*माणसातील माणूस हा नेहमीच चिरंजीव असतो. तो अमर असतो, तो कधीच नाश पावत नाही हे या तत्त्वचिंतनाच्या मागील मुख्य सूत्र आहे. आणि या सूत्राचे माणासाला-मराठी माणसाला-आकलन झाले तर त्याच्यामधील निराशावाद नाहीसा झाल्यावाचून राहणार नाही.*

*कोणतीही खोटी आशा वाईट. परंतु माणूस जेव्हा भविष्याचा विचार करतो तेव्हा तो आशेचा आणि इच्छेचाच विचार करतो. भविष्यातील उज्वल आशांची स्वप्ने माणसाला रंगविता आली नाहीत तर त्याला आजच्या अन्यायमूल, वैष्यम्यमूल समाजाचे चित्र बदलता येणार नाही. एका रीतीने पाहिल्यास अशा आशादायक स्वप्नरंजनात प्रत्येक माणसाला काही काळ तरी जाता आले पाहिजे. असे झाले तरच माणुसकीला आणि माणसाला चांगले दिवस येतील.*

*या पुस्तकाच्या वाचनाने मराठी माणसाला काही सुखद स्वप्ने पडोत अशी आशा करायला हरकत असू नये.*

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

४२, यशोधन,
मुंबई-४०० ०२०.
दिनांक- १ मे, १९८५.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन.................................................................................................. ६

भावानुवादकाचे प्रास्ताविक.................................................................................. ८

हृद्‌गत लेखकाचे ........................................................................................ १२

नित्शे ................................................................................................... १५

संवादात्मक कथन-पद्धती विषयी ........................................................................ ३८

घायाळ गवा ............................................................................................. ३९

विषाचा प्याला ........................................................................................... ४८

पेत्रार्कची पत्रे ........................................................................................... ६०

प्रेम समर्पण .............................................................................................. ७१

अमर बीज ............................................................................................... ८४

सोविएत देश हा जगात सर्वात अधिक वाचणाऱ्या लोकांचा देश आहे ही आज सर्वांनाच माहीत असलेली गोष्ट आहे. पण त्या देशांतील विचारवंतांमध्ये खोल विचारमंथनही चालू आहे हें मात्र सर्वांनाच ठाऊक आहे असें नव्हे. कारण साम्यवादी काय, समाजवादी काय, पुरोगामी काय किंवा सर्वसाधारण बुद्धिवादी मंडळी काय, पारंपरिक सोविएत राजकीय विचाराच्या पलीकडे जाऊन त्या लोकांचे तत्त्वचिंतन जाणून घेण्याची आपली इच्छाच नसते.

वास्तविक, या पृथ्वीवर उदयाला आलेल्या मानवाच्या भवितव्याचा आधुनिक विज्ञानें नि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टींनी विचार करणारे एक नवें तत्त्वविज्ञानच (Philosophical Science) आज सोविएत देशांत बनत आहे. पण सोविएत विचाराची आशयघनता व अर्थपूर्णता समजून घेताना ही गोष्ट मात्र आपण कदापि नजरेआड करता कामा नये, की ज्या मार्क्सविचारावर सोविएत समाजरचना, सोविएत विज्ञाने नि सोविएत तत्त्वविज्ञान आधारलेले आहे, तो विचार माणसाची व्याख्या विज्ञानदृष्ट्या (इतिहासविज्ञानदृष्ट्या) उत्पादन—साधने बनविणारा प्राणी अशी जरी करीत असला तरी तत्त्वज्ञानदृष्ट्या, त्याच माणसाची व्याख्या आत्मदिग्दर्शन नि आत्मनियंत्रण करू शकणारा इतर प्राण्यांहून वेगळा प्राणी, इतर सृष्ट पदार्थांहून वेगळा पदार्थ अशीही तो करतो. माणसाची ही दुसरी व्याख्या मुळांतील काही ऐतिहासिक व नंतरच्या काही प्रासंगिक कारणांमुळे आणि विरोधी प्रचारामुळे तितकीशी प्रचलित नाही हे खरोखर दुर्दैव आहे.

मार्क्सविचार समाजजीवनातील अर्थप्राबल्य व सामाजिक विकासाच्या नियमांचे अपरिहार्यत्व जरूर मानतो. पण त्याचबरोबर माणसाची एक विशिष्ट तऱ्हेची आत्मस्वायत्तताही तो मानतो. मनुष्याला ऐतिहासिक परिस्थितीच्या हातातले निव्वळ बावले मानणारा ऐतिहासिक नियतिवाद मार्क्सने कधीही स्वीकारलेला नाही. तसेच व्यक्तीला एक सामाजिक यंत्र वा त्या यंत्रातला एक दांता असेही मार्क्सने कधी मानलेले नाही. म्हणूनच व्यक्तीला क्रांतिकारक बनून परिस्थिती बदलण्याचे वैयक्तिक-नैतिक आवाहन तो करू शकला.

माणसाचे सृष्टीवरील व समाजावरील अवलंबित्व जितके वास्तव तितकेंच बरे आणि वाईट यामध्ये निवड करण्याचे माणसाचे अंतःकरणात्मक (नैतिक) स्वातंत्र्य व त्याचबरोबर त्या स्वातंत्र्याच्या मर्यादाही वास्तव आहेत असेंच मार्क्सने मानले आहे.

माणूस सृष्टीचा परिपाक व विषय तसाच तो या सृष्टींतील सर्वश्रेष्ठ विषयीही आहे, हे मार्क्सएवढे शास्त्रशुद्ध व त्याचबरोबर व्यवहारी रीतीने अन्य कोणीही दिग्दर्शित केले नसेल. अखेर माणसांनीच समाजक्रांती करावयाची आहे, निर्जीव परिस्थितीने नव्हे असे मार्क्सने वारंवार म्हटलेले आहे. आचार नि विचार यांतील फारकत मार्क्सला बिलकूल मंजूर नव्हती त्याचे कारणही त्याच्या विचाराची पायाभूत वैयक्तिकता व आत्मिकता हेच होते.

कोणतीच माहिती, कल्पना, जाणीव किंवा ज्ञान माणसाच्या अंतरात, खरे म्हणजे माणसाच्या आत्म्यापर्यंत पोहोचल्याशिवाय ते त्याचे तत्त्वज्ञान होत नाही व आचारात तर येतच नाही. मार्क्सला तत्त्वज्ञान म्हणजे क्रांती आणि क्रांती म्हणजे तत्त्वज्ञान असे वाटण्याचे कारणही त्याची सर्वोपरी असलेली

आत्मिकता हेंच होते. आर्त नि कृतिशील आत्मनिष्ठेमुळेच अर्थप्रतिष्ठित विचारवंत मंडळीच्या वैचारिक तटस्थतेचा मार्क्स कट्टर विरोधक बनला.

ह्या संबंधात आर्थिक, सामाजिक, राजकीय क्रांती म्हणजे अंती माणसांच्या आत्मिक जागृतीची क्रांती आहे हे सर्वांनीच समजून घेतलें पाहिजे. विशेषतः जड भौतिकवाद्यांनी. मार्क्सने जड भौतिकवाद oversimplified, vulgar, spontaneous, mechanical, static, anthropological, nihilistic, metaphysical, undialectical, French, English आदी अनेक दोषदर्षी विशेषणांचा वापर करून अस्वीकार्य ठरवलेला आहे. लेनिननेही तत्त्वज्ञानात्मक भौतिकवाद (Philosophical Materialism) जड, यांत्रिक, वैज्ञानिक भौतिकवादाहून किती वेगळा ते वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

आज अर्थप्रतिष्ठित जगात व इतरत्रही अर्थ व लिंग सोडून बाकी सारे शून्य समजणाऱ्या लोकांच्या हातांत समाजाची सत्ता केंद्रित होत आहे व परिणामी सर्वसाधारण लोकांत जुन्या धर्मसंप्रदायांचे पुनरपी आकर्षण वाढू लागले आहे. अनेक देशांत दिसून येणारें अंधश्रद्धांविषयीचे नवे आकर्षण तसेंच धार्मिक पुनरूत्थानाचा प्रभाव (Religious Fundamentalism) ही सत्ताधारी वर्गाच्या यांत्रिक, निष्ठूर, नीतीपराङमुख वर्तनाविरुद्ध बहुजन समाजाची अंतःकरणात्मक प्रतिक्रिया आहे. नीतीभ्रष्ट समाजरचना व नैतिक कर्तव्याला न जुमानणारी कर्ती सवरती माणसें समाजांत वावरत असपर्यंत ज्ञानविज्ञान अगदी शिगेला पोहोचले तरी अंधश्रद्धांचे आकर्षण संपणार नाही. कारण मनुष्यांच्या मनातील अंधश्रद्धांचे मूळ केवळ आर्थिक विषमतेंत व केवळ अज्ञानात नसून ते माणसांच्या वर्तनातील अनीतींत, अन्यायात, क्रौर्यात अधिक आहे. खरे म्हणजे ती फक्त ज्ञानात्मक किंवा बौद्धिक प्रक्रिया नसून ती अंतःकरणात्मक किंवा हार्दिक प्रक्रिया आहे. मार्क्सनेच जगात पहिल्या प्रथम ही हार्दिक प्रक्रिया विशद केली आहे. परंतु दुर्दैवाने 'धर्म ही अफू आहे' हे मार्क्सने वेगळ्या संदर्भातील अर्धवट वाक्य घोकणारे जड भौतिकवादीच अधिक निघाले व त्यामुळे समाजवादाची नि मानवतेची अपरंपार हानी झाली आहे.

तथापि आज अंतःकरण, नीती, आत्मा आदींचे मनुष्य जीवनातले योग्य स्थान ओळखणे म्हणजे केवळ वैयक्तिक आत्मशुद्धीचा उदोउदो करून समाजक्रांतीची आवश्यकता डावलणे नव्हे. उलट समाजांतील एकूण एक ज्वलंत शक्तिस्रोत समाजक्रांतीच्या दिशेने वळवणे होय.

हे कदापि कोणाला नाकारता येणार नाही, की एकंदर मानवी विचाराच्या इतिहासांत फक्त मार्क्सविचारानेच आचरण नि चिंतन यांचा नवा सृजनशील मेळ घातला आहे. त्याचप्रमाणे पदार्थाच्या पृष्ठभागावर असलेल्या गुणधर्मांचे ज्ञान (विज्ञान) नि अंतर्ज्ञान (Intuition), वैयक्तिक नि सामाजिक, राष्ट्रीय नि आंतरराष्ट्रीय, उपयुक्ततावादी मूल्य नि सौंदर्यवादी मूल्य यांचाही नवा सृजनशील मेळ सोविएत चिंतनात घातलेला आहे.

समकालीन सोविएत चिंतन हे त्या देशातील लोकांच्या क्रांतिकारी अनुभवांत मुरलेले चिंतन आहे. आचारविचाराच्या ऐक्यावर आधारलेल्या अशा चिंतनाचे मूल्यमापन करताना ना पुराण्या तत्त्वमीमांसेचे मानदंड उपयोगी पडणार, ना नव्या तत्त्वमीमांसेचे, ना पौर्वात्य ना पाश्चिमात्य. तसेच या देशात नि इतर अनेक देशांत प्रचलीत असलेल्या मार्क्सवादी मीमांसेचे मानदंडही उपयोगी पडणार नाहीत. खुद्द सोविएत देशांत विकसित झालेले मानदंडही जसेच्या तसे स्वीकारून काम भागणार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मार्क्स व लेनिन यांनी दाखवून दिलेल्या दोषांपासून संपूर्णपणे मुक्त असा द्वंद्वात्मक भौतिकवाद वर

म्हटल्याप्रमाणे काही ऐतिहासिक व प्रासंगिक कारणांमुळे अजून विकसित झाला नाही हे होय. त्यामुळे सोविएत तत्त्वमंथनाचे मूल्यमापन म्हणजे स्वतः विचारकाने वेगाने बदलत जाणाऱ्या एकंदर जीवन-परिस्थितीचा आज नव्याने करावयाचा शोध आहे.

जीवन परिवर्तनाच्या अपरंपार शक्यता आपल्या उदरांत घेऊन २१ वे शतक आता आपल्यासमोर आहे. या शतकाच्या उंबरठ्यावरून आपण सर्वांनीच हा शोध करावयाचा आहे. मग कोणी प्रगत भांडवलशाही दुनियेत राहणारे असोत, कोणी समाजवादी दुनियेत राहणारे असोत, किंवा कोणी आमच्यासारखे तिसऱ्या जगातले असोत.

आज आपण हे जाणू शकतो, की २१ वे शतक हे केवळ स्वयंचलित यंत्रतंत्राचे शतक नसून ते जागृत व शिक्षित बहुसंख्य श्रमिकांचे शतक आहे. हे शतक आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनाची समानसंधीच्या तत्त्वावर पुनर्रचना करण्याची परिस्थिती निर्माण करणार आहे, सक्ती करणार आहे, पण त्याचबरोबर मनुष्याच्या भावनिक, सांस्कृतिक, नैतिक जीवनाच्या शुद्धीची गरजही विशेषत्वाने निर्माण करणार आहे.

पाश्चात्त्य विद्वान आगामी शतक हे केवळ यंत्रतंत्राचे व माहितीचे किंवा प्रचार—माध्यमांचे शतक आहे इतके सांगूनच थांबत नाहीत, तर या शतकांत कामगारवर्गाची (Proletariat) जागा माहितगार वर्ग (Cognitariat) घेणार आहे असेही भाकीत करतात. या भविष्यवेत्त्यांपैकी वैज्ञानिक पद्धतीने विचार करणारे भविष्यवेत्ते देखील या शतकाच्या उदरांत मूलगामी समाजपरिवर्तनाच्या शक्तीही फार मोठ्या प्रमाणावर कार्यरत होऊं शकतात हे सांगावयाला कचरतात.

आतापर्यंत बहुसंख्य मनुष्यजातीचा बहुतेक वेळ फक्त पोटापाण्यासाठी राबण्यातच खर्च होत आला आहे. त्या मानाने सांस्कृतिक जागृतीसाठी नि उन्नतीसाठी बहुसंख्य मानवतेला खूपच अल्पवेळ मिळाला आहे. पण तंत्रज्ञानाच्या वापराने नि विशेषतः यंत्रमानवाच्या आगमनाने हे प्रमाण संपूर्णपणे बदलण्याची शक्यता आतां निर्माण झाली आहे. जीवनाच्या मुळालाच हात घालणाऱ्या अशा शक्यतांमुळे आगामी शतक हे फक्त भौतिक माहितीचे, रिकामटेकडेपणाचे व गुन्हेगारीचे शतक न ठरता ते आत्मिक संस्काराचे किंवा 'यांत्रिक विरुद्ध हार्दिक' संघर्षाचे शतक ठरू शकते.

आगामी शतकांतील प्रचारमाध्यमांच्या अचाट सामर्थ्याविषयी आपण खूप ऐकतो आणि पहातोही. पण जे लोक प्रचार-माध्यमांच्या सामर्थ्याविषयी बोलतात ते हे विसरतात, की कोणत्या ना कोणत्या प्रकारे माणुसकीला धरून असलेला प्रचारच माणसांमध्ये मूळ धरू शकेल. मुख्य म्हणजे त्याचेच आचारांत रूपांतर होईल. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत 'ये हृदयीचें ते हृदयी घातलें' असे होऊ शकेल. बाकी सारे ढीगभर पुढे उभे करून मूळ चिरंजीव माणुसकीबाबत उदासिन असलेला प्रचार भले प्रचंड शक्तिशाली प्रचारमाध्यमांद्वारे दिनरात्र माणसांना खायला घातला म्हणून त्याने कोणाचेच काही साधेल असे नाही. सध्या चाललेला आशयाहून माध्यमाचा जयजयकार हे दुष्ट यांत्रिक विचारसरणीचे सर्वत्र वेगाने फैलावणारे प्रत्यक्ष उदाहरण आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. माणसाचा प्रवास निसर्गाकडून व्यक्तित्वाकडे, किंवा मनुष्यप्राण्याची उत्क्रांती हाताकडून मेंदू नि मेंदूकडून हृदयाकडे अशी चालू असल्यामुळे आज सगळ्या माणुसकीला वेढत चाललेली यांत्रिकता फार काळ टिकूच शकणार नाही. अंतीं हृदयच वस्तूंच्या मर्माप्रत

पोहोचते किंवा पोहोचणार. यंत्राची, समाजवादाची, बुद्धीची व विशेषतः विवेकाची समूळ महती जाणलेल्या स्वामी विवेकानंदानी सुद्धा असेच प्रतिपादन केलेलें आहे.

२१ व्या शतकाची वाटचाल स्वातंत्र्याच्या, व्यक्तित्वाच्या, आत्म्याच्या व हृदयाच्या दिशेने गतशतकांहून निश्चित अधिक गतिमान असेल. प्रस्तुत पुस्तकांतील सोविएत वैज्ञानिकाचे शब्द या दृष्टीने अत्यंत सूचक आहेत. ते म्हणतात "वस्तुस्थिती अशी आहे, की माझा जो विकास झाला त्यात बुद्धीने हृदयाला खूप मागे टाकले. आकिलसने कासवाला मागे टाकले. बौद्धिक खेळ खेळण्यात मी प्रवीण बनलो होतो. पण नैतिक दृष्ट्या मी दुबळा राहिलो. दुर्दैवाने बहुतेक प्रकृतिविज्ञानिकांची हीच आजची शोकांतिका आहे." (पृ. ६२—६३).

प्रस्तुत पुस्तकाचे लेखक एवगेनी बोगात यांच्या प्रतिपादनाचा भर जितका सामाजिक प्रगतीवर आहे त्याहून अधिक मानवाचा आत्मसंयम, सदाचार व इतर सदगुणांच्या विकासावर आहे ही गोष्ट सुद्धा मानवाच्या भवितव्याची दिशा दाखवणारी आहे.

एवगेनी बोगात यांना आपली पृथ्वी हे विश्वाच्या खजिन्यातील अपरूप रत्न वाटते व या अपरूप वसुंधरेवरील मोलातीत शक्ती वाटते माणसाची आत्मशक्ती, जी त्यांच्याच शब्दांत 'युगायुगांबरोबर कलेकलेने विकास पावणारी नित्यनूतन व चिरंजीव आहे.'

मार्क्सला माणसांतील आदिम, निष्कपट माणुसकीचा व त्या अनुषंगाने माणसाच्या पुनरुत्थानाचा ध्यास लागला होता. अर्थात त्याचा अर्थ मानवतेने आता मागे जाण्याची आवश्यकता आहे असा नसून मानवतेने नव्या पायावर पुनर्निर्माण होणे अत्यावश्यक आहे असा आहे. मार्क्स मानवी, राष्ट्रीय नि प्रादेशिक परंपरेत जें जें उन्नतीला पोषक तें तें आत्मसात करून पुढे जायला सांगतो. माणसांतील चिरंजीव माणुसकीचा अशा तऱ्हेचा ध्यास हाच एवगेनी बोगात यांच्या पुस्तकांचा मुख्य विषय आहे.

वस्तुतः एवगेनी बोगात सारख्या प्रज्ञावंत सोविएत लेखकाचे संपूर्ण साहित्य अभ्यासल्याशिवाय त्यांच्या तत्त्वचिंतनाची अद्यावतता नि मौलिकता हाती लागणे असंभव आहे. शिवाय त्यांच्या प्रस्तुत पुस्तकातील सारभूत चिंतनांचा तेवढाच भावानुवाद मी केला आहे व तो शक्य तितक्या सकळार्थाने आपल्यासमोर ठेवण्याची तळमळ वगळल्यास इतर कोणत्याच अंगांतील परिपूर्णतेचा दावा मी करू शकत नाही.

**नारायण देसाई**

१९—अ, सन एन्ड सी.
पिकनिक कॉटेज समोर
जयप्रकाश रोड,
अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२.

अनुक्रमणिका

# हृद्गत लेखकाचे

आज आपण एका नव्या कालखंडात वावरत आहोत. नव्या कालखंडाचा उदय या पूर्वीही अनेक वेळा या पृथ्वीवर घडलेला आहे. पण या नवोदित युगाची स्पष्ट जाणीव जेवढी आज आपल्याला आहे, तेवढी पूर्वीच्या लोकांना त्यांच्या काळाची नव्हती. त्या काळात नवयुगाचा उदय होणे म्हणजे आजोबांच्या जीवनाहून नातवंडांचे जीवन अगदीच निराळे होणे असे घडत नसे. सध्या जीवनात घडणाऱ्या विस्मयकारी बदलांमुळे आजोबा नि नातवंडे यांनी परस्परांना ओळखणे जाणणेही आज कठीण होऊन बसले आहे.

मानवी जीवन प्रचंड वेगाने पालटत आहे. जुन्या परंपरा नष्ट होत आहेत. जीवनविषयक नि मानवी संबंधांविषयक एक नवीच धारणा आज आकाराला येत आहे. इतिहासातील या नव्या नि अभूतपूर्व अशा कालखंडाची पारख करण्यात या युगातील साहित्यकार, कलावंत नि विचारवंत व्यग्र आहेत.

आल्विन टॉफ्लर हा अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जेव्हा म्हणतो, की पृथ्वीवरील मानवाची ८०० वी पिढी आज उत्क्रांतीच्या वेगवान अवस्थेतू उत्क्रमण करीत चालली आहे, तेव्हा तो अगदी खरे तेच सांगतो आहे. मनुष्याचे पळापळाला वाढणारे तंत्रावरचे अवलंबित्व, माणसांमधल्या अन्योन्य संबंधांत पडत चाललेला खंड, व मनुष्यांत निर्माण होणारे मानसिक गंड नि ताण, हा त्यांच्या मते एक नवीन रोगच असून त्याला त्याने चक्क आगामी धक्का असे म्हटले आहे.

खरे तर, धक्क्याची ही कल्पना अर्थप्रतिष्ठित समाजरचनेचे द्योतक असून भांडवलदारी समाजाचा ती साक्षात्कार घडवते. ही समाजरचना दिवसेंदिवस अधिकाधिक चेहरा हरवलेली समाजरचना बनत चालली आहे. आल्फ्रेड बेचेर या दुसऱ्या एका अमेरिकन लेखकाने या समाजरचनेचे वर्णन करणाऱ्या आपल्या एका खूप गाजलेल्या कल्पनारम्य पुस्तकाला 'समाप्त मानव' असेच मुळी नाव दिलेले आहे. व हा केवळ योगायोगही नव्हे. भांडवली जग स्वरुपभ्रष्ट लोकांची पैदास करते याचे ते प्रत्यंतर आहे. त्या जगाला मानवतेची भावना नि मानवी मुखकमळ परके झाले आहे भांडवली समाजरचना आज मानवतेची उर्जितावस्था, मानवतेची आशाआकांक्षा, मानवतेचे हृदय ठरू शकत नाही. ते स्थान साम्यवादाने पटकावले आहे. कारण साम्यवादाला समाजविकासाचे साध्य खुद्द मानवातच गवसते. आत्मपूर्तीसाठी होणाऱ्या मानवाच्या निरंतर संघर्षात ते जाणवते.

अर्थात 'आगामी धक्का' त्यालाच भयभीत करून सोडील ज्याला आजच्या ८०० व्या पिढीआधी ७९९ पिढ्या होऊन गेल्या आहेत याची योग्य जाणीव नसेल !

संस्कृती नि सभ्यतेची आपल्यासमोर असलेली सामग्री तेवढीच काय ती आपली भौतिक नि आत्मिक सामग्री असे आज आपल्याला समजण्याचे कारण नाही. आपल्या आधी होऊन गेलेल्या लोकांच्या सद्भावना, आशाआकांक्षा, अन्यायाविषयीचा त्यांचा त्वेष, त्यांचा सत्यशोध, त्यांची आत्मप्रचिती नि भवितव्यावरील त्यांची श्रद्धा याही आपल्याच सिद्धी आहेत हे आपण ओळखावयास हवे. तसेच ज्यांनी आपल्या कालातील अन्याय, जुलूम, यातना, कल्पना सर्वच्या सर्व मुकाट्याने न मानता, संशय घेतला, असत्य वेशीवर टांगले, सत्यावर प्रेम केले, जे लढले, आणि उज्ज्वल भवितव्याखातर ज्यानी प्राणार्पण केले, ते आपलेच आहेत हेही आपण ओळखावयास हवे.

अनुक्रमणिका

परंतु ८०० व्या पिढीचे किंवा आमच्या पिढीचे एक खास लक्षण म्हणजे सामुदायिक प्रमाणावर घडलेल्या एका नव्या जागृतीचा प्रभाव हे होय. ही नवी जागृती म्हणजे इतिहास घडवण्याची जागृती होय. अशी जागृती यापूर्वी फक्त काही निवडक मंडळीमध्येच घडत असे. आज ती सार्वत्रिक प्रमाणावर घडते आहे.

इथे इतिहासाबद्दलची योग्य जाणीव म्हणजे जगाच्या भूतकालांत जे जे घडले, त्याकडे भावनिक आत्मिक नातें जोडावयाचे आहे ही होय. भूतकाळाच्या त्यांच्या सिद्धींकडे, त्यांच्या दुःखांकडे, त्यांच्या वेदनांकडे नाते जोडावयाचे आहे ही होय. अशी योग्य जाणीव नवीन इतिहास घडवण्याच्या कार्याबरोबर आज निर्माण होते आहे ही या बाबत लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

या आधीच्या मनुष्याने या आधी कधीही, आजच्या एवढा भावनात्मक नि आत्मिक वारसा शिरावर वाहिलेला नव्हता. हा वारसा, जो प्रायः जाणीवपूर्व असतोच असे नसले, तरीही तो आमच्या आजच्या भावना, विचार नि कृतींवर परिणाम करीतच असतो.

आधुनिक जीवनाच्या पिसाट धावपळीत, गडबड गोंधळात, गुलामी समाजरचनेविरुद्ध लढलेल्या हुतात्म्यांना, स्पार्टकसच्या साथीदारांना आपण विसरतो. तसेच गॉथिक शैलीतली अभिसुंदर मंदिरे उभारणारांना आपण विसरतो. आबेलार्द नि हेलॉइजचे अमर प्रेम आपण विसरतो. डिसेंबर क्रांतीचा उठाव करणारांच्या पत्नींनी केलेला असिम त्याग रशियन क्रांतिकारकांचे नैतिक धैर्य आपण विसरतो. मी पुनः म्हणेन, कि दैनंदिन जीवनातील मोहजाळांत, आजच्या कंपायमान परिस्थितीत आपण ते दृष्टीआड करतो. पण आपण त्याचा त्याग करू शकतो ? नाही. ते आमच्या अंतःकरणात जिवंत असते आणि म्हणूनच ‘आगामी धक्का’ जेवढा सकृदर्शनी धक्कादायक नि अशुभ वाटतो तेवढा तो होऊ शकत नाही.

मला इथे आधुनिक जग हे अगदी स्थिर व भक्कमपणे उभे आहे असे मुळीच सुचवायचे नाही. या विषयीं प्रस्तुत पुस्तकात मी माझ्या देशबंधूंचे नि जगातलें समकालीन चिंतन आत्मसात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मार्क्सच्या साहित्यात एक अत्यंत महत्वाचा उतारा आहे. त्या उताऱ्यात मार्क्सने भूतकालातील संचित धन जपल्याविना साम्यवाद असंभव आहे असे म्हटले आहे. हे मार्गदर्शनच सोविएत मानवाचे आत्मिक जगत या विषयावर लिहिलेल्या माझ्या एकंदर पुस्तकांचे स्फूर्तिस्थान आहे.

जी व्यक्ती ‘चिरंतन’ स्मृतीत राहते, ती अर्थात आपल्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण आणि कदापिही पुनरावृत्ती करता येणार नाही अशा लक्षणांनी युक्त असते. आपल्या काळाचीच ती अपत्य असते.

‘चिरंतन माणूस’ हे प्रस्तुत पुस्तक मानवात जे चिरंजिवित्व आहे त्याला वाहिलेले आहे. आणि त्याचबरोबर वर्तमानकाळाच्या आत्म्यालाही ते वाहिलेले आहे. वस्तुतः हे पुस्तक चिरंतन नि वर्तमान यांचा मेळ साधण्याला, तसेच त्यांच्या मधील विरोधाभासांना वाहिलेले आहे.

हे पुस्तक लिहिताना ते वाचणाऱ्या वाचकांच्या चेहऱ्यांची कल्पना करण्याचा मी प्रयत्न करीत होतो. हे चेहेरे मला दिसले हांसणारे, कपाळाला किंचित आठ्या पडलेले, तसेच आश्चर्यचकित आणि काहीतरी

अनुक्रमणिका

चुकतंय असे दाखवणारे. जसजसे त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव नाहीसे होऊ लागले, तसतसे लक्ष केंद्रित झाल्याचे आणि त्यातून नवीन विचार निघत असल्याचेही मला दिसले. विचारी चेहरे मला आवडतात. मला त्यांचे कौतुक वाटते. आणि ते जेव्हा माझ्यासमोर येतात, तेव्हा एखादी ओळ किंवा परिच्छेद सार्थकी लागल्याचे मला समाधान वाटते.

मी फक्त एकच गोष्ट इच्छितो, माझ्या वाचकांनी माझ्याबरोबर विचार करावा ही ती गोष्ट होय.

पुस्तक म्हणजे अफाट व अजब विस्ताराचा जणू एक निवासच आहे. काही काळ वाचक तिथे राहतो, आणि मग तो तिथून निघून जातो. पण एखादा तिथे सर्वकाळही राहू शकतो आणि तत्पूर्वी जे तिथे राहू लागले आहेत, त्याना यत्किंचितही त्रास न देता. इथे माझ्याबरोबर वाचक सदैव राहू लागेल अशा आशेने, नव्हे, असे स्वप्न पाहून मी हे पुस्तक लिहिले आहे.

***

अनुक्रमणिका

# नित्शे

वैज्ञानिक नि तांत्रिक क्रांतीने गुंतागुंतीचे तात्त्विक नि मानसिक प्रश्न निर्माण केले असून, त्यासंबंधी बरीच चर्चा आधुनिक जगात चालू आहे. विज्ञान नि तंत्र यांमध्ये घडून आलेला विकास, नाविन्यपूर्ण नि विस्मयकारी असला, तरी हे प्रश्न नवीन नसून, त्यांचा उहापोह गेल्या शतकातील ज्ञानी जनांनी केलेला होता.

या सर्व प्रश्नांत नवीन असे जर काय असेल, तर ते हे की, हे प्रश्न दिवसेंदिवस माणसांच्या वास्तव जगात अधिकाधिक उतरू लागले आहेत. जीवनाच्या अगदी जवळ येऊ लागले आहेत. मानवी जीवनाच्या चिरंजिवित्वाविषयीच पहा ना. चिरंजिवित्वाविषयीचा प्राचीन विचार धार्मिक, अध्यात्मिक नि आत्मगत चिंतनाचा विषय होता. पण आता आर्थर क्लार्क, मानव मृत्यूवर विजय मिळवू शकतो, एवढेच एकेकाळचे स्वप्न सांगत नाही, तर मानव नक्की कधी विजय मिळवून प्रत्यक्षात यांच देही याच डोळां अमर होणार, त्या काळाचे भविष्यही सांगतो.

मानव जातीच्या चिरंतन स्वरूपाच्या प्रश्नांना आज नवी कलाटणी मिळाली आहे आणि त्याबरोबर एक उग्र भयानक स्वरूपही प्राप्त झालेले आहे. जीवनाचा अखेर अर्थच काय? समता समता म्हणतात ती खरी आहे काय? नीतीमूल्यांमध्ये शाश्वत, व्यक्तिनिरपेक्ष, कालनिरपेक्ष असे काही आहे काय? की त्यात काही सत्वच नाही? सारा पसारा क्षणिक, सापेक्ष?

अशा प्रकारचे सखोल चिंतन नि विपुल वादविवाद यांपैकी मी फक्त एकच विषय घेतला आहे. तो म्हणजे नित्शे या तत्त्ववेत्त्याच्या तात्त्विक वारशाचे पुढे काय हा होय. खरे म्हणजे, हा प्रश्नही जसा जुन्यापैकीच आहे, तसाच तो आजच्या समकालीन प्रश्नांपैकीही आहे, नि सर्वांत अधिक लक्षवेधीही आहे.

नित्शेचे नाव आज परत दुमदुमू लागले आहे. अनेक देशांतून नित्शेच्या ग्रंथांच्या नवनव्या पंडिती आवृत्त्या प्रसिद्ध केल्या जात आहेत. आणि त्याच्या तत्त्वज्ञानावर अधूनमधून अगदी पद्धतशीरपणे वर्तमानपत्रात लेख प्रसिद्ध होताहेत. यापैकी अगदी ताजा लेख लुइ सुबिस या फ्रेंच वृत्तपत्रकाराने प्रकाशित केला आहे. या लेखाचे 'आमच्यामध्ये नित्शे' हे शीर्षकही मोठे मासलेवाईक आहे.

ज्यों ऑगेर दुर्बिजो या ख्यातनाम समाजशास्त्रज्ञाने लिहिलेली एक कादंबरी पण अशीच होती. या कादंबरीचा नायक नित्शेप्रणीत विचारगंडाप्रमाणे आपण आचरण करायचे म्हणून टुरिन शहरापर्यंत प्रवास करतो—जिथे 'बरे नि वाईट याच्या पलीकडे' या ग्रंथाच्या कर्त्याने कीर्ती नि दुःखभोग यानी भरलेले अखेरचे दिवस काढले होते. नित्शेचे तत्त्वज्ञान आज आधुनिक तंत्रशाहीच्या विचारात व नीतीमत्तेत घुसडविण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही त्याच्याबाबतींत अधिक ठळकपणे दिसून येणारी गोष्ट आहे.

नित्शे खरोखरच बुद्धिवाद विरोधी होता आणि सत्याच्या आकलनाच्या बाबतीत तो अंतःस्फूर्तिवाद मानणारा होता. वैज्ञानिक विषयाबाबत त्याची वृत्ती उपरोधात्मक होती. बुद्धिवाद्यांचा तो द्वेषच करी. सध्या त्याच्या नावाचा तंत्रसत्ताधिशांनी उदो उदो करावा, ही २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील एक विरोधाभासच म्हटला पाहिजे. या विरोधाभासाची कार्यकारण-यंत्रणा जाणून घेण्यासाठी सिल्स मारिया मठात राहणाऱ्या त्या बैराग्याच्या आयुष्यातील काही घटना आठवाव्या लागतील.

अनुक्रमणिका

एलिझाबेथ फोस्टर नित्शे, ह्या नित्शेच्या बहिणीने नित्शे वापरायचा ती काठी हिटलरला भेट म्हणून दिली तेव्हा ती ९० वर्षांची बाई होती. आपली ती काठी घेऊन तो तत्त्ववेत्ता आल्प्स पर्वतातील हिरव्या कुरणांतून, व्हेनिसच्या कालव्यातून आणि निस शहराच्या रस्त्यातून हिंडत असे. चिमुकल्या बांध्याच्या ह्या बहिणीने तरुण वयांत भावाला खूप स्फूर्ती दिलेली असली, तरी या भावाबहिणींमध्ये विशेष साम्य काही नसावे असे दिसते.

नित्शेच्या तरुणपणी काही जर्मन व्यापाऱ्यांनी सद्‌हेतुपूर्वक त्याला एक विपरीत भेट दिलेली होती—व्होल्तेरचा पुतळा त्यांनी त्याला दिला होता. त्या दिवशी एलिझाबेथ खूप रडली होती. विचारस्वातंत्र्य म्हणजे हा असला प्रकार आहे तर. त्यांना माझा भाऊ पॅरिसच्या त्या माकडाचा अनुयायी झालेला हवा आहे. व्होल्तेरचे विचार म्हणजे जर्मन प्रतिष्ठेचा उपमर्द, जर्मन प्रतिष्ठेवर कुठाराघात असे तिला वाटे. नित्शेची बहीण पुढेंही कधी वृत्तीने बदलल्याचे ऐकिवात नाही.

हिटलरने नित्शेच्या त्या काठीवरून जेव्हा कौतुकाने आपली बोटे फिरवली, तेव्हा एलिझाबेथला केवढी अपूर्व धन्यता वाटली! हिटलर काही तत्त्ववेत्ता नव्हता. पण तत्त्ववेत्त्याच्या काठीची भेट त्याने अभिमानाने स्वीकारली होती. आल्प्स पर्वतातून हिंडताना नित्शेला 'नित्य पुनरागमना'ची कल्पना ज्या दिवशी स्फुरली, त्या दिवशी कदाचित ती काठी त्याच्या हाती असावी. त्या दिवशी तो रडला. कारण प्रत्येक क्षणाचे पुनरागमन होते. म्हणजे प्रत्येक बदलणाऱ्या प्रक्रियेला नित्यत्व प्राप्त होते अशी त्याची धारणा होती. कोणी सांगावे, कधीतरी आपल्यासारखाच एखादा पर्वतातल्या याच खडकावर परत बसेल आणि हेच सत्य शोधून काढील. नियतीनेच आपणाला मुद्दाम उत्तुंग शैलशिखरावर (साडेसहा हजार फूट उंचीवर) उचलले होते असे त्याला वाटले. केवळ समुद्रसपाटीवरची ही उंची नव्हे, तर जगाच्या आकलनाबाबत क्षुद्र आकलनाहून कितीतरी उत्तमोत्तम आकलनात आपण ओढले गेलो आहोत अशी ही भावना.

बहिणीप्रमाणे जर तो आणखी काळ जगला असता, आणि हिटलरला आपली काठी घेऊन प्रदर्शन करताना त्याने पाहिले असते, तर 'नित्य पुनरागमना' विषयी त्याला काय वाटले असते? नित्शेची शिकवणूक जर खरी मानावयाची, तर हिटलरने ज्या घटनांना जन्म दिला, त्या घटनांच्या पुनरावृत्तीचीही कल्पना करावयाची काय ?

नित्शेला दुसरे कोणी नव्हते, अगदी एकाकी जीवन तो व्यतीत करीत होता. असे असूनही, आपल्या बहिणीचे वोल्तेरचे नावही न खपणाऱ्या एका तुच्छ राष्ट्रीय दुराभिमान्याबरोबर जेव्हा विवाह केला, तेव्हा त्याने तिच्याशी संबंध तोडले. नित्शेला मोंतेंज, स्तांदाल आणि दोस्तोएवस्की या प्रतिभावंतांविषयी अतीव आदर होता. संगीताच्या संगतीविना जगणे त्याला ठाऊकच नव्हते. समकालीनांनी लिहून ठेवलेल्या त्याच्याविषयीच्या आठवणी पाहिल्या, तर नित्शे दयाळू अंतःकरणाचा होता, भोवतालच्या लोकांबद्दल सहानुभूती नि कणव बाळगणारा होता असे दिसते. नि संकोची आणि लाजाळू तो इतका की, ज्या बाईवर त्याने प्रेम केले, तिच्यापाशी आपली प्रेमभावनाही तो बोलून दाखवू शकला नाही.

मानवतेला धीरोदात्त नि बलवंत करण्याचे नित्शेचे स्वप्न होते : समाजापासून अलग अगदी विमनस्क असे जीवन तो जगला आणि अनेक जुन्या पूज्यभावांचे नि मूर्तींचे त्याने भंजन केले; त्याचबरोबर अनेक प्राचीन मूल्यांचे त्याने पुनर्मूल्यांकन केले. परंतु त्याने जे ग्रंथ लिहिले त्यानी त्या काळचा जर्मन देश प्रभावित झाला नाही. जर्मनीची ही अनास्था विपरीत वाटली, तरी ती सत्यच होती. तसेच कर्ममार्गाची नि

कर्मवीरांची महती त्याने गायिली असली, तरी स्वतः मात्र त्या मार्गाने जाण्याचा त्याने कधी प्रयत्न केला नाही.

आपल्या भोवताली घडणाऱ्या साध्यासुध्या गोष्टींबाबतही नित्शे खूप सावध असे. उष्णतामानात किरकोळ बदल झाला, तरी त्याला तो सहन होत नसे. त्याचे हृदय नि आत्मा इतका हळुवार की, लुव्र शहरात कुठे आग लागली, तर तो ढळाढळा रडला. मेंदूच्या दुर्बळतेने नंतर तो इतका घेरला गेला की त्याची अखेरची दहा वर्षे अगदी अंधारमय दशेत रुग्णालयात गेली.

श्रीमंत नव्हे, पण जुन्या वळणाच्या सुखवस्तु नि प्रतिष्ठित घराण्यात जेव्हा तो जाई, तेव्हा मात्र भलत्याच कल्पनारम्य धाडसी क्रौर्याची भुलावण तो व्यक्त करी.

'क्रौर्य ही माणसाची फार प्राचीन करमणूक आहे' असे तो बोलून दाखवी. 'वेडा होऊ द्या रे मला ! अमर देवांनो, मला पागल बनवा तरच माझा माझ्यावर विश्वास बसेल !' हे त्याचे पालुपद होते.

हिटलरच्या जमान्यात जर तो जगता, तर त्याला वेड्याच्या दशेत मरण आले नसते, तर कृत्रिम मार्गाने त्याचे मरण ओढवले असते. शासनाचा तो बळी झाला असता आणि कैदखान्यात त्याला मरावे लागले असते. अर्थात हा विरोधाभास असला, तरी तो खराच आहे. फॅसिस्ट राजवट नित्शेसारख्यांना तापदायक ठरली असती. ना प्रतिभेच्या मुक्त विलासाकडे, ना शारीरिक दुर्बलतांकडे दुर्लक्ष करणारी ती राजवट होती. हिटलरचे युयुत्सु अज्ञान, उथळ लोकानुनय नि दुर्दैवी विदूषकीपणा यांमुळे नित्शेचा नैतिक पिंड, विशेषतः त्याची सौंदर्यवृत्ती नि भावना निश्चितच दुखावल्या असत्या.

नित्शेला प्राचीनत्वाचे भलतेच आकर्षण होते. नव्या 'शोकपर्यवसायी व्यक्तित्वाच्या' उदयाची नि शोकाला शौर्याने तोंड देणाऱ्या 'शोकदग्ध युगा' ची तो स्वप्ने पाहत होता. पण हिटलर? हिटलर तर एस्किलसच्या नायकांपासून फारच दूर होता.

परंतु विरोधाभास असा, किंवा मार्क्स, एंगल्स म्हणत त्याप्रमाणे इतिहासाची विपरीत चाल अशी की, हिटलरचे सरकार, हिटलरचा पक्ष, हिटलरची विचारसरणी तसेच त्याचे क्रौर्य, शक्तीपूजा नि विवेकदुष्टता हे सारे नित्शेच्या तत्त्वज्ञानाचेच तार्किक फलित होते, रक्तांकित शैलशिखर होते.

हिटलर काही विद्वान नव्हता. त्याने ब्रह्मज्ञानी प्लेटोचे ग्रंथ वाचलेले नव्हते, किंवा ना माँतेजचे मनोहारी साहित्य वाचलेले होते. त्याने नित्शेच्या तत्त्वज्ञानाचा गाभा टाकून दिला. त्याची भव्यदिव्यासाठीची—बल, ओज, तेज आदीची—तळमळ सोडून दिली. झरथुष्ट्राचे चिंतन करताना जी काठी नित्शेकडे होती ती त्या नाझी फ्युहररने उलटी फिरविली नि त्याचवेळी त्या काठीचे भवितव्य ठरले गेले.

झरथुष्ट्र जर खरोखरीच अस्तित्वात असता, तर तो दिव्य दृष्टीचा ज्ञानी, ज्या दिवशी ९० वर्षांच्या एलिझाबेथने नित्शेची ती काठी हिटलरला प्रदान केली, त्या दिवशी रुदन-हास्य हसला असता !

नित्शेने ‘एवम् ब्रवी झरथुष्ट्र’ (असे वदला झरथुष्ट्र) या आपल्या पुस्तकात ‘नित्य पुनरागमना’च्या शिकवणुकीचे आणि अतिमानवाच्या संकल्पनेचे प्रतिपादन केले आहे. त्याचा झरथुष्ट्र म्हणतो, ‘मानव शरमेचे नि दैन्यदुःखांचे अपत्य असून त्यावर मात करून आपल्याला पुढे जावयाचे आहे.’ या कारणास्तव ज्ञानी झरथुष्ट्राचे वास्तव्य उंच पर्वतराजीमध्ये असते, जिथे ते सप्त-विजनातील एकांताचा अनुभव घेत असतात. दीन सामान्यजन त्याच्या दृष्टीलाही पडता नयेत. अगदी क्वचितच झरथुष्ट्र सामान्यांमध्ये उतरण्याचे साहस करणार आणि तेव्हाच ते आपल्या शांत एकांत चिंतनाने लाभलेली सत्ये सामान्यांना उघडी करणार.

झरथुष्ट्र आणि अर्थात त्याच्याबरोबर नित्शे, मानवाकडे कोणत्या तरी श्रेष्ठ प्राप्तव्याप्रत जाणाऱ्या मार्गावरील संक्रमणकालीन प्राणी म्हणून पाहतात. अर्थातच, आज अस्तित्वात असलेल्या मानवाचे मूल्य त्याना नगण्यच वाटणार. मानवाच्या अस्तित्वाला आज काही किंमत त्यांच्यामते असलीच, तर ती त्या उच्च व्यक्तीपुरती आहे, जी जीवनाच्या शोकमयतेतही स्मितहास्य करते, नि या ऱ्हासाच्या मार्गावरील जगात श्रेष्ठ संस्कृती प्रस्थापित करते. नित्शेप्रणीत उच्च व्यक्तिमत्त्व आधुनिक मानवाला दुर्बळ बनवणाऱ्या करुणा, दया, स्वार्थत्याग आदी सद्‌गुणांपासून दूर असते. नित्शेला अभिप्रेत असलेली उच्च मनोवृत्ती युद्धक्रंदन नि कलात्मकता यांची भलामण करते. नित्शेचा झरथुष्ट्र गेल्या २५०० वर्षांच्या युरोपीयन संस्कृतीमुळे घडलेल्या मानवाच्या अधःपतनापासून मानवजातीला वाचवून तिला श्रेष्ठ बनवणार आहे. मानवाला मूल्ये निर्माण करावयास तो प्रवृत्त करणार आहे. नित्शेच्या झरथ्रुष्ट्राला मानव ही निराकार मृत्तिका, आकारहीन शीलखंड वाटतो, ज्याला आकार देण्यासाठी, ज्यावर संस्कार करण्यासाठी शिल्पकाराची गरज आहे.

नित्शेच्या झरथुष्ट्राची उत्साही वीरवृत्ती, प्रेम नि करुणा या दोहोंच्याही पलिकडची आहे. ‘मानवाबद्दलच्या अत्यंत तुच्छतेच्या नि तिरस्कारवृत्तीच्याही पलीकडची.’ कल्याणाच्या मागे लागून मानवाची सृजनशक्तीच संपुष्टात आली असे त्याचे प्रतिपादन आहे. म्हणूनच नित्शे परत परत म्हणायचे की ‘निर्मात्यांनी निष्ठुर, निग्रही बनले पाहिजे.’

नित्शेच्या झरथुष्ट्राचे थ्रुपदही असेच होते. निर्मितीची त्याची तीव्र इच्छाशक्ती फिरून फिरून शिन्नी पत्थराकडे धावावी तशी मानवाकडे धावते. तो कळवळून सांगतो, ‘अरे ! माझ्या मनीची प्रतिमा किंवा प्रतिमांची प्रतिमा अत्यंत कठीण पाषाणातसुद्धा माझी प्रतीक्षा करीत आहे, स्वप्ने पाहत आहे, घोरत बंदिस्त पडली आहे. माझा हातोडा त्या बंदिशाळेच्या भिंतीवर वाटेल तसे आघात करीत सुटला आहे. लहान लहान तुकडे हवेत पडत आहेत. पण मला त्याची पर्वा नाही. मला त्याचे काय आहे !’

झरथुष्ट्राला वाटते की, अतिमानवाचे सौंदर्य त्याच्यात अवतरत असून त्याच्या हातोड्याचा विषय असलेला खडक जणू भारला जाऊन छिन्नभिन्न होत आहे. “भले मला देवतांचा आता उपयोगच काय ?”

अतिमानवाची कल्पना ना या तत्त्ववेत्त्याने, ना त्याचा आदर्शपुरुष जो झरथ्रुष्ट्र त्याने कधी नीट, निश्चित, हाताला लागेल अशा स्वरूपात मांडलेली आहे.

नित्शेची काव्यात्म कल्पकता वास्तवात उतरावयाची, तर त्यातील अतिशय महत्त्वाचा भाग वगळावा लागेल व तो जर का वगळला, तर जे राहील ते क्षुल्लक असेल. नित्शे बिलकूल न जुळणाऱ्या तत्त्वांचा मेळ साधावयाचा प्रयत्न करावयाचा. विसंगतीची संगती घडवायचा प्रयत्न करायचा. युयुत्सुवृत्ती

नि कलोपासना, क्रौर्य नि सृजन-सामर्थ्य, निर्दयता नि गूढ अतर्क्यातून निपजलेली माणुसकी, जगाकडे पाहण्याचा दुःखांत दृष्टिकोन नि समवेदनांचा बऱ्याच प्रमाणात अभाव आदी कल्पनांचा मेळ फक्त काव्यात्म कल्पकतेचाच भाग होऊ शकत असल्यामुळे नित्शे मानवाच्या भावी वारसदाराची वास्तवांतील जिवंत प्रतिमा निर्माण करू शकला नाही.

वास्तववादी कला काय, किंवा खुद्द जीवन काय, त्याचे वादातीत, अटळ व आवश्यक नियम असल्यामुळे नित्शे विचारांचे एक तांडव निर्मिण्यापलीकडे जाऊ शकला नाही !

आणि नित्शेप्रणीत वड्या लोकांचा स्वर्ग जवळ येताच नित्शेचा अतिमानव वास्तव सृष्टींत अगदी बाळबोध अंकगणित करणारा प्राणी ठरला. समाजाचे बीजगणित त्याला झेपेचना. नकारात्मक गुणांचा तो पुतळा ठरला. पण चांगल्या गुणांचा मात्र त्यामध्ये अभाव दिसला. त्याचे युद्धप्रेम जरूर दिसले. पण कलाप्रेम आटलेले आढळले. तो क्रूर निःसंशय होता, पण सृजनशक्तीचे वरदान नसल्यामुळे निर्मितीशून्यही. दयाशील तर तो नव्हताच. पण प्रगूढ, अदृश्य स्रोतातून निपजणारी माणुसकी ? त्याचे काय ? तीही अदृश्य झाली. नि अखेर शुद्ध बैलाइतका संवेदनाशून्य तो बनला. ते सोडा. पण जगाविषयीची उंच, शोकदग्ध, शोकात्मक दृष्टी, ती तरी त्यामध्यें दिसली काय ? छे. त्याचा पूर्ण अभावच नित्शेच्या अतिमानवात दिसला.

अतिमानवाच्या हातोड्याच्या घणांनी खडकाचे उडालेले तुकडेच (नित्शेच्या झरथुष्ट्राने तुच्छ मानलेले सद्गुणी, उदास सामान्यजन) त्या निर्घृण हातोड्यावाल्या वीर पुरुषापेक्षा अखेर कितीतरी पटीने अधिक धैर्यशाली ठरले!

अतिमानवाची कल्पना नित्शेच्या अनुयायांना जिंकू शकली, त्याचे मुख्य कारण म्हणजे ती कल्पना तत्त्वज्ञानात्मक नसून काव्यात्मक होती हे होय. फॅसिझमच्या उदयाआधीचे नित्शेचे अनुयायी हे अर्थप्रतिष्ठित बुद्धिजीवी असून कल्पनारम्य जगात वावरणारे ते 'बुर्ज्वा' प्रामाणिक लोक होते. 'नव मानवजात' निर्मिण्याची अमूर्त स्वप्ने त्यानी पाहिली होती.

नित्शे तत्त्वज्ञानाची भाषा बोलू लागला, तो अतिमानवाच्या कल्पनेला आवश्यक सामाजिक परिस्थितीचा, 'अवनत बहुसंख्य जनता,' जातीजमाती, आणि लष्करी सत्ता, आदींचा गंभीरपणे विचार करू लागल्यानंतर तसा तो अतिशय तर्कशुद्ध तत्त्वज्ञानाची भाषा बोले. तसेच या विषयावरची त्याची विखुरलेली टिपणे सगळीच्या सगळीच कल्पनारम्य आहेत असेही नव्हे. काही खूप विधायकही आहेत. जरी त्यानंतर लगेच तो बुद्धिभ्रंशाच्या आजाराला बळी पडला असला, तरी त्या टिपणांत मानसिक रोगाची लक्षणे दिसत नाहीत.

कल्पनेत रमणाऱ्या त्याच्या अनुयायांना खूप कमी कळलेल्या नित्शेने आपल्या कल्पनेचे सारसर्वस्व ज्या शैलीत स्पष्ट केले होते, त्या शैलीला वास्तविक, तांडवशैली किंवा झरथुष्ट्र शैलीही म्हणता येणार नाही. मानवाला शक्य तेवढे अधिक कर्मप्रवृत्त स्थान नित्शेला द्यावयाचे होते. अधिक अचूक सांगावयाचे तर चांगल्या हुकमी यंत्राचे स्थान द्यावयाचे होते असे म्हटले तरी चालेल. तसेच त्याला असेही वाटले असावे की, माणसाला दुःख सहन करावयाला शिकवण्याची, दुःखात दडलेल्या त्याच्या उच्च भाग्याचा शोध घ्यावयाला शिकवण्याची गरज आहे. त्याचबरोबर त्याला असेही वाटले असावे की माणसाला निव्वळ यांत्रिक अस्तित्वाच्या पातळीवर उभा करून तिथेच त्याला धीरोदात्त, महोन्नत म्हणून पहावे. आणि त्या

निव्वळ अस्तित्ववादी आवश्यकतेलाच देवत्व प्रदान करून सर्वसामान्यांच्या गुणांवर आधारलेल्या विशाल, वर्धिष्णु पायावर महान संस्कृतीचा उदय घडवावा.

तसेंच अजून अनेक वर्षांपर्यंत मानवाच्या प्रतिष्ठेला कात्री लावणे हाच प्रमुख उद्देश असावा लागेल. म्हणून आधी विशाल पाया घालूया आणि त्यावर भक्कम मानवजात उदयाला आणूंया ! आता कोणालाही हे पटावे की, हे पोराचे बोलणे नव्हे. झरथुष्ट्राच्या गीतांजलीतून आणि त्याच्या चरित्र आणि अमर सौंदर्यातून ते स्फुरलेले होते !

पण हे वास्तव सत्य आहे, की अर्थप्रतिष्ठित संस्कृतीने माणसाची अधोगती घडविली आहे. माणसाला यंत्राचे गुण आणि मुबलक भोग चिकटवला आहे. अर्थप्रतिष्ठित समाजरचनेने माणसाला अतिमानव बनवण्याऐवजी त्याला अगदी गणितात्मक काटेकोरपणाने, बिनदिक्कत रसातळाला गाडलेले आहे.

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ एरिक फ्रॉम लिहितो त्याप्रमाणे मानव आज मेला आहे, आणि असा दिवस फार दूर नाही, ज्या दिवशी मानवाचे स्थित्यंतर संपूर्ण यंत्राच्या एका अंशभागात झालेले दिसेल. हा मानव खाऊनपिऊन फुगलेला असेल, त्याच्यापाशी करमणुकीची साधनेही विपुल असतील, पण तो सृजनहीन असेल, तो मुर्द्यासमान बिनसंवेदनेचा मानव असेल ! अशा मातीत बलवान मानवता कधी निपजली नाही व निपजणारही नाही.

मानवाला अवनत करण्याची कल्पना कवी-कल्पनेत रमणाऱ्या नित्शेचे एका सामाजिक विचारवंतात झालेले परिवर्तनच फक्त दर्शवीत नाही, तर पश्चिमी युरोपियन कल्पनेचे, विशेषतः पश्चिमी युरोपियन भावनेचे विचित्र, विषण्ण स्वरूपात झालेले स्थित्यंतरही दर्शविते. १९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच अनेक पाश्चिमात्य बुद्धिमंतांनी महत्तमासाठीची तगमग अत्यंत विक्षिप्त मार्गांनी अनुभवली होती. त्याचेच अखेरचे पर्यवसान मानवाला अवनत करण्याच्या कल्पनेत झाले. ही तगमग अगदी पराकोटीच्या, अगदी शुद्ध आणि कृतिशील स्वरूपात जर कोणी प्रकट केली असेल, तर ती स्तांदाल या नित्शेच्या अत्यंत आवडत्या फ्रेंच लेखकाने होय.

आपण स्तांदालसारखे व्हावे असे नित्शेला सदैव वाटे. समाजजीवनाला ते एक ‘द्वंद्वयुद्ध’ आहे असे समजून माणसाने आरंभ करावा, हा स्तांदालचा उपदेश शिरोधार्य मानून नित्शेने तारुण्यात प्रवेश केला आहे. त्याने डेविड स्ट्रॉस या प्रतिष्ठित, गंभीर तत्त्ववेत्त्याविरूद्ध तो जर्मन दांभिकतेचा पुतळा आहे, अशी प्रखर टीका केली. आणि ही टीका प्रसिद्ध झाल्यानंतर काही दिवसातच तो तत्त्ववेत्ता वारला. दीर्घकाळपावेतो नित्शे मग पश्चात्तापदग्ध अवस्थेतच जगला. आपणच त्या मान्यवर गुणी व्यक्तीच्या मृत्यूला कारणीभूत झालो असे त्याला वाटले. आणि आयुष्यात पुनः कधीच तो ‘द्वंद्वा’ ला प्रवृत्त झाला नाही. एकदा एका व्यक्तीला आव्हान द्यावयास तो तयार झाला होता खरा, पण ती बाब तत्त्वज्ञानाची नसून त्याच्या हिशेबात किरकोळ होती. त्या व्यक्तीने त्याचे प्रेमपात्र झालेली स्त्री त्याच्यापासून हिरावून घेतली होती. पण अखेर नित्शे त्या मोहाला बळी पडला नाही. ती फूस लावणारी प्रेमचोर व्यक्ती तेवढ्या लायकीचीच त्याला वाटली नाही.

नंतरच्या काळात समकालिनांनी त्याला दिलेली तुच्छतेची वागणुकही स्तांदालप्रमाणेच मोठ्या मनाने आपण सहन करावी अशी त्याची इच्छा होती. पण महमनस्कतेचा त्याचा मनोदय मात्र फार काळ टिकू शकला नाही. आपले तत्त्वज्ञान न समजणारा वाचकवर्ग आणि तत्त्वज्ञानविभागांची उदासीनता यामुळे तो दुखावला गेला नि पक्का हादरला. स्तांदालसारखे होण्यासाठी स्तांदालइतकेच महान व्यक्तिमत्त्व असणे आवश्यक होते. स्तांदाल आणि नित्शे यांच्या व्यक्तिमत्त्वांमधले महदंतर हे मानवाच्या श्रेष्ठत्वाखातीरच्या तळमळीपासून शेवटी मानवालाच खाली ओढण्यात झालेल्या अधोगतीचे एक आख्यान आहे. नित्शे हा निःसंशय अभिजात प्रज्ञेचा पुरुष होता. पण स्तांदालचा प्रामाणिकपणा आणि महात्मता मात्र त्याच्यापाशी नव्हती.

जगाची शोकात्म प्रकृती आणि शोकात्म विकार उघड करण्यात स्तांदाल पारंगत होता. त्याच्या आयुष्यकाळातील समकालीन कालखंडाची विपत्ती—महान व्यक्तींचे नि भावनांचे निर्गमन—आपल्या खाजगी जीवनातल्या विपत्तींप्रमाणेच त्याने अनुभवली होती. त्याचे बालपण हा फ्रेंच क्रांतीचा काळ होता तर त्याची तारुण्यावस्था हा नेपोलियनच्या युद्धाचा काळ होता, ज्यात तो सहभागी होता. बुर्बोन राजे पॅरिसला परतले तेव्हा तो अवघा तीस वर्षांचा होता. नेपोलियनोत्तर युरोपचे वातावरण त्याला असह्य झाले.

त्या काळचा युरोप म्हणजे उदयोन्मुख दुकानदारांची आणि मरणोन्मुख उमरावांची भूमी होती. फक्त इटलीमध्ये—रोम, फ्लोरेंस, नेपल्स आदी ठिकाणी त्याला ताज्या हवेचे वातावरण आढळले. तिथल्या क्रांतिकारकांशी झालेल्या वार्तालापांत आणि तिथल्या सामान्यजनांनी धैर्य नि परिश्रमपूर्वक जतन करून ठेवलेल्या जीवनाच्या परिपूर्णतेच्या जाणिवेत त्याने पुनरुज्जीवन अनुभवले. त्या लोकांना प्रेम कसे कारवे, घृणा कशी करावी, लढावे कसे नि मरावे कसे ते ठाऊक होते. आणि स्तांदाल, ज्याचा लुइ १८ व्याच्या नपुसंक नि फसव्या पॅरिसने आशाभंग केलेला होता, तो श्रेष्ठ उत्तुंग भावनांच्या जगात रमत असे. स्तांदालने प्रेम केले होते, घृणा केली होती, तो लढला होता आणि प्रसंगी मृत्यूला कवटाळण्यासही तयार झाला होता. इटलीने त्याच्या उत्कट भावनांची तळमळ शमवली होती.

इथेच त्याला मैतिल्द डेंबोवस्की भेटली होती, जिने त्याला सर्वश्रेष्ठ सुख आणि तीव्र दुःख दोन्ही दिली होती. आणि इथेच त्याला कारबोनारी क्रांतिकारकही भेटले होते. ज्यांनी त्याची मानवावरील नि क्रांतीवरील श्रद्धा दृढ केली होती. स्तांदालच्या अनुभवावरून हे उघड होते की, तशा प्रकारची तगमग केवळ कल्पनेच्या हिकमतीने, कृत्रिम काव्यकृतीने किंवा तात्त्विक शोधाने शमविणे शक्य नसते. ‘अरे इथे प्रत्यक्ष जीवनच पणाला लावायचे असते’.

काही दशकानंतरच्या पिढीचा फ्रेंच लेखक गुस्ताव फ्लॉबेर हा देखील शोकात्मकतेचा भोक्ता होता. त्यालाही त्याचे वातावरण स्तांदालहून अधिक असह्य, अधिक गुदमरवणारे वाटले होते. ‘मादाम बोवारी’ नंतर ‘सालांबो’ मध्ये त्याने तत्कालीन क्षुल्लक जीवनापलीकडे पहाणारी व्यक्तिमत्त्वे रंगविली. त्यासाठी त्याने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील कार्थाजकडे धाव घेतली. अशा तऱ्हेने लेखक फ्लॉबेर याने निःसंशय नामी क्षण अनुभवले. पण त्याने फ्लॉबेर ह्या माणसाचे समाधान झाले काय?

मानवातील श्रेष्ठत्वाखातीर तळमळणाऱ्या स्तांदालने ते श्रेष्ठत्व बाह्य जीवनाबरोबरच आपल्या हृदयात अनुभवण्याचाही शहाणपणा केला. त्याने दूरवरच्या इतिहासात येरझारा घातल्या नाहीत, तसेच कल्पनेच्याही भराऱ्या मारल्या नाहीत, किंवा भलतीच मनोराज्येही गाठली नाहीत. अर्थात स्तांदालच्या

काळातील जगात श्रेष्ठत्व असल्यामुळे स्तांदालला तसे करणे सोपे गेले असे मानण्याचा मोह जरूर होतो. पण खरोखरच मानवजातीच्या इतिहासात असे कालखंड होऊन गेलेच नाहीत, ज्यांतून श्रेष्ठत्व ना कुठे जात, ना नव्याने कुठून येत ?

स्तांदालने स्वतःला वास्तवापासून कधीच तोडले नाही. त्याने एकदाही माणसातल्या माणुसकीची अवहेलना केली नाही. त्याने आपल्या समकालींनांविषयी नि देशबांधवांविषयी नापसंती जरूर दर्शविलेली आहे. पण सर्वसाधारण मनुष्यत्वावरचे त्याचे प्रेम कधीही आटले नाही. लोकांबरोबरच्या आमने-सामने व्यवहारांत जरी तो अनेक वेळा त्रासून वैतागून गेला असला, तरी 'मानव हेच सर्वश्रेष्ठ ध्येय' हा आपला सिद्धांत त्याने कधी सोडला नाही. अगदी पराकोटीच्या भयानक प्रसंगी सुद्धा सर्वसामान्य माणूस नि त्याचे भवितव्य यांविषयी त्याला कधी शंका वाटली नाही. 'शंभर वर्षानंतरही वाचक मला समजून घेतल्यावाचून राहाणार नाहीत.' असे जे त्याचे एक विधान आहे त्याचाही अर्थ आपण कोणीतरी आगळीवेगळी गूढ विलक्षण व्यक्ती असा नसून आपणही सर्वसामान्य माणूस आहोंत असाच आहे. अर्थात महान व्यक्तिमत्त्वें नि भव्य कल्पना आपल्या आयुष्यकाळात नाहीशा झालेल्या पाहून निर्माण झालेल्या चिंतेने त्याचे मानवाविषयीचे प्रेम नि कळकळ अधिकच तीव्र झाली होती. कारण स्तांदाल महान भावना अनुभवणारे एक महान व्यक्तिमत्व होते.

स्तांदालच्या जीवनापासून जो धडा शिकायला मिळतो तो खरोखरच महत्त्वाचा आहे. महान व्यक्तीसंबंधात 'अतिमानवी' असा प्रकार आढळत नाही. नित्शेला स्तांदालविषयी आकर्षण वाटत असले, तरी त्याने स्तांदालच्या जीवनातून मिळणारा धडा मात्र गिरवला नाही. नि स्तांदालसारखे होण्यात म्हणाल, तर त्याला यत्किंचितही यश लाभले नाही. लेखक म्हणून पाहिले, तरी स्तांदालची पारदर्शक स्पष्टता नि सामर्थ्य त्याच्या लेखणीत नव्हती. आणि माणूस म्हणून स्तांदालची थोरवीही त्याच्यापाशी नव्हती.

खरे तर, आपल्यासमोर फक्त नित्शे ही व्यक्ती नसून नित्शेचा आगळाच काळ आहे. आपल्या भर तारुण्यात नित्शेने भव्यत्वाचे आकर्षण नि काहीतरी प्रमत्त दिव्य करून दाखवण्याची ओढ विशेषत्वाने अनुभवली होती. पण ऐन तारुण्यातील काही धडपडीनंतर (स्वयंसेवक डॉक्टर म्हणून त्याने युद्धकाळात केलेली सेवा आणि त्याच्या मनात वसलेला बिस्मार्कविषयीचा करिष्मा) जीवनात पुढे प्रमाथी इच्छाशक्तीचे दर्शन घडवणारे नि शोकनाट्याचा विषय होण्यासारखे बलिष्ट, तेजाळ काही घडू शकेल ही आशाच त्याने सोडून दिली. राजेशाहीच्या नि नोकरशाहीच्या जर्मनीत, तसेच अर्थप्रतिष्ठित बनलेल्या युरोप खंडात, त्याची तळमळ शमविणारे काही विजिगिषु घडेल असे त्याला वाटेच ना. स्तांदालच्या जमान्यात जुन्या जगातील थोर व्यक्तिमत्त्वे तरी गाजत होती. पण नित्शेचा काळ हा यूरोपच्या विकासाचा असा एक टप्पा होता, ज्या टप्प्यांत थोर व्यक्तिमत्त्वाला वावच नव्हता. जुन्या वास्तवतेची सद्दी पूर्णपणे संपलेली होती, आणि नवे जग जी सामाजिक वास्तवता पुढे आणीत होते, त्याने वरिष्ठवर्गीय मनोवृत्तीच्या त्या तत्त्ववेत्त्याला घाम सुटत होता. 'जनसामान्यांच्या समुदायां'ना तो घाबरत असे. मोजक्या श्रेष्ठ लोकांच्या हुकमतीतला समाजच त्याला अभिप्रेत होता. फ्रान्समध्ये 'पेर ला शेज' येथे 'कमुनार्ड' क्रांतिकारकांना भिंतीत चिणून ठार मारले म्हणून यूरोपातील नव्या दमाची अंतःकरणे हळहळली. ढळाढळा रडली तर नित्शे? रस्त्यारस्त्यात घडलेल्या चकमकींमुळे लुब्र शहरात वणवा पेटून त्याची आवडती, सुंदर निसर्गदृश्ये कुरूप झाली म्हणून हळहळला!

अनुक्रमणिका

ज्या गृहस्थाला आपल्या अवतीभोवतीच्या परिस्थितीत सुखसमाधान मिळेनासे होते तो कलेच्या इतका बेहद्द आहारी जाऊ शकतो की, जणू तो कलेने मंतरला गेला आहे असे वाटावे. पण मग तो जगाचे जे शुद्धसौंदर्यात्मक आकलन करू लागतो, त्याची परिणती अखेर एका क्रूर, गूढ न्यायाने खऱ्या सौंदर्याचा गळा घोटण्यात होते. विलक्षण आभास त्याच्या डोक्यात निर्माण होतात. सामाजिक अन्यायाच्या कळसाचा काळ हाच सौंदर्याच्या विकासाचा काळ अशासारख्या भयानक समजुती मग वाढीला लागतात.

पॅरिस कम्यूनच्या घटनेआधी काही महिने पोलादी चॅन्सलर बिस्मार्क याच्या सैन्याने पॅरिसवर आक्रमण केले. त्यावेळी जखमी सैनिकांनी घेरलेल्या भाषाशास्त्रज्ञ डॉक्टर नित्शे महाशयाना ते युद्ध आदर्शअशा बलवर्धक ध्येयाने प्रेरित झालेले, अप्रतिम सौंदर्याचा व्हिनस डीमेलो हा पुतळा मुक्त करण्यासाठी चाललेले युद्ध वाटले. शुद्ध सौंदर्यवादी दृष्टिकोनातील अभिप्रेत नैतिकता अमर कलाकृतींवर प्रेम करते खरी, परंतु मानवतेच्या सौंदर्याचे, मानवतेच्या मोलाचे भान त्यात असत नाही. आणि त्यामुळे शुद्ध सौंदर्यवादी जागतिक दृष्टिकोन अंती जीवनातले सौंदर्यच नष्ट करावयास कारणीभूत होऊ शकतो. शुद्ध सौंदर्यात्मक दृष्टिकोनाने प्रेरित होऊनच नित्शे साहेब शहाजोगपणे विचारतात, ‘एखाद्या जंगली देखाव्याचे चित्र जर आपण कौतुकाने पाहू शकतो, तर क्रूर माणसाचे कौतुक का पाप ठरावे ?’ त्या युयुत्सु सौंदर्यवादी तत्त्ववेत्त्याला खरोखरच वाटे की, मनुष्यप्राण्याला शुष्क नीतीवादाचे गलिच्छ अवडंबर टाकून द्यावयाला, नीतीच्या पलीकडे उडायला, जर आपण शिकविले नाही, तर जीवनाचाच कोंडमारा होईल!

नीतीपलिकडे जाणे म्हणजे एक स्वैर नृत्य आहे, विलक्षण तांडव आहे अशी त्याची कल्पना होती. पण वस्तुस्थिती अशी की एकदा का माणसाची नीती सुटली की, त्याचे जीवन अधिक गुलाम, अधिक बंदिस्त बनते, यंत्रवत होते. खरे तर, जीवनाचा आत्माच जीवनापासून विलग होतो. तर सदाचाराने जीवन उलट ताजेतवाने सतेज बनते.

महत्तमाच्या शोधात असलेले नित्शे जेव्हा इतिहासाकडे वळले, तेव्हा ते जीवनापेक्षा कलेकडेच अधिक आकृष्ट झाले. ते समकालीन जर्मनी व यूरोप सोडून प्राचीन शोकनाट्याच्या जन्माच्या काळापर्यंत जाऊन भिडले. प्राचीन शोकनाट्याने त्यांच्या अतर्क्यावरच्या प्रेमाची पूर्ती केली. कारण प्राचीन शोकनाट्य क्रूर नि मदमस्त मदिरेची देवता जी डियोनिसुस त्यापासून निर्माण झाले आहे अशी समजूत.

प्राचीन काळचा मनुष्य अस्तित्वाच्या नवतेने भारला जाऊन प्रथमच स्वतःच्या अंतर्यामीची अनावर चैतन्यशक्ती अनुभवू लागला होता. उत्फुल्ल जीवनोल्लासाने मंतरले जाण्याचा तो काळ होता. त्या काळातील जीवनाच्या चैतन्यमय भावनेने शोकनाट्य निर्मिले, ज्यात नव्या जगाच्या मूळारंभाचा आवेग आविष्कृत झाला. शोकनाट्य हा ‘विक्रमशाली वसंत ऋतूचा फुलोरा होता सुखसंवेदनांचा, अनावर वासनांचा होलिकात्सव होता.’

नित्शेला शिथिलतेचा, ऱ्हासाचा, तिटकारा वाटे. बळाचे तो कौतुक करी. नेभळटाची निंदा नि बळाची प्रशंसा त्याच्या साहित्यात भरपूर आढळते. त्याला स्वतः आपण एक जेता, नेता, दर्यासारंग, पराक्रमी वीर वगैरे बरेचसे व्हावयाचे होते. पण वास्तवात यापैकी तो काहीच होऊ शकला नाही. एक म्हण आठवते, ‘खरा भला माणूस भलेपणाविषयी क्वचितच बोलतो व खरा वीर शौर्याच्या गप्पात क्वचितच रमतो.’

अनुक्रमणिका

तत्त्ववेत्ता शोपेनहॉर यानी देखील शिवत्वाचा नि करूणामयाचा खूप विचार केला होता. पण सद्‌भावना म्हणे त्याच्यापाशी अभावानेच तळपत होती. नित्शेनेही बलोपासनेचे तत्त्व स्वतःच्या जीवनात फक्त शक्तीमहात्म्य गाण्यापुरतेच बाळगले होते. वास्तविक नित्शेची सत्ताभिलाषा हे ऱ्हासाचेच अत्यंत धोकेबाज स्वरूप होते. स्वतःविषयीच्या भलत्याच अफलातून कल्पना त्याने उराशी बाळगल्या होत्या. अतीव अनावर जीवनशक्ती स्वतःमध्ये वसत असून ती आपणाला सतावीत आहे अशा समजुतीच्या मिथ्य कथाही त्याने रचल्या होत्या. आपला रोग, आपली उन्मादावस्था या आपल्यातील अतिशक्तीजन्य अशा अवस्था आहेत असे तो प्रतिपादन करी.

प्राचीन शोकनाट्याच्या उत्पत्तीविषयीचा आपला ग्रंथ लिहून झाल्यानंतर लिहिलेल्या एका पत्रात नित्शे साफ साफ सांगून टाकतो, ‘मला वास्तव जगाचीच भीती वाटत्येय. मला वास्तव असे काही दिसतच नाही मुळी; सारे स्वप्नजाल वाटते. कदाचित, मला काही दिसतच नसावे. नाही मला दिसत. मी पहावयालाच घाबरतो.’

माणसाला या जगात जर वास्तव असे काही सापडेनासेच झाले, तर त्याला जगणेच अशक्य होऊन बसेल. या वास्तवतेच्या शोधातच नित्शे प्राचीन शोकनाट्याकडे वळला असेल. परंतु अनेक शोध लावल्यानंतर सुद्धा—अर्थात आत्मगत स्वरूपाचे शोध—जिवंत वास्तवाची जागा घेईल अशी वास्तवता काही त्याला इतिहासात सापडू शकली नाही असे त्याच्या पत्रांवरून उघड होते आणि कोणालाही झाले तरी भलतीकडेच ती कशी सापडेल हो ?

‘वास्तवता हरवली’ हे आहे नित्शेच्या वैयक्तिक शोकांतिकेचे अगदी योग्य वर्णन. डोंगरात जाऊन आपल्या झरथुष्ट्राबरोबर चिंतन करणे व तिथें तरी भविष्यकाळातील वास्तवता सापडते काय ते पहाणे याशिवाय त्याच्याकडे उरलेच होते काय? नित्शे तिथे परमानंद अनुभवतो. आणि हो. हेही सांगितले पाहिजे, की हरवलेली वास्तवता त्याला एकदाची सापडली. भविष्यात सापडली. परंतु ते कसे शक्य आहे? हो. ते शक्य आहे. कारण अतिमानवाने फार फार पूर्वी एकदा आपल्या अतिरिक्त सामर्थ्याने प्राचीन शोकनाट्याचे सर्जन केले होते ना? वास्तविक, नित्शेला साररूपाने नवे असे काही भविष्यात आढळतच नाही. जीवनाविषयीच्या त्याच त्याच बलसिद्धीच्या कल्पना, ‘निशाधुंद अस्तित्व’ ‘विजयोत्साही वसंतराज’ ‘आनंदोत्सव’ आदी भरपूर मसाला त्याला भविष्यात सापडतो. वास्तविक, अतिप्राचीन भूतकाळातील त्याला अतिशय प्रभावित करणाऱ्या चीजाच त्याने सरळ भविष्यांत भिरकावल्या. अर्थात त्याच्या अतिमानवाच्या शोधाने हवेत उडालेला प्रारंभिक जल्लोशाचा धुरळा खाली बसायला कांही फार काळ जावा लागला नाही.

तरुणपणी नित्शेने लिहिले होते की, प्रतिभाशक्ती नि कलाविलास हीं जर ग्रीक संस्कृतीची अंतिम उद्दिष्टे असतील, तर ग्रीक समाजाची सर्व स्वरुपे त्या महान ध्येयाकडे जाणाऱ्या पथावरील आवश्यक यंत्रणा मानल्या पाहिजेत. व गुलामगिरीही त्या यंत्रणापैकीच एक यंत्रणा होय.

तरुण नित्शे क्रौर्याच्या विलक्षण प्रकारांनी भयकंपित व्हायचा, नि त्याचबरोबर त्यातील आसुरी सौंदर्याने मोहरून जायचा, असे त्याच्या एका चरित्रकाराने म्हटले आहे. ‘झरथुष्ट्र’ लिहून झाल्यानंतर तो जेव्हा उच्चभ्रू लोकांच्या व लष्करी जातींच्या लोकांच्या सत्तेविषयी विचार करू लागला, तेव्हाच गुलामीविषयी मागचा पुढचा विचार न करता अगदी भावनाशून्य व निगरगट्ट मनाने तो लिहू शकला.

अनुक्रमणिका

जिवंत वास्तवतेशी ज्यांचे नाते तुटलेले असते, ते लोक अंती प्रतिगामी कल्पना खेळवणारे कल्पनारम्यवादी बनणे अटळ असते. स्वतः जगत असलेल्या जगांत ज्यांना महान विभूती नि वेड लावणारी ध्येये आढळत नाहीत, ते आपल्या जगावर अशा अकाट्य व कल्पनारम्य रीतीने जणू सूड उगवत असतात. आणि यातूनच त्यांची अतिभयानक महत्त्वाकांक्षा जन्म पावते—कधी कधी मानवालाच तुच्छ लेखण्याची, मानवतेचेच अवमूल्यन करण्याची महत्त्वाकांक्षा. अशा प्रकारच्या कल्पनेचा इतिहास, उत्क्रांती, खरोखरच मोठी कुतुहलजन्य आहे. प्रथम या कल्पनेचा आरंभ शोकात्मकतेच्या नि दिव्यत्वाच्या ओढीने झाला : समोर असलेल्या जिवंत वास्तवतेकडे दुर्लक्ष करून त्या ठिकाणी दृष्टिआड झालेला भूतकाळ नि दूरवरचा भविष्यकाळ कल्पून झाली. मग नैतिक मूल्यांची कपात सुरू झाली. सहानुभाव, सदयता, करुणा, शिवत्व याना फाटा देणे सुरू झाले व या सर्वांचा शेवट झाला मानवाचे अवमूल्यन करण्याच्या मनोवृत्तींत नि संभवतः बुद्धिभ्रंशात.

नित्शेतील युरोपियन वृत्तीने जुन्यापुराण्या प्रतिष्ठित कल्पनांचा, चांगल्या जीवनध्येयांचा निकाल लावला. परंतु अशा प्रकारच्या बौद्धिक साहसवादातून अखेर राजकीय साहसबाजीचा जन्म कसा काय झाला, त्याचा मात्र बरोबर पक्का शोध इतिहासकारांनी अजून घ्यावयाचाच आहे. आज ना उद्या तो घ्यावाच लागेल.

एका विशिष्ट अरिष्टाच्या काळातील युरोपियन प्रवृत्तीचा आविष्कार म्हणून नित्शेचे खास महत्त्व आहे. तो गटेचा ‘फाऊस्ट’ किंवा स्तांदाल यांच्या इतकेच यूरोपचे प्रतिनिधित्त्व करतो. खरे तर, यूरोपच्या सर्वात घबाड घृणित शोकनाट्याचा – माणुसकीच्या अधोगतीचा – तो तात्विक दृष्ट्या शिखर-प्रतिनिधी होता. यूरोपच्या नवजीवनकाळातील मानवतावाद त्याने ठोकरून लावला. आणि नवजंगलीवादाच्या वकीलीलाही अधूनमधून त्याचा प्रतिसाद मिळालेला आहे.

१९ व्या शतकाच्या अखेरीच्या महान युरोपियन साहित्यात एक निश्चित प्रवाह आढळून येतो. हा प्रवाह म्हणजे माणसाचाच तिरस्कार करण्याचा प्रवाह. या प्रवाहातील धोका म्हणजे हा प्रवाह उघड न वावरता भुरळ पाडणाऱ्या, उपरोधिक, कल्पनारम्यवादी स्वरूपात वावरत असतो. ज्या कलावंतांनी मानवजातीविषयीचाच अविश्वास व्यक्त केला, त्यानी नव्या शक्तिमान व्यक्तिमत्त्वाच्या सुंदर स्वप्नांनी वाचकांना नि स्वतःलाही चक्क फसवले. ऑस्कर वाइल्ड, क्नुट हमसुन, इब्सेन आणि विशेषतः नित्शेमध्ये हा प्रवाह मुखरित झाला. युरोपियन प्रवृत्तीने माणसाला एकदा जरी देवता मानले असले, तरी आता ती प्रवृत्ती तिथून मागे फिरली आहे. कदाचित हेगेलप्रणीत वैश्विक विवेकबुद्धीच्या ‘कावेबाजपणा’ चेही ते आणखीन एक उदाहरण असू शकेल. इतिहासाच्या हेगेलप्रणीत तथाकथित ‘काव्या’ प्रमाणे महान सभ्यता ही महान तांत्रिक संस्कृती असली पाहिजे, ज्यात माणुसकीचें मूल्य बसू शकत नाही.

अर्थप्रतिष्ठित बनलेल्या युरोपीय संस्कृतीने माणुसकीचा आदरभाव हे अंतिम ध्येय म्हणून कधी मानलेच नाही. ती गोष्ट साम्यवादी समाजरचनेतच फक्त शक्य होईल. कारण माणसाला त्याची मानवता परत प्राप्त करून देणे हे त्या समाजरचनेचे ध्येय आहे. युरोपातील अर्थप्रतिष्ठित मानवतावाद जेव्हा कळसाला पोहोचला होता, तेव्हा देखील जीवनमूल्ये (जी अर्थात क्वचितच स्वार्थातीत होती) सामाजिक आणि आर्थिक सत्तेच्या हितसंबंधांशी मेळ खाणाऱ्या उपयुक्ततावादी संज्ञांशी जोडली गेली होती. महत्तम ध्येय खुद्द मानव नव्हे, तर मानवाला कधी सहसा लभ्य न होणारे, मानवाच्या पलिकडचे काही ओजस्वी तेजस्वी देवदुर्लभ असे. अर्थप्रतिष्ठित मानवतावादाची उत्तुंगता मग जेव्हा पुरती संपली तेव्हा युरोपचीही

ऱ्हासग्रस्त सभ्यता माणसाकडे शोकांतिक नि मर्मान्तिक उपरोधाने पहाती झाली. त्या सभ्यतेला माणसाचाच कंटाळा आला. तिला माणसाशी कर्तव्यच उरले नाही.

उद्याची सभ्यता तांत्रिक संस्कृती बनेल नि त्याचे भवितव्य माणुसकी नव्हे, तर अतिशय संघटित झालेले 'खालच्या दर्जाचे लोक' व तंत्रज्ञानी ठरवतील. आणि अशा तऱ्हेने माणूस जितका 'गुणवान यंत्रा'चे गुणगान करून तांत्रिकतेला शरण जाईल, किंवा दुसऱ्या शब्दात तो जितका पतीत होत जाईल, तितकाच उद्योगिक समाज व त्याच्या पुढचा समाज म्हणे अधिकाधिक बलशाली होत जाईल.

पश्चिमेला आज नित्शेच्या तत्त्वज्ञानात जे स्वारस्य वाटते आहे ते उगाच नव्हे. तसेच, पश्चिमेचे तांत्रिक बळ आणि सामाजिक अरिष्टे दूर करण्याबाबतची माणसाची दुर्बळता, हा केवळ योगायोग नव्हे. अमीर-उमरावांच्या संवयी, पद्धती, शोक आजच्या उद्योगपतींना नि तंत्रशहाना आपल्या दर्जाला शोभणारे सौभाग्यालंकार वाटतात. वास्तविक, चिरंतन जीवनमूल्ये नि ख्रिस्ती नीतितत्त्वे यांविषयी नित्शेइतकेच सोयरसुतक आधुनिक उद्योगशाहीला आहे. जे नाट्यपूर्ण नि अगदी झपाटलेल्या अद्‌भुतरम्य पद्धतीने नित्शेने केले, तेच तंत्रशाही प्रत्यही न चुकता करीत असते. आजचे व्यापारी जग, भावविव्हल गीते न गाता, अगदी मख्खपणे जीवनमूल्यांचे पुनर्मूल्यांकन करीत चालले आहे. या लोकांना अमीर-उमरावांच्या चालीरीतींबाबत बरेच अद्‌भुतरम्य आकर्षण वाटत असले, तरी मुळात त्यांचे लक्ष स्वतःच्या नफ्यातोट्याकडे लागलेले असते.

अमीर-उमरावांची, बड्या लोकांची किंवा उच्चभ्रूंची चालचलणूक स्वतःच्या विशिष्ट स्थानाच्या, स्वतःच्या विशिष्टाधिकारांच्या जाणिवेतून आणि अधिकाधिक सत्ता उपभोगण्याच्या अभिलाषेतून आकार घेत असते. नित्शेने सत्याचा निकषच मुळी बलोपासनेची, बलशालीत्वाची उंची हा ठरवला आहे. या दृष्टीने पाहिल्यास आधुनिक तांत्रिक जग हे केवळ अधिक बलशालीच नव्हे, तर पूर्वीच्या जगाहून अधिक जीवननिष्ठ ठरते.

माणसाविषयीच्या तिटकाऱ्याची चर्चा करताना काही कलाकारांचा वर मी उल्लेख केला, ज्यांचा अंत अगदी विपरीत घडला. ऑस्कर वाइल्डला इंग्रजी समाजाने 'रीडिंग जेल' येथे तुरुंगात टाकले. तिथे भयाण एकलेपणाच्या नि दारिद्र्याच्या दुःखाने तो मरण पावला. सौंदर्याहून शिवत्व श्रेष्ठतर आहे, शिवत्वाचे सौंदर्य हेच सर्वश्रेष्ठ सौंदर्य, हे वाइल्डला फार उशीरा कळले. हामसुन तर पुढे आमच्या काळापर्यंत जगला. तो बुद्धप्रतिज्ञ फॅसिस्टही झाला, पण मरेपर्यंत जीवनात काही तोलामोलाचे असे त्याला गवसलेच नाही. वाइल्ड किंवा नित्शे यांपैकी कोणीच कधी फॅसिस्ट झाले नसते याची मला खात्री आहे. परंतु १९ व्या शतकाच्या अखेरी अखेरीला वाइल्ड, हामसुन, इब्सेन आणि नित्शे यानी विचाराचा एक विवक्षित प्रवाह पुढे आणला जो नंतर नित्शेने अगदी स्पष्ट आणि निर्णायक स्वरूपात उभा केला.

नित्शेला दोस्तोवस्की फार आवडायचा. अनेक वेळा माझ्या मनात अशी कल्पना डोकावून जाते की, 'झरथुष्ट्रा' चा निर्माता कोणी एक व्यक्ती नसून दोस्तोएवस्कीच्या कल्पनेचेच ते अपत्य असावे. त्याच्या एखाद्या कादंबरीतला तो नायक असावा. ही कल्पना नित्शेला जे आत्मिक दृष्ट्या सोसावे लागले त्यावरूनही खरी ठरते. दोस्तोएवस्कीचा एक नायक, आयवान कारामाझोव यासारखाच नित्शेचा भोग ठरला. तसेच, जर्मन तत्त्ववेत्त्याच्या या कल्पना (मानव-देव, नित्य पुनरागमन, दोन नीतिमत्ता : एक स्वामीसाठी, दुसरी दासासाठी, आणि सृजनशील व्यक्तिमत्त्व असलेल्यांचे क्रौर्य) रासकोलनिकोव,

किरिलोव, स्तावोगिन आणि आयवान कारामाझोव या दोस्तोएवस्कीच्या नायकानी आधीच व्यक्त केल्या होत्या. आयवान कारामाझोव आणि स्मेर्द्याकोव यांच्यामध्ये असलेले विरोधविकासी नाते नित्शे आणि फॅसिझम यांच्यातल्या नात्याची आठवण करून देते. (आयवान कारामाझोव जे उत्तुंग बौद्धिक शिखरावरून करून दाखवतो, ते स्मेर्द्याकोव खालच्या पातळीवरून सांगकाम्या चाकरासारखा अगदी रोख करतो.)

पण नित्शेच्या जीवनाकडे पाहून आयवान कारामाझोवची आठवण होत असली तरी, नित्शेच्या आणि दोस्तोएवस्कीच्या जीवनामध्ये तसे साम्य बेताचेच होते. दोस्तोअेवस्कीचे स्वप्न माणसाच्या पूर्णत्वाचे होते, माणसाच्या महत्तमतेचे नव्हे. दोस्तोएवस्कीला प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्वे निर्मिणे किंवा अमर कला निर्मिणे हे मानवतेचे ध्येय वाटले नाही. तर माणसा-माणसामध्ये सामंजस्य निर्माण करण्याचे, शहाणपण निर्माण करण्याचे ध्येय त्याने उराशी बाळगले. दोघानीही मानवी आत्म्यात डोकावण्याचे धाडस केले पण नित्शेला तिथे विपुल तिरस्कार आढळला तर दोस्तोएवस्कीला अपरंपार कणव आढळली. दोघांनाही जगाने 'क्रूर'च म्हटले असले, तरी त्या दोघांच्या क्रौर्यात मूलभूत फरक आहे नि तसाच स्वरूपाचा नि आशयाचाही फरक आहे. एखादा माणूस असहायतेमुळे, अति अनुकंपेमुळे, कमालीच्या निरुपायतेमुळे क्रूर होतो, जसा दोस्तोवस्की 'क्रूर' होता. तर दुसरा एखादा एकाकीपणामुळे, स्वतःकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे, किंवा बलहिनाच्या बलशाली होण्याच्या अनावर इच्छेमुळेही 'क्रूर' होऊ शकतो. या प्रकारचे होते नित्शेचे क्रौर्य? होय. नित्शेच्या क्रौर्याचा एक अंश कलाकार म्हणून त्याच्या नशिबी आलेल्या अपयशात गवसू शकतो. स्वतः नित्शेचे, किंवा माझ्या माहितीप्रमाणे त्याच्या एकाही चरित्रकाराने कलाकार होण्याच्या त्याच्या इच्छेचा उल्लेख केलेला नाही. पण त्याचा झरथुष्ट्र बोलतो ते मात्र काव्यात्म व लयीत, नि कविहृदयाला मौन अशक्य झाल्यामुळे हे सहज लक्षात येते. नित्शेने अगदी एकदाच आपण काही मोठे कवी नसल्याचे एका पत्रात प्रांजळपणे म्हटले आहे. रग्गड अहंकारी आणि नंतरच्या आयुष्यात आत्मगौरवाच्या नशेत बुडालेल्या नित्शेचे अशी कबुली द्यावी, हे जरा कसेसेच वाटते. आपल्या हृदयाला व्यथित करणारे सर्वांत मोठे शल्य त्याने जगापासून लपवून तर ठेवले नसेल? अपेशी कलाकारांच्या प्रेमळ आवरणाखाली अनेक वेळा खरे वाटणार नाही एवढाले क्रौर्य दडलेले असते.

नित्शेच्या तालबद्ध भावुक चिंतनात उत्तुंग डोंगरमाथ्यावर भ्रमण करणारी प्रवृत्ती जशी दृक्गोचर होते, तसाच त्या चिंतनामध्ये नित्शेमधला व्यथाव्याकुळ कलाकारही जाणवतो. तो कलाकार त्याच्या इतर अनेक महत्त्वाच्या कार्यबाहुल्यातही व्यक्त होतो. कदाचित कलात्मक अभिव्यक्तीत अयशस्वी झालेली आपली बलवत्तर प्रज्ञा त्याने दांडगाईने तत्त्वज्ञानाकडे वळवून उट्टे भरून काढले असेल. काही असो. ही गोष्ट नित्शेच्या पथ्यावर पडली. कारण प्रत्यक्ष वास्तवतेशी ज्याचा संबंध तुटलेला असतो आणि तो जोडण्याचे ज्याला धैर्य नसते, त्याच्यासमोर एकच मार्ग उरलेला असतो व तो म्हणजे वास्तवतेच्या जागी खोट्या कल्पना उभ्या करणे. असा माणूस जर तत्त्ववेत्ता असेल तर साहजिकच त्याचे कल्पनाजालच जगाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टिकोन बनते. नित्शेने झपाटल्यागत अधिकाधिक फसवे कल्पनाजाल विणले, ज्याला त्याने बिनदिक्कत आणि उर्मटपणे 'जीवन' म्हटले. आपल्या मृगजलवत कल्पनांना वास्तव म्हणण्यात त्याच्या हातून निसटलेल्या वास्तवावर त्याने सूडच उगवला!

नित्शेची जीवन-संकल्पना स्तांदाल किंवा दोस्तोवस्कीच्या जीवनसंकल्पनेसारखी मुळीच नाही. ती काही बाबतीत वाइल्ड आणि हामसुनच्या जीवनसंकल्पनेशी मिळतीजुळती आहे. नित्शेची संकल्पना केवल किंवा परम सौंदर्यात्मक असून तिचे मूल्यमापन सामाजिक-नैतिक आशय नसलेल्या, विशिष्ट, अमूर्त सौंदर्यानेच होऊ शकते. असे सौंदर्य की, जे शिवत्वाच्या, मानव-प्रेमाच्या, पलीकडचे आहे. ते शक्तीशाली

आहे. परंतु निरपेक्ष सौंदर्य तर जगात नाहीच व शिवत्वाशी काही कर्तव्य नसलेले सौंदर्य विरोधाभासाने 'विनाशकारी सौंदर्य' बनते. आणि बळ? ते जेवढे अधिक तेवढीच बऱ्याचे रुपांतर वाईटात होऊ नये म्हणून अधिक माणुसकी त्या बळात असावी लागते. जे सामर्थ्य (सृजनशील सामर्थ्य सुद्धा) माणुसकीपासून वंचित असते, ते निर्दय प्रेमासारखे 'राक्षसी वळणांनी' विध्वंसक बनते. नित्शेला सौंदर्य आणि सामर्थ्य ही नैतिकतेच्या बाहेरची मूल्ये वाटतात. इतकेच नव्हे, तर नैतिकता सौंदर्य नि सामर्थ्याचा खून पाडते, असे नित्शेचे प्रतिपादन आहे.

नित्शे जी एक गोष्ट सांगून सांगून कधी थकला नाही ती ही की, नीतीमत्तेने चालणारी माणसे अनितीने चालणाऱ्या माणसांहून अधिक तुच्छ, अधिक नेभळट असतात. माणसाचे मूल्यमापन नित्शे सामर्थ्यांच्या नि इच्छाशक्तीच्या प्रमाणावर करतो. नि इच्छाशक्तीचे सामर्थ्य व्यक्तीच्या प्रतिकारशक्तीवरून, व्यक्तीच्या सहनशक्तीवरून करतो; व्यक्तीला जे साधावयाचे त्यासाठी करावे लागणारे सायास, भोगाव्या लागणाऱ्या यातना, क्लेश यांवरून करतो. नित्शेने स्वतःला नि वाचकांना नेहमी हे पटवण्याचा प्रयत्न केला की, व्यक्तिमत्त्वाची संपन्नता, तसेच त्याचे उतू जाणारे आंतरिक जीवन नि पापभिरुता या परस्परविरोधी गोष्टी आहेत.

जीवनाकडे फक्त एक सौंदर्यमूल्य म्हणून पाहिले, तर ते भव्य नाट्यगृहासारखे वाटते—जे प्राचीन नाट्यगृहाहून भिन्न नव्हे—ज्यातील शेवटच्या रांगेवरून देखील शिकंदराचे स्पष्ट दर्शन घडू शकते. पण सॉक्रेटिस नाही दिसणारे तेथे. कारण त्या नाट्यगृहातील अभिनेते खडाव वापरायचे. तर अथेन्सचा तो विवेकशाली पुरुष अनवाणी फिरायचा. नित्शेला सिझर बोर्जियाचीही स्वप्ने पडत. त्याला वाटे की, तो जर रोमचा पोप झाला असता, तर युरोपच्या संस्कृतीला अवकळा आली नसती, तिचे अधःपतन झाले नसते. होय. बोर्जियाने हमरस्त्यावर, गल्लीबोळांत, नृत्यमंचावर, शयनागारात, सर्रास माणसांचे मुडदे पाडले हे खरे आहे. आपल्या बहिणीला पळवली हेही खरे आहे. निमंत्रित पाहुण्यांना विष घालून ठार मारण्यात और मजा लुटली हेही सत्य आहे.

कदाचित नित्शेला कोणताही बलाढ्य पुरुष, 'अनैतिक राक्षस' देखील, भयग्रस्त बनलेल्या तत्कालीन बड्या जर्मन लोकांना 'उपरोधिक विरोधी' म्हणून पसंत पडला असला पाहिजे. आपल्या या 'उपरोधिक विरोधीच्या' धक्कादायक कल्पनेने लोकांना चिडविणे, घाबरून सोडणे, नित्शेला आवडत असे. परंतु, बोर्जियाविषयीचा त्याचा उत्साह केवळ वादविवादात्मक स्वरुपाचा होता असे धरून चालले, तरी वास्तवाच्या केवळ सौंदर्यात्मक आकलनात अनुस्यूत असलेला नीतीभावनेचा कायमचा अभाव त्यात स्पष्ट होतोच.

मला वाटते नित्शेला व्यक्ती या नात्याने आपल्या आत्मिक विश्वाची विशिष्ट जाणीव होती. तसेच आपण या विश्वातले काहीतरी हरवून बसलो आहोत याचीही कल्पना होती. या कल्पनेने तो अधिक संतप्त बनला. स्वतःचा नि भोवतालच्या लोकांचा द्वेष करण्यास अधिक प्रवृत्त झाला आणि त्यातून त्याचा 'विपरीत विरोध' अगदी खुळेपणाच्या मर्यादेपर्यंत पोहोचला.

जीवन हे एक चंड प्रचंड मृगजळ असून सारेंच असार अनित्य आहे, असे मानणाराचे व्यक्तिमत्व अंती खरोखरच नष्टप्राय होते. नित्शेमध्ये बदल असा कधी घडलाच नाही. त्याच्यामध्ये 'उच्चभ्रूचे क्रांतिकारकत्व' (डॅनिश तत्त्ववेत्ता गिओर्ग ब्रांडेस याचे सूत्र) युवावस्थेतच दिसू लागले होते. या

अनुक्रमणिका

क्रांतिकारकत्वाबाबतीत तो स्वतःशी शेवटपर्यंत प्रामाणिक राहिला. त्याचे व्यक्तिमत्व आयवान कारामाझोवच्याप्रमाणे हिणकस होते. ४० वर्षे वयाच्या नित्शेला जेव्हा जावा बेटावरील भूकंपाचे वृत्त समजले तेव्हा अंगात वारे शिरल्यागत तो ओरडला. 'क्षणार्धात दोन लाख मानवी जीवांचे सुंदर मरण ! असाच होणे आहे मानवजातीचा अंत'! म्हणजे अशा रीतीने मोंतेंज, गटे, स्तांदाल आणि दोस्तोवस्कीच त्याने टाकून दिले असे नव्हे, तर उत्तरोत्तर मानसिक वेडाचाराच्या उंबरठ्याकडे त्याची पावले पडू लागली.

आयवान कारामाझोवचा (दोस्तोवस्कीच्या कादंबरीतील नायक) ही कल्पना छळ करीत राहिली की, जगात नित्य म्हणून जर काही नसेल तर नीतीमत्ता म्हणूनही काही असू शकत नाही.

नित्शेला सुद्धा सद्गुणांचा काही खास स्वतंत्र किंमत आहे असे वाटतच नसे; सद्गुणांनी अमरत्व, सौंदर्य, सामर्थ्य आदींबरोबर निगडित राहिले पाहिजे, तरच नित्शेच्या हाती सद्गुणांची धडगत होती ! तसेच सामर्थ्य नि सौंदर्य यांचा जेव्हा दिग्विजय होतो, (शिकंदर आणि नेपोलियन हे नित्शेचे प्रिय नायक होते) तेव्हा त्यापुढे इतर सद्गुणांची काय मातब्बरी? तिथे इतर सद्गुणांची खरी गरजच काय ? अमरत्वासमोर तर सारे कस्पटासमान. पण वस्तुस्थिती अशी नाही. हे जग नश्वर असल्यामुळे सद्गुण जरूर हवेत. सद्गुणांमुळेच तर निष्पाप निरागस जीवनाची शुद्धता टिकून राहते.

मनुष्याला करुणा नि सद्वर्तन हे गुण चांगले की वाईट ते ठरवायची संधी मिळालेली असते याचाच अर्थ ते गुण अस्तित्वात आहेत. ते जर अस्तित्वात नसते तर माणूसही अस्तित्वात नसता.

त्याचबरोबर हीही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, जगात चांगुलपणा ओतप्रोत भरलेला आहे, हा जसा भ्रम आहे, तसाच दुष्टपणा सर्वत्र भरला आहे ही समजुत देखील भ्रामक आहे. नित्शे नि त्याचे पूर्वीचे अनुयायी यांचे साहित्य वाचून, नको होईतोवर मिठाई खाल्लेल्या मुलाचे चित्र माझ्या नजरेसमोर उभे राहते. अधिक काही खायची त्या मुलाची वासनाच मेलेली असते. एकदोन घास कसेबसे खाते आणि सगळेच बाकीचे टाकून देते. १९ व्या शतकाच्या अखेरचा कालावधी हा इतिहासातील एक धक्कादायक कालखंड होता. त्यावेळच्या विचारवंतांना चांगुलपणा जगात दुथडी वाहून जातो आहे असे वाटू लागले होते. नित्शे वाचून असे वाटायला लागते की, जगात इतकी करूणा भरलेली आहे व इतका उच्छाद तिने मांडला आहे, की वेळीच जर लोकांना याबाबतीत सावध केले नाही, तर भयंकर गहजब अटळ आहे. लोकांच्या व्यथांनी व्यथित होण्यापेक्षा आनंदित होणेच आपण अधिक पसंत करतो असे उद्गार नित्शेने काढले आहेत. एका ठिकाणी तर समकालीन मानवतेने माणुसकीच्या सर्व मर्यादा ओलांडलेल्या आहेत असेही त्याने म्हटले आहे.

मानवतेचा तिरस्कार अनुभवताना नित्शे आणि त्याच्या अनुयायांनी जे जे मानवी आहे—चांगुलपणा, सहानुभाव, सदयता आदी—त्याचा तिरस्कार केला. मानवी सभ्यता जो एवढ्या जलद नि दुःखद रीतीने जराजर्जर होत चालली आहे त्याचे कारण या समाजरचनेची उर्ध्वगती संपुष्टात आली आहे हे नसून सदाचारामुळे समाज दुबळा बनला आहे असे त्याना वाटे. म्हणून सदाचाराचाच त्यानी धिक्कार केला !

नित्शे आणि त्याचे अनुयायी विसाव्या शतकात जगात करुणा नि सहानुभाव यांची आणखीनच वृद्धी होणार म्हणून भयभीत झाले होते. अर्थप्रतिष्ठित मानवतावादाच्या वाढत्या संकटाची जरी त्याना बरोबर

अनुक्रमणिका

चाहूल लागली होती असे म्हणता येईल, तरी दोन गोष्टी त्याना कळल्या नाहीत. पहिली गोष्ट म्हणजे मानवतावादाच्या अमर सिद्धींमुळेच त्यांचा भ्रमनिरास झाला आहे हे त्याना कळले नाही. आणि मानवतावादाची शेवटची अवनती म्हणाल, तर ती गोष्ट विजयी सौंदर्य करील, विजयी सामर्थ्य करील, किंवा शोकनाट्यावर स्वार झालेल्या स्वप्राणाची बाजी लावणाऱ्या नवीन युगातील मानवांच्या विजयाने ती होईल, अशी वस्तुस्थिती नसून ती गोष्ट यंत्रांच्या अमानुषी, पद्धतशीर क्रौर्याने आज होते आहे.

तसेच पुराण्या मानवतावादाच्या राखेतून वीर सिगफ्रिड किंवा नेपोलियन नाही निपजत. तर माणसांचा मख्खपणे खातमा करणारा पांढरपेशा असून आयकमन निपजतो, हेही त्याना उमगले नाही. पण हाय ! दुरान्वयानेही सौंदर्याशी काही कर्तव्य नसलेल्या, पण दुर्दैवाने पुढे खऱ्या ठरलेल्या घटना त्याना कुठच्या सुचायला? १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील तत्त्ववेत्त्यांना मानवतावादाविषयी शंकाकुशंका व्यक्त करण्याची चैन तरी परवडणे शक्य होते. पण २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आपणाला ती चैनदेखील अक्षम्य आहे. नुकताच रणभूमीवरून परतलेला योद्धा भाकरीचा तुकडा पायदळी तुडवून आज पुढे जाऊ शकेल काय ? शेवटी आपल्या शतकाने काही गोष्टींची—क्रौर्य, जंगलीपणा, पिसाळलेपणा आदींची—मजाच चोरली आहे. गेल्या जमान्यात अशा गोष्टी अद्भुतरम्य वर्तनात तरी मोडत. पण सध्याच्या तांत्रिक युगाच्या संस्कृतीने अशा गोष्टींचे मानवतावादाशी असलेले पुसट साम्य देखाल पुसून टाकले आहे. आणि आता कोडे उरले आहे ते हे की, ‘सदाचाराचे यंत्र’ काय आहे ? ‘दुराचाराचे यंत्र’ लक्षावधी मानवांनी अनुभवलेच आहे !

जगात चांगुलपणा भरून उरला आहे, हा नित्शेचा जसा एक भ्रम होता, तसाच त्याचा दुसरा एक भ्रम म्हणजे जगात ज्ञानाची नि बुद्धीवादाची अति झाली आहे हा होय. बुद्धिवादी समजल्या गेलेल्या १९ व्या शतकात तो अबुद्धिवादासाठी तळमळत होता. इथे इतिहास डियोनिसुसच्या (ग्रीक शंभु भैरवाच्या) या भक्ताला खचित हसला असेल. जगातला बुद्धिविरोध अस्तित्वाची मदमस्ती डोक्यात शिरून थयथय नाचणाऱ्या असुराच्या रूपाने नाही अवतरला. तो सरळ नि अपौरुषेय स्वरूपात अवतरला. नित्शेने ज्याचा तिरस्कार केला होता—त्या डिकन्सच्या सुबक जगाच्या जागी काफकाचे जग अवतरले होते. अर्थात ज्याचा नोकरशाहीशी कधीच संबंध आला नाही त्या ‘सिल्स मारिया’ मठातल्या संन्याशाला (नित्शेला) काफकाचे जग मुळीच परवडले नसते. डिकन्सने निर्मिलेले इरसाल खलभुजंग देखील काफकाने निर्मिलेल्या उत्तमोत्तम सज्ञनांहून अधिक सहृदय नि अधिक मानवी वाटतात. दुराचाराने आधुनिक कल्पकतेचा जणू ताबाच घेतला आहे. दुरचार आजच्या ऐहिक जगात पुरतेपणी घुसला आहे—ज्यात ना कल्पनाशक्तीचा विलास ना आनंद. व मजा अशी की खलत्वाचे हे विलक्षण न्यारे स्वरुप सर्वाधिक मनोराज्यात्मक ठरले आहे. येत्या शतकातील मानव कीडा बनणार आहे याची जर काही कल्पना नित्शेला करता आली असती तर अबुद्धिवादाच्या त्याच्या आकलनात निःसंशय भर पडली असती.

परंतु काफका सुद्धा जगातील अबुद्धिवादाच्या शक्तींच्या भविष्यातील वाढीच्या मर्यादा आणि स्वरूपे याची योग्य कल्पना करण्यास असमर्थ होता. लुचिनो विसकोन्ती यांचा ‘शापित’ (ला कादूता देइ देइ) हा चित्रपट नाझी जर्मनीतील एका प्रतिष्ठित उद्योगपतीच्या कुटुंबाचा उत्कर्ष आणि अपकर्ष रुपेरी पडद्यावर दाखवतो. या चित्रपटात सत्ताकांक्षा नि लैंगिक विकृती, तसेच राजकीय कावेबाजपणा आणि हिंसक क्रौर्य एकत्र आणलेली आहेत. हा चित्रपट फॅसिस्ट शासनाचा शंभुभैरवी अर्क उत्कृष्ट रीतीने दिग्दर्शित करतो : फॅसिस्ट शासनाची अवाढव्य आणि शिस्तबद्ध नोकरशाही असूनही ते शासन बेताल नि बुद्धिद्रोही होते.

नित्शेची कल्पना मोकाट सुटलेली होती – सोदोम आणि गोमार्स्क, पोंपेई बादशहाचे अखेरचे दिवस, हजारो ज्वालामुखींचा विस्फोट, सारे त्याने कल्पिलेले होते. पण बेछूट कारभार करणारी अजस्त्र नोकरशाही मात्र त्याने कधी कल्पिली नव्हती. ही गोष्ट इथे आवर्जून सांगितली पाहिजे, की जें जें नित्शेला हवे होते, ते ते बळ, क्रौर्य सारे २० व्या शतकात खरे ठरले. हे कसे घडले ? विडंबनाप्रमाणे असलेल्या या क्रूर विरोधाभासाने हें उघड केले की, त्याच्या इच्छा अजिबात वास्तवसृष्टीतल्या नव्हत्या, तर कल्पनारम्य जगातली ती बेबंद उड्डाणे होती.

ज्याने जगाचा थरकाप उडवला, तो निघाला हिटलर ! व नित्शेप्रणीत अबुद्धिवादाची करामत काय, तर नोकरशाही जुलूम ! नि शोकनाट्यावर स्वार झालेल्या शतकाचे सौंदर्य काय, तर हिरोशिमा!

जीवनतृष्णा म्हणजेच सत्तातृष्णा समजणे ही नित्शेची एक फार मोठी भूल होती. जगात होऊन गेलेल्या महान कलावंतांनी आत्म्याचे अत्युच्च क्षण, सुंदर तन्मयतेचे क्षण, विश्वाशी जोडणाऱ्या तद्रूपतेचे क्षण आजवर रंगवले आहेत : ऑस्टरलित्झच्या समरांगणावरील योद्धा आंद्रेय बोलकोन्स्कीचे शौर्य, मॉस्कोवरील धूमकेतू पहातानाची पियेर बेझुकोवची एकाग्रता आणि धरतीला मिठी मारणाऱ्या अलेक्सी कारामाझोवचा अत्यानंद. जीवनातील या महत्तम क्षणांचा सत्तातृष्णेशी संबंध जोडता येईल काय? तसे तर अनंत गोष्टींना सत्तातृष्णा ठरवता येईल. पण मग सत्तातृष्णेचा मूळ अर्थच नाहीसा होईल. राफाएल आणि नेपोलियन आदींच्या सुखाचे समान सूत्राने स्पष्टीकरण करता येईल ?

नित्शेचा सर्वाधिक दुर्दैवी प्रमाद कदाचित हा होता की, त्याने वनस्पती आणि मानव यामध्ये फरकच केला नाही, प्राण्यांची तर गोष्टच सोडा. निव्वळ इंद्रियात्मक तेवढेच त्याने मानले. म्हणूनच इंद्रियात्मक मूल्यांच्या तो आहारी गेला. माणसाचे जे भवितव्य त्याने सन्मानिले, त्याने त्याची टिंगल उडविली. ज्या माणसाने (नित्शेची) आत्म्याहून शरीर अधिक मूलभूत मानले, त्याच्या आयुष्यातील अखेरच्या दशकात त्याचे शरीर भक्कम असूनही आत्मा दुर्बळ होत गेल्यामुळे तो मग माणूस उरला नाही. ‘सत्ताकांक्षा’ या आपल्या अपुऱ्या राहिलेल्या पुस्तकात स्थिर संघटनासाठी सापेक्ष दृष्टीने आवश्यक असणाऱ्या आत्मशक्तीविषयीही त्याने प्रतिपादन केले आहे. पण ते प्रतिपादन आजच्या तंत्रपतींना पसंत पडणारे असेच आहे. काही आधुनिक विद्वानांनी केलेल्या आत्महत्त्येच्या व्याख्येशी नित्शे बहुधा सहमत झाला असता. त्यांच्या व्याख्येप्रमाणे आत्महत्त्या ही अशी एक व्यवस्था ज्यामुळे समाज-शरीर स्वतःहूनच आपल्या अवयवांना डाग देऊन रोगमुक्त होते.

नित्शेचा असा विश्वास होता की, नैतिकतेमुळे विवेक दुबळा पडून मनुष्याच्या सृजनात्मकतेची अधोगती होते. म्हणून काय वाटेल त्या उपायानी मनुष्याची सृजनात्मक शक्ती फिरून प्राप्त करून घेण्याची आवश्यकता आहे. पूर्वीच्या शक्तिशाली कालखंडात होऊन गेलेल्या कवींनी ज्याला स्फूर्ती म्हटले ती काय गोष्ट होती, याची स्पष्ट कल्पना एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काळात कोणाला असेल काय हा नित्शेला प्रश्न पडला होता. तूर्गनेव, दोस्तोएवस्की, तोलस्तोय, फ्लॉबेर, मोपासां, हाइने, डिकन्स आणि व्हिटमन यांच्या समकालीनाला हा प्रश्न पडावा हे विशेष आहे. नित्शेला अगदी प्रामाणिकपणाने आपले शतक ‘निर्फळ’ वाटावे यावरून स्वतः जगलेल्या शतकाचे अंतर्गत मूल्यमापन करणे माणसाला किती अवघड असते, हे तर जाणवतेच, परंतु मुख्य म्हणजे सृजनशीलतेबद्दल खुद्द नित्शेची काय कल्पना असावी त्यावरही प्रकाश पडतो. ‘असे बदलासे झरथुष्ट्र’ या रचनेच्या सृजनकाळातील स्वतःच्या स्फूर्तीचे वर्णन

करताना नित्शे लिहितो की, आपल्यासारखेच काहीतरी अनुभवलेला कोणी गाठण्यासाठी, की जो मला म्हणेल हो, अगदी असाच अनुभव मलाही आला होता, निःसंशय 'हजार वर्षे' मागे जाणे आवश्यक आहे.

नित्शेची 'हजार वर्षे' म्हणजे अगदी अक्षरशः हजार वर्षे असे न समजता ज्याअर्थी शक्तीशाली कालखंडातील कवींचा तो उल्लेख करतो. त्याअर्थी प्राचीन काळासाठीची त्याची तळमळ अगदी सॉक्रेटिसच्याही आधीच्या काळाची होमर, पिंडार, एस्किलच्या काळाची तळमळ होती असे समजले पाहिजे. त्यानंतरच येतो तो प्राज्ञपुरूष—अथेन्सच्या हमरस्त्यावर अनवाणी चालणारा सॉक्रेटिस—ज्याने आपल्या उपरोधाने कवितेला हतबल केले. पण सॉक्रेटिसाने एका शक्तीशाली कालखंडाचा सत्यानाश केला अशा ठाम समजुतीने नित्शे त्याचा द्वेष करतो. एका कुरुप, खोखल्या इसमाने जगाला शक्तिसामर्थ्याच्या मृगजळापासून वंचित केले; पुराण्या दंतकथा उघड्या पाडल्या. आतां मृगजळाविना, दंतकथांविना कविता जगणार कशी ? बुद्धिवादी नि नीतिवादी सॉक्रेटिसमुळेच प्लेटोने कलाविलासाची अवहेलना केली वगैरे. नित्शेने सॉक्रेटिसबद्दल जो एकंदर युक्तिवाद केला आहे, त्यावरून निःसंशय असे म्हणता येते की, नित्शेला लालायित करणारा जमाना म्हणजे दुसरा तिसरा कोणता नसून नैतिक जाणिवेची स्पष्टता ज्या काळात असत नाही असा जमाना होय. यातच नित्शेचे सृजनशीलतेविषयीचे नि मानवाविषयीचे आकलन अंतर्भूत आहे.

नित्शेवर लिहिलेल्या आपल्या लेखात थॉमस मान याने नित्शे आणि शेक्स्पीयरच्या हॅम्लेटला समोरासमोर उभे केले आहे. हे दोघेही पुरुष विद्वत्तेच्या प्रचंड ओझ्याखाली दबले गेलेले होते. इथे मला प्रवासी नटांच्या बाबतीतली हॅम्लेटची वृत्ती आणि शोकनाट्य या कलाप्रकाराबाबतची नित्शेची वृत्ती यांमध्ये तुलना करण्याचा मोह उत्पन्न होतो. हॅम्लेट जेव्हा शोक करत ओरडतो 'हेकुबा माझा कोण?' तेव्हा त्याला कलेची शक्ती प्रतीत झालेली असते. कला नैतिक कर्तव्याची आपल्याला जाणीव करून देते. हजार वर्षापूर्वी होऊन गेलेल्या आख्यायिकेतल्या हेकुबाबद्दल हॅम्लेट जेव्हा शोकविव्हल होतो, तेव्हा त्याच्यमध्ये गूढ किंवा अबुद्धिवादी भावना जागृत होण्याऐवजी त्याच्यासमोर त्यावेळी प्रत्यक्ष ठाकलेल्या खलत्वाला शासन करण्याची स्पष्ट भावना जागृत झालेली असते. तसेच नटांना सोडून जाताना हॅम्लेटच्या मनात पिसाट अमूर्त भावना जागृत न होता बापाच्या खुन्याला शासन करण्याची निश्चियी भावना जागृत झालेली असते. नटांच्या मदतीने त्याला अडकवण्याचा 'सांपळा' जेव्हा तो उभा करतो तेव्हा रंगभूमीच्या ताकदीबद्दल त्याच्यामध्ये विश्वास निर्माण झालेला असतो.

कलेकडे पहाण्याची ही वृत्ती कलेकडे पहाण्याच्या 'नित्शेप्रवृत्तीविरोधी' आहे. किंवा ती 'सोक्रेटिसवादी' वृत्ती आहे असे म्हटले पाहिजे. नटाला रडताना पाहून नित्शे कदापि व्यथित होणार नाही. कारण जीवनापेक्षा कलाच त्याला कितीतरी पटीने अधिक वास्तव वाटते. नटातला माणूस तो पाहणारच नाही. 'हेकुबा आपला कोण ?' म्हणून माणूस तेव्हाच आक्रंदन करील, जेव्हा त्याला प्रत्यक्ष जीवन कलेहून अधिक सत्य वाटेल. तसेच खराखुरा हाडामासाचा माणूसच कधी एके काळी जगलेल्या व आता आख्यायिका बनलेल्या हाडामासाच्या दुसऱ्या माणसासाठी व्याकुळ होईल. तो प्रवेश चित्तवेधक झाला आहे, त्याचे कारण त्यातील त्या दोन व्यक्ती काळामधले अंतर मिटवू शकत नाहीत हे होय. दोन विभिन्न काळाच्या तोंडावर त्या उभ्या आहेत.

जीवन नि कला या विषयीच्या सॉक्रेटिसच्या संकल्पनेप्रमाणे रंगभूमीचा फार मोठा नैतिक प्रभाव पडू शकतो. ती मानवाला उपकारकच नव्हे तर उद्धारकही ठरू शकते. पण म्हणून कलेला खुद्द जीवनाहून

अनुक्रमणिका

श्रेष्ठतर ठरविण्याचे प्रयत्न फोल आहेत. कारण तशा प्रयत्नात कलेचा विकास तर नाहीच. पण कला मुळातच उपयोगशून्यच ठरते. ज्या व्यक्तीचा वास्तवाशी संबंध उरलेला नसतो, आणि ती व्यक्ती जेव्हा, तो संबंध फक्त कलेत शोधू पहाते, तेव्हा तिच्यावर बहुधा कलेचा द्वेषही करण्याची पाळी येते. कारण शेवटी कलासुद्धा अशा व्यक्तीच्या अघोरी तृष्णांची तृप्ती करू शकत नाही.

वरील गोष्टीतच सृजनशीलतेसंबंधीच्या नित्शेच्या मनोवृत्तीचे कोडे उलगडते. कोणत्याही प्रकारची सृजनशीलता मग ती कलाक्षेत्रातली असो, प्रीतीच्या क्षेत्रातली असो, वा विज्ञानाच्या क्षेत्रातली असो, ते एक पुनरुत्थान असते, अमरत्वासाठी चाललेली ती एक झुंज असते. पण पुनरुत्थानाकरिता ज्याचे पुनरुत्थान व्हावयाचे ते ‘काहीतरी’ मुळात वास्तव असावे लागते आणि नित्शेपाशी तर तसे काहीच नव्हते. पुरातन कला ही त्याला एक व्यक्त, हस्तगत झालेली वास्तवता वाटे. पण पुरातन कला ‘एकेकाळी’ निश्चितपणेच एक पुनरुत्थान होते. एक झुंज होती. नित्शेला माणसांविषयी ना भावना ना प्रेम. सृजनशीलता ही त्याची एक अमूर्त संकल्पना होती. आणि बलदंड कालखंडाबद्दलची त्याची तळमळ म्हणाल, तर ती ज्याप्रमाणे लोकांना आज पृथ्वीबाहेरच्या संस्कृत्यांविषयीचे स्वप्नाळू आकर्षण वाटते त्या प्रकारची होती.

एकोणिसावे शतक हे ‘ला कोमेदी उमान’, ‘नववी सिंफनी’ रशियन कादंबरी आणि फ्रेंच पेंटिंग यांचे शतक होते. ते शोपां, पुष्किन, डिकन्स फ्लॉबेर, वांग्जेर आणि रोदां यांचे शतक होते. (मार्क्स-एंगल्सचा विचार मी बाजूला ठेवतो. कारण नित्शेला त्यांतले काहीच माहीत नव्हते) एकोणिसावे शतक हे एक प्रचंड करामतीचे आणि महत्तम सृजनशीलतेचे शतक होते. पण नित्शेला त्यापासून काही अधिक हवे होते.

तरीही हा वैयक्तिक आसुरीपणाचा प्रश्न नव्हता. तसेच त्या शतकाला सामर्थ्याचे शतक न मानता विवेकाचे शतक मानावे, हेच मुळांत बरोबर नव्हते. ज्या अर्थप्रतिष्ठित मानवतावादाने शतकानुशतके युरोपातील सृजनशील प्रज्ञाप्रतिभेला पोषण दिले, त्याला अखेर आपण काय आहोत त्याची जाणीव नि आपल्या निर्गमनाची शेवटची अवस्था नित्शेमध्ये गवसली. आत्मवादी कल्पनांनी एकेकाळी भारून गेलेली ती महान संस्कृती आता निस्तेज क्षीण होत चालली होती. मुख्य म्हणजे त्या रग्गड धनवान संस्कृतीने आता आपल्या विकसनावस्थेचा संधिप्रकाश गाठला होता. नित्शेला त्या जातिवंत अर्थप्रतिष्ठित शतकाच्या वेदना, यातना पिसाट तीव्रतेने जाणवल्या. तो त्या वेदना, यातना स्वतः जगला. तो स्वतःच त्या वेदना-यातना बनला.

नित्शेला त्याच्या वरिष्ठवर्गीय जहालपणामुळे मानवतावाद नि नवसंस्कृती निर्माण करण्याच्या भविष्यातील शक्यता दिसू शकल्या नाहीत. प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडण्याचा काही मार्ग आहे, असेही त्याला वाटले नाही. त्याचा झरथुष्ट्र जेव्हा ‘ईश्वर मेला’ असे पुकारतो, तेव्हा आपल्याला तर मग माणूस सुद्धा मेला असे वाटते. नित्शेला देव झालेल्या मानवासंबंधीची विपरीत स्वप्ने पडत. जणू काय मेलेला ईश्वर नि मेलेला माणूस यांच्या मिश्रणातून जगाला ताजेतवाने बनवणारा एक नवा बलशाली मनुष्यप्राणी उत्पन्न करता येणे शक्य होते. पण जर का मानव नि देव दोन्ही मेले, तर सृजनशीलताही मरेल. मानव-देव ‘मुनलाइट सोनाता’ किंवा ‘युद्ध नि शांतता’ याना जन्म देऊ शकेल? नित्शेच्या वारेमाप उधळणाऱ्या चिंतनातून एकच निष्कर्ष निघतो. तो म्हणजे विनाश कसा घडवायचा ते या मानव-देवाला माहीत असणार.

अनुक्रमणिका

आज आपण जेव्हा ‘असे बदलासे झरथुष्ट्र’ आणि ‘चांगले व वाईटाच्या पलीकडे’ या ग्रंथांच्या कर्त्यांचा विचार करतो, तेव्हा आम्हाला असा विचार सुचल्याविना राहत नाही की, आधुनिक भांडवलशाहीच्या तांत्रिक संस्कृतीच्या विपर्यासातच त्याचे निष्कर्ष अंगभूत आहेत.

नित्शेच्या वेडाचे शुद्ध वैज्ञानिक नि वैद्यकशास्त्रीय स्पष्टीकरण करता येण्याजोगे आहे. दोस्तोवस्कीचा आयवान कारामाझोव देखील तसा आजारी नव्हता. तरीपण अंती त्याला वेड लागलेच. ‘मंतरलेले’ या दोस्तोवस्कीच्या कादंबरीतील किरिलोवला मानव-ईश्वराचे स्वप्न नित्शेआधी पडले होते. आणि आत्महत्येच्या आदल्या दिवशीच्या त्याच्या अर्ध-भ्रमिष्टावस्थेतल्या अर्थसंगत असलेल्या सूत्रामध्ये तीच पिसाट कल्पना समाविष्ट आहे. हिरोशिमा नि नागासाकी या शहरांवर मानवसंहारक अणुबॉम्ब टाकण्याच्या कामात सामील असलेला अमेरिकन मेजर क्लाऊड एथेरली हाही नंतर भ्रमिष्टच झाला. खरोखरच, मनुष्यप्राण्यात असे काहीतरी असावे की, जे नाकारले किंवा दुर्लक्षित केले तर त्याबद्दल शिक्षा ही भोगावी लागणारच.

दोस्तोवस्कीच्या कादंबऱ्यांतील घटनांप्रमाणेच नित्शेच्या जीवनातील घटना घडलेल्या आहेत. नित्शेचे मरणोत्तर भवितव्यही मोठे प्रतिकात्मक आहे : अधोगती नि वैफल्याने ग्रासलेल्या युरोपने त्याला गुरू केले. खरे तर, नित्शे हे जग कायमचे सोडून गेलाच नाही. वायमार या ठिकाणी जिथे तो वारला तिथे त्याच्या स्मरणार्थ म्युझियम उभारला गेला. त्याचे साहित्य प्रकाशित, पुनर्प्रकाशित होत राहिले. त्याच्यावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांची संख्या हळूहळू वाढत जाऊन ती एखाद्या ग्रंथसंग्रलयाएवढी झाली. याबाबतीत किर्केगार्ड हा पश्चिम युरोपचा अर्थप्रतिष्ठित तत्त्ववेत्ताच काय तो त्याची बरोबरी करू शकला. इथे रशियाच्या बुद्धिवादी मंडळीला धन्यवाद दिले पाहिजेत. कारण २० व्या शतकाच्या आरंभीचा युरोप जेव्हा नित्शेच्या तांडवाने उत्तेजित झाला होता, तेव्हा निकोलाय फ्योदोरोव याने अनेक लहानमोठे लेख लिहून नित्शेच्या तत्त्वज्ञानावर झोड उठवली आणि त्याला सरळ सरळ ‘काळ्या साम्राज्या’ चा तत्त्ववेत्ता म्हटले. फ्योदोरोव हा मॉस्कोतील रुम्यानेत्सेव म्युझियममध्ये ग्रंथपाल होता आणि महाशास्त्रज्ञ त्सियोलोवस्की तसेच श्रेष्ठ कलाकार व्ही. चेक्रिगिन यांचा तो गुरू होता.

नित्शेने अनेक पिढ्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन घडवला. त्या पिढ्यांतील उत्तमोत्तम प्रज्ञावंतांनी इतिहासाचे धडे लक्षात घेऊन त्याच्या तत्त्वज्ञानाचे नंतर पुनर्मूल्यांकन केले, तर अधमांनी लोकांना द्वेष करावयाला, ठार मारावयाला, आगी लावायला लावले. आवश्यक तेथे त्यांनी स्वतः जाळपोळ करणे, ठार मारणे असले प्रकार केले. ज्यांना नैतिकतेला उडवून लावायचे होते त्यांना नित्शेने मोकळे रान करून दिले.

गोबेल्स जेव्हा जिभल्या चाटीत लक्षावधी लोकांना खतम करावयाच्या गोष्टी बोलला, तेव्हा तात्विक युक्तिवादाशी त्याला काही कर्तव्य नव्हते. ‘वंशश्रेष्ठत्व’ नि ‘विनाशातील सौन्दर्य’ यासंबंधीची किरकोळ नि भारी अशी नाना तऱ्हेची कोष्टके त्याच्यापाशी सदैव तयार असत. नित्शे फॅसिझमला काही कमी जबाबदार नाही. किंबहुना आयवान कारामाझोव, स्मेरद्याकोवच्या गुन्ह्याला जिताक जबाबदार त्याहून नित्शे खासच कमी जबाबदार नव्हे.

तत्त्ववेत्त्याच्या बहिणीने भेट म्हणून दिलेल्या काठीवर हिटलर आत्मविश्वासपूर्वक रेलला.

अनुक्रमणिका

युद्धोत्तर काळांतल्या पहिल्या काही वर्षांत ‘काळ्या साम्राज्याच्या तत्त्ववेत्त्या’ला (नित्शेला) फॅसिझमपासून वेगळा काढण्याचे पश्चिमी राष्ट्रांनी खूप यत्न केले. त्याच्या पुनरागमनासाठी त्यांना त्याचे पुनर्वसन करणे, ढोंगबाजीला त्याचा असलेला विरोध जगाला कळविणे, तसेच त्याच्या शुद्ध नि दयाळू अंतःकरणाविषयी लोकांना पटविणे आवश्यक होते. १९६८ तल्या पॅरिसमधल्या दंगलीनंतर ‘डाव्यां’ नी (अति डाव्यांनी) प्रचारकी सभा घेऊन असा बोभाटा केला की, नित्शे हा या काळातला सर्वश्रेष्ठ राजकीय तत्त्ववेत्ता ठरणार आहे. या लोकांनी बेधडकपणे सर्व संकेत उडवून लावले. तर दुसऱ्या बाजूने सध्याच्या संशोधकांपैकी बहुतेक संशोधक म्हणे राजकारण बाजूला ठेवून त्याच्याविषयी निःपक्षपातीपणाने बोलण्याचा प्रयत्न करतात. विस्मरणाची खाई किती उथळ ! काही म्हणा. तथापि नित्शेला आजच्या जमान्यात आणून उभा करण्याचा कल मात्र दिवसेंदिवस अधिकाधिक उघड होत आहे.

आपल्या मानसिक रोगाविरुद्ध लढत असताना नित्शेने गिओर्ग ब्रांडेस याना टुरिनहून डेन्मार्क येथे एक पत्र पाठविले. त्या आधी ब्रांडेस यानी नित्शेच्या तत्त्वज्ञानावर अमेरिकेत भाषणे केली होती. “मित्रवर्य गिओर्ग, तू मला शोधून काढल्यानंतर आता मी सापडणे मुळीच कठीण नाही. पण आताचा प्रश्न आहे तो स्वतःला कसे हरवून बसावे हा ....” त्या पत्रावर त्याच्या आजाराच्या सुरुवातीच्या दिवसात इतर पत्रांवर जशी तो सही करायचा तशीच त्याने सही केली : “क्रूसावर चढवून ठार केलेला”. (ही गोष्ट मात्र बरीक लक्षात ठेवण्यासारखी आहे की, तो मानसिकदृष्ट्या पुरता कोसळण्याआधी त्याचे मन मानव-ईश्वराकडून ईश्वर-मानवाकडे वळले होते.)

आणि नित्शेचा आंतला आवाज चूकही नव्हता. कारण जगाने हे दाखवले आहे की, ते त्याला हरवायला तयार नाही. अर्थात तो कधी जगलाच नाही असे भासवणेही मूर्खपणाचे ठरले असते. नित्शे काही हॅम्लेट नव्हता. वा डॉन जुआन वा डॉन क्विझोटही नव्हता. संदेशवाहकदूताप्रमाणे धावत धावत तो रंगभूमीवर चढला-ख्रिसमसच्या मंद दीपाच्या प्रकाशात-आणि वेगाने धडधडणाऱ्या छातीने त्याने घोषणा केली : ‘ईश्वर मेला’ आणि ईश्वराची नि पावित्र्याची टवाळी करण्याच्या पळवाटा मळवून झाल्यानंतर ईश्वराच्या ध्यासांत तो वारला.

इतिहासाचे महत्त्वाचे धडे वगळून आज आपण नित्शेविषयी बोलू शकला नाही. नित्शेचे मूल्यमापन करावयाचे तर २० व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या पार्श्वभूमीवरच ते करावे लागेल. धुळ खात पडलेल्या ग्रंथांच्या आधाराने ते नाही करता येणार. खरे तर, लब्धप्रतिष्ठित विद्याव्यासंगी मनोवृत्तीचे इथे काम नाही. शिवाय असा प्रयत्न अप्रामाणिकपणाचाही ठरू शकतो. कारण, आपण जेव्हा अशा एका तत्त्ववेत्त्याविषयी विचार करतो, ज्याच्या शिकवणुकीचा फॅसिझमने वारेमाप उपयोग करून घेतला, तेव्हा त्या तत्त्ववेत्त्याविषयी आपण पूर्वग्रहरहित वस्तुनिष्ठ वृत्तीने लिहू-बोलू शकत नाही. नित्य पुनरागमन नि अतिमानव या नित्शेच्या प्रमुख कल्पना पाश्चिमात्त्यानी त्यांचा संदर्भ तोडून घेतल्या आहेत.

ज्या समाजात व्यक्तिवाद नि उपहासगर्भ बेपर्वा या गोष्टी शिगेला पोहोचल्या आहेत, तो समाज नित्शेला एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व असे मानण्यापेक्षा आपल्या हातातले एक आधुनिक शस्त्र मानतो. काही मंडळी आम्हाला असे पटवण्याचा प्रयत्न करतात की, नित्शे हा प्रतिभापुत्र असून एखाद्याने आगीशी खेळावे तसे तो विचाराशी खेळला. नित्शे प्रतिभावान होता की नाही. याचा निर्णय करीत मी बसणार नाही. पण तो प्रतिभेचे संतान मात्र बिलकूल नव्हता. त्याचे बालपण संस्कृतीच्या ऱ्हासाच्या अखेरच्या अवस्थेत गेल्यामुळे बिघडले होते. आता विस्तवाशी खेळण्याबाबत म्हणाल, तर त्या बाबतीत माणसानी खूप जबाबदारीने

अनुक्रमणिका

वागावयाचे असते. कारण शेवटी आग ती आगच आणि विचारांशी खेळणे हे तर कमी धोक्याचे मुळीच नव्हे. याबाबत आपणा सर्वांचे निश्चितपणे एकमत होईल.

मानवजातीचा इतिहास काही नित्शेला साथ देत नाही हे उघड दिसते. त्यामुळे लष्करवादाच्या समर्थकांचा नित्शेसाठी विश्वासार्ह दोस्त शोधण्याचा प्रयत्न आहे. त्याकरता विज्ञानाचा आधार ते घेऊ पहातात. याबाबतचे त्यांचे युक्तिवाद पाहू या : गेल्या अनेक वर्षांतील वैज्ञानिक शोध सिल्स मारिया मठातल्या मठवासीयाने (नित्शेने) जे लिहिले त्याचाच म्हणे पाठपुरावा करतात. या मठवासीयाने जगाचे यांत्रिक आकलन नाकारले आहे व खरोखरच आज आपण संभाव्यतेच्या जगात वावरतो आहोत, यांत्रिक नियतीच्या नव्हे. तसेच त्याने अस्तित्वमात्राच्या कोसळण्याविषयीही लिहिले आहे. जर का विश्व हा 'राक्षसी कारखाना' आधुनिक विज्ञान म्हणते त्याप्रमाणे कोसळणारा असेल, तर हे अरिष्ट ही मात न करता येणारी विश्वाची घटना मानली पाहिजे वगैरे. इथे काही कारणास्तव जो प्रश्न उपस्थित करता येत नाही तो हा की, कोसळणाऱ्या विश्वामध्ये न कोसळणारे जग निर्माण करणे हेच माणसांचे जीवितकार्य किंवा स्वीकृत ध्येय आहे असे नाही वाटत ?

पण वरील प्रकारच्या युक्तिवादांनी देखील माणसांची सहानुभूती मिळवता येईलच असे नाही. म्हणून नित्शेच्या मोहक रूपाविषयी, दाहक एकलेपणाविषयी, कोमलपणाविषयी, कनवाळू अंतःकरणाविषयी सांगितले जाते. पण खरोखरच आधुनिक पाश्चिमात्यांना नित्शेच्या बौद्धिक, नैतिक गुणांविषयी कदर आहे? तसेच त्याचा आतला आवाज नि आत्मिक बळ ओळखून आपण त्याच्यापुढे निस्वार्थी भावनेने नतमस्तक व्हावे असे पाश्चिमात्त्यांना खरोखरच वाटते? नाही. तंत्रप्रधान संस्कृतीला या गोष्टीचे काहीही महत्त्व वाटत नाही. तसेच, नित्शेच्या प्रतिभेने कुठल्यातरी मार्गाने विज्ञानाचा विकास आधी हेरला होता, तो तरल, संवेदनशील प्रकृतीचा होता, शुद्ध हृदयाचा होता, आदी गोष्टींचे तंत्रसत्तेला मुळीच सोयरसुतक नाही. नित्शेची महती त्यांना वाटते त्याचे कारण त्याचे तत्त्वज्ञान तंत्रसत्तेला भक्कम वास्तवता प्रदान करते हे आहे. तंत्रसत्ताधीशांना त्याच्या मूलभूत सिद्धांतांपैकी एक सिद्धांत फारच प्रिय आहे. तो म्हणजे– वास्तव जीवनातील मूल्ये ही नैतिक नि आत्मिक मूल्यांहून अधिक श्रेष्ठ असतात हा होय.

ज्या जगाने मानवापेक्षा वरचढ अशी तंत्रविद्या आज निर्माण केली आहे, त्याला अशा तत्त्वज्ञानाची निकड आहे. मानवाच्या आत्मशक्तीवर हुकमत गाजविणाऱ्या तंत्रज्ञानाचे सामर्थ्य हेच ज्या संस्कृतीचे इंद्रियविज्ञान बनले आहे, त्या संस्कृतीला नित्शेचे महत्त्व वाटते. पण इंद्रियवैज्ञानिक मूल्यांचा जर पृथ्वीवर विजय झाला, तर इंद्रियवैज्ञानिक दृष्टीने देखील जीवन संपेल, ही गोष्ट नित्शेच्या ध्यानी आली नाही. त्याचप्रमाणे तंत्रसत्तेच्या अधिपतीना हे कळत नाही की, तंत्रविद्या जेव्हा सर्वेसर्वा होणार तेव्हा तिचाही अस्त होणार !

नित्शेचा 'वरिष्ठवर्गीय जहालवाद' समकालीन तंत्रसत्तात्मक जहालवादाशी मिळताजुळता आहे. आज सर्वोपरी ठरलेल्या तंत्रविद्येचे जर का मानवाचेच पतन घडवले, तर जीवन पुरते निर्बुद्धपणाचे होईल. नित्शेचा शंभुभैरवी (डियोनेशियन) घटक म्हणजे जर अपौरूषेय धागडधिंगा असा अर्थ असेल तर ही गोष्ट स्पष्ट आहे की, नित्शेची मदिरेच्या नि मौजेच्या क्रूर देवतेची आराधना आजच्या पश्चिमेशिवाय कोणालाच झेपणार नाही. फरक एवढाच आहे की, प्राचीन कालांत यातून गंभीर शोकनाट्य तरी निर्माण झाले, पण आधुनिक काळात मात्र फार्स निर्माण होताहेत. तसेच आजच्या कालात शंभुभैरवी धागडधिंगा जेवढा त्याज्य नि घृणास्पद झाला आहे तेवढा तो यापूर्वी कधीच झाला नव्हता.

अनुक्रमणिका

सायबर्नेटिक्सच्या आधीच्या काळात 'शंभुभैरवी' यंत्रमानवाविषयी बोलताच येत नव्हते.

तंत्रविज्ञान सत्तेच्या भावनेला उंचावते. त्यामुळे नित्शेच्या मूल्यक्रमामध्ये तंत्रज्ञानाला सर्वांत वरचे स्थान मिळाले आहे. 'सिल्स मारिया' मठातील हा संन्याशी विचारतो 'सत्य म्हणजे तरी काय ?' आणि तोच उत्तर देतो की, सत्य म्हणजे ज्याच्या साथीला आनंद आहे असे गृहीत प्रमेय व कार्यशक्तीचा कमीत कमी व्यय. दशकानुदशके तंत्राधिपतींना भेट म्हणून तो अशी सूत्रे पाठवायचा.

काही उदारमनस्क तंत्राधिपतींना सुखवणारे त्याचे दुसरे एक सूत्र असे आहे. सत्य ? सत्य ही एक फसवणूक, ज्याच्याविना माणसाची एक विशिष्ट जात जगू शकत नाही. एरवी मूल्य हा जीवनाचा अंतिम पाया आहे. आणि जीवन जगणाऱ्या माणसांच्या विशिष्ट जातीविषयीचे त्याचे कोष्टक मानवतेला उद्देशून आहे हेंही विसरतां कामा नये.

जीवनाचे मूल्य? नित्शेचा निष्कर्ष आहे जीवनाला मूल्य नाही हा. पश्चिमेच्या विकासक्रमातील शोकनाट्यात्मक आणि शोक-सुख नाट्यात्मक अवस्थांमधून जावून फार्स हा कलेचा आकृतिबंध त्याने चालू काळासाठी पुढे आणावा ही गोष्ट देखील कुतुहलपूर्ण आहे. ज्या विचारवंताने प्रथम शोकनाट्याचा पुरस्कार केला, त्यानेच बुद्ध्या अबुद्ध्या फार्सची भलावण केली आहे. परंतु 'तंत्रसत्तात्मक जहालवाद' त्याची दखल घेत नाही. कुठलीही वरिष्ठवर्गीय नीतिमत्ता माणसाना उंच नीच, स्वामी-दास, नेता नि कळप, कर्ते नि अकर्ते यांच्यामध्ये विभागून टाकते. आणि तरीही खूप गंभीर, निवडक, उत्तम व वैचित्र्यपूर्ण दिसण्याची ती हाव धरते. नाहीतर तंत्रसत्तात्मक जहालवादाला आपल्यातील सत्ता गाजवण्याच्या अंगभूत प्रवृत्तींचा उपयोग करून घेता येणार नाही. आणि या प्रवृत्ती इतक्या बेफाट आहेत कीं त्याविषयी उघडपणे फक्त वैज्ञानिक कांदबऱ्यातच काही वाचायला मिळते. सत्ता गाजविण्याची ही हाव फक्त जगावरच नव्हे तर विश्वावरसुद्धा !

आता आपण शेवटी फ्रिड्रिच नित्शे नावाच्या गरीब, दयाळू आत्म्याकडे वळूया. एकदा त्याच्या पुस्तकांच्या प्रकाशनात गुंतलेल्या तरुणाच्या सोबतीने (नित्शेला एकटा बाहेर पडण्याची परवानगी नव्हती) तो फिरावयास गेला असताना वाटेत त्याला एक लहान मुलगी दृष्टीस पडली. तो त्या मुलीकडे गेला, नि त्या मुलीच्या केसाची बट त्याने सरळ केली आणि हसत म्हणाला, 'निष्पाप अस्तित्वाची ही मूर्तीच नव्हे काय ?' नंतर तो हॉस्पिटलमध्ये परतला नि कालांतराने दिवंगत झाला.

पण ही मुलगी मात्र चालतच राहिली. थेट आमच्या काळापर्यंत. प्रथम ती सँडल्स वापरे. पण मग तिला अनवाणी चालणे भाग पडले. कारण तिचे आणि तिच्यासारख्या हजारो-लाखो मुलां-मुलींचे सँडल्स. जगातल्या सर्वांत अधिक कुविख्यात फॅसिस्ट नरमेधखान्यात (आबशविट्स येथे) जमा झाले. पण तरीही मुलगी अखंड चालतच राहिली. कालांतराने तिला शानदार सँडल्स वापरायला मिळाले. आता ती सुंदर फरसबंदी रस्त्यांवर आत्मविश्वासपूर्वक चालताना दिसते.

* * *

# संवादात्मक कथन-पद्धती विषयी

“...सृजनशीलता, सृजनशील माणूस, निर्मितीचा आनंद या शब्दांनी मी गांगरून जातो. हे शब्द कोणाला उद्देशून असतील बरे ? अर्थात सर्वप्रथम कवींना, संगीतरचनाकारांना, विचारवंतांना. तात्पर्य प्रज्ञा प्रतिभावंताना. पण सर्वच काहीं प्रज्ञा प्रतिभावंत नसतात. मी सामान्य असलो तर? मला जेमतेमच बुद्धी असली तर? मला साहित्य, कला आवडूनही त्या क्षेत्रात निर्मिती काही करता आली नाही तर...?

“काही असले तरी मीही अनेक वेळा उत्कट आनंदाचा अनुभव घेतला आहे. तोही फक्त पुस्तकांतून व घटनांतूनच नव्हे. मी माझ्या नकाशे काढण्याच्या खोलीत बसतो. मान उंचावतो नि खिडकीतून दिसणारे बाहेरचे प्रचंड डेरेदार वृक्ष डोलताना पाहून मला विशेष काहीतरी लाभल्याचा आनंद होतो. नंतर सतत नकाशे काढण्याचे माझे काम सुरू होते. एकदा एक खुळा विचार माझ्या डोक्यात आला. ज्या क्षणी मला आनंद होतो त्या क्षणी पांढरा कागद निळा किंवा नारिंगी बनेल? माझ्या सुखाने जगात काही बदल होईल?”

वाचकांबरोबर विचाराचे प्रत्यक्ष दळणवळण साधावे या हेतूने मी प्रस्तुत लिखाणाला कथनरूप दिलेले आहे. ‘काय, चेटूक अमर आहे?’ आणि ‘चमत्कार’ या माझ्या पुस्तकांच्या प्रकाशनानंतर वाचकांची असंख्य पत्रे मला आली. ती प्रथम देऊन मग त्याविषयी सविस्तर चर्चा करणे हे रूढ पद्धतीला धरून झाले असते. पण ती पद्धती मला रूचत नाही. कारण, तसे केले तर न्यायाधिशाच्या खुर्चीच्या मागच्या बाजूला शहाणपणाचे प्रतीक मानले गेलेले जे घुबड कोरलेले असते, ते हळूच उठून माझ्या डोक्यावर येऊन बसले आणि अखेरचे अपीलकोर्ट बनण्याचा खुळेपणा माझ्या पदरी पडला असता. ती पद्धती वैचारिक प्रांतातल्या लोकशाहीला सोडून वाटते. मुख्य म्हणजे वास्तवातले शक्तिसंतुलन त्यांत प्रतिबिंबित झाले नसते.

खरे तर, अनेक वाचकांची पत्रे माझ्या पुस्तकांच्या पानांहून अधिक अर्थसमृद्ध आहेत. अर्थात, रूढ पद्धत अगदी उलटी करून पुस्तकातले विवेचन वरती व वाचकांचे चिंतन त्याला जोडलेले असे करता आले असते. परंतु या पद्धतीत ग्रंथकर्त्याच्या भूमिकेला अगदीच अल्प वाव मिळाला असता. मला तर माझ्या वाचकांबरोबर परत एकदा त्यांना कुठे काय खटकते आहे, त्याविषयी चर्चा करावयाची आहे. त्याकरिता मी नि वाचक, या दोन्ही बाजूंनी, स्वतंत्रपणे, समानतेच्या स्थानावरून, आणि परत एकत्र असे बोलले पाहिजे.

म्हणून वाचकांच्या पत्रांतील उतारे मी माझ्या कथनांमध्येच घातले आहेत. किंवा वाचकांचे विचार नि माझे प्रतिविचार एकत्र बुडले आहेत म्हणानात!

प्रस्तुत चिंतनाचा आरंभ मला एका अगदी दुधखुळ्या पत्राने करावासा वाटला. ‘प्रज्ञाप्रतिभेचे वरदान न लाभलेल्या सामान्य बुद्धीच्या व्यक्तीला निर्मितीचा आनंद प्राप्त होऊ शकतो का’ या वर दिलेल्या पत्राला मी दुधखुळे अशासाठी म्हणतो, की काहीशा बालसुलभ अज्ञानाच्या धाष्ट्याने त्याने तत्त्वज्ञानाच्या सर्वांत अधिक जटील क्षेत्रापैकी एका क्षेत्रात उडी घेतली आहे : मानव—सृजनशीलता—जगत. पण या पत्राला आपण सुज्ञ पत्रही म्हणू शकतो. कारण त्यात सृजनशीलतेच्या व्यापक नि विविध प्रांतातले आकलन अनुस्यूत आहे, जे माझ्या मते आज खास महत्त्वाचे आहे. ते अधिक सखोल करणे हा आमच्या संयुक्त चिंतनाचा महत्त्वाचा हेतू आहे.

***

अनुक्रमणिका

# घायाळ गवा

“...तुम्हाला आठवतंय ‘भविष्यकाळच्या रूपरेखा’ या आपल्या पुस्तकात इंग्रज ग्रंथकार आर्थर क्लार्क काय लिहितो ते? तो म्हणतो की, यंत्रविद्येचे चमत्कार जे आपणाला आज चकित करून सोडताहेत, ते पांचशे किंवा कदाचित शंभर वर्षांत देखील आपणाला अतिशय जुनेपुराणे वाटायला लागतील. पहिल्या वाफेच्या इंजिनाचे मॉडेल किंवा फोटो पाहून आज आपली जशी करमणूक होते, तशीच आजची ही सुपरसॉनिक विमाने, अत्याधुनिक मोटारी आणि अवकाशयाने पाहून, आमच्या नातवंडांनी देखील होईल. मनुष्याच्या आजच्या करामतीची तीन चारशे वर्षांनंतरच्या लोकांना करमणूक वाटेल, पोरखेळ वाटेल या कल्पनेने मला धक्का बसतो. पण त्यावर विश्वास ठेवणे मात्र कठीण नाही.

“पण स्वतःला मी एक असा प्रश्न केला, की जो तत्त्वज्ञानाच्या तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्याला कदाचित शोभणारा नसेल. काही असो. मी असे विचारतो, की मानवाचा चेहरा पाचशे, हजारच काय कैक हजार वर्षांनंतर देखील विचित्र किंवा हास्यास्पद का वाटत नाही? प्रतिभावान एस्किलसचा चेहरा...पास्कलचा चेहरा...राफाएलचा चेहरा...पुष्किनचा चेहरा नि अज्ञात प्रज्ञावंतांचे अज्ञात चित्रकारांच्या चित्रातले चेहरे ? अर्थात तत्कालीन कलेची वैशिष्ट्ये, कलेचे अपूर्ण संकेत, कलेचे ठळक दोष आदी गोष्टी कधी कधी हास्यास्पद वाटू शकतील. पण जीवनाचे सत्य ज्याचे मानवी चेहऱ्यात दर्शन घडवण्याचा चित्रकार-शिल्पकार आदींचा प्रयत्न असतो, ते कधी हास्यास्पद वाटणे शक्य आहे काय?”

सकाळच्या प्रहरी विदेशातील वृत्तपत्रांचे नि नियतकालिकांचे भारी गठ्ठे माझ्या मेजावर येऊन पडतात. मी ते प्रथम चाळतो आणि मग हळू हळू कागदाच्या त्या ढिगाऱ्यात गढून जातो. मला त्यावेळी क्षणभंगुर फेसाच्या बुडबुड्यांची आठवण होत नाही असे नाही, पण मी वाचतच राहतो. दुपार झाल्यानंतर मात्र त्या लहानशा संपादकीय खोलीची हवा भलभलत्या सनसनाटी बातम्यांनी इतकी भरून जाते, की माझ्या डोक्यात विचित्र, विलक्षण राक्षसी प्रतिमांचे स्फटिक बनू लागतात.

इटालियन नियतकालिक ‘इल तेंपो’ मानवाचा मेंदू कृत्रिम रीत्या राखून ठेवण्याच्या प्रयोगाविषयी संक्षिप्त माहिती देते. तर ‘लेक्सप्रेस’ हे फ्रेंच नियतकालिक त्याच विषयावर सविस्तर चर्चा करते. मानवाला अमर बनवण्याचा मार्ग त्याचा देह अमर करणे हा नव्हे, तर त्याचा मेंदू जो अतिशय गुंतागुंतीच्या स्वयंचलित उपकरणांनी जोडलेला असेल आणि जो विचार आचरणात आणू शकेल, तो अमर करणे हा आहे. ‘इल तेंपो’ अगदी चोख व्यवहारीपणाने आजच्या जगाला माहिती देताना म्हणते, की गर्भवती स्त्रीला जननघटकांवर परिणाम करणाऱ्या द्रव्याचे इंजेक्शन देऊन अजून जन्माला न आलेल्या मुलाचे व्यक्तिमत्त्व आपण हवे तसे घडवू शकतो.

‘स्टर्न’ मध्ये डॉ. ख्रिस्तियन बर्नार्ड माकडाचे हृदय माणसाला बसवण्याचे आश्वासन देतो आणि त्याचबरोबर आफ्रिकेत सहा हजार हत्तींची कत्तल कशी केली त्याचा खुलासेवार वृत्तांत वाचावयाला मिळतो. हा रिपोर्ट अगदी अत्याधुनिक पद्धतीने सादर केलेला असतो. हत्तींनी तुडवलेल्या प्रदेशाचा देखावा अणुस्फोटानंतरच्या प्रदेशाचा वाटावा.

‘व्होक्सटिमी’ या पत्राने कृत्रिम मानवी बीजारोपणाविषयीच्या नैतिक आणि कायदेविषयक परिणामाची चर्चा करणारा रिपोर्ट दिला आहे. एका फ्रेंच आरोग्यधामात कृत्रिम उपायांनी गर्भधारणा केलेले

अनुक्रमणिका

मूल जन्माला येते. ज्यावेळी प्रसूतीतज्ञ त्या बाळाची तपासणी करीत असतात, त्याच क्षणाला कदाचित दशलक्ष टन (टी. एन. टी.) शक्तीच्या मनुष्यसंहारक हायड्रोजन बॉम्बचा भूमिगत प्रयोग नेव्हाडामध्ये होतो. (या बॉम्बने होऊ शकणाऱ्या विनाशाइतका विनाश करण्यासाठी किती हजार हत्तींनी तो प्रदेश तुडवावा लागला असता कोण जाणे!)

स्विस साप्ताहिक 'डी वेल्टवोचे'ने आल्बेर्तो मोराविया या साहित्यिकाराची मुलाखत प्रसिद्ध केली आहे. अमेरिकेतील काही अवकाशकेंद्रांना भेट देऊन ते नुकतेच परतले आहेत. त्या अवकाशकेंद्रांतील कर्मचाऱ्यांना मोरावियाने नव्या धर्माचे यंत्रमानव म्हटले आहे. त्यांची जीवनातील अभिरुचीच नष्ट होत आहे. तरी आपली कामगिरी ते चोख बजावतात. त्याचबरोबर आपण एका स्वयंचलित यंत्राचे वेगळे काढता येणार नाहीत असे हिस्से बनलो आहोत, याचीही त्याना जाणीव झालेली असल्याचे व खंत वाटत असल्याचे मोरावियाने म्हटले आहे.

'यु. एस. न्यूज ॲण्ड वर्ल्ड रिपोर्ट' या अमेरिकन पत्राने अमेरिका साठवत असलेले गॅस आणि जंतूंचे डायग्रॅम याद्यांसकट प्रसिद्ध केले आहेत.

विविध माहितीच्या प्रवाहाचा हा प्रचंड लोट माझ्यावर फुटला आहे. धगधगणारी तारांगणे, मधमाशांची नृत्ये, सुपरसॉनिक आगगाड्या, हृदयाची कलमे, वाळवंटे जिंकण्याच्या योजना, नव्हे-तीं गुलाबासारखी फुलवण्याच्या योजना, मरिजुआना पिणाऱ्यांची प्रचंड संमेलने, अत्याधुनिक कलेची प्रदर्शने, कॉम्प्युटरने वर्तवलेली भविष्ये ... नेव्हाडामध्ये नवीन अणुस्फोट ... दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीच्या तंत्रविद्येवर अवलंबून राहणारे जिणे ... शहरांतल्या माणसांना बहिरे करून सोडणारा गोंगाट.

आणि अखेर माहितीच्या या जगडव्याळ लोटांतून जेव्हा मी निसटतो तेव्हाच काय तो मी खरा श्वास घेतो आणि मग हत्ती पहातो.

मी अगदी स्वच्छ तीन अंगांनी हत्ती पहतो. रे ब्रॅडबेरीच्या 'धी बेल्डट' या चित्रपटामध्ये सहसंवेदनात्मक भिंती असलेल्या खोलीतील मुले जसे काय वाटेल ते पाहू शकतात, तसे मी हत्ती पहातो : अजब आफ्रिका, वाळवंटे नि सिंह. मला कमी उंचीवरून उडणाऱ्या विमानांसारखे वेगाने माळरानाकडे धावणारे हत्ती पहायला आवडते. पण आता त्यांना सबमशिनगन्स वापरून अगदी काळजीपूर्वक नि बुद्धीला पटेल अशा रीतीने ठार केले जाणार आहे. अर्थात त्यांच्या मौल्यवान हस्तिदंतांना इजा पोहोचणार नाही अशा पद्धतीने हो! आणि मग त्यांचे सांगाडे कौशल्याने ठाकठीक केले गेले, तरी त्यांच्या रक्तांकित आतड्यांचे अवाढव्य डोंगर उरणारच, ज्यांची आफ्रिकन पार्श्वभूमीवर घेतलेली सौम्य चित्रे 'स्टर्न' या प्रतिष्ठित नियतकालिकाचे छायाचित्रकार भावनावशतेने जगाला जरूर पेश करतील!

या सगळ्यातून स्वतःला वाचवण्याकरता मी एका नव्या लाटेत उडी घेतो. 'लुक' या नियतकालिकात सी. पी. स्नो म्हणतात, की मानव जातीवर सध्या ओढवलेले संकट मानवजातीची क्षितिजे आज अतिशय विस्तारताहेत म्हणून उद्‌भवलेले नसून, तीं आकुंचन पावताहेत म्हणून उद्‌भवलेले आहे. ते सांगतात, की माणसाची कल्पकता फुलण्याऐवजी आज कोमेजते आहे.

तीन अमेरिकन नियतकालिके १९८४ त मंगळावरील उड्डाण नियोजित केले गेले असल्याची माहिती देतात. तर ‘पॅरिस मॅच’ हे नियतकालिक अवकाश-उड्डाणाच्या वेळी रेडिओ कॉन्टॅक्ट तुटला, तर टेलेपाथिक कॉन्टॅक्टची शक्यता नाकारता येत नसल्याचे सांगते. ‘धी ओब्सर्वर’ मध्ये एक अमेरिकन भाषाशास्त्रज्ञ लिहितो की, माणसाच्या अंतःकरणाच्या संघटनेचे स्वरूप पूर्वीसारखेच रहस्यमय राहिले आहे (आधुनिक विज्ञानाची भाषा मोठी विस्मयकारक आहे नाही ? पूर्वीच्या काळात ज्याला ‘आत्मा’ म्हणत, त्याला आता मोठ्या चलाखीने ‘माणसाच्या आंतरिक संघटनेचे स्वरूप’ म्हणतात) पश्चिम जर्मनीतील पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्राज्ञ जोकी बोडामोर ‘डी त्साइट’ या नियतकालिकामध्ये कायमच्या संपलेल्या जुन्या परंपरांबाबत चर्चा करतो.

मी मध्येच एकदम बहुरंगी वार्तापत्रांच्या ढीगातून बाहेर पडतो. आधुनिक जग ‘मागे पडलेल्या जगा’हून इतके भिन्न वाटते की, ते पाहून आज मला एक विचार सुचला : आमचे युग हे मुख्य भूमीशी दळणवळण तुटलेल्या एकाकी गलबतासारखे तर नसेल ? मागे खूप खूप दूर पडली आहे त्याची विशाल किनारपट्टी : मानवाचा इतिहास.

काठोकाठ खळबळीने भरलेल्या माझ्या संपादकीय कार्यालयाच्या वातावरणात मला श्वासोच्छ्वास घेणेही जेव्हा मुष्किल होते, तेव्हा मी जवळच्याच एका ‘बुलेवार’मध्ये जातो.

तेथे मुले खेळत असतात. वृद्धजन उन्हाच्या बाजूला बसलेले असतात. बुलेवार हा म्हाताऱ्यांचा तसेच मुलाचा प्रांत आहे. पंधरा वर्षापूर्वी म्हाताऱ्यांची संख्या तेथे मुलांहून कमी असायची. नंतर ती समसमान झाली. आता ती मुलांपेक्षा किंचित अधिक झाली आहे.

बुलेवार आता म्हातारे बनले आहेत. शरदाच्या प्रारंभी जेव्हा गरमी कमी होवून लिंडन नि पॉपलर या वृक्षांची पालवी झडू लागते, तेव्हा हे विशेषत्वाने जाणवते.

मी बुलेवारचा प्रेमी आहे. तेथे मनःशांती मिळते. चिरंतन स्वरूपी असे काहीतरी तेथे असते.

बुलेवार शुद्ध असतात — सायंकाळी न बोलताच दिवे लागतात तेव्हा देखील नि तरुपल्लवांचे अधूनमधून शीळ घालणे चालू असते तेव्हा देखील; रात्रीच्या समयी तर बुलेवार मायेची पखरण घालतात तेव्हा भंगलेले प्रेम तेथे अश्रू ठेवते.

होय. बुलेवार मनःशांती देतो. विशेषतः सायंकाळच्या प्रहरी. मी एका मुलीजवळ जातो. ती काठीच्या नाजूक टोकानं वाळूवर रेघोट्या काढीत असते. ती काय बरें रचते डोंगर की लाटा? पण तिची काठी मोडते. मुलगी जवळचीच दुसरी काठी घेते नि पहिली रेघच ती पुढे चालू ठेवते—ती आपल्या कामात व्यग्र असते. मधूनच तिचा चेहरा सुकल्यागत होतो. लहान दिसतो. त्रासिक होतो. तिच्या डोक्यातला विचार समजावा म्हणून मी त्या मळलेल्या लहान बोटांवर लक्ष केंद्रित करतो. ती लहान बोटेच काय ती आता मला उरली आहेत. आणि काठीच्या मोडक्या टोकाने जन्माला घातलेली ती नवता. पण अखेर मला हे समजले, की तिने काढलेल्या रेघोट्यात ढगही होता नि डोंगरही. तसेच त्यांत मेंढरांचे कळप नि लाटाही. मुलांच्या ‘प्रतिकात्मक’ चित्रांपैकी ते एक होते, ज्यामध्ये माणसाच्या कल्पनाशक्तीला हवे ते पहाता येते, जसे वाजणाऱ्या घंटेमध्ये हवा असलेला आवाज आपण ऐकू शकतो. लाटांसारख्या वाटणाऱ्या त्या

अनुक्रमणिका

जिवंत रेघांमध्ये मला मात्र 'घायाळ गवा' दिसला. प्रागैतिहासिक काळातील कलावंताने काढलेले तें एक उत्कृष्ट चित्र आहे.

'घायाळ गवा' —भावुकता आणि वेदना यांचे जिवंत गाठोडे—मला इतक्या स्पष्टपणे गवसला, की मी जवळ जवळ ठरवून टाकले, की ती मुलगी घायाळ गव्याचेच चित्र काढीत असावी.

"तुम्ही तुमच्या शेवटच्या पत्रात विद्यार्थी तत्त्ववेत्त्याच्या 'चिरंजीव माणूस' विषयक सिद्धांताविषयी लिहिलेत. मला ते वाचून त्या विद्यार्थ्याच्या सिद्धांतातील सहजसुलभतेविषयी, त्याच्या श्रद्धेतील बिनधास्तपणाविषयी व त्याच्या शोधाविषयी हेवा वाटला."

"खरे तर, तेव्हा मला दुःखच झाले व आज अधिकच होत आहे. जुन्या परिभाषेचा उपयोग करावयाचा, तर मी आहे पदार्थविज्ञानशास्त्रातला प्राणी. काव्यविहाराशी माझे नाते नाही. (नोवोसिबिर्स्क विश्वविद्यालयाच्या पदार्थविज्ञान शाखेचा मी पदवीधर आहे). तरी खऱ्या कवितेचे मला वावडे नाही. आधुनिक विज्ञानिक कादंबरी लिहणारा माझा आवडता लेखक होता नि आहे ब्रॅडबरी. (बरोबर सांगावयाचे तर मी जे प्रथम तुम्हाला पत्र लिहिले त्याचे कारण तुमचे पुस्तक मला आवडले हे नसून ब्रॅडबेरी हे आहे) मला वाटले, की तुम्ही त्याचे काहीसे भावनात्मक आकलन करता आहात. पण मी आता त्याबाबत नाही लिहीत.... तथापि, मी काहीसा कवी बनून तशा भावनेने पाहिले, तरीसुद्धा आमच्या तंत्रविद्येचे चमत्कार पांचशे वर्षांनी, इतकेच काय शंभर वर्षांनी देखील हास्यास्पद वाटतील असे स्वप्नात सुद्धा मला कधी वाटले नव्हते. प्रयलकाळाआधीचे निःसंशय वाटतील. परंतु हास्यास्पद? इतिहासपूर्वकाळातील हत्यारे आज आपणाला खरोखर हास्यास्पद वाटतात? शीडाची गलबते म्हणजे काय मस्करी वाटते? तुमचा विद्यार्थी तत्त्ववेत्ता पास्कालच्या चेहऱ्याने भारावून गेला आहे. तो त्याला मानवाच्या आत्मिक जीवनाची प्रतिमा म्हणून चिरंतन वाटतो. आणि तंत्रविद्या तसेच विज्ञान यापासून तो चेहरा त्याला वेगळाच वाटतो. माझ्यातर्फे त्याला होफमनच्या गोष्टीतील एक पान वाचायाला सांगा. त्यात होफमनने सतराव्या शतकाच्या मध्यकाळात फ्रान्समध्ये काचेच्या खिडक्या असलेली नवी गाडी (कोच) निघाली तेव्हा पॅरिसच्या नागरिकांना कोण आश्चर्य वाटले त्याचे वर्णन केले आहे. लोक रांगा लावून ती गाडी पहात होते. पास्कालचा चेहरासुद्धा त्या आश्चर्यचकित झालेल्या लोकांमध्ये असावा. (१७ व्या शतकातला त्याचा काळ होता) त्याच्या चेहऱ्याने देखील खिडकीच्या काचेला आपल्या बोटांनी स्पर्श करूनच तो चमत्कार खरोखरच घडला आहे का ते पाहिले असावे. कारण शेवटी पास्कालच्या अंतःकरणात शोध करणारा नि बोध घेणारा लहान मुलाचा आत्माच वसत होता. ज्या चेहऱ्याची तुमचा विद्यार्थी तत्त्ववेत्ता प्रशंसा करतो तो चेहरा वयाने बहुधा तिशीच्या नंतरचा असला तरी प्रतिभावान मुलाचा आहे.

तसेच पास्काल हा केवळ कवी आणि नैतिक तत्त्ववेत्ता नव्हता. तो एक श्रेष्ठ गणितज्ज्ञ व पदार्थविज्ञानवेत्ता पण होता. निश्चित विचाराचा पुरस्कर्ता या नात्याने तो यंत्रविद्येचा नि विज्ञानाचा चाहता होता. त्या क्षेत्रातील त्या 'चमत्कारा' विषयी त्याच्या मनात आदरभाव होता. तुमचा विद्यार्थी हे जाणतो काय? आमच्या भोवती घडणाऱ्या असल्या चमत्कारांवर माझे प्रेम होते व आहे. जे विमानातील बिनचूकपणाची पद्धत मला शोस्ताकोविचच्या संगीतरचनेहून आधुनिक माणसाविषयी कमी सांगत नाही. तसेच क्वांतम यंत्रशास्त्राने कल्पकतेला जे विविध, विलक्षण विषयाचे खाद्य नि उत्तेजन मिळते ते अत्याधुनिक कलाकृतींहून मुळीच कमी नसते. पण याविषयी हे एवढे म्हणजे सर्वस्व नव्हे. निःसंशय सर्वांना ठाऊक असलेली सत्येंच परत सुनावतो आहे मी.

अनुक्रमणिका

“वस्तुस्थिती अशी आहे, की जगाविषयीच्या माझ्या समतोल बुद्धीला एकदा जबरदस्त धक्का बसला त्याचा गाभा अतिशय वैयक्तिक स्वरूपाचा होता (स्त्रीबरोबरचे संबंध तोडण्याबाबत नाही मी म्हणत. पुरुषाविषयी मी लिहितो आहे. माझ्या बालपणापासूनच्या दोस्तीविषयी बोलतो आहे मी) परंतु तुमचा माझा परिचय अगदी अल्प नि अलिकडचाच असल्यामुळे या बाबतचा सारा तपशील काही मी लिहित नाही.

“आधुनिक पद्धती जी आज अनेक वर्षांपासून मी पहातो आहे, तिच्या मागे धूर्त व्यवहारीपणा, धोरणी आत्मिकता, नैतिक रीतेपणा, खरे म्हणजे पूर्ण अनैतिकता आहे. जेथून, दुर्गंधीयुक्त थडग्यापासून मागे हटावे तसा मी मागे हटलो आहे...

“त्यामुळे मी म्हणतो, की तुमच्या तत्त्ववेत्त्याची मानवावर—कालच्या, आजच्या नि उद्याच्या – जी बिनधास्त श्रद्धा आहे त्याचा मला हेवा वाटतो.

“मी कठीण परिस्थितीतून गेलेला माणूस आहे. आणि मी विचारही खूप केला आहे. संशयही फार घेतला आहे. आणि मी माझा सिद्धांतही बनवला आहे. मला निश्चित वाटते, की जग आज एक नवे परिमाण धारण करीत आहे. एक ऐतिहासिक उदाहरण देऊन मी हे स्पष्ट करू इच्छितो. आपण हे जाणताच, की प्रलयकाळाआधी एक खूप विकसित संस्कृती अस्तित्त्वात होती. तत्कालीन विद्यापारंगताना उडता येत होते. विद्युत्‌चा शोध लागला होता. अणुकेंद्राची रहस्ये कळली होती.

आणि अकस्मात जागतिक महाअरिष्ट कोसळले. मानवी संस्कृतीचा घास घेतला गेला. त्या महाअरिष्टाचा मानवाच्या मनावर जगप्रलयाच्या रूपाने कायमचा ठसा उमटला. त्या आपत्तीतून जे उरले त्यांना शून्यातून प्रारंभ करावा लागला... माझ्या या प्रमेयात एक गोष्ट अगदी निर्विवाद आहे ती ही, की ते महाअरिष्ट जागतिक होते. बाकी सारें कल्पकतेचा खेळ आहे.

“काही विद्वानांच्या प्रतिपादनानुसार, ज्यांमध्ये माझ्या वर्तुळातील मंडळीचाही समावेश आहे. विश्वातील एका अति प्रचंड द्रव्यखंडाने सूर्यमालेच्या संतुलनाला धक्का दिल्यामुळे पृथ्वीचा कल नि त्याबरोबर ध्रुवांचे स्थान ढळले आणि पृथ्वीवर जलप्रलय होऊन अनेक भूखंडे नि प्रदेशांचे प्रदेश महापुरात विलुप्त झाले.... मी एकदा घरी परतत असताना हमरस्त्यावरील मोटारगाड्यांचा न संपणारा सतत प्रवाह नि वर आकाशात उडणारी विमाने पाहून माझ्या मनात विचार आला : या नवीन महापुरात आज आपल्याला चिरंतन वाटणारी मूल्ये बुडणार तर नसतील? (त्यावेळी माझ्या मनात तुमचा विद्यार्थी तत्त्ववेत्ता मानवी चेहऱ्यामध्ये जे काय प्रशंसनीय पहातो तेच होते) आज ध्रुवांचे स्थान पुतः ढळते आहे असे नाही वाटत? – यावेळी भूगोलात्मकदृष्ट्या नव्हे. पण नैतिकदृष्ट्या? मला या विचारांनी प्रदीर्घ काळापर्यंत दारूण यातना दिल्या आहेत. आता मी जरा शांत झालो असलो, तरी हे माझे पत्र मात्र गोंधळाचेच आहे. तथापि चिरंतन मानवावर अगदी सहजतेने, सुलभतेने, निर्धास्तपणाने नि आनंदाने विश्वास ठेवणारांचा मला चिक्कार मत्सर वाटतो.”

आठवतें ना त्या मुलीचे ते चित्र? त्या मुलीने ते चित्र पूर्ण केले. हातातली काठी टाकून दिली आणि बोटे मोकळी करून आपण काढलेल्या त्या ड्रॉइंगवर जणू रक्षणार्थ हात ठेवला. मला वाटले ‘नवीन महापूर’ थांबवण्यासाठी आवश्यक तो सहज प्रयत्न त्या चिमुकल्या पॉपलर वृक्षाच्या पानाहून रुंद नसलेल्या हातात आहे. त्या हातात ‘घायाळ गवा’ जगत आहे.

अनुक्रमणिका

काही दशकांमागे ‘घायाळ गव्या’चा स्पेन देशांतल्या आल्तामिरा गुहेमध्ये जेव्हा शोध लागला, तेव्हा स्पॅनिश आणि फ्रेंच पंडितांना ती चित्रे इतिहासपूर्व काळातील चित्रकाराने काढली असावीत हे पटेचना. नीट्स रेषा, बोलका कुंचला, तंतोतंत चित्रण नि अनिर्बंध रचनाशैली आदी इतके आधुनिक वाटले, की माद्रिद येथे भरलेल्या विश्व चित्रकला परिषदेने घाईघाईने ते चित्र म्हणजे आधुनिक प्रतिभेचे चौर्य आहे असे जाहीर करून टाकले. आणि आल्तामिराच्या जवळपासच्या एखाद्या धनवान स्पॅनिश जमिनदाराच्या घरी राहिलेल्या आधुनिक कलाकाराकडे त्या कलाकृतीचे जनकत्व असल्याचा तर्कही केला. पण जेव्हा अशा प्रकारचा आरंभिक सनसनाटीपणा थांबला, भावनोर्मी शांत झाल्या आणि अशीच चित्रे कोंबोरेल गुहेमध्येही सापडली, जिथे कुठलाच आधुनिक कलाकार पोहोचणे शक्यच नव्हते. तेव्हा कोठे त्या चित्राचा काळ ठरविण्याचे गंभीर प्रयत्न सुरू झाले आणि शेवटी ख्रिस्तपूर्व वीस ते बारा हजार वर्षाचा काळ निश्चित झाला.

आता गव्यांविषयी खडान्खडा माहिती उपलब्ध झाली आहे. हजारो पानांचे संशोधन आतापर्यंत झाले असून चित्रणाच्या पूर्णत्वाविषयी आणि इतिहासपूर्वकालीन कलावंतांच्या संभाव्य प्रेरणांविषयी बरीच चर्चा झाली आहे. कोणत्या असाव्यात त्या कलावतांच्या प्रेरणा? नुसते कार्यशक्तीचे आधिक्य, की यातुविधी, की भोवतालच्या वास्तवाचा वेध घेणाऱ्या मानवाच्या असंज्ञ अंतर्मनाचा प्रयत्न?

गव्यांच्या चित्रांच्या बाबतीत वाचताना — त्यांच्या ताठर स्नायूंचे थरथरणे, त्यांच्या आखूड पण बलिष्ट तंगड्यांची लवचिकता, कलाकाराच्या हाताला नागड्याउघड्या वास्तवाचे जिवंत चित्रण करणे किती साधले आहे तें, जनावरांचे घनदाट जंगलातून वेगाने पळणे, डरकणे, आणि मागावरील शिकाऱ्यांचा त्वेष अशा अनेक बारकाव्यांकडे लक्ष जाते. पण मला असे वाटते, की त्या गव्यामध्ये विशेषतः सर्वात लक्ष वेधून घेणाऱ्या घायाळ गव्यामध्ये ध्यानात न आलेले असे जे आहे, ते त्याच्या अमरत्वाची रहस्ये जाणून घेण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

‘घायाळ गव्या’च्या एखाद्या राजासारखा बलदंड, तरीपण पोरासारख्या असहाय असलेल्या तुटलेल्या पंज्यात, त्या नतमस्तक पराजिताचा मोठ्या मनाच्या जेत्यावर विश्वास —जो हजारो वर्षानंतर शेक्सपीअरच्या शोकांतिकांमध्ये फिरून आम्हाला चकित करतो. कलाकाराने त्या गव्याला नवे सत्य नि नवे सौंदर्य दिले आहे जे मानवी सौंदर्य आहे. मानवी सौंदर्याचीं ही चित्रे गव्यांचीं का असेनात, ती प्राणपणाने झुंज देण्याची हिंमत नि जिद्द यांनी ओतप्रोत भरलेली आहेत. नवलाची गोष्ट ही आहे, की त्यात क्रौर्य अजिबात नाही. ज्या कलापंडितांनी ही चित्रे समकालीन युरोपियन कलाकारांची असल्याचे जाहीर केले, त्यांना हा शुद्ध नैतिक आशय दिसू नये हे विचित्र वाटते. आधुनिकतावादी कलाकाराने त्यात निश्चितच क्रौर्य ओतले असते!

इतिहासपूर्व काळातील कलाकारांच्या नागड्याउघड्या वास्तवाच्या (जगणे म्हणजे जीव घेणे) चितारण्यात क्रौर्याचा अभाव असावा या वस्तुस्थितीच्या पोटांत मानव्याच्या भवितव्याची आशा आहे. त्या कलाकाराचे कलाविश्व करुणामय आहे. आणि मला हे तथ्य त्या कलाकाराचे ‘ड्रॉइंग’ कलेच्या दृष्टीने किती निर्दोष आहे, दाट कावेच्या पुटांचा उठाव किती साधला आहे वगैरेहून अधिक महत्त्वाचे वाटते.

घायाळ गव्याच्या रंगाऱ्याने आपले काम संपवून गुहा सोडली. जेथे खाली विस्तव पेटलेला होता नी भोवती शिकाऱ्यांची बायकामुले स्वप्ने पहात झोपलेली होती. ती प्राचीन पुराणी रात्र नि ते पुराणे जग हेच

अनुक्रमणिका

त्याचे आवतीभोवतींचे अस्तित्व. पण तो कलाकार विश्वाच्या अमर्यादित्वाला नि वैश्विक रहस्यांना तुल्यबळ ठरला. तो खुद्द एक सूक्ष्मविश्व होता. म्हणजेच तो 'सृजनशील माणूस' होता.

नेहमीच्या रात्रींप्रमाणेच ती रात्रही अस्वस्थ होती. वारा शीळ घालत होता. जिवंत, प्राणवान गवे गर्द वनराजीत सूंसाट धांवत पळत होते. पण प्राचीन काळातील रात्रीच्या नेहमीच्या अस्वस्थतेत काही नवीन घडलेले ऐकू जात होते : मायकेल अंजेलो पत्थराला आकार देत होते, मोझार्त व्हायोलिनला सूर लावीत होते, तर पुष्किन हांसत होते.

"... चिरंजीव माणसावरील श्रद्धा माझ्या मनात सहजपणे उद्‌भवली काय? एक गोष्ट मी निःसंशय मानतो, की ती श्रद्धा माझ्या मनात संपूर्णतया स्वाभाविकपणे निर्माण झाली. प्लेटोच्या संवादांनी त्या श्रद्धेचा प्रारंभ झाला. तत्त्वज्ञान शाखेत सामील होण्यापूर्वी मी ते वाचले. तेव्हा मी फक्त सोळा वर्षाचा होतो. आणि कारखान्यात काम करून रात्रीच्या शाळेत शिकत होतो. एक गोष्ट त्यावेळी मला पक्की समजली. माझ्याआधी दोन हजार वर्षे जगात बुद्धिमान, गंभीर विचार करू शकणारी, शहाणीसुरती नि आवश्यक तेव्हा शूरांचे सुंदर मरण स्वीकारणारी चांगलीं माणसे होऊन गेली आहेत. मी प्लेटोचे संवाद तत्त्वज्ञानाचा दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असताना दुसऱ्यांदा वाचले. तेव्हा माझ्या संशोधनाचाही ते विषय झाले होते. पण त्यामुळे मी त्यांच्याकडे विद्यार्थ्याच्या गरजेच्या दृष्टींतून पाहिले होते. मी ते अनुभवले नाहीत. मी ते पढलो. काही काळानंतर फिरून मी त्या संवादांकडे वळलो नि मग मात्र प्लेटो माझ्या आत्म्यात शिरला. अभ्यासाच्या विषयाप्रमाणे तो आता माझ्याबाहेर राहिला नव्हता. पण माझ्या अंतर्यामी पोहोचला होता. आता माझे आकलन एका मुलाचे साधे भोळे आकलन उरले नव्हते. आता मला प्लेटोचा विवेक व त्यातील आत्मिक जगाचे सौंदर्य कळलेले होते. आता मी प्लेटो वाचीत नाही. मी त्याच्या सांगाती जीवन जगत आहे. त्याला स्थलकाल लागत नाही. तो माझ्या आत्मिक जगाचा अणुरेणू बनला आहे माझ्यात वास करणाऱ्या चिरंतन मानवाचा तो जीवाणु बनला आहे. भूतकाळाच्या सिद्धी जतन करण्याविषयीचे मार्क्सचे सूत्र आपणाला ठाऊक असणारच. भूतकाळाच्या सिद्धीचे जतन ही गोष्ट मार्क्सने माणसाचें 'सामाजिक मानव' म्हणून, म्हणजेच माणसाचें 'माणूस' म्हणून पुनरूत्थान होण्याची आवश्यक अट मानली आहे. व प्रत्येक माणसात चिरंजीव माणसाविषयीची जाणीव असणे हा भूतकाळातील सिद्धी जतन करण्याचाच एक मार्ग आहे.

"... आणि यामुळे मी अगदी बेचैन होतो. तुम्हाला आठवत असेल मी तुम्हाला माझे पहिले पत्र लिहिले त्याचे कारण मी तुमच्या पुस्तकात पाहिलेला उतारा... 'सॉक्रेटिसने विषाचा प्याला तोंडाला लावण्यापूर्वी तुम्ही त्याच्यापाशी बसून बोलत आहात; तुम्ही स्वतंत्र विचार नि प्रस्थापिताला विरोध करणारे आहांत. पण तुम्हाला हेलोइज प्रेमाविषयी लिहिते आहे. तुम्ही उमराव आहात, पण डिसेंब्रिस्ट क्रांतिकारकासारखे पुरोगामी क्रांतिकारक असल्यामुळे सिनेट चौकात तुम्हाला घोड्याच्या टाचाखाली झारने तुडवून ठार मारले आहे; तुम्ही कम्युनार्ड कांतिकारक आहांत नि तुम्हाला पॅरिसमध्ये फाशी दिले आहे... होय. मला.

"... मी देखील असाच विचार करतो की, मानवतेच्या विकासातील वास्तव आणि अत्युच्च अवस्था ही फक्त आज हीच आहे. कारण ही अवस्था असंख्य पिढ्यांच्या आत्मिक नि नैतिक अनुभवांनी भरलेली व एकवटलेली आहे आणि मला जर आजचा माणूस व्हायचे असले तर ज्यांनी प्रेम केले, जे लढले, जे हरले, ज्यानी आशाआकांक्षा धरल्या, नि भवितव्याखातिर बलिदान केले, त्यांचे विचार, भावना मी माझ्यात

अनुक्रमणिका

पोसल्या पाहिजेत. आपल्यामध्ये चिरंजीव माणसाच्या जाणीवेचे जतन केल्याशिवाय आपण आजचे माणूस होऊंच शकत नाही.

“...मी परत परत ‘जाणीव’ हा शब्द वापरतो आहे खरा, पण त्या शब्दाच्या निश्चित अर्थाविषयी मला खात्री नाही. मी म्हणेन माणसाने आपल्यामध्ये ‘चिरंजीव माणूस’ बांधला पाहिजे. होय. बांधला पाहिजे. शेवटी आमच्या आत्मिक जीवनाचे सुद्धा एक विशिष्ट बांधकाम, एक विशिष्ट शिल्प... आहेच...”

शेवटी मी त्या मुलीच्या वाळूवरील चित्रणापासून दूर झालो. त्यात माझ्या कल्पनाशक्तीने ‘घायाळ गव्या’च्या लक्षणांचा शोध लावला. आता माझ्या संपादकीय कार्यालयात पोहोचण्याची वेळ झाली होती, जेथे वृत्तपत्रांचा नवा गठ्ठा माझी वाट पहात असणार. एकदोन तासानंतर त्या सनसनाटीने भरलेल्या वातावरणातून नव्या आणि विलक्षण प्रतिमांचे चमचमणारे ‘कण’ बाहेर पडतील. मी विचार करत करत ‘बुलेवार’मधून चाललो होतो. प्रलयकाळाआधीच्या कलाकाराला आपल्या जगाबरोबर तुल्यबळ होणे आजच्या आधुनिक सृजनशील कलाकारापेक्षा सोपे होते हे माझ्या लगेच लक्षात आले.

वीस हजार वर्षाच्या मार्गाने जगात एक नवीन देखावा निर्माण केला आहे. इतकेच नव्हे, परंतु मानवी आत्म्यामध्येही भर घातली आहे. त्याने आत्म्याची घनगंभीरता वाढवली आहे. त्याला अधिक ज्ञानाने नि शक्तीने संपन्न, समृद्ध केले आहे. आज तो हजारो वर्षाहून हजारो पटीने अधिक काही आत्मसात करून घेऊ शकतो. पण त्याला आज अफाट गुंतागुंतीला तोंड द्यावे लागत आहे. तरी पण काहीतरी अपरिवर्तित उरलेच आहे. हे ‘काहीतरी’ सागरतळाच्या मौक्तिकासारखे आहे. ‘घायाळ गव्या’समोर ते ठेवले तर हजारो वर्षे लोटली आहेत असे वाटणारच नाही.

पण ती लोटली आहेत खरी.

माणसाच्या आत्मिक जगात प्राचीन वीरपुरुषांची वीरता, आबेलार्दहेलोइजचे प्रेम, जाळलेल्या, मारलेल्या, पुरलेल्या, अनन्वित छळ सोसलेल्या निरीश्वरवाद्यांच्या यातना, नि त्याचबरोबर देवालये उभारणाऱ्यांची उदात्तता पण समाविष्ट झाली आहे.

मानवाच्या आत्म्याने स्पार्टाकसचे धैर्य, लोकसत्तेसाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचा त्याग, लेनिनची महात्मता तसेच कार्बिशेबचे आणि मुसा जलिलचे कर्तव्यप्रेम आदी सारे आत्मसात केले आहे.

मानवाच्या आत्मिक अनुभवात एडिपस आणि फाउस्ट, हॅम्लेट आणि आयवान कारामाझोब एकजीव झाले आहेत.

“...मानवी जगताच्या प्रमुख अंगांपैकी नैतिक धन हे एक प्रमुख अंग आहे. फक्त आनंद, उत्साह, आशा, प्रेम यांतच नव्हे तर फिटलेल्या संशयात, मिटलेल्या वेदनेत, जागून काढलेल्या रात्रींच्या स्मृतीत आणि आपले प्रमाद मान्य करण्यात ते अंतर्हित आहे.

“...गोंधळलेल्या अवस्थेत लिहिलेल्या, घोटाळ्यांत टाकणाऱ्या त्या पत्राबद्दल मला आता दुःख होते. वस्तुस्थिती अशी आहे की, माझा जो विकास झाला त्यात बुद्धीने हृदयाला खूप मागे टाकले.

अनुक्रमणिका

आकिलिसने कांसवाला मागे टाकले. 'बौद्धिक खेळ खेळण्यात' मी प्रवीण बनलो होतो. पण नैतिकदृष्ट्या मी दुबळा राहिलो. दुर्दैवाने बहुतेक प्रकृतिविज्ञानिकांची हीच आजची शोकांतिका आहे. वरवर विपरीत वाटले, तरी याबाबतचे सत्य असे आहे, की हृदयावर हाणलेल्या टोल्यामुळे विवरणात्मक 'प्रमेये' शोधून काढणाऱ्या बुद्धिमत्तेचा आधारस्तंभच राहात नाही. अशा मनोवृत्तीमुळं माझी बुद्धी नष्ट होवून 'नवीन प्रलयाच्या लाटेने ध्रुवांचेच स्थान ढळते आहे' वगैरे सिद्धांत मी त्या पत्रांत लिहिला...

"...खरोखरच आधुनिक जगात ज्याला काही पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञ 'भयंकर आणि कुरुप' म्हणतात ते आहे. परंतु इतिहासातील महान घडीचा तो 'फाजिल खर्च' आहे. मानवजात आज जे अनुभवत आहे, ते केवळ कालखंडाचे परिवर्तन नव्हे, तर युगाचे परिवर्तन आहे : मानवी समाजाचा चेहराच आज बदलत आहे. पृथ्वीग्रहाचा चेहराच आज बदलत आहे.'

"...तुमच्या तत्त्वज्ञ विद्यार्थ्यांच्या स्वतःमधील चिरंजीव माणसाचा शोध घेण्याविषयीच्या मनोदयाशी मी आज अधिक सहिष्णू बनलो आहे. अर्थात शंभर किंवा पांचशे वर्षांनी देखील आधुनिक तंत्रविद्येच्या सिद्धी हास्यापद ठरणार आहेत असे मात्र मला अजूनही वाटत नाही. अशी मते सुद्धा जरा 'फाजिल'च वाटतात."

***

अनुक्रमणिका

# विषाचा प्याला

दहा वर्षांचा मुलगा मी! घरांतल्या माळ्यावरून धुळीने बरबटलेले, अर्धे फाटलेले, सुरुवातीची पानेच नसलेले, एक पुस्तक शोधून काढतो. ॲन्डरसनच्या पुस्तकांनी झपाटलेला असा तो माझ्या किशोरावस्थेचा काळ होता. कधी एकदा त्या पुस्तकाच्या विश्वात पाऊल टाकीन असे मला झाले होते. पण एक तास गेला, दोन तास गेले. मी वाचतोच आहे. तरी त्या पुस्तकातले मला काही समजेचना. डोके दुखू लागले. आणि इतक्यात एका ओळीने माझे लक्ष वेधून घेतले. जीवनभर माझी साथ करीत राहील असे काहीतरी त्या पुस्तकाचा अज्ञात लेखक मला सांगून गेला. ‘लक्षात ठेव, शिल्पकार तूच तुझ्या जीवनाचा.’

आजवर मी ती ओळ विसरू शकलेलो नाही. पुढील आयुष्यात मला नेहमीच असे वाटत आले आहे, की मला सतत जागृत नि कार्यतत्पर ठेवणारी ती ओळ एक निगूढ शक्ती आहे. इतर अनेक मुलांप्रमाणे नंतर मी माझा व्यवसाय शिकलो. वस्तूंच्या प्रतिकृती कराव्या, लाकडावर कोरीव काम करावे, वस्तूंची लवचिकता अजमावावी, छाया—प्रकाशाची किमया समजून घ्यावी, पण शिल्पकार म्हणून माझा साधनविषय जो पत्थर तो त्या पुस्तकातल्या ओळीत लिहिल्याप्रमाणे माझा मीच होतो!

माझ्या बालमनावर नवसृष्टी उभी करणाऱ्या ॲन्डरसनच्या प्रभावाहून कमी प्रभाव गाजवणारे नाही ठरले ते शब्द! ‘पण सर्व शक्तीमान होण्यासाठी मनुष्याने करीत राहिले पाहिजे.’ पण काय? काय करीत राहिले पाहिजे?

अनेक वर्षे लोटली. उन्हाळ्यातल्या एका संध्याकाळी मॉस्कोतल्या लेनिन वाचनालयातील एका नीरव हॉलमध्ये मी वाचीत बसलो आहे. नि अचानक ती महाप्रभावशाली ओळ माझ्या हातातील काळ्या बांधणीच्या पुस्तकातून डोके वर काढून परत माझ्या भेटीला आली. मी त्या पुस्तकाच्या लेखकाचे नाव परत एकदा वाचले. पिको देला मिरांदोला.

इटलीच्या पुनरुज्जीवन-आंदोलनाचे माझे संशोधन त्यावेळी चालू होते. आणि पिको देला मिरांदोला हा त्या विश्वविख्यात आंदोलनाचा धीरोदात्त नायक! विस्मयकारी अष्टपैलू प्रज्ञाप्रतिभेचा तो युरोपचा पुरुष इटलीत होऊन गेला. समकालीन बखरकारांच्या लिखाणानुसार दहा वर्षांच्या अल्पवयातच तो इटलीचा सर्वश्रेष्ठ कवी नि वक्ता मानला जाऊ लागला नि तरुणपणीच तत्कालीन उपलब्ध विश्वकोषात्मक ज्ञानाचा तो धनी झाला. बावीस भाषांतून तो वाचन नि लेखन करी. नंतर आणखीनही काही भाषांवर त्याने प्रभुत्व संपादन केले. काव्य नि तत्त्वज्ञान यांचा तर त्याच्या ठायी सृजनशील नि कृतिशील मिलाफ झालेला होता. जग नि जीवन यांविषयीची उच्च विचारसरणी नि मानवाच्या कर्तृत्वावर अविचल श्रद्धा या गुणांमुळे त्याच्या साहित्याचा परिमळ सर्वत्र दरवळायला वेळ लागला नाही. ख्रिस्ती धर्मसंस्थेने त्याची प्रज्ञा नि साहित्य पाखंडी ठरवली. तो जर शंभर वर्षे आधी किंवा ५० वर्षे नंतर जन्मता—म्हणजे ज्या काळात धर्मसंस्थेने पाखंड्यांबाबत निकाली पावले उचलली—तर संभवतः त्याला जाळूनच मारले असते. पण त्याच्या काळात धर्मसंस्थेला किंचित वेगळी लहर आलेली असावी. त्यामुळे त्याचे साहित्य तेवढेच अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडले नि त्या महान प्रज्ञावंताला, पिको देला मिरांदोलाला एका किल्ल्यात बंदिस्त जीणे जगावे लागले. त्याचे चरित्रकार सांगतात त्याप्रमाणे फक्त ३१ वर्षांच्या तरण्याताठ्या वयात अति बौद्धिक श्रमामुळे बंदिवासातच तो मरण पावला!

अनुक्रमणिका

त्याच्याविषयी त्या आधी मी थोडेबहुत वाचलेले होते. पण त्याचे साहित्य माझ्या हाती तोवर पडले नव्हते. मला त्याची पुस्तके शोधूनही सांपडलेली नव्हती. नि अचानक आज माझ्या हातात आला होता पिको देला मिरांदोला, ज्याला मी बालपणापासून ओळखत होतो. तासभर त्याचे ते पुस्तक वाचल्यानंतर माझ्या मनात किंचितही शंकेला जागा उरली नाही. की मला अति भारावून सोडणारी ती ओळ 'दि दिग्निताते होमिनिस' (मानवाच्या प्रतिष्ठेविषयी) या त्याच्या जगविख्यात भाषणातली होती. मी परत वाचले ते शब्द, 'लक्षात ठेव. शिल्पकार तूच तुझ्या जीवनाचा'.

या भाषणातच मिरांदोलाने माणसाला अखिल अस्तित्वमात्राचा सर्वश्रेष्ठ आविष्कार म्हटले आहे. तो म्हणतो, 'माणूस आहे कदापि न सरणाऱ्या चिरंजीव शक्तीचा स्रोत. नैतिक नि बौद्धिक विकासाची अनंत शक्यता असलेला प्राणी' मनुष्याला तो विश्वाच्या केंद्रस्थानी कल्पितो. मिरांदोला म्हणतो, की 'मनुष्यजन्माचे हे महद्‌भाग्य, की जे त्याला हवे ते तो निर्मू शकेल'.

चारशे वर्षांनंतरचा विसाव्या शतकाच्या मध्यकालातला दुसरा एक कवी तरी काय तेच सांगतो : फक्त अधिक ठासून. तो म्हणतो.

जोजवूं, निजवूं नको तव आत्म्याला,

व्हावा नच बेसूर, बेताल, मंद वायू,

यास्तव कार्यमग्न ठेव आत्मशक्तीला

रात्रंदिन कार्यमग्न, रात्रंदिन कार्यमग्न !!

हे दोन आवाज : एक पिको देला मिरांदोलाचा, नि दुसरा निकोलाय झाबोलोत्स्की या रशियन कवीचा. हे आवाज नेहमी माझ्या कानी गुंजत राहिले आहेत.

आतां एक पत्र पहा : "मी हे रात्रीच्या वेळी लिहितो आहे. माझ्या मेजावर वह्यांचे ढीग पडले आहेत. आतापर्यंत २८ निबंध तपासून मी पार गळून गेलो आहे. कर्कश घंटीच्या केकाटणाऱ्या आवाजासारखा आवाज डोक्यात घणघणू लागला आहे. कार्याधिक्याने नाही थकत तेवढा माणूस, पण तोच जर एकसुरीपणा आला, तोचतोचपणा आला, की नक्कीच ठार होतो माणूस ! हस्ताक्षरातला फरक वगळलात तर हा मुलगा काय नि तो मुलगा काय, तसेच ही मुलगी नी ती मुलगी—फरक काय ? तातीयाना या पुष्किनच्या नायिकेसारखे तिचे नि फक्त तिचेच असे काही स्वत्व जर व्यक्तिपाशी नसेल तर... आणि एक व्यक्तीच दुसऱ्या व्यक्तित्वाची भुकेली असू शकते नि दुसऱ्याला समजू शकते. मला वाटते तो पास्काल (फ्रेंच तत्वचिंतक) असावा. तो म्हणतो, की माणूस जितका अधिक अभिजात बुद्धीचा तितका तो दुसऱ्यांचे अभिजात गुण अधिक पारखतो.

"पण पुष्किनच्या तातियानावर लिहिलेले बहुतेक मुलांचे हे निबंध त्या दृष्टीने किती रटाळ नि किती अन-अभिजात ! पुष्किनची ती गूढ नायिका इतकी अभिजात, की विचारवंतांच्या पिढ्यांमागून पिढ्यांना तिने विचार करायाला लावले आहे. मी हे अपराधी भावनेने लिहितो आहे. कारण जर एखाद्या मुलाचे वा मुलीचे मन (ही मुले चांगली चौदा—पंधरा वर्षांची आहेत) स्वतःचा वेगळेपणा पहाण्या-समजण्या-उमजण्या इतपत

पुरेसे हाललेले नसेल, जागृत नसेल, तर मग (आता हे आगळे वेगळे पहाणे, समजणे उमजणे हे बहुधा मृगजळ असते म्हणा) खुद्द शिक्षकाने आपल्या व्यक्तित्वाची शंका घ्यायला नको का?

अर्थात संशय घेण्यास, तात्त्विक चिंतन करण्यास दिवसा सवड असते कुठें? वर्ग घ्यायचे असतात. शिक्षकाच्या मिटिंग्ज असतात, पालक भेटत असतात. रात्रीच्या वेळी जेव्हा खिडकीबाहेरचे जग सामसूम झोपेच्या आहारी गेलेले असते, तेव्हा तुम्ही स्वतःशी बोलू शकता नि तेव्हाच विचार डोक्यात येतात.

“कौन्स्तान्तिन पावतोवस्की या साहित्यिकाला (रशियन) फक्त कल्पनामय जीवनाविषयी पुस्तक लिहिण्याची इच्छा होईल. आपल्या या तोतया जीवनचरित्रात वाटेल त्या साहित्यकाराशी त्याला दोस्ती करावीशी वाटेल. ब्लोक या साहित्यिकाला तो भेटू शकेल. वास्तव जीवनात त्याने त्याला पाहिलेही नसेल. पण जर का मी लेखक असतो, तर ह्याहूनही काहीतरी अधिक विस्मयकारी निर्माण करून दाखवण्याचे मी धाडस केले असते. एका संध्याकाळी मी अनेक शतकात नि अनेक देशांत होऊन गेलेले माझे आवडते नायक एखाद्या हॉटेलमध्ये एकत्र जमवले असते. हो खरंच जमवले असते! ते सगळेच अगदी आवडीने ‘सत्यं शिवं सुंदरम’ची चर्चा करतील. पण चर्चा करूनच ते थांबणार नाहीत. कृतीही करतील. जुलुमी कॉन्स्टन्सच्या तळघरात बंदिस्त पडलेल्या जॉन हुसने तिथून निसटावे म्हणून खुद्द सेर्वांतीस त्याच्या रक्षणार्थ तलवार उपसेल. तरीही, जॉन हुस पळून जाईल, की सॉक्रेटिसप्रमाणे आपल्या तत्त्वांना जागून बंदिवासातच राहील? या विलक्षण पुस्तकात ज्या निस्पृहतेने व निर्भयतेने सॉक्रेटिस विषाचा पेला प्याला, त्याच निस्पृहतेने नि निर्भयतेने जॉन हुस, ज्याचा शिरच्छेद झाला, त्या ब्रिटिश तत्त्वचिंतक थॉमस मूरच्या बाजूला खडा राहील. बाकी मला हे जरूर मान्य केले पाहिजे, की मी लेखक नसून साहित्यविषय शिकवणारा एक शिक्षक आहे. म्हणून साधे प्रकल्पच हाती घेतलेले बरे.

मला जगातल्या वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या कालखंडात होऊन गेलेल्या ध्येयवाद्यांच्या बंदिवासातील साहित्याचा एक साहित्यसंग्रह तयार करावासें वाटते. अगदी सॉक्रेटिसपासून तो चेर्निशेवस्की व झेरजिन्स्की धरून थेट दुसऱ्या महायुद्धापर्यंत. अर्थात फुचिक नि जलिल हेही येतीलच. असे पुस्तक तरुण वाचकाला नैतिक कार्याची महती पटविण्यास सहाय्यभूत होईल. कोणत्याही परिस्थितीत आपल्या कर्तव्यास जागावयास शिकवील. खरेच, मी प्रचंड प्रकाशनाविषयी नाही म्हणत. माझ्या शाळेतील वाचनालयाला अशा पुस्तकाची भले एक प्रत मिळाली तरी चालेल. मी माझ्या मुलांमुलींकडून त्या पुस्तकाच्या हस्ताक्षरीय प्रती तयार करून घेईन. हो. हस्ताक्षरीय प्रती. ती प्रत अधिक हृदयाला भिडेल. कधी कधी वर्गाच्या वेळी मी स्वतः त्यातील माझा बौद्धिक वाटा उचलीन. “तू युरा, थॉमस मूरचे त्याच्या कन्येला लिहिलेले पत्र आणि ‘युटोपिया’ या त्यांच्या ग्रंथातले निवडक उतारे लिहून काढ. हं. आणि विक्टर, तू रे, तू जान हुसचे शेवटचे पत्र लिही. लीदा, तू कांपानेला (स्पॅनिश तत्त्वचिंतक) यांच्या ‘सिवितास सोलिस’ (सूर्यनगरी) या पुस्तकातील एक पान लिहून काढ बरे. आणि तू सर्गेय, तुला आम्ही सेर्वान्तिस कृत डॉन क्विझोटाच्या प्रथम खंडातले उतारे देणार. आणि माशा, तुला ते बघ, पूर्वीचे डिसेंबरवादी क्रांतिकारक माहित असतीलच. त्यांच्यापैकी लुनीनची पत्रे तू लिहून काढ बरे !”

“मी तसा कोणालाच विसरत नाही. ना मुलांना, ना मुलींना. ना थोर पुरुषांना.

“आणि इथेच आम्हाला तुमच्या मदतीची गरज वाटते. (आता मनोराज्य म्हणजे मनोराज्य. पण त्याचाही काही शुद्ध हेतू असतोच.) मला माझ्या विद्यार्थी दशेतले अर्धे विसरलेले एक नाव आठवते – तो

बोयेथियुस असावा का? हो. बोयेथियुसच तो. सहाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातला तो एक रोमन तत्त्ववेत्ता होऊन गेला. थियोदोरिक राजाने प्रथम त्याला अंधारकोठडीत टाकले नि नंतर त्याला देहांत शासन केले. या बोयेथियुसनेच 'दी कोन्सोलासिओने फिलोसोफिये' (तत्त्वमहती) हा ग्रंथ लिहिला. मला अधिक काही आठवत नाही... मला सांगा. ह्या ग्रंथाचा रशियन अनुवाद झाला आहे काय? त्यातल्या काही भागाचा तरी? त्यातील मूलभूत विचारांची रुपरेषा तरी? आमच्या जिल्हा-केंद्रातील वाचनालयात व इतरत्रही मी चौकशी केली. मी अनेकांना पत्रेही टाकलेली आहेत. बोयेथिउसचा काही थांगपत्ता? तुम्हाला ही शोधाशोध निःसंशय तेवढी कठीण ठरणार नाही......"

परत एकदा मी लेनिन ग्रंथालयात जातो व तिथे शोध करतो. वाचतो. चिंतन करतो. विस्मृतीच्या अंधारात फार दूर पोहोचलेल्या, जवळ जवळ शेषप्राय झालेल्यांच्या पुनर्जन्म घडवण्याचा विचार करतो. बोयेथिउस जगला आणि त्याने लिहिले त्या गोष्टीला आता १५०० वर्षे लोटली आहेत. रोम एकदा नव्हे, अनेकदा जाळले गेले. अलेक्झांड्रियातले ग्रंथालयही जाळून टाकले, इतकेच नव्हे, तर धर्मवेड्यांनी महापंडिता हिपासियाचाही छळ केला. त्या रानटी कालखंडात तिने तत्त्वज्ञान नि गणितशास्त्र या विषयांना वाहून घेतले होते. (गिबनच्या म्हणण्याप्रमाणे तीक्ष्ण अणकुचीदार शिंपल्यांनी तिची हाडे सोलून मांस काढले गेले होते.) कलाविश्वाची भांडारे तर कधीच लुटली गेली होती. गोथ, ऑस्ट्रोगोथ, व्हांडाल, हुण आदींनी एका महान प्राचीन संस्कृतीचे ध्वस्त ढिगारे पायाखाली तुडवले होते.

पण त्या निरर्थक, माणुसकीहीन कालात, अंधश्रद्धा नि क्रौर्य यांनी भरलेल्या त्या कालांत, आशेची हिरवी पालवीही काही ठिकाणी जरूर बचली होती—रोमन सरदारांच्या वाड्यांत बहुमोल हस्तलिखिते बचली होती. ॲरिस्टोटलचे साहित्य वाचले जात होते. तसेच पायथागोरस, प्लेटो आणि प्लोतिनसच्या विचारांची चर्चा होत होती. पण वाड्यांतून बाहेर पडणे धोक्याचे होते—ओस्ट्रोगोथ शिपाई ठार करीत होते आणि रस्तेच मरत चालले होते : ना व्यापार ना पोष्टखात्याचा कारभार. दळणवळणाच्या अभावी जगाचे तुकडे तुकडे झाले होते नि जीवनव्यवहाराचे डबके झाले होते.

अशा जगात रोमचा तो तत्त्ववेत्ता बोयेथियुस जगत होता.

इतिहासाला हे ठाऊक आहे, की इटालीचा ऑस्ट्रोगोथ राजा थिओदोरिक याचा तो मंत्री होता आणि कटकारस्थानाच्या आरोपाखाली राजाने त्याला प्रथम अंधारकोठडीत टाकले नि मग त्याला देहांताची शिक्षा दिली. अंतिम घटकेची वाट पहात असतानाच्या मधल्या काळांत त्याने 'तत्त्वमहती' हा आपला प्रमुख ग्रंथ रचला. मानवाच्या आत्मिक समृद्धीची ती उदात्त गाथा आहे. हजार वर्षांनंतर स्पिनोजा तत्त्ववेत्त्याने जे विचारसूत्र सांगितले, की 'जीवन सार्थक्य किंवा स्थिर चित्तवृत्ती हे दुसऱ्या कोणत्या गुणाचे फळ नसून तोच स्वयं गुण आहे' तेच बोयेथियुसने 'मानवसुद्धा देव होऊ शकतो' अशा स्वरूपात मांडण्याचे धाष्टर्य केले होते. ही गोष्ट त्याने रोमच्या शासनाने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतरच्या पहिल्या शतकात केली होती हे ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे. (कारण ख्रिस्ती संप्रदाय नराचा नारायण होण्याची कल्पना कदापि मानीत नाही. —अनुवादक) माझ्या माहितीनुसार एकाही इतिहासकाराने बोयेथियुस राजद्रोही कटात सामील होता असे सिद्ध केलेले नाही. तरीही राजा थिओदोरिकने त्याला देहांताची शिक्षा केली हे वादातीत आहे.

ज्या कालखंडात स्त्री-गणितज्ञांचा क्रुद्ध जमावाकडून छळ नि हत्या झाली, ज्या कालखंडात कलांचा उच्छेद झाला, त्या कालखंडांत बोयेथियुसचा जीव घेतल्याशिवाय ते कसे राहतील?

'तत्त्वमहति' हा ग्रंथ शासनविषयक ज्ञानाने परिप्लुत आहे. तुलनाच करावयाची तर विषाच्या पेल्यातील घोट घेण्याआधीचे सॉक्रेटिसचे आपल्या मित्रांबरोबरचे अखेरचे संवाद आठवतात. काहीही झाले तरी जगाच्या नियमानुसारीत्वावरची त्याची श्रद्धा कधी ढळली नाही. तसेच "अस्तित्वाच्या पायातील अर्थगर्भते" वरचा त्याचा विश्वासही उडाला नाही. जीवनाला तो 'चिरंतनस्वरूपी' असा "होकारच" देतो. आणि त्याच्या युगाच्या संदर्भात ह्या "होकारार्था"चे आश्चर्य वाटल्याविना राहत नाही.

राजा थिओदोरिकने त्याला शासन करण्याची जी पद्धत निवडली, त्यावरून इटलीच्या त्या राजाच्या बुद्धिमत्तेविषयीच्या भावना काय होत्या ते स्पष्ट होते. या तत्त्ववेत्त्याने डोके त्या अधमांनी खरखरीत दोरखंडाने करकचून बांधून इतके आवळत आवळत नेले, की त्या तीव्र वेदनांनी अंध बधीर होऊन तो गतप्राण झाला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे इतिहासकारांनी त्या राजाचे वर्णन मोठा सहिष्णुवादी राजा असे केले आहे !

बोयोथियुसचे अर्धे अधिक साहित्य कवितामय आहे. कवितारव हा तत्त्वज्ञानाचा आवाज असे त्याला वाटे. तत्त्वज्ञानाची निर्मितीच निर्माणाचे सर्वोच्च सत्य प्रस्थापित करते. "जी निर्माणे पवित्र हेतूने प्रेरित होऊन मूल स्रोताकडे धाव घेतात, जिथून प्रथम ती अवतरलेली असतात..."

होय आश्चर्यकारक....

पण निःसंशय सर्वात अधिक आश्चर्यकारक जर काय असेल तर ते हे, की पंधरा शतकानंतर रात्रीच्या निवांत निरव समयी एका शिक्षकाला तो तत्त्ववेत्ता दर्शन देतो !

मानवाला परिपूर्ण जग हवे आहे. रिते पोकळ नव्हे. रात्रीच्या समयी विश्व कसे लख्ख आलोकित दिसू लागते, त्याचे अनंतत्त्व अगणित नक्षत्रांनी ओतप्रोत भरलेल्या आकलनीय वास्तवतेची रुपरेषा धारण करते. अशा समयी आपण सीरियुस आणि सोफोक्लिस या श्रेष्ठ प्राचीन साहित्यकारांशी वार्तालाप करू शकतो.

जेव्हा माझ्या अंतरांत रात्रीच्या आकाशाचा उदय झालेला असतो, तेव्हा नक्कीच नीतीमत्तेचा जय होतो. अशावेळी वृक्षांच्या, निर्झरांच्या, डोंगरांच्या चमत्कारांचा बालपणी जसा अनुभव यायचा तसा मला आता विश्वाच्या चमत्कारांचा अनुभव येतो नि माझे हृदयाकाश विशाल उदात्त होते. मी संपन्न, व्युत्पन्न, समृद्ध बनतो.

मानव जेव्हा स्वतःच्या ठायी विश्वाची अनुभूती घेतो ते स्वतःचे चिंतन विश्वाला भिडवतो, तेव्हा नीतीमत्तेचा विजय होतो. जेव्हा माणूस अस्तित्वाचा पाय समजून घेऊ इच्छितो, जीवनाचा अर्थ काय हा प्रश्न उपस्थित करतो, जेव्हा "अँटिगनी, फाऊस्ट, हॅम्लेट, आंद्रेय बोल्कोन्स्की ही जगें आहेत" असे म्हणतो, तेव्हा नेमका हाच त्याचा मनोदय असतो.

अनुक्रमणिका

"नाटक पहायाला गेलो होतो. परत येऊन आता तासभर झाला असेल. 'अँटिगनी' पाहिले आम्ही. सोफोक्लिसचे नव्हे. समकालीन फ्रेंच नाटककार जियां आनुइल यांचे. फार दिवसांपासून ऐकत होतो मी या नाटकाविषयी. आता ते पाहिले नि मनात शंकाकुशंकांचे माले उठले म्हणून लिहितो आहे. नाट्यगृहातून येताना वाटेत मित्रांबरोबर चर्चा केली. पण त्यानी माझी खिल्ली उडवली. माझ्या कल्पनांना नावे ठेवली. मी एकटा पडलो. त्यावेळी मला माझ्या मतांची खात्री होती. पण आता.....

"अँटिगनी मरणाच्या मार्गाने कशासाठी म्हणून जाते? तिचा त्या मागचा हेतू ना बुद्धीला, ना हृदयाला पटत. क्रेओनचा हुकूम मोडून पोलिनिसीच्या शवावर ती माती ओढते. हळुवार नि कोंवळकीने. पण निश्चयी वृत्तीची ती स्त्री तिच्यावर प्रेम करणाऱ्या हेमोनबरोबर रहाते तिथवर ठीक असते. परंतु ज्या श्रद्धाविश्वावर तिचा विश्वास बसलेला असतो, त्याला तडा गेल्यानंतर श्रद्धेय असे तिच्यापाशी काही उरलेले नसल्यामुळे ती अगतिक होऊन मरणाला वरते. मला तिला अडवायची असते. मुलांच्या रंगभूमीवरील खेळ पाहून एकाद्या चिमुरडीने ओरडावे तसे मी ओरडतो. नको. नको. नको जाऊस. नको ओलांडूस ती रेषा. जिवंत रहा तू. हेमोनवर प्रेम कर. त्याला पुत्र दे. जगावरील श्रद्धा परत मिळव. किंवा किमान पक्षी नताशासारखी प्रपंचात रमून जा. पण जग! शेवटी ज्या पोलिनिससाठी तू तुझे जीवन पणाला लावलेस तो पोलिनिस नि एतेओक्ले हे ज्यांचा अभिमान बाळगावा अशा लायकीचे भाऊ नाहीत ग! ते क्षुल्लक प्राणी निघाले. वीरपुरुषाचे मरण कोण मेला, नि कुत्र्याच्या मोतीने कोण मेला तेसुद्धा धड कोणाला ठाऊक नाही आहे. शिवाय, तुझा स्वतःचा दफनविधीवर विश्वास नाही. जीवनातला अखेरचा माणूस जो तू तिथे पाहणार, तो म्हणजे तो रखवालदार, जो नाही तुला जाणत नि तू त्याला. तुझ्या त्यागाची इथे कोणा लोकाला आवश्यकता आहे? ना जिवंतांना ना मृतांना. थांब!

एकदा तर क्रिओनचेसुद्धा मला पटू लागले होते. पटण्याजोगाच होता त्याचा युक्तिवाद. ॲन्टिगनीने मरणाचा विचार सोडून द्यावा म्हणून परोपरीने त्याने तिला समजावले. आणि इथे तर माझे मित्र माझ्यावर मारे तुटून पडले. ठीक आहे. नि मग मलाही चेव आला. मी माझ्याच मताला चिकटून बसलो. आता मला पश्चाताप होतो आहे. पण ॲन्टिगनी मरणाचा जो निश्चिय करते त्याचे नैतिक मूल्य तुम्ही तरी मला दाखवा. त्यांचे म्हणणे असे की, दैनंदिन व्यवहारी जीवनाच्या तर्कशास्त्राने ते नैतिक मूल्य जाणले जाणारच नाही. त्यांच्यापैकी एक म्हणाला, की तुम्ही वाढलाच आहात एकंदर अशा विचारामध्ये, की तुम्ही एखाद्या महान विचारासाठी किंवा मानवतेसाठीच फक्त मरण पत्करू शकता. पण आनुइलची ॲन्टिगनी स्वतःशी इमान राखण्यासाठी मरते–'पण मानवता आणि ध्येय यांच्यावरची श्रद्धा मिळवल्याशिवाय माणूस स्वतःशी इमान राखू शकतो म्हणता? जगावरचाच विश्वास तुम्ही हरवून बसलात तर तुम्ही स्वतःलाच नाही हरवून बसणार'?

मी म्हणालो, 'जीवनावर संपूर्ण अश्रद्धेच्या परिस्थितीत स्वतःशी इमान राखायचा एकच मार्ग उरतो. तो म्हणजे मृत्यू'! ते म्हणाले : 'मरायचे कशासाठी? स्वतःसाठीच! पण स्वतःसाठी म्हणजे स्वतःमधील कशासाठी ? —'तुला कळत नाही रे' माझा दुसरा एक तीस वर्षाचा विद्वान मित्र मला समजावण्याच्या सुरात म्हणाला. 'हे बघ. अगदी कमालीच्या निराशाजनक परिस्थितीत असा निर्णय हे देखील एक बंड असू शकते. आपल्या आदर्शाशी मेळ न खाणाऱ्या जीवनाचा त्याग करणाऱ्या व्यक्तीचे ते बंड असते'. पण भल्या माणसा, मृत्यूकडे जाताना ॲन्टिगनी किती बालसदृश्य, किती आगतिक दिसत होती? ती आणि बंडखोर? माझ्या दुर्दैवाने सोफोक्लिसचे 'ॲन्टिगनी' मला नीट स्मरत नाही नि माझ्यापाशी ते नाटक नाही. ते असते तर मी तुम्हाला लिहिलेही नसते....'

अनुक्रमणिका

हे पहा, आनुइलच्या नायिकेच्या उलट सोफोक्लिसच्या नायिकेचा पोलिनिसवर शेवटपर्यंत विश्वास असतो आणि क्रेओनचा कडक हुकूम उडवून लावून ती त्याचा दफनविधी करण्याचा प्रयत्न करते. तिचा दफनविधीवर आणि परमेश्वरावर विश्वास असतो. तसेच सोफोक्लिसचा क्रेओन ॲन्टिगनीला जगण्याचा, प्रेम करण्याचा नि पुत्राला जन्म देण्याचा आग्रह करीत नाही. तो तिला कठोरपणे सरळ हुतात्म्याच्या वेदीवर पाठवतो.

पण सोफोक्लिसची ॲन्टिगनी केवळ पोलिनिसखातीर नि परमेश्वराखातीर, ज्याच्या धर्मज्ञांचे ती जरूर पालन करते, मरत नाही. ती आपल्यासाठीही, आपले इमान राखण्यासाठीही प्राणत्याग करते.

अडीच हजार वर्षापूर्वी हे शोकनाट्य अशा एका नाट्यगृहात खेळले गेले, ज्याची आधुनिक मानवाला कल्पना करता येणे कठीण आहे. जणू काय, आक्रोपोलिस पर्वताच्या कुशीतील एका भव्य फरसबंदी अर्धगोलाकार नाट्यगृहांत, मानव नि त्याचे प्राक्तन यांचे द्वंद्व अवतरले होते. दंतकथांनी अमर करून ठेवलेल्या प्राचीन अथेन्स नगरातली ती कथा आहे. ती कथा आहे शोकपर्यवसायी शक्तीच्या विरुद्ध संघर्षात ॲन्टिगनीच्या झालेल्या जैताची. ती आपल्या ध्येयास्तव, आपल्या प्रेमास्तव अंती आत्मार्पण करते. दुनियेतली कोणतीच शक्ती मनुष्याला प्रेम करण्यापासून वंचित करण्यात यशस्वी होऊ शकत नाही; आपल्या मनोदेवतेनुसार वर्तन करण्यापासून मना करू शकत नाही; रोखू शकत नाही हे ती सिद्ध करते. ती स्वतःशी इमान राखू शकली, कारण आपल्या ध्येयसर्वस्वाखातीर ती देहत्यागही करू शकली म्हणून. आणि त्यातच तिचे जैत आहे.

आनुइलची ॲन्टिगनीही स्वतःशी इमान राखू शकली कारण ध्येयाविना ती जगू शकली नाही म्हण्न.

तरी या दोन ॲन्टिगनींमध्ये खोल दरी आहे. राजा एडिपसच्या कन्येची करुण कहाणी चालू जमान्यातले फ्रेंच नाटककार जेव्हा अत्याधुनिक नि यातनामय स्वरूपात प्रस्तुत करतात, तेव्हा संगीतकार बाख यांचे अभिजात संगीत हुशार 'जॅझ' संगीतकारांनी प्रस्तुत करावे तसे वाटते. सुसंवादित्व इथे भंग पावलेले असते; आफोरा (वाद्य) आपल्या हातून पडून फुटून त्याचे तुकडे तुकडे झालेले असतात नि त्या तुकड्यात अखंड प्रतिभेची खांडोळी ओळखता येऊन दुःख होते.

आतां 'बाखचे जॅझीकरण' आवडणारी मंडळी थोडी थोडकी आहे असे नव्हे. त्यातले अनेक माझ्या परिचयाचेही आहेत. पण मला स्वतःला मात्र ऑर्गनच अधिक पसंत आहे. अठराव्या शतकात बाख चिरंजीवित्वाप्रत पोहोचला नव्हता. तसे झाले असते तर पुढील दशकांमध्ये जेव्हा अर्थप्रतिष्ठित समाजरचनेच्या अंगांचे विघटन सुरू झाले तेव्हा त्याला फरफटत ओढत आणून त्या काळात बसवले असते. समकालीनता नीट व्यापक नजरेने पारखून घेतली तर ऑर्गनचा बाखच अधिक समकालीन वाटतो.

आनुइलचे शोकनाट्य वाचल्यानंतर असे वाटते की, ॲन्टिगनी जे मरण स्वीकारते तो वस्तुतः आत्महत्येचाच प्रकार असतो. ती विशिष्ट दुष्ट शक्तीनाच 'नाही' म्हणते असे नव्हे, तर अस्तित्त्वाच्या पायावरच ती 'नकारा'ची कुऱ्हाड मारते. कोणतीही भावना नि कृती अपेशी होणे हे ज्या भ्रमिष्ट जगात नशिबी आलेले असते, ज्या जगात भर उजेडात देखील निशामय करंटेपणा सावलीप्रमाणे तुमचा पिछा पुरवतो,

अशाला ‘नकार’ देणे हे वेगळे आणि अस्तित्त्वात बदलाची शक्यता उरलेली नसते म्हणून अस्तित्वालाच नकार देणे हे वेगळे. आनुइलची अँटिगनी सगळ्यालाच ‘स्थितीशीलतावादी’ ‘नकार’ देते.

तथापि तिच्या देहांताआधी किंवा आत्महत्येआधी क्षणभर तिला जाग येते किंवा आल्यासारखी वाटते : हेतुशून्य मरण हे हेतुशून्य जीवनाहून अधिक चांगले मुळीच नाही असे तिला वाटते. आनुइलच्या ॲन्टिगनीमध्ये पत्ते खेळणाऱ्या रखवालदारांची मौन प्रतिमा प्रभावी आहे. आम्हाला ते दिसोत वा न दिसोत– ते न दिसताही प्रभाव गाजवतात. देहांताआधी ॲन्टिगनी त्यांच्यापैकी एकाबरोबर एकटी असते. तिच्या जीवनातले अगदी संपूर्ण नि अतिशय कडवट एकाकीपणाचे ते क्षण असतात.

रखवालदार पत्ते खेळतात. तत्त्ववेते मरतात नि फिरून उठतात. बंदिशाळा कोसळतात नि परत बांधल्या जातात. जुलूमशाह्या मरतात नि परत जन्मतात. शतकांमागून शतके वाहत असतात. पण रखवालदार मात्र पत्ते खेळतच असतात !

सोफोक्लिसची ॲन्टिगनी आणि आनुइलची ॲन्टिगनी या दोन ॲन्टिगनीमधील संवादाचीही आपण कल्पना करू या.

| | |
|---|---|
| **आनुइलची ॲन्टिगनी** | तुला हे माहीत आहे की ते आज अडीच हजार वर्षें न थकता पत्ते खेळत आहेत. तुझ्या काळापासून ते माझ्या काळापर्यंत. |
| **सोफोक्लिसची ॲन्टिगनी** | पण त्यांच्या पत्त्यांवर आगीची चमक तुला दिसली नाही? |
| **आनुइलची ॲन्टिगनी** | आग? काय बोलते आहेत तू हे? |
| **सोफोक्लिसची ॲन्टिगनी** | अडीच हजार वर्षापासून पेटत्या मशालींची टप्प्या टप्प्यांनी लागलेली एक रांगच्या रांग नाही दिसत तुला? |
| **आनुइलची ॲन्टिगनी** | आगीच्या उजेडात पत्ते काय अधिक सुंदर दिसतात? |
| **सोफोक्लिसची ॲन्टिगनी** | पत्त्यांचे फाटके तुटके विटकेपण स्वच्छ दिसते. साफ जीर्णशीर्ण झालेत ते पत्ते! |
| **आनुइलची ॲन्टिगनी** | नि तुझ्या त्या आगीचे काय? |
| **सोफोक्लिसची ॲन्टिगनी** | अग, आग सदैव ताजीतवानी! चिरंजीव! |

हजारो वर्षांपासून लागलेली पेटत्या मशालींची रांग आणि अथेन्स नगरीतल्या त्या हर्षोल्लासभरीत शर्यती, यातील शोकपर्यवसायी भेद हा आहे, की पेटती मशाल ही सदैव जीतीजागती राहिली आहे. जान हुस चितेवर पोहोचला आणि काडी पेटवण्याआधी आपला निर्णय मागे घेऊन जीवंत रहाण्याची अखेरची संधी त्यानी त्याला दिली. तो उत्तरला, ‘नाही. नाही.’ थॉमस मूर सुद्धा असेच उत्तरला. आणि जियोर्दानो ब्रुनो? आणि हजारो अज्ञात बंडखोर, धर्मवेडविरोधी विद्रोही, स्वातंत्र्ययोद्धे, प्रगती-योद्धे असेच उत्तरले. ‘नाही. नाही.’ पण त्यांचा नकार जगाला नकार नव्हता. पण जगातील अमानुषत्त्वाला नकार होता. हा ‘नकार’ कदाचित मानवी विषयांपैकी सर्वाधिक महत्त्वाचा विषय असेल. अंतःकरणालाच सुट्टी देण्यापेक्षा प्राणाला सुट्टी देणे सुलभ आहे. कारण अंतःकरण म्हणजे तुमच्या अंतरातली मानवजात. त्याचा त्याग म्हणजे माणसाच्या चिरंजीवित्वाचाच परित्याग होय.

अनुक्रमणिका

मानवी आत्म्याचा इतिहास, मानवी आत्मजाणीवेचा इतिहास, हा नैतिक महतीने ओतप्रोत भरलेला आहे. हजारो वर्षांपासून त्याचा अखंड स्रोत, अखंड प्रवास, अखंड मोर्चा चालू आहे.... देवदेवतांपासून लढून जिंकून घेतलेला यज्ञाग्नी इथे स्वयंभू देवत्त्व पावलेला आहे.

दैनंदिन जीवनात अग्नीच्या शलाका क्वचितच दिसतात नि कमीच कळतात हे खरे आहे. पण जवळून पहा नि अंतर्यामीही पहा.

"बोअेथियुस आणि पिको देला मिरांदोला यांची माहिती पाठविल्याबद्दल धन्यवाद. मी पोष्ट खात्यातल्या एका सेवानिवृत्त कारकुनाची, हेन्के याची साधी कहाणी तुम्हाला पाठवतो आहे. तारेशास्त्राच्या एका पुराण्या मासिकातून मी ती जशाची तशी लिहून काढली आहे. त्या विलक्षण व्यक्तीची ती कहाणी यापूर्वी आपण वाचली नसेल अशा भाबड्या समजुतीने मी ती खटाटोप केलेला आहे. म्हणजे काय, तर अशा रीतीने आम्ही परस्परांना भेटी पाठवल्या. संचिताची देवघेव केली.

"माझं अंतःकरण व्यथित झालं आहे. नेहमीप्रमाणे मी हे रात्रीचे लिहितो आहे. मी आता झोपायला हवे होते. उद्याचा दिवस कठीण आहे. मला गुन्ह्यांचा तपास लावणाऱ्या खात्याने उद्या बोलावले आहे. माझ्या दोन विद्यार्थ्यांना अटक झाली आहे यावर तुमचा विश्वास बसेल? त्यानी खेळण्यातले पिस्तूल (बालकांच्या खेळ—क्रीडा भांडारातून खरीदलेले) दाखवून बायांना नि वृद्धांना घाबरवून त्यांच्या टोप्या आणि पैसे पळवले. आपण गंमत केली असे त्यांचे म्हणणे आहे. पण चोरीच्या पैशातून ते दारू प्यायले आणि पोरींना भेटवस्तू दिल्या असे शाबीत झालेले आहे. मला वाटते त्यांच्यापैकी युरा ह्या विद्यार्थ्याचा मागल्या पत्रात मी उल्लेख केला होता. माझ्या आगामी 'चिरंजीव साहित्य संग्रहा'तील थॉमस मूरचे आपल्या सुकन्येला पत्र मी त्याच्याकडे सोपविले आहे."

मला हा धक्का सहन करणे कठीण आहे. माझे धैर्यच खचल्यासारखे वाटते. आपत्तीवर आपत्ती म्हणजे आठवड्यापूर्वी माशा, घर नि शाळा दोन्ही सोडून पळून गेली. प्रेम. ती इतर विद्यार्थिनींहून वयाने मोठी आहे. तिच्या आजारामुळे तिसरीत आणि पांचवीत तिला रखडावे लागले. माझ्या चौदा वर्ष वयाच्या विद्यार्थिनीना घरातून नाट्यपूर्ण पद्धतीने पळून जाण्यात फार मोठी कल्पनारम्य मजा वाटते. त्याना ना अभ्यासाला वेळ मिळत. मग माझ्या साहित्य-संग्रहासाठी वेळ कोठून मिळणार? आणि खरोखरच काय गरज आहे या साहित्यसंग्रहाची? कांपानेला नि चेर्निशेवस्कीचे निवडक उतारे कोणीही लिहून काढू शकेल. एका ठराविक काळात, ठराविक किल्ल्यांत ते लिहिले गेले हे मात्र बारीक अक्षरात नोंदले पाहिजे. पण यात जर अंतःकरण ओतले गेले नाही, तर त्याचा विशेष काय फायदा? निश्चितच माझ्या मुलांच्या अंतःकरणात शिरण्याचा मार्गच मला सापडलेला नसणार. बोयेथियुससाठी आभारी. पण कारागारातील साहित्यसंग्रहाचा उपक्रम मला आता बालिश वाटू लागला आहे. शिक्षणशास्त्रात भलतीच लुडबुड करण्याचे हे माझे बेत रात्रीच्या वेळी मी ठरवतो म्हणा!

"आज डिसेंबरवादी क्रांतीत भाग घेतलेल्या लुनिनची पत्रे ती लिहून काढते. उद्या ती लुनिनला, शाळेला नि मला विसरणार. आणि नमुनेदार अत्याधुनिक पादत्राणांचा एक जोड बरोबर घेऊन ती पळून जाणार. आता वयाच्या तिसाव्या वर्षी मी गंभीर वास्तववादी बनले पाहिजे असे घोकून मी स्वतःलाच कमीपणा आणतो आहे. मी जेव्हा आरशात पहातो, तेव्हा मला वाटते बहुधा मी विदूषकासारखा वागून लोकांची करमणूक तर करीत नसेन?"

“उद्या सकाळी उठून आताच्या ह्या लहरीला ‘नाही, नाही, नाही’ असे निर्धाराने सांगण्याची शक्ती जर माझ्यात आली तरच माझे पत्र तुम्हाला मिळणार”

अर्थात, पोस्ट खात्यातील सेवानिवृत्त कारकून हेन्के यांविषयी मी यापूर्वी वाचले होते. काय ती त्याची विस्मयकारी चिकाटी! तशी त्याच्याविषयीची माहिती कमीच आहे. १९ व्या शतकाचा तो आरंभकाळ होता. पोष्ट खात्यातून निवृत्त झाल्यानंतर त्याने स्वतःला तारेशास्त्राला वाहून घेतले. तारेशास्त्राचा त्याचा व्यासंग पूर्वीपासूनचाच होता. नंतर पंचम ग्रह शोधून काढण्याचा त्याने निश्चय केला नि तो कामाला लागला. गणितज्ञांच्या हिशेबाप्रमाणे मंगळ आणि गुरू यांच्या मधोमध हा छोटा पंचम ग्रह असावयास हवा होता. सतत पंधरा वर्षे रात्रीमागून रात्री अपयशाने धीर खचू न देता त्याने त्या ग्रहाचा शोध चालवला आणि अखेर त्याला तो सापडला. १५ वर्षं त्याने एकट्याने आपल्या रात्री आकाशाबरोबर वेचल्या. अंदाजे साडेपाच हजार रात्री. आणि त्यांच्यापैकी एकाही रात्री त्याने आपल्या ध्येयकार्यापासून दूर होण्याची, आकाशाचे निरीक्षण थांबवण्याची गोष्ट काढली नाही.

निद्राविहीन, एकसूरी नीरस जीणे. मनुष्य जीवनाची परिपूर्णता, विविधता, रसिकता घटनांच्या संख्येवर नव्हे, तर नैतिक आशयावर तोलली जाते. अमेरिकन विज्ञान-कादंबरीतले नायक दर मिनटाला जे विविधत्व अनुभवतात त्यासाठी हेन्केला दहा वर्षं पुरली नाहीत. पण आत्मिक दृष्ट्या त्या नायकांचे जीवन किती कफल्लक असते! तो सेवानिवृत्त कारकून तो शोध लावण्यात यशस्वी झाला नसता तर त्याच्या निरीक्षण कार्याचे, त्याच्या भगीरथ प्रयत्नांचे वैज्ञानिक मूल्य खचितच अतिशय उणे ठरले असते. पण, त्यामुळे त्याच्या जीविताच्या नैतिक तोलामोलात काही फारक?....

“मी आणखी एक नाटक पाहून परतल्यानंतर लिहीत आहे. यावेळी ‘माझे जीवित’ ही चेकोव याची कादंबरीका रंगभूमीवर पाहिली. घरी परतताना बरोबरच्यानी जे काय पाहिले त्याविषयी गरमागरम चर्चा केली. मला वाटते माणसाने स्वतःला या जगात झोकून द्यावे. स्वैज्ञानिक शोध वगैरे ज्याविषयी माझे मित्र मनात सदैव मांडे खात असतात. त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. ‘पण मानवी जीवनाचे स्वतंत्रपणे, स्वतःमध्ये नि स्वतःचे असे अपार मूल्य असू शकते. पण ते जीवन जर आत्मिक आशयाने – प्रेमाने, निष्ठेने, प्रामाणिकपणाने आणि अशाच प्रकारच्या इतर गुणांनी संपन्न असेल तर’ असे मी शेवटी बोलून गेलोच. त्यांच्यापैकी एका तरुणाने मला एक मार्मिक प्रश्न विचारला. हर्मिताज म्युजियममध्ये ठेवलेली चित्रकार रांब्रां यांची कलाकृती ‘वृद्ध ज्यूचे तैलचित्र’ पाहून जो प्रश्न तुम्हाला सुचला होता तसाच तो प्रश्न होता, चेखोवने जर त्या मनुष्याची कहाणी लिहिली नसती तर त्या मनुष्याचे जगाला काय कळले असते? काय महत्व त्याचे आमच्या जीवनात? भल्या मित्रा, आपण माणसाचा नव्याने शोध करू शकत नाही. आपण माणूस पाहू शकतो. शोधू नाही शकत. चेखोवने शोधून नाही काढला तो माणूस! चेखोवने तो पाहिला. आता तू विचारतोयस, की त्याने जर ही कथा लिहिली नसती तर काय झाले असते? साहित्यात एक अनमोल कथा उणी पडली असती जरूर. पण त्यामुळे आत्मिक दृष्टीने समृद्ध व्यक्तिमत्वें – स्वयंप्रकाशमान केंद्रें, स्वयंप्रकाशित दीप जगातले कमी झाले नसते. ते आपल्या मुलांनातवंडांत टिकले असते, उरले असते. मी अर्थातच आता लिहितो तितका सुसंगतपणे त्यावेळी बोललो नसणार. कदाचित त्यांना यातले काही कळलेही नसणार. बोलत बोलतच आम्ही घराकडे पोहोचलो आणि त्यानी ‘अच्छा स्वयंप्रकाशित दीपमहाराजा, भेटा उद्या सकाळी’ असे म्हणून माझा निरोप घेतला.

“पण हे सर्व काही नव्हे. मी जेव्हा पहिल्या प्रथम तुम्हाला तुमच्या ‘वृद्ध ज्यू’ बद्दल लिहिले, तेव्हा माझ्या कल्पनांची मला आताच्या एवढी खात्री नव्हती. आपण आपल्या मागे फक्त रेल्वेमार्ग, ग्रंथ, नगरे, बौद्धिक यंत्रे एवढेच ठेवतो, असे नव्हे तर आमचे व्यक्तिमत्त्व, ‘स्वयंप्रकाशमान केंद्र’ सुद्धा ठेवतो, ह्या प्रतिपादनातील सत्याबद्दल माझ्या मनात शंका होत्या व त्या मी तुम्हाला सांगितल्याही होत्या. मी सहमत होतो नि नव्हतोही. ठोस वास्तव वस्तूमध्ये अंतर्हित नसलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे मला काहीतरी स्वप्नवत्, मृगजळवत् वाटे. वास्तवतेविषयीची माझी कल्पना संभवतः गचाळ असावी. वैज्ञानिक शोध, कलात्मक आविष्कार वगैरे पुरती. पण सोफोक्लिसच्या ॲन्टिगनीने काही संशोधनही केलेले नव्हते, किंवा ती प्रतिभावती कलाकारही नव्हती. तरीसुद्धा तिचे आत्मिक जीवन तिच्या कालाहून कितीतरी अधिक काळ टिकून आहे. कशाचीही तमा न बाळगता स्वतःशी ती इमानी राहिली ही सुद्धा वास्तवातच नव्हे?

“एक तऱ्हेवाईक मुलगा आमच्या इमारतीत राहतो. तो सोळा वर्षाचा मुलगा कविता नि कथा लिहितो. पण ते लेखन तो फक्त आईलाच दाखवतो. (घरात अन्य कोणी नाही) सकाळच्या वेळी आम्ही एकाच वेळेला घरून निघतो—तो शाळेत नि मी कामावर वाटेत आम्ही जीवनाविषयी बोलतो. कधी कधी तो भलतेच प्रश्न विचारतो. गेल्या रविवारी तो म्युजियममध्ये गेला आणि बोरोविकोवस्कीच्या चित्राकडे पहात राहिला. एका सैल वस्त्रांकिता श्वेतरंगी कोमल युवतीचे (अठराव्या शतकातील वाटावे असे) ते चित्र होते. त्या चित्राकडे पहात राहून अमळशाने तो स्वतःला प्रश्न करतो, ‘कुठे आहे ती आता’? माझ्याकडे बघून तो हसला नाही की काय नाही..... मला सरळ विचारतो, काका, कुठे असणार हो तुम्ही दोनशे वर्षानंतर? अर्थात गंमतीने तो प्रश्न झेलून घेण्याइतपत विनोदबुद्धी मला त्यावेळी सुचली नाही. तो कदाचित तुम्हालाही लिहील. माझा एक १५ वर्षाचा मावसभाऊ आहे. त्याच्याकडे मी जेव्हा जातो तेव्हा तो नि त्याचे मित्र असेच अनेक प्रश्न विचारून मला भंडावून सोडतात.

तो दूरदृष्टीचा शिक्षक ज्याच्याविषयी तुम्ही मला पत्रांत लिहिलेत, मला खात्री आहे, की त्याची श्रद्धा परत त्याच्या विद्यार्थ्यांवर बसेल. नि कारावासांतील साहित्याचा त्याचा संग्रहही यथावकाश पुरा होईल.

मार्क्सने एका ठिकाणी अगदी समर्पक उद्गार काढले आहेत. तो म्हणतो. “मानवजात आता फिरून बाल्यावस्थेत शिरण्याचा प्रयत्न करील तर तो बालिशपणा ठरेल. पण बालकाच्या निष्कपटीपणाने मनुष्य विपुल आनंदी नाही होत? असे जर असेल, तर मग मनुष्याने खरोखरच आपल्या अस्सल स्वत्वाचे उच्च पातळीवर पुनर्निमाण नको करायला ?”

जसे मानवतेला तसे व्यक्तिविशेषालाही मार्क्सचे हे उद्गार लागू आहेत. व्यक्तीने आत्मिक दृष्टीने साधना करणे याचा अर्थ आपल्या अस्सल स्वत्वाचे उच्च पातळीवर त्याने पुनर्निमाण करणे होय. या करिता माणसाला आपण भूतकाळांत काय होतो, आणि भूतकाळात काय काय घडले त्याचा विसर पडता नये.

जे कलाकार आत्मिकता, मानवता नि सौंदर्य यांचा आविष्कार करतात ते महान समजले पाहिजेत. पण हे गुण स्वतःमध्येच शोधून काढून विकसित करणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे.

“ल्युशियाने तुम्हाला लिहिण्याबद्दल मला आग्रह केला होता. पण ते काही जमले नाही. माझे लिखाण मी तुमच्याकडे पाठवू? पण मलाच ते कच्चे वाटते. सध्या मी ते आईला वाचून दाखवितो. पण

ल्युशियाने माझ्याबद्दल तुम्हाला लिहिले असल्याचे कळले. आणि शेवटी तुम्हाला लिहिण्याचे मी ठरविले. मध्यस्थामार्फत बोलावे हे मलाहि पटत नाही.”

“मानवी भावभावनांचे जग मला अनंत नि सामर्थ्यशाली वाटते. हे सामर्थ्य साहित्य नि कलाविष्कारात पुरते अंगीभूत झालेले असते, म्हणूनच साहित्य नि कला अत्यानंद देऊ शकतात. तुमच्याप्रमाणे मलाही वाटते की, आता असे युग फार दूर नाही, ज्या युगातील मानवाच्या भावनांना अलौकिक भौतिक शक्ती प्राप्त झालेली असेल. माझा यावर विश्वास बसतो, कारण कधी कधी मला इतका आनंद होतो की, अवकाशयानालाही गतिमान करण्याइतकी कार्यशक्ती त्यातून मिळू शकेल. रात्रीच्या अंधारात निपचित पडून राहा नि विचार करा!

“आणि मग तुम्ही तुमच्या आधी जे जगले, वावरले, सवरले, त्यानी अनुभवलेल्या भावभावनांचा विचार करा. तेही त्यांच्या काळांत विस्मित झाले होते. तेही हर्षभराने उल्लसित होऊन नाचले, बागडले होते. नंतर ते गेले. पण मग कुठे कुठे गेले ते भांडार?

तरुण माणसा, ते कुठे गेले नाही. ते अजूनही तुझ्यापाशी आहे. ते जर पार गेले असते तर तुला रात्रीच्या रात्री जागून काढण्याची गरज पडली नसती. माणूस जेव्हा अगदी एकटा, एकांतवासात स्वतःबरोबरच असतो नि जीवनाबद्दल तो तत्त्वचिंतन करतो, तेव्हाच्या त्याच्या जीवनातील त्या घटका धन्य असतात. नवनिर्माणकारी असतात. सर्जक असतात. ‘सृजनशील व्यक्ती’ हे सूत्र पुनरुक्तिपूर्ण आहे. कारण व्यक्ती कधी असृजनशील असूच शकत नाही. तिने जगाला आपले तर्पण केलेलेच असते. ती जगात विरून जाते. तिने कादंबरी लिहिली नसेल. पण मानवी व्यवहारात, प्रेमात नि सत्याच्या शोधात आपला स्वभाव प्रकट केलेला असणारच.

‘विषाचा प्याला’ या प्रकरणाच्या शीर्षकाचा अर्थ स्वतःसमोर सत्याची प्रतिमा, सामाजिक नैतिक ध्येयासमोर सत्याची प्रतिमा असा घेतला पाहिजे. ‘नाही’ असे जेव्हा माणूस म्हणतो तेव्हा तो क्वचितच हुस आणि मोअरच्या ‘नाही’ सारखा शतकानुशतके टिकलेला असतो. बहुतेक वेळा त्याचा ‘नाही’ फक्त कुटुंबाने किंवा इष्टमित्रांनी तेवढाच ऐकलेला असतो. आणि तो ‘नाही’ रात्रभरच्या हो-नाही, हो-नाही अशा विचारानंतर जर स्वतःपाशीच उच्चारला गेला असेल तर तो कोणीही ऐकलेला नसणार. पण ऐकला न जाणे म्हणजे तो नसणे असे थोडेच आहे?

कारण ‘तू’ विना ‘मी’ असू शकत नाही.

***

अनुक्रमणिका

# पेत्रार्कची पत्रे

मी त्यावेळी तरुण होतो. नि युद्ध संपलेले होते. माझ्या अनेक सहकाऱ्यांप्रमाणे मलाहि तेव्हा लेनिनग्रादमधल्या 'हर्मिताज' म्युजियमने आणि मॉस्कोतील पुष्किन कलाभांडाराने वेड लावले होते. आयुष्यातला माझा बराच काळ तेथील कलाकृतींचे सौंदर्य पहाण्यात गेला. नित्य सकाळी उठून त्या कलाभांडारांच्या नीरव दालनांतून मी फिरत राहायचा. असे करताना घटकांमागून घटका कशा निघून जात ते समजतच नसे. अचानक संध्याकाळ व्हायची नि तो अपूर्व सौंदर्यास्वाद मधेच सोडून देऊन निघणे भाग पडायचे.

तेथील कलावस्तूंच्या साग्रसंगीत वर्णनाने वाचकांना मी कंटाळून सोडणार नाही. पण त्यावेळी मला जो एक शोध लागला त्याविषयी जरूर बोलणार आहे. कारण तो आजही मला तेवढाच महत्त्वाचा वाटतो.

मला वाटते चित्रांचे दोन प्रकार सहज कल्पिता यावेत. एक बोलक्या चित्रांचा नि दुसरा श्रोत्या चित्रांचा. पुसां या चित्रकाराची चित्रे सर्वात बोलकी चित्रे म्हणता येतील. तर चित्रकार रांब्रां यांची चित्रे श्रवणचित्रे गणायला हरकत नाही. रांब्रांच्या कुठल्याही चित्रासमोर जाऊन खुशाल उभे रहा. तीं तुमचे ऐकताहेत असा भास तुम्हाला होईल.

राब्रांचे कुठलेही चित्र टक लावून पहाल तर ते तुमच्यावरच रोखलेले वाटेल. त्या चित्रातले मूक, निर्विकार भावदर्शन आपणहून प्रभाव पाडते. मला वाटते मानवी संबंधातील अत्युच्च श्रेणीचा अन्योन्याश्रय तो हाच.

रांब्रांने रंगवलेली वडिलधारी माणसें, बायबलमधले हुतात्मे, सामान्य युवक-युवती, डॉक्टर्स, भिक्षेकरी, निसर्ग, वनराजी, वृक्षवेली, रस्ते—रांब्रांच्या सकल कलाविश्वाची एकच इच्छा—ती म्हणजे तुमचे शब्द ऐकण्याची. त्याच्या कलेचे हे वैशिष्ट्य आजच्या पाश्चात्य कलाविष्काराच्या संदर्भात खास महत्त्वाचे आहे. इंगमार बर्गमान या स्वीडिश फिल्म दिग्दर्शकाच्या कलेचा अभ्यास केलेल्या एका कलासमीक्षकाने एक गुजगोष्ट सांगितली आहे : बर्गमानचा कॅमेरा बोलणाऱ्या व्यक्ती टिपतो. ऐकणाऱ्या क्वचितच. बर्गमानच्या नायकांना बोलावे कसे तेवढेच कळते. त्याच्या त्या पोकळीतल्या बोलण्याला माणसातील दळणवळणबंदी किंवा समवेदनेचा अभाव असे आजकाल म्हणतात. अशा लोकांना आता चारच ज्ञानेंद्रिये काय ती उरली आहेत. माणसाचे पंचम ज्ञानेंद्रिय शरीरात जरी अजून टिकून असले, तरी नैतिक दृष्टीने ते क्षीण होत चालले आहे. पाश्चात्य जगातल्या माणसाची वाटचाल आहे ही. रांब्रांपासून वर्तमानकालखंडापर्यन्तच्या या वाटेवर माणूस दळणवळणाची किंवा मानवी समागमाची अमोल देणगी हरवून बसला आहे.

बर्गमानच्या चित्रातील नायक एकटे, एकसूरे, जगापासून तुटलेले असतात. मानवी वर्तनाचे जे एक तर्कशास्त्र आहे, त्या दृष्टीने हे लोक म्हणजे एक कोडेंच असतात. त्याना हवी असते सहानुभूती. त्याना हवा असतो हृदयाचा ओलावा. जरूर. पण त्याना हवे असते ते अगदी जवळ असूनही त्याना दिसत मात्र नसते. दुःखाला ते डरतात. पण अखेर अगतिकतेने ते दुःखाकडेच पावले टाकतात. यातली खूबी ही आहे की, बर्गमान—जमान्याचे नायक व्यक्ती नसतातच मुळी. ते फक्त सजीव वस्तू!

अनुक्रमणिका

शंभर वर्षापूर्वी सोरेन किर्केगार्ड हा तत्त्ववेत्ता म्हणाला होता, “आत्मा नसणे हा सुद्धा एक रोगच आहे” बर्गमानचे चित्रपट मानसिक तोल सुटलेल्या अवस्थेचे एक नवे स्वरूप आहे. खरे तर हे आहे व्यक्तित्वाचे विघटन. ‘वाइल्ड स्ट्रॉबेरीज’च्या नायकांपैकी तरुण बोर्ग हा नायक एखाद्या रोगी विकृत माणसाने आत्मक्लेशावरच जीव टाकावा तसा एकलकोंडेपणावरच जीव टाकतो.

‘वाइल्ड स्ट्रॉबेरीज’ मध्ये वृद्ध झालेल्या एकलकोंड्या बोर्गला एक स्वप्न पडते. प्रातःकाळचे..... नागडे निर्जन रस्ते; कांटेच नसलेली घबाड घड्याळे नि उजाड दुकाने; अस्थिपंजर घोड्यांच्या गाडीतून एका बड्याची प्रेतयात्रा निघाली आहे; सारे कसे अगदी निःस्तब्ध, निर्जीव कंटाळवाणे व मध्येच ती प्रेत-वाहिनी गाडी मोडते नि घोडे सैरावैरा पळू लागतात व बोर्ग हळूच उठणाऱ्या प्रेताकडे बघतो नि काय ते त्याचें स्वतःचेच प्रेत असते!

या स्वप्नात एकलेपणातील नि एककल्लीपणातील आचरटपणा स्पष्ट होतो. मानवी संबंध फक्त जर एकलेपणापुरता म्हणजे स्वतःपुरताच सीमित झाला, तर एका प्रातःकाळी एक प्रेतच दिसणार नि ते झक्क स्वतःचेच असणार!

वृद्धापकालांतील बोर्ग जे रस्ते स्वप्नात पहातो, ते वास्तवातल्या रस्त्यांसारखेही असणार नि त्याहून भिन्नही असणार. करडा प्रकाश नि स्मशानशांतता यामुळे ते रस्ते विलक्षण भ्रमिष्ट दिसणार. असले हे जग माणसांचें जग नव्हे. नि त्याचबरोबर ते जग माणसाचें किंवा व्यक्तीचेही जग नव्हे. ते आहे मनुष्येतर जगत जे हरवून बसले आहे नितळ उन्हाचा निसर्ग. जे विसरले आहे झाडाच्या पानांची सळसळ, नि बाळगोपाळांचा खेळ नि खळखळाट. एखाद्या नगरातील रस्त्यांवर कांटे नसलेल्या घड्याळांच्या प्रतिमा हे एकलेपणाचे, करंटेपणाचे निर्दय प्रदर्शन आहे. तो आहे उघडबंब अभाव. वृद्ध बोर्गच्या स्वप्नाचा तात्त्विक आशय हा असा आहे.

बर्गमान अंतर रांब्रांकडे वळणे, त्याने रंगवलेल्या वडिलधाऱ्या व्यक्तींकडे नि वृक्षांकड वळणे हे खरोखरच सुखदायी आहे. प्रथम मला वाटे, की रांब्रांची चित्रें ह्या मानवाच्या एकलेपणाच्याच कथा आहेत. आणि सामान्य प्रतिभेच्या समकालीनांच्या चित्रांतील दारूपानपार्ट्या, खाजगी संगीत जलसे, त्यांचे प्रेमविलास आदी मानवी समाजाची हृद्य चित्रें आहेत. कदाचित असेही घडले असेल, की तीं लहान चित्रे मी दूर अंतरावरून पाहिली असावीत, व त्यामुळे माझ्यावर भोवतालच्या वातावरणाचाच अधिक प्रभाव पडला असेल नि त्यामुळे त्यातील लोकांच्या चेहऱ्यांकडे माझे लक्षच गेले नसेल.

रांब्रां माणसाचे दर्शन घडवतो. तर सामान्य प्रतिभेचे ते कलाकार जीवनातील क्षणिक घटनांचे. लोक घटकाभर रमतात. पत्ते खेळतात. गीत गातात. पण त्यांचे चेहरे बघेपर्यन्तच ही खुशी टिकते. एकदा का ते निरखून पाहिले, की सारी मजा खलास होते. ते लोक असतात आत्मसंतुष्ट नि चांगल्या माणसांबद्दल बेपर्वा. चिरेबंदी घराच्या जाड भिंतीआड भिक्षेकऱ्यांना, बेघरांना, नाधार वृद्ध स्त्रीपुरुषांना जसा प्रवेश नसतो, तसे मोहरबंद त्यांचे चेहरे असतात. अशा घरातील मेजावर निर्धन नि लफंग्या कलाकाराला रांब्रांला कोण पंक्तीस बसवील हो? पण अधिक मानवी काय? रांब्रांच्या चित्रांतील हिरोंचा एकटेपणा, की मजा लुटणाऱ्या क्षुद्र चैनबाज अर्थप्रतिष्ठित लोकांची सामाजिकता?

अनुक्रमणिका

बहुतेक असेच म्हणावे लागेल, की एकटेपणाच्या नि सामाजिकतेच्याही अनेक जाती आहेत. पैकी बोर्गच्या एकलेपणाची कोणती? नि कोणती रांब्रांच्या 'वृद्धाची', जो गेलीं तीनशे वर्षे मानवतेच्या हृदयात जिवंत आहे ?

एक चिंतनशील प्राणी म्हणून, नि एक व्यक्तित्व म्हणून, माणूस स्वतःमध्ये एक विचारधन, एक निकष बाळगून आहे. नुस्ता मी नव्हे, तर 'मी अधिक माणुसकी' हे आहे ते धन. व हा आहे तो निकष. माणसाच्या जगाशी होणाऱ्या व्यवहाराचे मुख्य निर्णायक सूत्र ते हेच आहे. बाकी सारे आहेत वरवरचे दिखाऊ ढंग. वरलीया सोंगाला भुलण्याचे प्रकार!

"आधुनिक पद्धतीने जे विचार करतात, त्याना तुम्ही जे लिहिता ते बरेचसे हास्यास्पद वाटते. अत्युल्लसित धुंद पोरीनी 'आ! काय तो संगीतकार बाख! आ! काय तें वाद्यसंगीत'! असे म्हणत सुटावं ना तसेच तुम्ही 'आ! काय सॉक्रेटिस! आ! काय सिसेरो! आ! काय तीं जीविताच्या सखोल अनुभवांनी परिप्लुत त्यांची पत्रें' असे म्हणता. खरं सांगू, पुरे करा ते तुमचे आभाळातले बोलणे आणि स्वच्छ सांगा, आज तुम्ही तुमच्या दिवाणखान्यात बसून बिनधास्त मोकळेपणाने तुमच्या खास मित्रांबरोबर तुमचा प्रिय साहित्यकार जो शिलर त्याच्या साहित्यात आविष्कृत झालेल्या उन्नतउदात्त भावनांविषयीं, प्रेयस नि श्रेयसाविषयीं बोलू शकता? नाही. तुम्हाला तुमची खिडकी बंद करावी लागते बाहेरच्या मोटारींचा नि विमानांचा कर्णकठोर आवाज बंद करण्यासाठी. आता कुठे राहिलेय् ते पूर्वीचे जीवन नि ती लांब लांब पत्रें, ते प्रशस्त दिवाणखाने, —ती सारी तेव्हाची ऐट! आता आले टेलेटाइप्स रेडियो, टेलिफोन, वर्तमानपत्रे, टी. व्ही, आणि इलेक्ट्रॉनिक युग. केवळ सोबतला नव्हे तर त्याने घेरले आहे सारे. आजची दुर्दैवाची गोष्ट ही नव्हे, की नव्याच्या उदयामुळे आधीच्या जगाचा नैसर्गिक मृत्यू घडला आहे. नाही. आपले दुर्दैव याहून भयानक आहे व आजच्याहून उद्या ते अधिक उग्र भेसूर होणार आहे.

"जुन्याला आता काही वास्तविक स्थान उरले नसले, तरीही माणसांच्या खाजगी नि सामाजिक व्यवहारात जुन्या यंत्रणा अजून टिकून आहेत व आणखी बराच काळ त्या तशाच उरणार आहेत—या जुन्या यंत्रणा नव्याशी मेळ खात नाहीत किंवा जागतिक मज्जासंस्थेच्या विकासाबरोबर येणाऱ्या नव्या परिस्थितीशीही मेळ खात नाहीत.

"प्राचीन काळापासून, समाजाच्या आदिम अवस्थेपासूनच ही गोष्ट स्पष्ट दिसते आहे, की नव्या यंत्रतंत्राच्या उदयाने मानवाची क्षितिजे विस्तारली आहेत. हाताच्या जागी आलेली दगडी कुऱ्हाड, चामड्याच्या जागी (चामडीं पांघरणे) आलेले घर, साध्या मानवी आवाजाच्या जागी आलेला रेडिओ आदी याची उदाहरणे होत."

"आता नवी परिस्थिती निर्माण झाली आहे. आताचे नवे बदल अलग अलग सुटे असे नसतात. ते मानवतेच्या महाकाय मज्जासंस्थेमध्येच सरळ घुसतात. हात, पाय, कान, जाणीव (कॉम्प्युटर्स) हे सगळे एकाच वेळी कार्यरत आहेत. शिवाय अंतराळातून अखिल जग पहायाची अंतराळ-वीरांची शक्ती..."

"या नव्या शक्यता, हे नवे 'विस्तार,' मी परत एकदा सांगतो कीं आज एकसमयावच्छेदे वावरू लागले आहेत, व त्याच्या परिणामी मानवी अस्तित्वाची एक नवी संरचना निर्माण झाली आहे; उद्या

अनुक्रमणिका

कदाचित आमच्या हयातीत देखील दूरविचारसंक्रमणही शक्य झालेले असेल, आणि ही संरचना अधिक समर्थ अधिक गुंतागुंतीचीही झालेली असेल."

"कंदील नि खटारागाडी'च्या युगातला माणूस ज्याचे तुम्हाला आकर्षण वाटते, तो आपल्या सहकाऱ्यांकडे दोन तऱ्हांनी संबंध प्रस्थापित करीत असे. भाषा नि पत्रें यांच्या द्वारें. तुम्हाला तो मातब्बर वाटतो. मला भिकारी! मी वास्तवता अधिक पूर्णत्वाने पहातो, ऐकतो, भावतो नि अनुभवतो. अर्थात वास्तवतेची सर्वांगीण सर्वव्यापी गुरुकिल्ली आता सापडली आहे असे नव्हे. पण ती कधीतरी सापडण्याची शक्यता नि आशा मात्र आज निर्माण झाली आहे."

"खाजगी व सामाजिक व्यवहाराच्या यंत्रणा ज्या आमच्यामध्ये आज कार्य करतात, त्या आमच्या 'कार्यशक्तीच्या अभावा'मुळे आम्हाला नवीन परिस्थितीची योग्य जाणीव होण्यापासून नि विश्वास निर्माण करण्यापासून परावृत्त करतात. तुम्ही इतरांसह (कदाचित पत्नीसह) टी. व्ही. पहात बसता नि आफ्रिकेतल्या एका दूरच्या खेड्यातील मुलगा तुम्हाला जवळ जवळ स्पर्श करतो. पण तुम्ही त्या मुलाबरोबर नाही आहांत. खरे तर, समकालीन जगाच्या रचनेतूनच तुम्ही बाहेर पडला आहांत. आणि पेंगुळत पेंगुळत सामाजिक व्यवहाराच्या आपत्तींबाबत उंच स्थानावरून शोकव्यथित चिंतन करीत आहात."

"पण जरा इतिहासाकडे ध्यान दिलेत तर तुमच्या हे लक्षात येईल, की अशा आपत्ती सगळ्या संक्रमण-युगात जगाच्या नव्या व्यवस्थेच्या बाहेर राहिलेल्यांच्या वाट्याला येतच असतात. भाषाशास्त्र नि बहुभाषाकोविद म्हणून मला हें चांगले माहीत आहे."

"शेक्सपियरचा काल घ्या. त्याच्या समकालीनांनी लिहिलेली नाटके जेव्हा आपण वाचतो तेव्हा असे वाटते, की त्यांतील घडामोडी आपल्या या पृथ्वीवर न घडता चंद्रावरील निस्तब्ध वाळवंटांत त्या घडताहेत काही समकालीन फिल्म्सप्रमाणे. उदाहरणार्थ, स्वेड बर्गमानच्या फिल्म्ससारखे भावना हरवलेले, एकाकी पडलेले, मानवतेपासून तुटलेले जीव फक्त यांत्रिकपणे एकमेकांवर आदळताहेत बिलियर्ड बॉल्सप्रमाणे. पण त्या काळात रोमेव आणि ज्यूलिएत, ट्वेल्थ नाइट, मच अॅडो अबावट नथिंग आणि अथेल्लो लिहिली गेली! शेक्सपियरच्या काळातला मनुष्य तरुण उमेदवाराच्या शयनकपाटातून सरळ अज्ञात, धोक्याच्या नि अतर्क्य संभाव्यतेच्या जगात उतरतो व त्या काळचा तो कलाकारही आपल्या भोवतालच्या घडामोडींपासून बाजूला न राहता धैर्याने त्यांना सामोरा जातो. त्याने 'मेरी वाइव्हज ऑफ विंडसोर' आणि 'हॅम्लेट' लिहिली. त्याच्या घनगंभीर शोकांतिकांमध्ये सुद्धा मनुष्य मनुष्यांविना, साथीदारांविना राहू शकत नाही : त्याच्या नायकांचे आत्मे नव्या जगाला कवाडे उघडायला तयार आहेत. आणि या नव्या जगावर आपल्या जिवलगांसह, प्रेमिकांसह, इतरांच्या साथीसोबतीनेच प्रभुत्व प्रस्थापित करता येणे शक्य आहे हे समजणारे आहेत.

"पण शेक्सपीयरचे समकालीन जे नवीनाबद्दल कुरकुरत नि कचरत राहिले त्यानी मात्र फक्त बर्गमान शैलीचे साहित्य रचले."

"ते जुने दरवाजे, त्या मोठ्या खांबांच्या ओसऱ्या, ते उबदार दिवाणखाने, पत्रांची ने-आण करणाऱ्या त्या चार चार घोड्यांच्या बग्ग्या, ज्याविषयी तुम्हाला आकर्षण वाटते, ते सारे परत येऊ शकते?"

"मी तुमचा शुभचिंतक आहे. तुमचे विचार आधुनिक कालाला शोभणारे असावे असे मला वाटते. पण मला आशा मात्र वाटत नाही. तुम्ही हे पत्र वाचून बाजूला ठेवाल, विसराल, नि तुमच्या सिसेरो, आबेलार्द, पेत्रार्कच्या पत्रात बुडून जाल!"

आजच्या आधुनिक पेंटिंगचे पुरस्कर्ते अनेकदा म्हणतात, की त्यांचे आवडते चित्रकार वास्तवतेचे चित्रण तीं विमानातून, धावत्या गाडीतून, किंवा मोठे करून दाखविणाऱ्या आरशातून दिसते तसे करतात.

कल्पना करा, की भावी काळातल्या एखाद्या शहरात मध्य-विसाव्या शतकातील आधुनिक चित्रकाराच्या चित्रांचे एक प्रदर्शन माहितीच्या उद्देशाने भरलेले आहे. पुढे जाऊन कल्पना करा, की हे शतक जसे वास्तवात आहे तसे जाणून घेणारा एखादा इच्छुक धावत्या गाडीतून दिसते तशी वास्तवता रंगविणारीं तीं चित्रें पहातो.

मला वाटते, की त्याच्याबरोबर अगदी सहनशील आणि जाणता मार्गदर्शक असला तरी देखील चित्रकाराने वास्तवतेचा विपर्यास नि ऱ्हास करणारी तीं चित्रे का काढली ते त्याला उमजणार नाही व ही असली वास्तवता तो मानणार नाही. तो म्हणेल की अशी वास्तवता ना आता आहे नि कधी होती. ही माणसाने पाहिलेली वास्तवता नव्हे. अगदी स्पष्टच सांगावयाचे, तर अर्धे शरीर घोड्याचे नि अर्धे शरीर माणसाचे असलेला 'सेंटाव्र' राक्षस जसा आपण कल्पितो, तशाच प्रकारच्या अर्धे शरीर यंत्राचे नि अर्धे मनुष्याचे असलेल्या राक्षसाने पाहिलेली ही वास्तवता होय. व ज्याअर्थी कला मानवी वास्तवतेचे पुनर्निर्माण करते त्या अर्थी प्रदर्शनातले चित्रण अवास्तव आहे. अशा परिस्थितीत माणसे पूर्वीच्या म्युजियम्सकडे वळतील. रांब्रांदच्या चित्रांकडे वळतील. ज्या चित्रांनी मानवाबाबतच्या सत्यावर प्रकाश टाकला आहे.

विमान, मोटार, दुर्बिण ही सारी मानवाची हत्यारे आहेत. टेलिफोन, रेडिओ, टी. व्ही., ही देखील तशीच मानवाची हत्यारे आहेत. तंत्रज्ञानाचा — चालू असलेल्या वैज्ञानिक – तांत्रिक क्रांतीचा – तो वरदहस्त आहे. वास्तविक मनुष्याच्या सेवेला सिद्ध असलेल्या बहुमोल बुद्धिमान हत्यारांची विपुलता मनुष्याची शक्ती कितीतरी पटीनी वाढवते, विस्तारते व माणसाना ज्ञानार्जनार्थ व जगाच्या पुनर्रचनेसाठी विमुक्त करते.

क्यानाडा देशातले प्रख्यात समाजशास्त्रज्ञ मार्शाल मॅक लुहान यांच्यावर आणि पाश्चात्त्य देशांत लोकप्रिय झालेल्या त्यांच्या जनसंपर्कसाधनांच्या सिद्धांतांवर विश्वास ठेवायचा, तर जो शोध आमच्यातील सुप्त शक्तींचा विस्तार करतो, तो मग टी. व्ही. असो, किंवा स्वयंचलनाचा असो, तो शोध माणसाची केवळ सेवाच करून थांबायाचा नाही. तो माणसाला बदलणार, घडवणारही. मॅक लुहानच्या अनुयायांच्या म्हणण्याप्रमाणे कार चालवणे म्हणजे माणसाने एका अर्थी आपले पाय तोडणे होय. पण तासनतास टी. व्ही. पहात बसणारे आपल्या कोणत्या अवयवाचे कलम करतात ते मात्र मॅक लुहानचे अनुयायी सांगत नाहीत. पण त्यांच्याच युक्तिवादानुसार दोन्ही पायांचे कलम करण्याहूनही ते अधिक भयंकर आहे.

मॅक लुहानच्या प्रतिपादनानुसार पाषाणयुगापासून मानवाची सत्ता हत्यारांवर चालण्याऐवजी हत्यारांची सत्ताच माणसांवर चालत आलेली आहे. मॅक लुहान एक गोष्ट जी सतत सांगतो ती ही, की आधुनिक कालातील हत्यारे-साधने विशेषतः जनसंपर्काची साधने आज बेसुमार मातब्बर नि शक्तिशाली

झालेली आहेत. म्हणून नवे जग समजून घेणे व त्यातील आपले स्थान समजून घेणे हे आज अधिकच महत्त्वाचे झालेले आहे.

मॅक लुहानने जे नवे जग म्हणून सांगितले आहे त्याच्या अनेक वेगवेगळ्या बाजू आहेत. त्यातली एक बाजू म्हणजे आशयावर प्रस्थापित झालेले आकृतिबंधाचे वर्चस्व ही होय. माणसावर प्रस्थापित झालेल्या हत्यारांच्या वर्चस्वाचा हा पुढचा विस्तार आहे. टी. व्ही. वर काय दाखवायचे त्याला महत्त्व नाही. त्याच्या मते टी. व्ही. माध्यम मन्युष्य संपर्क साधते हेच महत्त्वाचे आहे. ते भावनांचे नवीन पद्धतीचे संघटन करते, वास्तवतेची नवीन प्रकारची आकलन-व्यवस्था लावते. आणि वेगाने धावणाऱ्या गाडीतून दिसणाऱ्या वास्तवासारखा जो एक नवीन माणूस तें बनवते आहे, तो फक्त तोंडी चर्चा करील. तो पत्रे वगैरे विषय लिहिणार नाही.

बिचारी पत्रे! गेल्या शंभर वर्षापासूनच आम्ही ती पुरून टाकीत आहोत. विसाव्या शतकापूर्वी होऊन गेलेला फ्रेंच इतिहासकार गास्तोन बोआसिये याना टेलिग्राफच्या शोधांमुळे पोष्टाचाच निकाल लागेल अशी भीती वाटत होती. हा पंडित जर आजचा टेलिफोन पाहता, तर त्याची भीती वाटत होती. हा पंडित जर आजचा टेलिफोन पाहता, तर त्याची भीती आणखीनच दुणावली असती!

तरीही व्हिदिओ-टेलिफोन कोणत्याही क्षणी येऊ शकतो अशी आज परिस्थिती असून देखील पत्रे मरणाचे नाव घ्यायला तयार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पत्रे जगतातच. कारण माणसांना इतरांबरोबर विचार करण्याची, इतरां सोबत दुःख सहन करण्याची नि सहानुभूतीची गरज आहे नि ती गरज कदापी सरणारी नाही. जनसंपर्क—साधने बेलाशक शक्तिमान आहेत. तरीही पत्रे जगणारच. मॅक लुहान काहीही म्हणत असले तरी मानवी व्यवहारात आशयच आकृतीहून श्रेष्ठ आहे.

अर्थात असा काळ जरूर होता जेव्हा मानवी जीवनात पत्रांचे स्थान आजच्याहून मोठे होते. युरोपात पेत्रार्काचा काळ हा असा काळ होता.

पेत्रार्कने आविन्योनहून फ्लोरेंसला जी पत्रे पाठवली, ती ज्याना पाठविली जात त्यांच्या आयुष्यातील त्या मोठ्या घटना ठरत. पाहुण्यांना घरी बोलावले जाई, बड्या पार्ट्या होत, आणि पत्रांचे सामुदायिक वाचन होई.

पत्रांची नेआण करणाऱ्या व्यापाऱ्यांची वगैरे वाटेतच जी लुटमार होई त्यात पेत्रार्कची पत्रे म्हणजे वाटमाऱ्यांना मोठी दौलत वाटे!

पण भावी काळाच्या उदरातील शहरांत पत्रांचे काय होईल? त्यांना परत ते पूर्वीचे वैभव प्राप्त होईल काय? कसे असणार त्यावेळी मानवी संबंधांचें स्वरूप? पूर्वीचें काय उरणार नि काय सरणार?

“एक वृद्धा ट्रॉलीबसमध्ये चढली. तिच्याकडे माझे लक्ष जेव्हा मी एक हुंदका ऐकला तेव्हाच गेले. तिच्या हातात एका मुलाचा फोटो होता. तो एका रुमालांत होता ज्यांत तिचे पैसेही होते. त्या फाटक्या रुमालातून पैसे खाली पडले तेव्हा तिच्या शेजारी बसलेल्या प्रवाश्यांनी ते उचलून तिच्या हातावर ठेवले. पण तिला काही ते समजले नाही. तिने तो फोटो घट्ट आवळून धरला होता व ती रडतच होती. मला तिच्या

अनुक्रमणिका

चेहऱ्याकडे बघायची छाती झाली नाही. माझी नजर फक्त तिच्या बोटांवर खिळलेली राहिली. ती बोटें सुजलेली नि अति परिश्रमांमुळे विरूप दिसत होती. कोणीही तिच्याजवळ जाऊन तिची विचारपूस केली नाही. आणि मलाही काहीतरी अडवते आहे असा भास झाला. मी त्या बसमधल्या प्रवाश्यांकडे पाहिले. ते थकलेले होते. तरी त्यांचे चेहरे सहानुभूतिशून्य मात्र वाटले नाहीत. काहींचे तर करुणामय वाटले. मी तिथून उठलो नि व्यथित अंतःकरणाने घरी गेलो. घराचा जिना चढताना माझे मन मला विचारत होते : मी का नाही गेलो तिच्याकडे ? वर्गात शिकवण्यासाठी ‘युद्ध नि शांतता’ ह्या कादंबरीतील काही प्रकरणे रात्री मला वाचून काढावयाची होती. पण ते पुस्तक माझ्या हातातून खाली पडले. नि मी एकही माणूस त्या वृद्धेकडे का गेला नाही हाच विचार करीत राहिलो नि डोळ्यांसमोर तिची ती सुजलेली बोटे उभी राहिली. ती बोटे त्या नीट कपडे केलेल्या मुलाच्या फोटोला स्पर्श करीत होती. ती बोटे होती शिवण-टिपण करून जगणाऱ्या एका महिलेची. जड कात्री वापरण्यामुळे वाकलेली व अंगुस्तानने दाट बनलेली. माझी मावशी शिंपिण आहे.”

“मी नि ती वृद्धा जर एकटेच बसमध्ये असतो, तर बहुतेक मी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असता. मग काय इतर प्रवाशांनी मला रोकले? की कदाचित मी त्याना रोकले?”

“जितका मी त्या घटनेचा अधिक विचार करू लागलो, तितकी ती मला अधिक कळेनाशी झाली आणि मला तर मी एक माणूस म्हणून नि भावी शिक्षक म्हणून ती घटना समजून घ्यावीशीच वाटत होती. त्या घटनेचें कारण काय? परदुःखाकडे शीतळ दृष्टीने पहाण्याचा तर तो प्रकार नसेल? की फक्त आप्पलपोटेपणाची भावना? बेपर्वा? थकवा? खोटी लाजलज्जा? स्वतःच्या अगतिकतेची भावना? की पुढे होऊन काहीही न करण्याचा स्वभाव?”

“नायकांच्या वर्तनाचे काळजीपूर्वक विश्लेषण करावयाला आम्हाला शिकवतात त्याच पद्धतीने बसमधल्या प्रवाशांच्या वर्तनाचे मी विश्लेषण केले. शेवटी मी त्या वृद्धेला विसरूनही गेलो. पण मी त्या वृद्धेकडे कां गेलों नाहीं त्याचे कारण मग मला कळले. तिचे दुःख हे क्षणभरही माझे दुःख झाले नव्हते. ते माझ्या हृदयाला भिडले नव्हते. ते जर माझ्या हृदयाला भिडते, तर ना आप्पलपोटेपणाची भावना, ना खोटी लाजलज्जा मला रोकू शकली असती. मी किंवा दुसऱ्या कोणीही, दुःखी माणसे नि प्रेक्षक यांमधील लक्ष्मणरेषा ओलांडावयाला मागेपुढें पाहिले नसते.

मार्क्सच्या प्रारंभीच्या एका ग्रंथामध्ये भावी कम्युनिस्ट समाजरचनेमधला माणूस म्हणतो, “इतरांच्या भावनांत नि सुखांत ‘माझे’च हित असते.”

मार्क्सचें हे सूत्र मानवी व्यवहाराचे रहस्य उघडे करते नि भावी कालातील अभुतपूर्व सौख्याची शाश्वती देते. मला कधी कधी वाटते की, इतरांच्या भावभावना नि इतरांची सुखे हे माझेच लाभ आहेत जसे! नताशा रोस्तोवाच्या भावभावना नि सुखदुःखे तोल्स्तोयची सुखदुःखे झाली होती. आणि एमा बोव्हारी जेव्हा वारली तेव्हा आपणच मेलों असे फ्लोबेरला वाटले. अर्थपूर्ण मानवी व्यवहार हा कलानिर्मितीसारखाच आहे असे म्हणणे म्हणजे काहीशी अर्धवट तुलना केल्यासारखें होईल. पण एक नवीन जाणीव मिळवून देण्यात त्या तुलनेची मदत होते. माणसांमधला परस्परानुभाव साधताना आपण मान्य करीत नसलो तरी आपण कलाकार बनतो. माणसांमधला परस्परानुभाव नि कलानिर्मिती यांची दोन समान लक्षणे सांगता येतील. कलाकाराला एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे विश्व, स्वभाव नि प्राक्तन यांचे सूक्ष्म ज्ञान झालेले असते. कलात्मक

जाणीव ती हीच. हे जे मी लिहितो आहे ते लेखणीच्या अनवधनाने नाही मी लिहिलेले. ‘सामान्या’मध्ये असामान्यत्वाचा साक्षात्कार होणे हे आहे कलात्मक जाणीवेचे, कलेच्या दिव्य दृष्टीचे लक्षण. (गोर्कीने चितारलेलीं ज्ञातअज्ञातांची व्यक्तिचित्रे त्याच्या दिव्य दृष्टीचीच साक्ष पटवितात.) निश्चितपणेच असे म्हणता येईल की माणसा-माणसांतील व्यवहार हा सुद्धा त्या त्या व्यक्तीला लागलेला शोध असतो. तुम्ही ती व्यक्ती आपली व्हावी म्हणून घेतलेला तो शोध असतो नि त्या शोधात तुम्ही समृद्ध झालेला असतां. अर्थात तुम्हाला मोठेपणा वगैरे प्राप्त होण्याचा हा प्रश्न नसतो. तर त्याने तुमच्या जीवनात संपूर्णतः नवीनाचा प्रादुर्भाव होत असतो. पूर्वी जे नव्हते त्याचा तुमच्या जीवनाच्या क्षितिजावर होणारा तो नवा उदय असतो.

कलात्मक निर्मितीप्रमाणेच मानवी परस्परानुभावाच्या परिणामी बहुमोल खजिना तुमच्या हाती लागतो. प्रत्येक प्रेमभाव, प्रत्येक करुणाभाव, प्रत्येक सहानुभाव तसा एकमेव, अद्वितीयच असतो. व्यक्तींसारखेच हे भावही तुमच्यासमोर उभे ठाकतात.

आता आपण बर्गमानच्या फिल्म्सकडे वळूया. सच्च्या मानवी व्यवहारात व्यक्ती व्यक्तीला भेटते. एक अथांग ‘अहं’ दुसऱ्या अथांग ‘अहं’ला भिडतो. आणि अशा प्रकारच्या देवघेवीच्या सृजनशील व्यवहारात व्यक्ती मानवतासम्मुख होऊन विश्वसर्जनाच्या प्रक्रियेतील अंशभाग बनलेली असते.

“मी कबूल करतो, की माझ्या पहिल्या पत्रात मी जरासा चिडलेला होतो. खरंच गावंढळ उपदेशवादाची मला भारी चीड येते नि तो तात्विक असेल तर त्याने माझे पित्त खवळते. बाळपणात चिकार शेंगदाणे खाल्ल्यावर मला झाले होते तसे होते. हां. बालपण हे खरेच मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. पण ते बालपणातच ठीक आहे. अखेर तो जीवनाचा केवळ आरंभच असतो. जे सप्तवर्षीय कुकुल्या बाळाला ठीक असेल, ते तिशीतल्या बाब्याला हास्यास्पद, खुळचट ठरेल. आणि माझी अशी भावना झाली आहे की, तुम्ही तुमच्या वाचकांना तीस वर्षीय बालके बनवायचा जणू वीडा उचललेला आहे.

वैज्ञानिक कादंबरीत घडते तसे घडून आज सॉक्रेटिस जर का परत आपल्यात आले, तर ते श्रोत्यांच्या शोधात, रस्त्या रस्त्यांतून, बाजाराबाजारांतून अनवाणी हिंडत फिरणार नाहीत, तर ते सरळ लक्षावधी लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या टी. व्ही. केंद्राकडे धाव घेऊन जनसंपर्काचे ते साधन सॉक्रेटिस आशयाने समृद्ध करतील. अर्थात हे शक्य आहे, की आपल्या आशयाला संवादाचे रूप देण्याकरता ते एखाद्या विक्षिप्त व्यक्तीला बरोबर घेतीलही. तिथे स्टुडियोमध्ये ते कपडे करतील. बूट घालतील आणि मला वाटते, की तो शहाणा माणूस टी. व्ही. कॅमेराच पसंत करेल. फक्त तुमच्यासारखे उपदेशवादीच काय ते पुराण्या झग्याला चिकटून बसतील : कारण अशामुळे आधुनिक जगाच्या बाहेर काहीसे सन्मानपूर्वक रहाणे तुम्हाला परवडेल. कृपा करून असे समजू नका की, यंत्रविद्येचा बेसुमार जलद गतीने होणारा विकास नि माणसाच्या भावनाविश्वातील बदलांची मंदगती यातील विषम प्रमाण मला अस्वस्थ करीत नाही. मीही त्याने अस्वस्थच होतो. माझ्या एका बुद्धिमान नि प्रज्ञावंत समव्यवसायी गणितज्ञाशी मी याविषयी चर्चा केली तेव्हा तो मला म्हणाला, ‘हे पहा, द्मित्री कारामाझोवला (दोस्तोवस्कीच्या कादंबरीचा नायक) वसंत ऋतूच्या आगमनाने वृक्षवल्लरींना फुटलेली लिवलिवित पालवी पाहून जो वैश्विक आनंद झाला, तो चंद्रभूमीवर प्रथम पाऊल टाकलेल्या अमेरिकन अंतराळ प्रवाश्यांना झालेल्या आनंदाहून अधिक उत्कट होता. आता ही गोष्ट बरी की वाईट हा प्रश्न अलाहिदा आहे. तरी पण हा गणितज्ञ तुमच्याबरोबर आहे असे तुम्हाला वाटते? राजेश्री, असे हुरळून जाऊ नका. त्याने अजून ठरवलेले नाही आहे. तेही बरे की वाईट हा मुद्दा अलाहिदाच.

ते चांगले आहे असे तुम्हाला आताच वाटणे मूर्खपणाचे ठरेल. कारण कल्पना करा, की खुद्द द्मित्री कारामाझोव हाच चंद्रावर पोहोचला तर ? तर काय ?

“आमच्या वादविवादाच्या अगदी गाभ्यात आता आपण शिरलो आहोत. तुम्हालाही मानवता तारांगणात पोहोचलेली हवीच आहे. पण मोबदल्याशिवाय. तुम्ही वरवर तरी कारामाझोवचे आत्मिक अराजक ही आमच्या उत्थानासाठी आम्ही चुकती केलेली भावनात्मक किंमत आहे ही कल्पना मानावयाला तयार होणार नाहीत. अर्थात काहीही किंमत न देता जर मानव नि मानवता विकसित होत असेल तर ते केव्हाही उत्तमच. परंतु विश्वाच्या कार्यशक्तीच्या सातत्याचा जो न्याय आहे, धर्म आहे, नेम आहे तो फक्त प्राकृतिकापुरताच नसून नैतिकालाही तो लागू आहे. या न्यायाप्रमाणे कार्यशक्ती नष्ट होत नाही. द्मित्री कारामाझोवच्या भावनांतील अराजक अंतराळ—प्रवाशांच्या समतोल बुद्धीत स्थिरत्व प्राप्त करील नि फिरून ते कारामाझोवच्या नातवंडापतवंडांच्या वेडात चाळवले जाईल, ज्यांना दुसऱ्या गृहताऱ्यांवरील वृक्षवल्लीला फुटलेली पालवी पाहूनही वैश्विक आनंद होईल.... हो. हा आहे प्रत्येक उत्थानाचा विवेकी विरोधविकास. पण तुम्हा उपदेशवाद्यांच्या हातात जर का मानवतेच्या विकासाची वास्तविक सत्तासूत्रे असतील, तर तुम्ही लोक गतकाळातील शिळोप्याच्या गुलुगुलु गोष्टी सांगत बसाल नि मानवता गुहेतील जीवनाप्रत मागे पोहोचलेली किंवा थांबलेली असेल.”

“आता मॅक लुहानची जनसंपर्काची उपपत्ती मला वाटते समकालीन जीवनाचे विविध पैलू लक्षात घेऊन सावधपणे विचार करणारी आहे. त्याबद्दल फारसा उत्साह वाटत नसला तरी मला त्यात रस घ्यावासा जरूर वाटतो.”

“शतकानुशतके माणसांना आपल्या वातावरणाचे भानच नव्हते. माणसांच्या हयातीत वातावरणात विशेष जाणवण्यासारखा फरक पडतच नसे. आज माणसाहून वातावरणात शीघ्र वेगाने बदल होत आहे. अशा परिस्थितीत स्थितकृतासारखे किंवा स्थितकर्त्यांसारखे तरी बनावे लागले किंवा हे विलक्षण परिवर्तन समजून घेण्यास कार्यरत तरी व्हावे लागेल. मला वाटते मॅक लुहान हे समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे.”

“प्रस्तुत पत्र परत वाचल्यानंतर एक गोंधळ माझ्या लक्षात आला. गेल्या पत्रात मी भाषाशास्त्रज्ञ नि भाषाकोविद असल्याचे म्हटले होते. नि या पत्रात गतितज्ञाला मी माझा समव्यवसायी असल्याचे म्हटले आहे. अर्थात दोन्ही खरीच आहेत. कारण माझे संशोधनाचे क्षेत्र आहे अवकाशीय समाजशास्त्र. (इतर ग्रहांवरून येणाऱ्या संदेशांचे त्यांच्या सांस्कृतिक खाणाखुणा आदीनुसार अर्थ लावणे) आणि त्याचबरोबर आंतरग्रहीय संपर्क साधनांचा उलगडा करणेही माझ्या कक्षेत येते.”

“जाता जाता मला असे सुचवावेसे वाटते की आज अनेक विज्ञाने जीं विकसत चालली आहेत, त्यांचे आंतरवैज्ञानिक संशोधन-विज्ञान वा विषयां-विषयांतील आंतरविषयक वैज्ञानिक संशोधन हे आहे विज्ञानाचे सर्वांत अधिक आधुनिक पाऊल आणि मानवी व्यवहाराचे यशस्वी आगामी स्वरूप.”

परिवर्तनाविना, नवतेविना जीवन नाही. पण परिवर्तन म्हणजे माणसांतील मनुष्यत्वाचाच घात असे मात्र होता नये.

अनुक्रमणिका

मार्शाल मॅक लुहान, मनुष्याच्या भोवतालच्या परिस्थितीविषयी, अनेक प्रकारांच्या 'वातावरणांविषयी' खूप काही विचार करतो. पण खुद्द माणसाविषयी मात्र खूप कमी विचार करतो. त्याचे लक्ष मानवाला जे गौणस्वरुपी त्यावर अधिक, नि मानवाला जे प्राणभूत त्यावर कमी केंद्रित झालेले आहे. पण 'शीघ्र गतीने बदलणारा वास्तव' त्याचे प्रभुत्व मानल्याविना गत्यंतरच उरलेले नसल्यामुळे लोकांवर प्रभाव गाजवतो हे खरेच आहे.

पण या 'वास्तवात' जमेला धरलेला मनुष्य मात्र बर्गमानच्या सिनेमातील मनुष्यांसारखाच जवळजवळ अवास्तव असतो.

मॅक लुहानचे जग नि बर्गमानचे जग ही दोन्ही आहेत परस्पर संबंधित जगें. ही कल्पना विरोधाभासावर आधारलेली वाटेल. कारण मॅक लुहानचे जग आहे गरमागरम उकळत्या वास्तवाचे प्रत्यक्ष रूप. त्याचा वास्तव आहे स्टेडियम, जो जयजयकारी तांत्रिक प्रगतीच्या खांबांवर उभा आहे. नि त्याचा आखाडा आहे तंत्रसामर्थ्याच्या चमत्कारांना प्रतिसाद देणाऱ्या लोकांनी गच्च भरलेला. तर बर्गमानचे जग आहे गारेगार थंड, निर्जन, ओसाड. त्याच्या सिनेसृष्टीत आहे किरणे नसलेला सूर्य नि आहेत वाहने नसलेले रस्ते. नि घरे? त्याच्या घरांच्या उदास वीटांतून निथळतो आहे ओवाळून टाकलेल्या मानवी अस्तित्वाचा गारठा!

तथापि ही दोन्ही जगे—मॅक लुहानचे सिद्धांत नि बर्गमानचे चित्रपट—आहेत परस्पर संबंधितच. ही दोन्ही आहेत अर्थप्रतिष्ठित किंवा भांडवलदारी समाजरचनेत जे अधिक शक्तिशाली तेच कसे अधिक छळणारे, पीडणारे ठरते, त्याची प्रत्यंतरे. मार्क्सने मनुष्याच्या सामर्थ्याला 'मनुष्यजातीय शक्तींचे वास्तवातील रूपांतर किंवा 'मनुष्यजातीय शक्तीचे मूर्तिमंत फळ' म्हटले आहे, जें विज्ञानाच्या नि तंत्रविद्येच्या अद्यावत सिद्धींचे योग्य वर्णन ठरेल. मॅक लुहानच्या सृष्टीत मनुष्याच्या अशा प्रकारच्या सामर्थ्याचा विजय दिसेल. तर बर्गमानच्या सृष्टीत त्या प्रकारच्या सामर्थ्याचा पराभव किंवा त्या शक्ती मानवाला परकी ठरलेल्या दिसतील. पण हे सारे अप्रत्यक्ष रीत्याच—पराजितांच्या वैफल्यातून!

"युद्ध नि शांतता" ही कादंबरी मी रात्रभर जागून वाचली. त्यामध्यें पियेर बेझुकोव आणि आंद्रे बोल्कोन्स्की जीविताच्या अर्थाची चर्चा करतात. ती प्रकरणे तुम्हाला आठवत असतील. किती अत्युत्कट आहेत ते क्षण ! ते तिथे एकटेच बसून चांगल्या-वाईटाचा, सत्या-असत्याचा उहापोह करताहेत. त्यांचे आत्मेच त्याकडे वळले आहेत व चर्चेच्या परिणामी ते लोक त्याआधीचे रहात नाहीत.

"मनुष्य हा आत्मिक प्राणी आहे. ठीक? त्याच्या शरीराचे, त्याच्या चेहऱ्याचे रूपदर्शन आत्मिक आहे. त्याची भाषा आत्मिक आहे. माणसाच्या आत्मिक स्वरूपाविषयीचा असला विचार माझ्यासारखा शिक्षकविश्वविद्यालयाच्या चौथ्या वर्षाच्या विद्यार्थ्याला बहुधा बराच बालिश वाटण्यासारखा आहे. पण तोलस्तोय वाचताना मी अनुभवलेला आनंद और आहे हे कबूल केले पाहिजे.

"मार्क्सला कोणीतरी काहीशा गमतीने विचारलेल्या प्रश्नमालिकेतील 'माणसाचे सर्वांत अधिक उद्वेगजनक अपयश कोणते?' या प्रश्नाला मी आज 'आत्मिकतेचा अभाव' असे उत्तर देईन."

अनुक्रमणिका

“मी असे उत्तर देईन त्याचे कारण म्हणजे माझ्या मते माणसाच्या बऱ्याच निंद्य उणीवांचे कारण माणूस आत्मिकदृष्टीने संकुचित होतो, कधी कधी भ्रष्ट होतो व तो आत्महीन यंत्र बनतो यात आहे असे मला वाटते.”

“मी शिक्षक होऊन शिकवायला सुरुवात करीन तेव्हा मी माझ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीमध्ये आत्मिक शक्ती विकसित करण्याची स्वप्ने पहात आहे. माझ्या मते सर्वात अधिक महत्त्वाची गोष्ट जी आज करावयाला हवी आहे, ती म्हणजे मनुष्याला सखोल चिंतन करावयाला प्रवृत्त करणे ही होय.”

“होय. बसमधल्या त्या वृद्धेला मी विसरलेलो नाही.”

बसमधल्या त्या वृद्ध महिलेमध्ये महान चित्रकार रांब्रांदच्या ‘श्रोत्या’ वृद्धेत जे आत्मसौंदर्य आहे, त्याहून कमी न पहावयास नक्कीच आत्मिक शक्तीचा खूप विकास झालेला असावा लागतो.

***

अनुक्रमणिका

# प्रेम समर्पण

मी त्या जलाशाला गेलो तेव्हा डिसेंबरची कडाक्याची थंडी होती. तरी हॉल भरगच्च भरलेला असणार ही मला कल्पना होती. पण प्रवेशद्वारापाशीच भला मोठा खवळलेला जमाव असेल याची मात्र कल्पना नव्हती. कोरड्या बर्फाने ओठ भाजत असल्यामुळे 'ज्यादा तिकिटा'साठी हावभावांची, हातवाऱ्यांची भाषा गर्दीतल्या मंडळीने चालवली होती. आंत माड्रिगल ऑर्केस्ट्राने इटालियन रिनेसान्सचे संगीत चालवले होते. पण जमावाच्या क्षोभामुळे ज्या संगीतमय वृत्तीने आलो होतो ती मात्र राहिली नाही.

हॉलमध्ये मी माझ्या शेजाऱ्यांकडे पाहिले. मंडळी तरुण होती. अनेकजण नुकतेच तारुण्यात पाऊल टाकलेले आनंदी गडी दिसले. चारही बाजूला दृष्टिक्षेप टाकल्यावर काही वृद्ध जोडपीही लक्षपूर्वक पहात असलेली वाटली. वाद्यसंगीत सुरू झाले. पण प्रत्येक चीज परत परत ऐकण्याचा मंडळींचा आग्रह मात्र जरा पोरसवदा वाटला.

क्रिसमस कारोल हा फार मोठा विनोद वाटला व नृत्याची लय आणि आत्मिक भाववृत्तीचा सिंफनीची लय यात फरकच जाणवला नाही. प्रेमातील एकनिष्ठेचे भावगीत तर चक्क प्रार्थनेसारखे वाटले.

माड्रिगल संगीत मेळ्याने विनोदी भाषणे केली, विचार मांडले, नृत्यें केली नि विविध कार्यक्रम सादर केले. मला वाटते मानवी आत्म्याइतका विभिन्नतायुक्त समग्रता साधलेला एकमेळ दुसरा कुठलाच नसेल आणि समग्रता वा एकमेळच सागराप्रमाणे विविधतेला सामावू शकतो.

विश्वाच्या विविधतेत अनुभवाला येणाऱ्या आत्म्याच्या त्या अवस्था, ज्या माणूस शंभर पाचशे किंवा हजार वर्षानंतर देखील पुनः मूळच्या ताजवटीने अनभवू शकतो, त्या खास महत्त्वाच्या आहेत. त्या साठीं माणूस पुनः पुनः कला नि संगीत यांचा आश्रय घेतो. संगीत त्याच्या त्या अवस्था चाळवते. कधी कधी संगीत एकदम त्या अवस्था जागृत करू शकत नाही. पण अखेर आत्म्याला गदगदून हालवून सोडल्याशिवाय मात्र ते राहत नाही. अशा वेळी जीवनाचे अनेक क्षण सार्थक पावतात नि जीवन समृद्ध होते. ते क्षण कदाचित एखादी संध्याकाळ—ज्यावेळी पेत्रार्कने लावराला पाहिले—किंवा एखादी सकाळ—ज्यावेळी दांतेने तरुण बेआत्रिसला पाहिले, चिरंजीव असतात. नित्यनूतन असतात.

"तुम्हाला असे कधी वाटत नाही का, की मानवी संबंधांना अद्‌भुतरम्य बनवणे, विशेषतः प्रीतिभावनेचे कल्पनारम्य पद्धतीने वर्णन करणें, जे पूर्वीच्या काळी नवलपूर्ण व 'अमर' ठरले होते म्हणतात, ते आजच्या तरुण वाचकांत आत्मविश्वासाला सुरुंग लावणारे ठरू शकेल? इच्छा नसताना तरुण वाचक तुलना करून निराश होऊ शकेल? पूर्वीच्या त्या प्रेमी गायकांसारखा किंवा दांते आणि पेत्रार्क यानी अनुभवला म्हणतात तसला अनुभव त्या वाचकाच्या कधीही वाट्याला आलेला नसणार? तसेच त्याला माहीत असलेल्यांपैकी कुणाच्या तो वाट्याला आलेला नसणार?"

"तुम्हाला एक पाखंडी प्रश्न विचारू का मी? खरोखर लावरा, बेआत्रिस या प्रिया वा प्रेयसी कधीकाळी अस्तित्वात होत्या म्हणता?"

अनुक्रमणिका

"तुम्हाला खरोखरच असा विश्वास वाटतो का, की वीस, तीस, चाळीस वर्षांपर्यंत पेत्रार्कने लावरावर खरीखुरी प्रीती केली होती; जिला उभ्या आयुष्यात त्याने फक्त काही वेळाच पाहिले होते; जिचा आविन्योनचा सरदार उगुएस दे सादे यांच्याशी विवाह झाला होता; जिला वीस वर्षात अकरा मुले झाली होती; जी प्लेगच्या आजाराने वारली; नि जिचे त्याच दिवशी दफन करण्यात आले; जिला सहा महिन्यातच जग पार विसरून गेले; नि जिचा पतिराज अवघ्या काही महिन्यातच पायातली जुनी व्हाण फेकून देण्याआधी परत बोहल्यावर चढला?"

"त्या शतकांतले काय ते आविन्योन—काय ते पिसाळलेले कुत्रे, काय ती डुकरे, वासरे, गुरे; काय ते घाणीने बरबटलेले रस्ते; पेत्रार्काभोवती ओवल्या गेलेल्या दंतकथांमधून अमर झालेले बाळगोपाळांचे ते आविन्योन पेत्रार्काच्या काव्यपुस्तकांच्या अभिसुंदर आवृत्त्यांवरच ठीक दिसते."

माफ करा हं माझ्या उपयुक्ततावादी पाखंडाबद्दल. पण मी म्हणेन की हा सारा पेत्रार्काच्या प्रतिभाशक्तीचा चमत्कार होता. आणि दांते? नऊ वर्षाच्या त्या मुलाने इटली देशातील फ्लोरेंसाच्या रस्त्यावर पाहिलेली एक पोरगी, व 'दिविना कोमेदिया' या त्याच्या अभिजात कलाकृतीत अमर झालेली ती बेआत्रिस यांचा काय संबंध हो?

"विश्वसाहित्यातील एक ऐतिहासिक घटना म्हणून बेआत्रिसचे स्थान वादातीत आहे. पण बेआत्रिस? ती खरी होती?"

वाङ्मय विषय घेणारे आमचे आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे जुने आवडते शिक्षक जेव्हा आजारी झाले, तेव्हा त्यांच्या जागी एक उदासवाणा माणूस आला, ज्याचे आमच्या एका विनोदी मित्राने 'हा काय माणूस?' 'हा तर एक निर्जीव पुतळा' असे वर्णन केले. मला ना धड त्या शिक्षकांचा चेहरा आठवत, ना त्यांचा आवाज. माझ्या डोळ्यासमोर फक्त त्यांचे हात येतात. जाडजूड, थलथलित, सफेद, जणू काय मळलेल्या कणिकेचे निष्काळजीने बनवलेले व त्यांवर घाईघांईने पीठ शिंपडलेले. वर्गात शिकवताना हे मशारनिल्हे शिक्षक एकदा म्हणाले, ज्युलिएत ना, ती काय बेरोनातली एक सामान्य पोरगी, जिला रोमेवने आपल्या कल्पनेतील हिरेमाणकांनी शृंगारलेली होती झाले ! पण आम्हाला मात्र या कोड्याचा उलगडा कधी झालाच नाही कारण रोजालिनला देखील त्याने हिरेमाणकांनी शृंगारिले होतेच की? तर मग कॅपुलेटकडच्या नाचानंतर ज्युलिएतला पहाताक्षणीच तो रोजालिनला कसा विसरला? (शेक्सपियरच्या या शोकनाट्याच्या आरंभीच रोमेव ज्युलिएतच्या नव्हे तर दुसऱ्या कोणाच्या तरी प्रेमाने अगदी वेडापिसा झाला होता.) दुसरे असे की, रोमेव हाच वेरोनातला एक सामान्य पोरगा असून ज्युलिएतनेच त्याला आपल्या कल्पनेतील हिरेमाणकांनी शृंगारले होते असे का नाही होऊ शकणार?

हे सारे मनात घोळत असल्यामुळे आम्ही आमच्या वयाला साजेशा टारगटपणाने ठरवून टाकले की, आमच्या नव्या गुरूजींचा प्रेमभंग झाला असला पाहिजे व म्हणूनच ते असे काही तरी बोलत असावे.

नंतर विश्वविद्यालयात शिक्षण घेतांना दांते नि पेत्रार्क यांच्याविषयी मी बरेच वाचले, तरीही माझ्या डोक्यातून हा पोरकटपणाचा नि मूर्खपणाचा विचार काही गेला नव्हता, की साहित्याच्या इतिहासाचा अभ्यास विशेषतः त्यातील हस्तिदंती मनोऱ्यांचा, प्रेमात अयशस्वी झालेल्या लोकांकडून बहुतेक होत

असतो. एखा ज्ञात्याच्या शब्दांत 'विलक्षण उदात्त' अशा या मानवी संबंधांचे हे अभ्यासक दोन संशयातून कधीच मुक्त नसतात.

एक संशय हा की, बेआत्रिस नि लावरा या स्त्रिया खरोखरच अस्तित्वात होत्या का? व दुसरा संशय हा की त्यानी त्या महान कवींना भारले होतेंच का? की त्या महान कवींनी वास्तवात स्त्रियांवर करतात तसलेच प्रेम त्यांच्यावरही केले होते?

प्रामाणिक इतिहासकारांनी जुनी ऐतिहासिक कागदपत्रे सूक्ष्म अभ्यासून बेआत्रिस आणि लावरा यांचे अस्तित्व सिद्ध केले आहे.

व दुसऱ्या संशयाबाबतचे वादातीत असे पुरावे दफ्तरखान्यात नि कागदपत्रांत तरी कसे असू शकतील?

एका तत्त्ववेत्त्याने एकदा म्हटल्याप्रमाणे प्रेमानुभव हा माणसाचे संपूर्ण जीवन गदगदा हालवून सोडणारा अनुभव असतो. प्रेमाच्या विरोधाभासावर कोणी काहीही बोलले व लिहिले असले, तरी या अनुभवात असे काहीतरी निश्चित असते, जे गणिती बुद्धीला अगदी तंतोतंत अचूक वाटणारे नसेल, परंतु नैतिक दृष्टीने ते वादातीत असते. प्रेमाच्या साम्राज्यात इतर काही असेल, व प्रेमाची रीत भले विपरीतही असेल, पण त्या विपरीतांचा सूरमेळही तिथे आहे. तसे नसते, तर तो अनुभव ठरला नसता. म्हणजे गोंधळाच्या, अव्यवस्थेच्या, विसंवादाच्या विश्वापासून जिंकून घेतलेले ते आपले विश्व ठरले नसते. पेत्रार्कची लावरावरची (ती सामान्य स्त्री जिला आविन्योनच्या त्या माणसापासून अकरा मुले झाली) प्रीती समजण्याकरता दफ्तरखान्यातील कागदपत्रात डोके न खुपसता माणसाचे जीवनसर्वस्व हालवून सोडणाऱ्या त्या अनुभवात डोकावले पाहिजे.

प्रेमात पडलेल्या माणसाविषयी असे म्हटले जाते की, त्याच्या आत्म्याच्या नव्या अवस्थेमुळे भोंवतालचे जग त्याला खोटे वाटू लागते. मला वाटते प्रेमात पडलेल्या जीवांना आसमंतांत नवी सत्ये दृक्गोचर होत असावीत.

प्रणयीजनांची परीक्षा त्यांच्या या नव्या अवस्थेवरून करावयाची असते. लावराविषयीच्या एका सुनीतामध्ये पेत्रार्क म्हणतो, (तिला तो चर्चमध्ये वा रस्त्यावर पहातो) "मी तिला अखेर पाहिले, तेव्हा मला ती दुःखीकष्टीशी दिसली. ती म्हणजे सद्‌गुण, सुज्ञता, कोमलता, यातना या सर्वांचा एकवटलेला सूरमेळ, जो पृथ्वीने अजून ऐकलाच नव्हता. खाली वाकूनच आभाळ तिला आलिंगन देते नि त्यावेळी वायु इतका मृदु मुलायम होतो की झाडाची पत्तीही हलू नये."

प्रेमाचे तर्कशास्त्र आहे हे. मानव नि विश्वाची एकतानता आहे ही. दिल नि पान यांचा एकजीव आहे हा. इथे थंड गार तर्काला स्थान नाही.

दंतकथांतील 'साफो' या ज्ञानदेवतेच्या काळापासून तो सोविएट गीतकार निकोलाय झाबोलोत्स्कीच्या काळापर्यंत काव्य ठासून सांगत आले आहे : की खरे प्रेम हे या नव्या वास्तवतेचा शोध घेणाऱ्या काटेकोर विज्ञानाहून काही और आहे. प्रेमाची ही नवी वास्तवता म्हणजे आमचे स्वत्व नि

अनुक्रमणिका

अवकाशात तळपणारे नक्षत्रपुंज यातील नाते. आमचे स्वत्व नि उसळणाऱ्या सागराची लय यातील नाते. हे नाते प्रेम न करणाऱ्या मनुष्याच्या बहुधा नजरेआड रहात असल्यामुळे त्याला आपले जीवन स्वतंत्र आहेसे वाटते. वास्तविक, मानवी हृदय नि नक्षत्रपुंज समानधर्मी आहेत. पण ही कल्पना त्याला उत्साहजनक वाटत नाही. कारण हृदय नि नक्षत्रांच्या संगतीचा क्षण त्याने आपल्या अंतर्यामी कधी अनुभवलेलाच नसतो.

पेत्रार्कच्या साहित्यातील काही ओळी उतरून घ्याव्या म्हणून मी त्याचा साहित्यखंड उघडतो. पण तो ग्रंथराज मग बंद करावयाची मला इच्छाच होत नाही.

सांगू, प्रीतीसंगे पावले किती किती चाललो मी
परी दमलो कसा ना कधी,
विलसे सदा हास्य माझ्या रुदनी
तीही हासली, पण कळी सुकली तिची.
नि मान तिने टाकली.

पेत्रार्कने आविन्योनच्या चर्चमध्ये जेव्हा प्रथम तिला पाहिले तेव्हा त्याचे वय तेवीस वर्षे होते. तर तिचे वीस. तिचे लग्न पूर्वीच झालेले होते. तो तरुण पण ज्ञानी नि कवी होता. त्याच्या प्रथम भेटीच्या बेचाळीसाव्या वाढदिवशी, नि तिच्या मृत्यूनंतर एकवीस वर्षांनी आता वृद्ध होत चाललेल्या पेत्रार्कला आपली जुनी कागदपत्रे चाळताना त्याचे एक सुनित सापडले. जे पूर्वी त्याला आवडले नव्हते पण आता त्यात त्यानी काही ओळी लिहिल्या.

“१३२७ या वर्षी एप्रिल रोजी सकाळीच रामप्रहरी मी एका चक्रव्युहात शिरलो जिथून बाहेर पडण्याचे द्वारच नाही.”

त्यानंतर पाच वर्षांनी त्याचे निधन झाले. निधन समयी ते आपल्या विचारात निमग्न होते. हाती लेखणी होती. त्याआधी त्यानी लिहिले होते, “तिच्याविना मी दुसऱ्या कशाचाच विचार करू शकत नाही” त्याच्या मनात दुर्धर संघर्ष चालू होता. ज्या मानाने त्याचे वय होत गेले त्या मानाने त्याला हे अधिकाधिक स्पष्ट जाणवले, की तिने त्याच्यावर प्रेम करणे हे ईश्वराविरुद्ध पाप करणे होते.

पण इथे मी सर्वांना बख्खळ ठाऊक असलेल्या गोष्टीच तर सांगत बसलो आहे. त्यापेक्षा ह्या कथेतील सर्वाधिक महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयावरच लिहिणे अधिक बरोबर ठरेल नाही?

त्याची प्रेयसी आता प्रौढ होत चालली. केसांत आता सफेदी दिसू लागली. मुखकमल म्लान होत चालले. चाल मंदावत गेली. कोणी असे म्हणू शकेल की, प्रेमांध झालेल्या पेत्रार्कला ती वृद्ध होत चालली आहे हे दिसणारच आहे? तो तिला क्वचितच पाहत असणार रस्त्यावर किंवा चर्चमध्ये.

नाही. तसे नाही. लावरा युवती होती तेव्हा, त्यांच्या प्रेमाच्या प्रारंभीसुद्धा, पेत्रार्कने आपल्या प्रियतमेची ‘नाशिवंत प्रतिमा’ पाहिली, नि त्याच्या प्रेमळ हृदयाने जे अनावर दुःख नि वेदना अनुभवल्या त्याला कल्पनारम्य वाङ्मयात सुद्धा तोड नाही. खुद्द त्याच्या हृदयंगम सुनीतांमध्ये सुद्धा नाही.

अनुक्रमणिका

त्याचे प्रेम, ज्या रात्रीच्या रात्री त्याने तिचा केवळ नामोच्चार करीत काढल्या, त्याहून अधिक दिव्य स्वरूपाचे आहे. प्रेमाखातर जागून काढलेल्या रात्री हा 'मानवाचे सर्वस्व पणाला लागलेल्या प्रेमानुभवाचा' प्रथमपासूनच धर्म आहे. पण त्यात आपले जिच्यावर प्रेम आहे, ती व्यक्ती वृद्ध होऊन अंतर्धान पावणार म्हणून होणाऱ्या अतीव दुःखाची जी भर घातली, ती मात्र पेत्रार्कनेच.

तिला प्रथम चर्चच्या द्वारावर ऐन जवानीत पाहिली, त्या घटकेनंतर सोळा वर्षांनी आपल्या नंतरच्या साहित्यात पेत्रार्क स्वतःचे समाधान करतो आहे.

"अरे मीच तर जीवनाच्या विवंचनांमुळे नि तिच्याहून वडील असल्यामुळे अधिक वृद्ध बनत चाललो आहे. "जरी रोग नि पुनः पुनःच्या बाळंतपणामुळे ती निर्माल्य होत आहे."

अर्थात ही फक्त कल्पनारम्य वाङ्मयातील अलंकारिक भाषा नव्हती. पण आपल्या प्रेमाचा जीव आपल्याआधी जाणार म्हणून अस्वस्थ झालेल्या व्यक्तीचे ते वास्तविक नि संयत चिंतन होते. ह्या संयमात 'भडक' वर्णनाहून अधिक वास्तवता आहे.

मृत्यू पावली तेव्हा ती चाळीस वर्षांवर होती. त्या काळी स्त्रियांना अल्प वयातच मरण येई. जीवघेणा बुंबॉनिक प्लेग सुरू होण्याआधी काही काळच त्याने तिला पाहिलीं होती नि त्या वृद्ध प्रेयसीविषयी अपूर्व प्रीती त्याच्या हृदयात उदेली होती. मनुष्याच्या ह्या मार्दवात मानवाच्या महान भवितव्याचे आश्वासन आहे. पेत्रार्कच्या साहित्याने मानवी भावनांच्या उन्नयनात इतकी वरची पायरी गाठली की, आजही अतीव आदरानेच तिच्याकडे पहाणे शहाणपणाचे ठरेल.

आणि ज्या गृहस्थाने 'लावरा होतीच का' अशी शंका घेतली त्याला मी हे उत्तर पाठविले.

"तुमच्या वाङ्मयशाखेच्या अध्यापकाचे हात तुम्ही म्हणता तसे एवंगुणविशिष्ट असे असतीलही. काही असो. परंतु रोमेव आणि ज्युलिएत बाबतचे त्याचे मत मात्र सयुक्तिक वाटते. स्तांदालची उपमा वापरावयाची तर, पुरुषी कल्पना ही मीठाच्या खाणीत वाळलेल्या काटकीसारखीच स्फटिकांनी मढवलेली आहे. वाळलेल्या काटकीच्या जागी तुम्हाला सर्वसामान्य स्त्री कल्पिता आली की बस्स ! कविकल्पनेचा तर हा गुणविशेषच आहे. आणि रोमेव हा कवी होता. तो शेक्सपियरचे एक अंगच होता. शेक्सपियरचे उत्तमांग.

"पेत्रार्क नि लावराला घटकाभर आता विसरूया. कारण त्यांच्या बाबतीतली आमची माहिती अगदीच तुटपुंजी आहे. ती अवघ्या काही घटनांची आहे. नि तीही कोर्टकचेऱ्यातील कागदोपत्री समाविष्ट झालेली आणि पेत्रार्कच्या आत्मनिष्ठ सुनीतांमध्ये उपलब्ध झालेली. म्हणून आपण कवी लेर्मान्तोवकडे वळूया. त्याच्याविषयी आम्ही खूप अधिक जाणतो. आपल्या प्रेयसीचा हात आणखीन एकदा हाती घ्यायला मिळावा म्हणून तो कवी अख्ख्या जगाशी टक्कर द्यायला, वाटेल त्या यातना भोगायला, कोणत्याही दिव्याला तयार असे. याचा अर्थ त्याला तिच्यामध्ये उच्च कोटीच्या अस्तित्वाचा साक्षात्कार घडलेला असावा. पण वस्तुस्थिती मात्र अशी की, त्याच्या त्या रमणीने एका संशयित चारित्र्याच्या प्रेम वल्लभाशी लग्न केले आणि त्याला हवेहवेसे वाटणारे ते दुर्मिळ दुर्लभ हात भलत्याच इसमाच्या सेवेला रूजू झाले.

अनुक्रमणिका

“थोर पुरुषांच्या समकालिनांनी लिहिलेल्या स्मृतिवाङ्मयात त्या पुरुषांनी ज्यांच्यावर प्रेम केले त्यांच्या विषयीचे जे चित्रण आलेले आहे, त्यातील विसंगती तुम्हाला नाही जाणवली? जे प्रेम करतात त्याना त्यांच्या प्रेमिकांच्या गुणावगुणाविषयी एक वाटते, तर जे समतोल बुद्धीने निर्णय करू शकतात त्याना (या लोकांमध्ये त्यांच्या आठवणी लिहिणारे लेखकही आले) दुसरेच वाटते.”

“मला वाटते माझे हे पत्र वाचून तुमच्या मनात हा विचार नक्कीच आला असेल की, मी कधी प्रेम केलेलेच नसणार. वस्तुस्थिती याहून भयंकर आहे : मला बालपणच ठाऊक नाही.

“युद्ध आले. मी पोरका झालो... अनाथ.. दूरचे नातेवाईक... फिरून अनाथाश्रम... पुढे बांधकामावर नेमणूक... असे सांगतात की, पाच ते आठ वयोवर्षाच्या दरम्यान हां हां म्हणता मुलाची कोमल तरुतुल्य बुद्धी फुलू लागते नि तीं गुण घ्यायला लागतात. आज काय तर कवी, उद्या काय तर चित्रकार, परवा नटसम्राट! पण मला त्या वयात खायची भूकच अधिक होती म्हणून असेल कदाचित. पण असे काहीच घडले नाही. तरी सुप्तावस्थेतले गुण काही मेले नाहीत. माझ्या दुर्दैवाने मी वीस वर्षाचा झाल्यानंतर माझ्या गुणांचा उदय झाला. एव्हाना मला चांगला पगार मिळू लागला. (कसबी कारागीर म्हणून माझी प्रगती बऱ्यापैकी चालू होती) त्यानंतर जणू गुंगीतून जागे व्हावे तसे बालवय माझ्यात जागे झाले. आज कवी, उद्या कलाकार, परवा आणखीन काही... पण बालवयातच ते सोपे असते! त्या वयात गुणांचा सहज विकास होतो नि जीवनाच्या पुनर्रचनेचा प्रश्न नसतो. पण आता मी भोवऱ्यात अडकलो, रंगभूमीवरचा नट काय, वृत्तपत्रसृष्टीतला पत्रकार काय, नाट्यदिग्दर्शक काय!”

“माझ्यातील कवी जागा होण्याआधीच मी तिला भेटलो. कदाचित तिनेच पुढाकार घेतला असावा. मी तिला चिकार कविता अर्पण केल्या असतील. भेंडोळींच्या भेंडोळी आहेत अजून माझ्यापाशी. त्या चिक्कार काव्याच्या वह्या मी परत कधी वाचण्याचे धाडस करणार नसलो, तरी पण नष्ट नाही केल्या अजून. त्यावेळी मला आपले वाटे की, तिने आपल्या केसांचे सौन्दर्य फक्त सणासुदीच्या दिवशीच तेवढे प्रदर्शित करावे. तसेच सायंपोषाखाने नटून तिने कामावर जाणे काही योग्य नव्हे. डोक्यात ती शरदात फुलू लागणाऱ्या नि सूर्याच्या कोवळ्या उन्हात चमकणाऱ्या फुलांची माळा विशिष्ट डौलात माळायची. एकदा आम्ही ग्रीष्माच्या पावसात सांपडून हिऱ्यांसारख्या चकाकणाऱ्या पर्जन्यबिंदूनी पुरते न्हाऊन निघालो. त्याक्षणी मी जे अनुभवले ते अवर्णनीय आहे. पुनरपि अशक्य आहे.”

“आम्ही समवयीन होतो. पण माझ्यात तिला पोरकट वयातील चंचलता दिसली व लहान मुलासारखी मला ती वागवू लागली.

“जेवढे अधिक प्रेम मी तिच्यावर करू लागलो तेवढा माझ्यातला पोरकटपणा जाऊ लागला नि पूर्वी जो मी भक्कम पुरुष होतो तो माझ्यात फिरून संचरू लागला. आणि मग मीच तिला लहान मुलीसारखा वागवू लागलो. पण तिचे बालपण अगदी पूर्ण व्यवस्थितपणे गेले होते व तिचा जमही व्यवस्थितपणे पूर्वीच बसला होता. हे सारे असले तरी मला तिच्यात एक तरुण ललना दिसत होती. कारण माझे तिच्यावर प्रेम बसले होते. मला ती मोकळ्या मनाची, शहाणी मुलगी जिच्या डोक्यात जीवनाच्या विविधरंगी छटा अगदी दाटून भरल्या होत्या अशी वाटे. परंतु मी जितका तिला एक मुलगी मानायाचा तितका माझ्यातला मुलगा मला तिरस्करणीय वाटायाचा. नाहीतरी मी किती किव करण्यासारखा होतो. पोरकट हौशी कविता लिहिणारा नि ओबडधोबड चित्रे काढणारा!”

अनुक्रमणिका

“मला तिला चकित करून सोडायचे होते. तिला हादरा द्यायचा होता. पण त्यासाठी करायाचे काय? मी माझ्या पूर्वीच्या पुरुषी शक्तीची गरज असलेल्या कामावर रुजू झालो. ते काम काहीसे धोक्याचे असायाचे. खूप खूप उंच घरबांधणीच्या कामावर मी रुजू झालो नि एक दिवस तिला मी खूप उंचीवर जणू ढगांखालून मी कसा चालतो ते जमिनीवरून बघायसाठी बोलाविले. त्यावेळी मी संरक्षक पट्टाही न बांधता परातींमागून पराती मागे टाकीत चालू लागलो. पण मध्येच फार सोसाट्याचे वारे वाहू लागले आणि माझे धाबे दणाणले. पण मी ते काम जमवले. नि श्वास रोखून भरभर खाली उतरलो नि तिच्याकडे धावून गेलो. पण तिचा तो रुसलेला, मला दूर लोटणारा परका चेहरा मी कधीच विसरणार नाही. माझी कल्पना तिला चकित करण्याची, तिला धक्का देण्याची होती. पण उलट तिनेच मला धक्का दिला. बराच वेळ आम्ही काही बोललोच नाही. मग ती मला म्हणाली, “किती किती निष्ठूर नि मूर्ख पण आहेस रे तूं!”

“ती रात्र मी जागून काढली. माझ्याकडून तिचा जो अक्षम्य उपमर्द झाला होता त्याची तीव्रता जाणण्याचा मी प्रयत्न केला. मी आडदांडपणे तिचा पाणउतारा केला अशी तिची कल्पना झाली. पण खरं सांगतो, माझ्या २६ वर्षाच्या उमरीत मी इतका असहाय्य, इतका दयनीय, इतका पडलेला कधीच नव्हतो. पण तिला हे कळले नाही. त्यामुळे माझी जगण्याची इच्छाच संपली.

“पुढें काय झाले? एका चित्रपटातल्याप्रमाणे ‘ह्याला पुढे नाहीच!’

“शरदातली एक सायंकाळ होती. मला ते पुरते आठवते. मी तब्बल तीन तास तिच्या घरापाशी तिची वाट पहात नि पावसात भिजत होतो. आणि ती आईसाठी दूध आणण्याकरता म्हणूण बाहेर पडली. तिने मला ती एका खलाशाबरोबर लग्न करणार असल्याचे सांगितले. गेली सहा वर्षे तीं परस्परांना पत्रे लिहित होतीं. त्याला म्हणे तिने अजून कधी पाहिलेही नव्हते. जणू काय त्याची गरजच नव्हती अशा आविर्भावाने ती म्हणाली. “फोटो पण नाही?” मला खात्री करून घ्यावयाची होती म्हणून मी विचारले, “नाही—फोटो पण नाही” अर्थात असल्या खुळचट गोष्टींवर माझा विश्वास बसला नाही. पण तिने मला बनवावे याचेच मला अधिक दुःख वाटले.

“मी देशाच्या उत्तरेकडे निघून गेलो. मग एका मित्राच्या पत्रातून तिने एका खलाशाबरोबर विवाह केल्याचे आणि ते लोक दक्षिणेकडे रहात असल्याचे कळले. मी कावराबावरा होऊन तडक विमानतळाकडे धाव घेतली. विमानतळ तीन सप्ताहांपर्यंत ओळीने बंद होता.

“ही कहाणी इतकी अर्थशून्य आहे की, आता माझाच त्यावर विश्वास बसेनासा झाला आहे. खरोखरच माझ्या आयुष्यात असे काही घडले असेल का? काही महिन्यांनंतर मी तिला पत्र पाठविले आणि तिच्याकडून आलेल्या पत्रात ती आई होणार असल्याचे तिने कळविले. तसेच ती रहात असलेले शहर स्वच्छ नि झकास असून मला उन्हाळ्याची सुटी घालवायची असल्यास कमी खर्चात रहाण्याची व्यवस्थाही तिच्या ओळखीने होण्यासारखी असून बाजारात मासळीचे ढीग पडलेले आहेत वगैरे...

“इकडे उत्तरेला एका भूगर्भशास्त्रज्ञाकडे मला उत्कृष्ट ग्रंथसंग्रह मिळाला. त्यात इतिहासाचे दुर्मिळ ग्रंथ होते. आणि मला वाटते अखेरीस मी एकदाचा इतिहासकार होण्याचे नक्की केले. तिसाव्या वर्षी विद्यार्थी बनण्याची चैन परवडण्याची शक्यताही माझ्या जीवनात एव्हाना निर्माण झाली.

अनुक्रमणिका

"प्रेमात कल्पनारम्यता अटळ आहे, हे बालपणापासून आपण पुनः पुन्हा सांगू शकत नाही. हजारो वर्षांच्या शहाणपणातून निर्माण झालेले वादातीत सत्य म्हणून आम्ही ते स्वीकारलेले असते.

"होय. हें खरे आहे की, आजुबाजूच्या प्रेमात न पडलेल्या लोकांना जे दिसत नाही ते प्रेमात पडलेल्याला आपल्या प्रेमविषयात दिसते. त्यांना जिथे 'खास असे काही' दिसत नाही. तेथे याला चमत्कारच चमत्कार दिसतात. जीवनाचा अनुभव असलेल्या शहाण्यासुरत्यांना 'प्रेमाचा भावनिक धक्का' संपणारा असतो हे कळलेले असते. पण त्या लोकांचे उपरोधिक हास्य प्रेमात पडलेल्याला मात्र दिसत नाही. शहाण्यांना नक्की ठाऊक असते की, आज चनत्काराचा चमत्कार बनलेले प्रेमपात्र उद्या किंवा परवा सामान्य कोटीत जमा होणार आहे. तिच्या ओठावरच्या भावाविष्कारातील किंचित बदलाने याचे प्राण आज कासावीस होताहेत, पण पुढे हा स्वतःलाच हासणार आहे.

जीवनाचा अनुभव घेतलेले, टक्केटोणपे खाल्लेले शहाणे या सगळ्यातून गेलेले असतात हे खरे आहे.

आणि तो दिवस येतो. सूर्यप्रभेने विणलेले प्रीतीचें ते आवरण पडते. चमत्काराचा चमत्कार क्षुल्लकत्वाच्या करड्या राखेने फासला जातो. हिरा कोळसा होतो. याप्रमाणे तो किंवा ती उपरोधाने हासू लागतात. प्रथम खरोखर स्वतःलाच हासतात नि मग जीवनाचे धडे शिकून शहाणी झालेली ही माणसे सहानुभूतीचे हास्य चेहऱ्यावर खेळवत बेजबाबदारपणाच्या पुढच्या कृतीकडे पहातात.

"प्रेमात कल्पनारम्यता अटळ असते"—या म्हणण्यात काहीसा कार्यकारण भाव उमगतो व मनाचें समाधान होतें हे खरे आहे. परंतु प्रेमात जर फक्त कल्पनारम्यताच असेल, तर मग वास्तवात हरवलेले असते ते काय? स्वप्न? मृगजळ? प्रेमातील कल्पनारम्यता हे जागृतावस्थेतील स्वप्न? आणि स्वप्नासाठी रडणे योग्य आहे?

कदाचित असे तर नसेल, की खोलवर विचार न करता ज्याला आपण 'प्रेमातील कल्पनारम्यता' असे म्हणतो ती वस्तुतः कल्पनारम्यता नसून तो काहीतरी वेगळा प्रकार असतो आणि तो अधिक अर्थगर्भ, अधिक वास्तव असतो? कदाचित असे तर नसेल, की प्रेमात पडलेल्या व्यक्तीलाच फक्त मानवाबाबतचे उच्च सत्य दिसते? नि माणसात जे काही आटीव, मौल्यवान नि अत्युत्कृष्ट आहे त्याबाबतचे ते सत्य असते—पण माणसाचे ते सामर्थ्य जो प्रेम करतो त्याला त्याच्या प्रेमपात्रात सुप्त दिसण्याऐवजी व्यक्त दिसते. वास्तवात प्रकट झालेले दिसते.

प्रेमाचा चमत्कार तो हाच. कोळशाचा हिरा बनतो आणि तो दीर्घकाळ टिकूही शकतो. जर आपण तसा घाट त्याला देऊ शकलो आणि फक्त प्रेम करून घेण्याचे तेवढे स्वीकारले नाही तर.

शेकडो वर्षे मानवजातीने अ-प्रेमाचे समर्पण निर्माण केले आहे. आणि यात ख्रिस्ती चर्च विशेष यशस्वी ठरले. मानवजातीने आजवर प्रेमसमर्पण नव्हे तर अ-प्रेमसमर्पण शिकवले. आपल्या प्रेमपात्रात एकदा जे गवसले, ते चिरंतन जतन करून कसे ठेवावे ते शिकविण्याऐवजी प्रेमातील कल्पनारम्यतेच्या अटळतेविषयी शिकवले आहे.

अनुक्रमणिका

पण प्रेमसमर्पणाला आकार द्यावयाचा तर प्रथम आपण एक चूक सुधारली पाहिजे. प्रेमाकडे ती एक संपूर्ण उत्स्फूर्त क्रिया असून तो अंतर्मनाचा प्रांत आहे या दृष्टीने पहाण्याचे सोडून दिले पाहिजे. प्रेमाचे स्वयमेव सर्जन व विसर्जन पण होते. बुद्धिगम्य नसलेल्या प्रेमशक्तीचे उच्चतम आविष्करण वाङ्मयात, कलेत होते. पण बुद्धिगम्य नसलेली प्रेमशक्ती दैनंदिन जीवनामध्येसुद्धा प्रभावी असते. जरा कमी आढ्यतेने पण अधिक चिकाटीने.

स्तांदालचा प्रेमविषयक प्रबंध (द लामुर) हा या वादळी, मोकाट सुटलेल्या पाण्याला विशिष्ट दिशेने प्रवाहित करण्याचा, अनिर्बंधाला बांध घालण्याचा प्रयत्न होता. पण लेखकाच्या हयातीत त्या प्रबंधाच्या अगदी मर्यादित प्रतीच वितरित झाल्या होत्या आणि स्पष्टच सांगायचे तर आज आम्ही तो निबंध जवळ करीत नाही. त्याहून कार्मेनच्या प्रतिमेसारखे किंवा त्या प्रकारचे उद्या काय ते माहीत नसणारे प्रेम स्वीकारणे अधिक सुलभ होते. प्रेमातील कल्पनारम्यतेचे सूत्र जे तयार झाले, तें जो आनंद टिकविणे आमच्या हातात नाही, त्या आनंदाच्या प्रकाराचे स्वाभाविक समर्थन म्हणून संभवतः तयार झाले.

परंतु आपण जे प्रेमपात्रांत पाहातो, ते जर केवळ उन्मत्त चंचलता नसून सर्वेच्च सत्य असेल, आणि जर प्रेमातील कल्पनारम्यतेच्या उणीवेमुळे आपण तें सदैव टिकवू शकत नसलो, तर ती खरी हानी नव्हे काय? फक्त आपलीच नव्हे तर जगाचीही?

आपल्या प्रेमविषयात संपूर्णतया समान असे काही पहाणारी दोन माणसे आढळणे असंभव. प्रेमात पडलेल्या प्रत्येकाला आपल्या प्रेमविषयात काही खास, काही विशिष्ट, काही एकमेव, काही निरपेक्ष दिसत नसते.

१४ व्या शतकातील परिभाषेत पेत्रार्कने या निरपेक्षाला 'ईश्वरी सौंदर्याचे प्रतिबिंब' म्हटले आहे. आजच्या आपल्या भाषेत आम्ही त्याला 'अनंत ऐश्वर्य' म्हणतो.

आपण प्रेम करतो त्या व्यक्तीत हे ऐश्वर्य **निर्माण करण्यात आणि विकसित करण्यात** ज्या नैतिक साधनेचा अंतर्भाव होतो तो प्रेमसमर्पणाचा आशय आहे. कोणतेही समर्पण हे आधी आत्मतर्पण असते. तो त्याग असतो. प्रेमसमर्पण हेही असेच आहे. 'माझ्यासाठी'च्या परिस्थितीतून माणसाला 'तुझ्यासाठी'च्या परिस्थितीकडे पोहोचावयाचे असते. वैयक्तिक अस्तित्वाचे केंद्र 'मी' पासून 'तू' कडे फिरवायचे असते. खरे प्रेम हे आत्मिक मातृत्व आहे. आपण ज्यावर खरे प्रेम करतो त्याच्या आत्म्याला निःस्वार्थीपणाने आणि सहनशीलतेने उत्कृष्ट पोषण देण्यात ते आपोआप दिसते. आणि इथेच चमत्कार आपली वाट पहात असतो. तो समजून घ्यायचा तर प्रेम म्हणजे निर्मिती आहे, एक सृजनक्रिया आहे हे समजून घ्यावे लागते—जे म्हणून आपल्या प्रेमविषयात उत्तमोत्तम असेल त्याकडे सृजनशील वृत्तीने पहावयाचे असते.

पण सृजनशीलतेच्या प्रमुख अंगातील एक अंग म्हणजे सर्जक किंवा कलाकार स्वतःच बदलत जाणे हे आहे. ही गोष्ट प्रेमात विशेषत्वाने घडते. कारण प्रेमात 'विषयी' आणि 'विषय' कोण हे ठरवणे अशक्य असते. ती आणि तो किंवा तो आणि ती जर प्रेमात असतील तर एकमेकांत जे उत्कृष्ट असेल त्याचे त्यांच्याकडून पोषण होईल.

अनुक्रमणिका

अशा रीतीने व्यक्ती स्वतः जो त्याग करते त्यात त्या व्यक्तीचे नुकसान होत नाही. फायदाच होतो. खरे तर त्याचा पुनर्जन्म होतो आणि त्यात मानव्याचाच नव्हे, तर वैश्विकाचाही संचार होतो. आत्म आणि पर या भावांचे साम्य नि सख्य जुळून जग जाणण्याचे नवे सामर्थ्य त्या व्यक्तीत प्रकट होते. कवी जेव्हा लिहितो, 'वनचरांच्या उदासीनतेतही मज गमे जिवंतपण तव हास्यासम' तेव्हा प्रेम ही खरीखुरी वैश्विक भावना आहे या त्याच्या मताशी आपण सहमत होतो.

परंतु स्वार्थ हा बहुधा वरचढ होऊन प्रेमात पडलेल्या दोघांपैकी एकांत उत्तम ते स्वतःकडे खेचण्याची किंवा प्रभाव वा अधिकार गाजवण्याची आवड नि ईर्षा पैदा होते नि वरचढपणासाठी संघर्ष सुरू होतो. आपण तिच्यासाठी किंवा त्याच्यासाठी नव्हे, तर ती किंवा तो आपल्यासाठी अशी भावना जोरावते. अर्थात 'दुसऱ्या पक्षाला' ही तसे वागण्याची इच्छा होऊन परिणामी 'प्रेमातील कल्पनारम्यते'चे तर्कशास्त्र जन्माला येते नि मग निराश झालेली व्यक्ती काळ्या ठिक्कर पडलेल्या कोळशाच्या तुकड्याकडे पाहून तोच तुकडा त्या व्यक्तीला कधी हिरा दिसला होता यावर विश्वास ठेवायला तयार होत नाही.

"काल रात्री मी हेलोइजने आबेलार्दला लिहिलेली पत्रे वाचली आणि मला वाटले : ज्या स्त्रिया प्रेम करून अमर झाल्या त्यांच्या पत्रांचे संग्रह प्रकाशित केले तर किती चांगले होईल! मला जर कधी मुलगी झाली तर तिला ती वयात येईल तेव्हा मी हे पत्रसंग्रह देईन, जे नेहमीच तिच्यापाशी राहतील. पूर्वी मुलींना दागदागिने, हिरे, मोती, जडजवाहर आदी देण्याची पद्धत होती. पण ती तिला ही पत्रे देईन, जी सदैव तिच्यापाशीच रहातील आणि स्त्री म्हणून तिचा स्वतःवरचा आत्मविश्वास कधीच ढळणार नाही.

"पण लगेच दुसरा विचारही माझ्या डोक्यात आला : पण फक्त थोर पुरुषांवर प्रेम केलेल्या स्त्रियांचीच पत्रे तेवढी आमच्यापर्यंत आली आहेत. आणि यातील सर्वच स्त्रिया काही थोर नव्हत्या. (अर्थात 'हेलोइज' किंवा डिसेंबरच्या उठावात भाग घेतलेल्या क्रांतिकारकांच्या बायका याला अपवाद) त्या स्त्रिया ज्यानी ज्यांच्यावर प्रेम केले त्याना मानवता विसरणे शक्य नाही म्हणून अमर झाल्या.

"पण ज्या स्त्रियांनी सामान्य, अप्रसिद्ध 'जेथे ना चिरा ना पणती' अशा पुरुषांवर—गवंड्यांवर, कोळ्यांवर, शिपायांवर, कंपाउंडरांवर, कारागिरांवर, वाद्ये वाजंत्री वाजविणारांवर—प्रेम केले त्यांच्या प्रेमाविषयी काय? त्यांची आठवण करण्याच्या लायकिच्याच त्या खरोखर नाहीत? काय जाणतो आपण त्यांच्याविषयी? ती पहा तिथे आहे एक अनामिका जिने खलाशावर प्रेम केले, जो दूर दर्यापार गलबतावर आहे. किती प्रतिक्षा, किती चिंता, किती एकनिष्ठा!

"मी सकाळपर्यंत त्या अज्ञात स्त्रियांविषयी विचार केला नि मला त्या माझ्या बहिणींसारख्या वाटल्या. ज्यांनी थोर पुरुषांवर प्रेम केले, त्यांना त्यांनी ज्यांच्यावर प्रेम केले, त्यांच्या योग्यतेत स्वतःच्या भावनेच्या योग्यतेची पावती तरी मिळाली. पण सामान्य जनांना त्यांचें प्रेम कमी योग्यतेच नाही हे कळले असेल काय? कदाचित नसावे. त्यानी प्रेमाचा विचारच केला नाही. त्यानी त्यावर लिहिले नाही. त्यानी फक्त प्रेम केले.

"आणि या विचारापर्यंत पोहोचल्यानंतर मला असे आढळून आले की, कवी, तत्त्ववेत्ते, लढवय्ये यांच्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रियांहून आपण या जनसामान्य स्त्रियांचें अधिक ऋण लागतो.

अनुक्रमणिका

“ज्यांनी प्रेम केले, पण ज्यांना आपल्या प्रेमाची थोरवी कळली नसेल, अशी कोट्यावधी माणसे आहेत. ती जेवतात, खातात, गप्पागोष्टी करतात, मजामौज करतात. त्यांना मुले होतात, तीं प्रार्थना करतात. काही तरुण वयात मरूनही जात असतील.

त्या रात्री जनसामान्यांच्या थोरवीचा विचार करता करता मला वाटले. होय, हेलोइज, बेआत्रिस, लावरा या प्रेमललना एकदोन शतकाच्या ठायी उगवणारी नक्षत्रं आहेत. जितके अलीकडे अलीकडे यावे तितकी ही उपज कमी कमी होत चालली आहे. पण का? कारण प्रेमचमत्काराची महत्तमता भावणारा महाकवी शतकाच्या ठायी एकदाच जन्म घेणार!

“यावरून जर आपण असे मानावयाला गेलो, की ‘चिरंजीव किंवा अमर प्रेम’ या जगात शतकांनुवर्षांनंतरच उपलब्ध होत असते तर त्याचा अर्थ आपल्या नशिबात ते असण्याची आशा एकंदर कमीच असा नव्हे का? म्हणजे मग स्त्रीपुरुष असाच नाही का विचार करणार, की प्रीती ही चीज हेलोइज, ॲडमिरल नेल्सन, अलेक्झांडर ब्लोक आदी भाग्यवंतांच्याच नशीबातली असून आपला तेथें पाड लागणार नाही?

“पण मला जर कधीकाळी मुलगी झाली तर मात्र मी तिच्यात असा आत्मविश्वास निर्माण करीन, की प्रेम हा भले चमत्कार असला तरी तो कोणीही अनभवू शकेल. हेलोइजच्या जीवनात जर तो घडू शकतो तर माझ्याही जीवनात घडू शकेल!

“पूर्वी मानवी व्यवहारात जेव्हा विचाराहून भावनेचे अधिक प्राबल्य होते, तेव्हाच्या स्त्री-पुरुषांनी आपण करतो तो चमत्कार आहे हे न जाणताच प्रेम केले. पण आज विचाराचे प्राबल्य वाढल्यामुळे प्रेमाचे दिवस आता संपले आहेत अशी समजूत होते व आपण प्रेम करतो ते प्रेमच नव्हे असे अवलोकनात आले, की चिरंतन प्रेमाच्या शक्यतेवर माणसाचा विश्वासच बसेनासा होतो. व एकदा का माणसाच्या मनात प्रेमचमत्काराचा मुडदा पडला, की तो सहसा परत उठत नाही.

“पण आजच्या जगात लोकांना वाटते त्याहून खूप अधिक प्रेम आहे. हो. अनेक अडचणी असल्या तरी आहे. हे प्रेम अगदी खास प्रकारचे आहे नि स्तिमित करणारे आहे. मला ते व्यक्त करणे अवघड आहे. एक समकालीन कवी म्हणतो त्याप्रमाणे प्रेम ही जीवनाची अर्धी रोटी आहे. यापूर्वी प्रेम जीवनाच्या रोटीइतके आवश्यक वाटे. आज आपल्याला जीवनात रोटीहून काहीतरी अधिक भरीव हवेसे वाटते आहे. प्रेमभावनेत काहीतरी नवीनाचा प्रादुर्भाव होतो आहे. ते नवीन माझ्या हृदयात उगवते आहे. मला आर्ततेने जाणवते आहे.”

“पण जवळ जवळ हजार वर्षांपूर्वी हेलोइजने आबेलार्दला हीच गोष्ट नाही का लिहिली होती की प्रेमात देह नव्हे आत्मा मुख्य आहे? तर मग बदलले ते काय? काहीच नसेल कदाचित. आणि मी आपलं, उगाच कुठल्याकुठे भरकटतो आहे.”

तुम्ही नव्हे पण खुद्द जीवनच भरकटते आहे. प्रेमच भरकटते आहे. निरंतर राहूनही प्रेम सतत नवतेने विनटून चकित करीत असते. प्रत्येक नवीन युगात ते नवनवीनाचा साक्षात्कार घडवीत असते.

दिनांक ४ जून १९१७. कवी अलेक्झांदर ब्लोक यानी आपल्या दैनंदिनीत लिहिले : "मी आज ल्युबापाशी 'वीता नोवा' (नवजीवन) विषयी बोललो. विचारांचा नि भावनांचा कोण भोवरा, कोण युद्ध, कोण अश्रुधारा! आज माझ्या कुशीत सतत दुखतंय... संध्याकाळी मी तिला घेऊन स्टेशनवर गेलो. गाडीत बसवले. त्यावेळी घडलेली किंचितशी गोष्टही मी विसरू शकत नाही. किती छान !...

ल्युबा म्हणजे एल. डी. मेन्देलेएवा. कवीची ही पत्नी.

'वीता नोवा' हे दांतेचे पहिले पुस्तक. त्यात कवीने बेआत्रिसच्या प्रेमाविषयी लिहिले आहे. कवीने प्रथम तिला 'उत्तम लाल रंगाच्या वेषात' पाहिली, त्या क्षणापासून तो तिच्या अल्पायुषी मृत्यूपर्यंतची ती कथा आहे. ('वीता नोवा'च्या लेखनानंतर कवीच्या नशिबात देशत्यागाचे दुःख आले. पण त्या दुःखात अमर बेआत्रिसच्या चिंतनाने त्याला अपार धैर्य नि सुख दिले.)

अर्थात कवी ब्लोक नि त्याची पत्नी यांचे 'वीता नोवा'विषयी त्या दिवशी काय बोलणे झाले ते कधीच कळणार नाही. संभवतः 'विफल प्रेमा' नंतर जगातल्या त्या एकाच व्यक्तिविषयीचे प्रेम ह्रदयात निरंतर वास करून राहते असे ती बोलली असावी.

परंतु 'जुन्या जगाच्या कोसळण्याचा आवाज' स्वतः ऐकल्यानंतर त्या कवीला काय अनुभव आला व काय वाटले ते आम्हाला माहित आहे. एका लेखात ते लिहितात, "रशियन क्रांतीचा पल्ला ... जागतिक तुफानाची आशा पल्लवित करतो, जे बर्फाच्छादित देशांना गरम हवा नि संत्र्यांच्या बागांचा ताजा दरवळ देईल."

परस्परात गुंतलेल्या 'मानवतेच्या तंतूं'ची भक्कम फांदी बनते. ही फांदी अनादि कालापासूनच्या मानवाच्या श्रेष्ठ अनुभवांपासून (श्रेष्ठ आणि अज्ञात) जीवनरस घेऊन तसेच आजच्या मानवतेच्या अंतःकरणाच्या वेदनात मिसळून अधिक लवचिक आणि अधिक जिवंत बनेल.

प्रेमाचा जीवनाच्या अत्यंत नाजूक अंगांशी नेहमीच संबंध असतो व जगाच्या नैतिक परिस्थितीवर ते अवलंबित असते. आजच्या काळाला ही गोष्ट अधिकच लागू आहे.

अर्थप्रतिष्ठित जगात जिथे कामवासनेच्या रहस्यांशी अखेरची आवरणे देखील उघडी पडली आहेत; जिथे निष्ठूर उपयुक्ततावादामुळे मनुष्याच्या आत्मिक, नैतिक बुनयादीलाच तडा गेला आहे; जिथे गिऱ्हाइकाच्या कुजक्या कामचेष्टा चाळवण्याकरता आणि पैशाकरता नारीचे वस्त्रच नव्हे, तर चामडीही हाडापासून सोलावयाची तयारी असते, तिथेही काही असले तरी, 'मानवतेची फांदी' वाढते आहे. आज पूर्वी लोकांना अज्ञात असलेले काहीतरी नवीन असे प्रेमात अवतरले आहे. हे नवे आत्मिक प्रकटन आहे; ही नवी कोमलता आहे! नवीन उदासी आहे; नवी करुणा आहे. खरे तर, प्रेम हा नास्तिकतेवर मिळवलेला विजय आहे. 'तुझ्यावर प्रेम करतो' असे म्हणणे म्हणजेच मी तू अमर आहेस असे म्हणण्यासारखे आहे.

त्याच्या बेआत्रिसाला वंदन करायला मिळणे ही दांतेला प्रचंड घटना वाटे. धन्यतेची परिसीमा वाटे. त्याच्या प्रिय मजकूर लावराचा हातमोजा पडून क्षणभर तिचा उघडा हात नजरेला पडला, तेव्हा पेत्रार्क

थरारून गेला. असाच तिच्या मुखड्यावरचा बुरखा दूर होईल तर... पण छे. केवढी पापी वाटली त्याला ती कल्पना!

स्तांदाल याला तर प्रेयसीचा हात दाबण्यातही परम सुख वाट.

खूप खूप लिहावेसे वाटते : प्रेमाच्या वेदनामय आनंदाविषयी (ज्या पिढीच्या आयुष्यात भर ज्वानी नि युद्ध आणि महाकठीण काळ एकदमच पोहोचले त्या पिढीविषयी) तसेच प्रेमाला मत्सराचे किती वावडे आहे त्याविषयीही लिहावेसे वाटते. पण एका आठवणीने मला ह्या चिंतनाला विराम देणे भाग आहे. माझ्या मनावर खोलवर परिणाम करणारी ती आठवण आहे वाद्यसंगीताची.

त्यातील अंगभूत सामर्थ्यामुळे वाद्यसंगीत वैश्विक अनुभूती देते. विश्वाला ते माणसाळविते.

शरदाच्या एका रात्री एस्तोनियातल्या एका नगरीतील त्रिकोणी टावनहॉलमधून वाद्यसंगीताचे कर्णमधुर सूर माझ्या कानावर पडले. त्या हॉलच्या प्रवेशद्वारापाशी अगदी कडाक्याच्या थंडीत मी बराच काळ अंधारातच निस्तब्ध उभा होतो.

इतक्यात एक वृद्ध गृहस्थ तेथे आला. त्याने त्या प्रचंड प्रवेशद्वाराचे भले मोठे कडे ओढले नि तसेच घट्ट ओढून धरून आतून येणारे सूर ऐकतच तो उभा राहिला. रस्ता निर्जन होता. जवळपासच्याच सागरी हॉटेलमधून आलेली मनमौजी मंडळी मात्र हंसत खिदळत होती. पण अमळशाने तेही थांबले. त्यावेळी टॉवनहॉल काळाकभिन्न गंभीर वाटत होता. एका खिडकीतून अंधुकसा पिवळा प्रकाश मात्र दिसत होता.

वाद्यकार जी संगीतिका वाजवीत होता ती वाख या संगीतकाराची होती. जलशाची पूर्व तालीम तर नसेल? की काहीतरी अर्धेअधिक विसरले गेलेले तो फिरून जागवीत होता? मधुर बालपण? एका स्त्रीची कोमल प्रतिमा? घटकाभर वाटले की, वाजत होते ते वाद्य नव्हे. तर करडे-काळे घनगंभीर जुने पत्थर परत फुलत होते.

जेव्हा उजाडले, तेव्हा दुधाकरता जाणारी एक तरुण मुलगी मला रस्त्यावर दिसली. झोपेतून उठलेला एक मुलगा एका सताड उघड्या खिडकीतून तिच्याकडे पाहून हसला. फ्लोरेंसमध्ये सुरू झालेल्या आता दंतकथा झालेल्या दांतेच्या त्या प्रेमाप्रमाणेच स्वाभाविकपणे हे प्रेम सुरू होत होते. माझी खात्री झाली, की त्या बिआत्रिस, त्या लावरा खरोखरीच्याच होत्या.

* * *

## अमर बीज

बालपणाचे ते दिवस होते. त्या काळात पुराणातील देवदेवता माझ्या मनात अनेक गुंतागुंतीच्या भावना निर्माण करीत. त्यांच्या अचाट सामर्थ्याने, बुद्धिवैभवाने नि कलानैपुण्याने मी दिपून जात असे. पण त्यांचा उद्धटपणा नि क्रौर्य मात्र मला आवडत नसे.

देवदेवतांविषयीच्या दंतकथांतील विराट प्रतिमांनी, नि वीजेवाणी चमचमणाऱ्या घटनांनी मुलांची कल्पनाशक्ती बेफाम धावू लागते. त्यांच्या ग्रहणशक्तीला आणि भावविवशतेला भलतेच आव्हान मिळते. जे मूल हेफेस्तुस वा अथेना या देवतांविषयी वाचते, ते मूल फक्त पहात नाही, तर भावनाविवश होते.

हेफेस्तुसच्या लोहारकामाच्या जागी मी स्वतः पोहोचलेलों आहे. मी तिथले अद्‌भुत चमत्कार पाहिले आहेत; तिथल्या भट्टीचा झोत माझ्या चेहऱ्यावरच्या त्वचेला लागला आहे. तिथल्या अद्‌भुत प्यालांना मी स्पर्श केला आहे. तिथल्या सोन्याचांदीची धूळ माझ्या बोटांवर चढली आहे. माझ्या बोटांवरील ती धुळ अजून गेलेली नसतानाच मी दंतकथांतून वास्तव जीवनाकडे वळलो.

अथेना देवतेने अराक्नेला दिलेली सजा माझ्या डोळ्यांसमोर घडली. अराक्नेचा गुन्हा तरी काय? तर त्या मर्त्य स्त्रीने एका देवतेशी, खुद्द झेबुसच्या कन्येशी स्पर्धा करण्याचे धाडस केले होते. अराक्नेने सुंदर तलम कापड विणले होते. खुद्द देवतेच्या वीणकामाला तुच्छ लेखून तिने स्वतःची कारागिरी पूर्णत्वाच्या पलीकडे नेली होती. अर्थात एका मर्त्य जीवनाची एका देवतेबरोबरची ही स्पर्धा होती व त्यात तिने चमत्कार करून दाखविला होता.

पण अथेना? तिच्या कल्पनेप्रमाणे अराक्नेची कला विरूप होती. तिने चितारलेल्या देवता किरकोळ होत्या म्हणून झेऊसच्या त्या उन्मत्त कन्येने अराक्नेला शिक्षा केली. तिच्या अंगावर एका अद्‌भुत मुळीचा रस शिंपडला-त्या मर्त्य युवतीची देहयष्टी सुकून गेली. ती हडकुळी बनली. तिच्या डोक्यावरचे दाट केस गळून पडले. तिचे हातपाय बारीक झाले. नि तिला आणखीन नवे हातपाय फुटले. तिचा चेहरा भेसूर झाला नि कोळ्याच्या जातीविशेषात तिचे रूपांतर घडले. हजारो वर्षे ती स्वर्ग नि पृथ्वी व्यापणाऱ्या कोळ्याच्या करड्या जाळ्यात लटकते आहे बापुडी!

कोळ्याचे ते जाळें आजही माझ्या चामडीवर चिकटल्याचा भास होतो. ह्या ओळी लिहिताना देखील मला लेखणी खाली ठेवून माझे कपाळ, बुबुळे पुसाविशी वाटतात. फार काळ लोटल्यामुळे आताशी माझी बोटें धुतली जाऊन सोन्याचांदीची धूळ आतां गेली आहे खरी, पण माझा चेहरा कोळ्याचे जाळे मात्र विसरलेला नाही.

अथेना ही ताठर देवता होती. तिला देवलोकाची प्रतिष्ठा सांभाळावयाची होती. अराक्नेला शिक्षा करून तिने आपल्या तत्त्वाशी इमान राखले होते. तिचे क्रौर्य किळसवाणे होते. मुलानाही ते समजे. मी तिला एका म्युजियममध्ये पाहिले—पत्थरात—ताठ.

डियोनिसुस ही देवता मात्र मला कधी कळली नाही. ऐहिक जीवनावर प्रेम करणाऱ्या मदिरा नि मौजेच्या ह्या देवतेने मिन्यास राजाच्या तीन तरुण मुलांना चक्क वटवाघुळ बनवले. कारण काय? तर बाकी

सर्व स्त्रिया तिला भेटण्यासाठी रानावनात पोहोचल्या. पण त्या मुली मात्र वीणकाम करीत घरीच बसून राहिल्या.

आणि मी पुनः काय पाहिले? एक रात्र. जळती कोलिते. दाट काळ्या केसाच्या तरुण राजकन्यांची लहान लहान होत जाणारी शरीरे. एक उध्वस्त गुहा आणि वटवाघुळे.

अथेनाचे क्रौर्य अमुकच एका प्रकारचे मर्यादित तरी होते. पण डियोनिसुस? तो स्वैर वृत्तीचा होता. मद्य, मौज आणि कर्मठ भक्ती यात तो दिवसरात्र बुडलेला असायाचा. आणि दुसऱ्या दिवशी पश्चातापांत पोळलेला असायचा. खूप उशीरा मला हे उमगले की, अथेना आणि डियोनिसुस स्वभावाने भिन्न असल्या तरी वस्तुतः त्याना एकच गोष्ट साधावयाची होती. ती म्हणजे 'जगाचे अमानुषीकरण' : सद्गुणी स्त्रियांचे कोळ्यात आणि वटवाघुळात रुपांतर करणे—मानवी अस्तित्व उच्च पातळीवरून खालच्या पातळीवर आणणे.

जीवनावर ढीग प्रेम करणाऱ्या अर्तिमिसने देखील आक्तेओनला काळवीट बनवले. पुराणांतरीच्या सर्वोत्कृष्ट देवताना सुद्धा विश्वाचे मानवीकरण करण्याची इच्छा कधी झाली नाही. कारण आपली सत्ता कमी होईल ही त्याना भीती होती. त्यांच्या क्रौर्याचे हे मर्म समजूनही मला अपोलो देवतेचे कौतुक वाटते. माझी ही भावना बाळपणीचीच आहे. नंतर ती पक्क नि जटिल बनली.

अपोलोने मार्सियासला आपल्या हाताने फास लावून घेण्याची शिक्षा फर्मावली आणि जिवंत असताना त्याचे मांस सोलून काढण्याची शिक्षा दिली. पण ही गोष्ट कांही मी पाहिली नाही.

कारण लहान मुले काही गोष्टींची कल्पनाच करू शकत नाहीत. एका मुलीचे वटवाघुळात रूपांतर पहाणे मला कठीण नव्हते. कारण मुलाच्या जगात मुलीही असतात नि वटवाघुळेंही असतात. पण जिवंत मनुष्याचे मांस हळूहळू सोलून काढताना पहाणे मात्र मुलांच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडचें असते. असल्या दंतकथा किंवा पुराणकथा वाचताना पाय ठेंचाळल्यानंतर होतात तशाच वेदना मुलांना होतात. पण मार्सियास ह्या वनदेवतेला गुलजार, तरुण अपोलो देवाने केलेली शिक्षा मला अराक्नेच्या किंवा मिन्यास राजाच्या कन्यांनी भोगलेल्या शिक्षेप्रमाणे कल्पनेने पहाता आली नाही. मी त्या गोष्टीवर फक्त विश्वास ठेवला.

मार्सियसला स्वतःच्या हातानी फास लावून घेण्याची शिक्षा होण्याआधी त्याचे देवदुर्लभ तंतुवाद्यसंगीत चालू असते. त्याचा माझ्या मनावर आराक्नेला शिक्षा होण्यापूर्वी तिचे जे अप्रतिम वीणकाम चालू असते त्याहून कमी प्रभाव पडला नव्हता. परंतु करुणा नि संगीतप्रेम ह्या माझ्या भावना मंदावल्या तेव्हा मी एक तिसरीच भावना अनुभवली- ती म्हणजे विस्मय.

मला ती भावना आज पस्तीस वर्षे उलटल्यानंतरही भावते आहे. पण त्यावेळची गोष्ट खूपच वेगळी होती. आज ज्याचे अगदी सोपेपणी आकलन करता येते ते त्यावेळी करता येत नसे : मार्सियास मोझार्तप्रमाणे एक महान संगीतकार होता आणि मत्सरग्रस्त अपोलो देवाने त्याचा जीव घेतला होता. पुढे कित्येक हजार वर्षांनंतर पुष्किनच्या 'मोझार्त आणि सालिएरी' ह्या शोकांतिकेमध्ये सालिएरीने जे स्वतःचे बेगुमानपणे समर्थन केले, अगदी तसेच स्वतःच्या कृत्याचे उद्दाम समर्थन अपोलोनेही त्यावेळी केले होते. तो म्हणतो. होय. ज्या कलाकाराला प्रतिमेचे लेणे विनासाधना लाभते, त्याच्या हातून कला भ्रष्ट होऊ नये

म्हणून मी त्याला मारले. सालिएरीने सुद्धा आळशी कलाकाराला वीष घातले. अपोलो प्रमाणेच त्याने आपण आराधना करीत असलेल्या संगीतकलेचा स्वतःला त्राता मानले असणे शक्य आहे. परंतु अपोलोमध्ये नसलेला एक स्वभावगुण त्याच्यामध्ये होता. त्याच्या ठायी संशयालाही जागा होती."पण मी प्रतिभावानच नसलो तर?" ह्या संशयामुळे सालिएरीचे व्यक्तिमत्व शोकदग्ध बनते नि आपल्याला त्याच्याविषयी सहानुभूती वाटू लागते.

पण बालपणापासून मी फार दूर चाललो आहे. त्या वयात मला हे सारे काही समजत नव्हते. आणि मला त्यावेळी ज्याविषयी खूप वाटायाचे त्याविषयी आज काही वाटेनासे झाले आहे.

मी गर्विष्ट अथेनाच्या आणि स्वैरवृत्तीच्या डियोनिसुसच्या क्रौर्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला—कोणाचे समर्थन करावे म्हणू नव्हे. छे. तसे मुळीच नव्हे—आणि त्या प्रयत्नात मला यशही आले. पण अपोलोच्या क्रौर्याचे कारण मात्र मला कळले नाही. कलाकार मार्सियासबद्दल अपोलोला सहानुभूती वाटायाला हवी होती. नव्हे आपुलकी वाटायाला हवी होती. कारण शेवटी अपोलो कलांचा गुणग्राहक होता. पोशिंदा होता, स्वतः तो एक निपुण संगीतकलाकार होता. तो जेव्हा किथार (एक वाद्य) वाजवी तेव्हा खुद्द युद्धदेव आरेस युद्ध विसरून जाई आणि पृथ्वीवर शांती नि स्वास्थ्य नांदे. दैवी संगीताच्या प्रभावांतून कोण सुटला आहे? खंबीर मनाच्या दर्यासारंगाना देखील संगीत नेईल तेथे जावे लागे.

अपोलोच्या अनेक बिरूदांपैकी 'मुरलीधर' हे एक होते. ह्या साऱ्या कल्पनारम्यतेच्या नि प्राचीनाच्या ओढीने माझे बालमन भारावून नि थरारूनही जाई. पण अपोलोचे मला जे विशेष आकर्षण आहे त्याचे कारण तो देवमासा बनायचा हेही होते. किशोरावस्थेत मला ही गोष्ट नक्की पटली होती, की देवमासा ज्याअर्थी चांगला आहे त्याअर्थी अपोलोही चांगला आहे. पृथ्वीवर तो 'मुरलीधर' तर समुद्रात तो देवमासा! याहून अधिक चित्तथरारक नि मनोरंजक दुसरे काय असू शकेल?

अशा रीतीने माझे हृदय मोहरून गेलेले असताना मार्सियासची गोष्ट मला कळली. ह्या क्रूर छळाचे चित्र मी म्युजियम मध्ये पाहिले. मस्त दारू प्यालेला क्रूरकर्मा एका दुर्दैवी माणसाची कातडी सोलतो. तसे करीत असताना त्याचे हात दुर्दैवी माणसाच्या रक्तमांसात बरबटतात. त्या दोघांपैकी एकाच्याही चेहऱ्यावर मानवी भाव कसे ते दिसतच नाहीत. क्रूरकर्म्याच्या चेहऱ्यावर द्वेषामुळें ते दिसत नाहीत, तर त्याचा बळी झालेल्याच्या चेहऱ्यावर छळामुळे दिसत नाहीत. माझें पोळलेले हृदय चित्रांतला प्रकार जाणून घेण्यासाठी तळमळलें. शिक्षिका मला म्हणाली, "अपोलो मार्सियासला शिक्षा करतो आहे" अर्थात याने मला कशाचाच बोध झाला नाही व तिचे खरेही वाटले नाही. कारण लहान मुलांच्यासाठी म्हणून छापलेल्या प्राचीन कथांच्या संग्रहात अशी गोष्टच नव्हती. तसेच कुठे तो सकल कलांचा भोक्ता महान सतारवादक अपोलो देव आणि कुठे हा क्रूर दंडदाता अपोलो? त्यांच्यात काही साम्य? कुठे तो देवमासा आणि कुठे हा राक्षस?

नंतर मी अपोलो-मार्सियासची कथा वाचली. मार्सियास हा वनदेव होता. त्याने जंगलात सापडलेल्या बांबूच्या एका तुकड्याची मुरली बनवली आणि स्वतःच्या स्वतःच तो ती वाजवायला शिकला. त्याच्या त्या मधुर मनोहर मुरली वादनाने माळरानें प्रफुल्लित झाली. जनावरे, मनुष्ये मोहित झाली. एकंदर वातावरणच प्रफुल्लित झाले, नि हां हां म्हणता त्याच्या गुणांचा परमळ ठायी ठायी दरवळला. मग त्याने खुद्द अपोलोलाच आव्हान दिले. पण अपोलोने मार्सियासच्या पातळीवर येऊन ती स्पर्धा जिंकायला हवी होती. पण तसे न करता भारी मूल्यवान कपडे घालून, हाती सोन्याची सतार घेऊन तो जुगलबंदीला आला.

अनुक्रमणिका

त्यामुळे हा सामना कलाकारांमधला न होता सुवर्ण नि बांबूच्या तुकड्यांमधला सामना झाला नि त्यात सुवर्णाची सरशी झाली. परिणामी अपोलोने मार्सियासला ठार मारण्याची शिक्षा दिली.

मी जेव्हा मोठा झालो, तेव्हा मला ती कथा नीट कळली : अपोलोने मार्सियसचा जीव घेतला, कारण त्याच्या बांबूच्या साध्या तुकड्यात जगाला मोहित करण्याची शक्ती त्याने अनुभवली. म्हणजे त्याला त्या मर्त्य कलाकारांत खरा देव दिसला.

आजही अपोलोच्या गोष्टीने मी चक्रावून जातो. तो इतका क्रूर असूनही त्याची कलात्मक प्रतिभा कशी आटली नाही? त्या कथेवर विश्वास ठेवायचा तर मार्सियासच्या वधानंतर अपोलोचे कलानैपुण्य उलट चढलेच होते. पान याच्याबरोबर झालेल्या त्याच्या जुगलबंदींत त्याची सृजनशीलता अभूतपूर्व वाढलेली दिसली.

नंतर माझ्या हे लक्षात आले की प्राचीनांच्या जाणिवेत सृजनशीलता हा गुण नैतिकतेवर अधिष्ठित असलेला गुण मानलेला नाही. अर्थात प्राचीन लोकांच्या पुराणकथांत हा प्रश्न उपस्थित करण्याची अपेक्षा करणे मूर्खपणाचे ठरेल. हा महत्त्वाचा प्रश्न पुढें उपस्थित झाला. ह्या प्रश्नाने पुष्किनला बेचैन केले. आणि आज आम्हालाही तो बेचैन करतो आहे.

"तुम्हाला शेकडो, हजारो लोकांच्या आत्मिक जीवनाचे विशिष्ट स्वरूप व्यक्त करणारे सूत्र प्रायः 'वैश्विक नियम' वाटतो, पण त्या सूत्राच्या अचूकतेविषयी मला मात्र शंका आहे. 'विशाल कल्पकता हे विशाल हृदयाचे द्योतक आहे' ह्या तुमच्या सूत्राविषयी मी बोलतो आहे. त्या सूत्रावरील तुमच्या निष्ठेचा मला हेवा वाटतो."

"वरील समीकरणाचा मोह पडावा असेच ते आहे हे खरे आहे. परंतु तुमच्या युक्तिवादात तर्काचा गणिती काटेकोरपणा नाही. मी गणितज्ञ नव्हे. मी बालरोग विषयातील शल्यविशारद आहे. माफ करा. वैज्ञानिक पद्धतीने विचार करण्याची संवय असलेल्या माझ्या मनाला तुमचे ते समीकरण गचाळ वाटते."

'जादूटोणा करणारे दुष्ट चेटके अमर आहेत?' ह्या तुमच्या पुस्तकात तुम्ही अँडरसनविषयी उल्लेख केला आहे. अँडरसन हे खरोखर विशाल अंतःकरणाचे पुरुष होते नि कल्पकतेचे ते धनी होते. पण अशा प्रकारच्या काही वैयक्तिक उदाहरणांवरून मानवी जीवनाविषयी सार्वत्रिक नियम किंवा गुरुकिल्ली बनवणे कितपत समर्थनीय आहे? किंबहुना कल्पनाशक्ती श्रेष्ठ नि उज्ज्वल, पण हृदय संकुचित नि क्षुल्लक असे नाही होऊ शकणार? तसेच अंतःकरण थोर, पण कल्पनादारिद्र्य अठरा विश्वे असे पण होऊ शकेल. तुम्हाला वाईट वाटेल याची मला जाणीव आहे. पण माझा त्याला नाइलाज आहे. तुम्ही लिहिता की, 'विशाल, उज्ज्वल प्रतिभेची व्यक्ती दुष्ट असलेली मी पाहिलेली नाही.' पण मी तसले लोक पाहिले आहेत ना. तुम्ही लिहिता की 'उलट माझ्या अवलोकनाप्रमाणे सज्जन लोकांची कल्पनाशक्ती अटळपणे विशाल नि उज्ज्वल असते, जी उतारवयात देखील मंदावत नाही'. पण माझ्या अवलोकनाप्रमाणे कधी कधीच नव्हे तर अनेकवेळा तुम्ही म्हणता ते खरे नसते.

"तथापि आम्हा दोघांनाही हे ठाऊक आहे की, 'मी पाहिले आहे' 'मी पाहिले नाही' अशा पातळीवरील चर्चा लहान मुलांनाच शोभणारी आहे. म्हणून त्यापेक्षा मानवतेच्या आजवरच्या अनुभवाकडे

अनुक्रमणिका

वळणे अधिक इष्ट ठरेल. मानवी जीवनाचा हजारो वर्षांचा इतिहास आपल्याला हे सांगेल की, दुष्टतेपाशी कधी कधी थक्क करून सोडणारी तशीच मोठी भुरळ पाडणारीही कल्पकता असू शकते."

"दुष्ट कल्पकतेची देखील अतिशय कल्पनारम्य तऱ्हेने वाहवा केली गेली आहे. लागण व्हावी अशी त्यांतली लालूच आहे. मानवजातीत सुखाच्या वासनाकामना त्याने उद्दीपित केल्या आहेत. ज्वाला नि मदिरेप्रमाणे ती लोकांना पेटवत सुटते. लोकांना एकदम अचंबित, विस्मित करून टाकते. म्हणजे त्यामध्ये नक्कीच ताकद आहे. पुराणकालांतल्या देवदेवतादिकांना हेफेस्तुससारखा सज्जन लोहार प्रिय न होता भडक माथेफिरू शंभुभैरव (डियोनिसुस) प्रिय झाला तो उगाच नव्हे. दुष्टतेतील इरसाल आकर्षणाचा तो नमुना आहे."

"पाशवी अवस्थेपासून ते धर्मवेड नाकारणाऱ्या लोकांवर केल्या गेलेल्या अनन्वित छळापर्यंत दुष्टतेच्या भगतांकडून आसुरी आनंदाने घडलेला विध्वंस, रोमन सर्कसच्या मैदानातले ते क्रौर्य, रानटी टोळ्यांचे क्रौर्य आणि त्या पलीकडे?"

"आणि त्या पलीकडे? पुनरुज्जीवनवादी चळवळीतील सिझर बोर्जियस या दैत्याला घटकाभर सोडून देऊया. पण बेनवेनुतु सिलिनीच्या सृजनशीलतेचे काय? सिलिनीची प्रतिभा कलेच्या क्षेत्रात जशी अप्रतिम तशीच ती भयंकर क्रूरकर्मांत देखील अप्रतिम!"

'खलत्वाचे मोहपाश' हा महत्त्वाचा विषयच दोस्तोवस्कीच्या अंतर्यामी सलत होता. सौंदर्याविषयी तो काय म्हणाला आठवते? 'तेथे सैतान देवांशीच युद्ध मांडतो, नि युद्धाचे कुरुक्षेत्र असते माणसाचे हृदय!' म्हणजे सौंदर्यही पापी दुष्ट असू शकते. मग हे सारे 'ठार दुबळ्या कल्पकतेला' कसे जमायचे?

"आ! तुमचे ते सर्वतोगामी समीकरण कमीत कमी भविष्यकाळात जरी लागू पडण्यासारखे असते तरी बहार झाली असती. तसे घडते तर सद्गुणांपाशी संपन्न कल्पकतेची मिरासदारी आली असती आणि खलत्वाच्या अधमपणावर सतत विजय मिळवता आले असते. ज्या बालकांवर मी शस्त्रक्रिया करतो त्याना पूर्वस्थितीवर येण्यासाठी भोगावे लागणारे दुःख अखेरचे ठरावे असेच मला वाटते : पण स्पष्ट सांगावयाचे तर संपन्न कल्पकता निर्मळ अंतःकरणावर अधिष्ठित असते, हे सूत्र कधीकाळी वैज्ञानिक सूत्राच्या पातळीवर येईल अशी खात्री देता येत नाही."

"तुमच्या लिखाणाशी प्रत्यक्ष रीतीने संबंधित नसलेल्या एका विचाराबद्दल मी तुमच्याशी बोलू इच्छितो. फार काळापासून असे समजले जाते, की शोकनाट्य हा साहित्यप्रकार माणसांना उच्च पातळीवर नेऊन त्यांची आत्मशुद्धी करतो. पण अशीही शोकनाट्ये आहेतच व तीही थोर कलाकारांनी लिहिली आहेत, जी मनुष्यांना ना उच्च पातळीवर नेऊ शकत, ना त्यांची आत्मशुद्धी करत. या नाट्यांपाशी अव्वल दर्जाची गुणवत्ता असूनही त्याना हे साधत नाही व त्याचे कारण म्हणजे त्यांत मुलांची हिंसा असते हे होय. मी ह्या संदर्भात 'मेदेया या शोकनाट्याचे उदाहरण देऊ इच्छितो. मुलांची हिंसा श्रेष्ठ शोकनाट्यात सुद्धा आत्मशुद्धी करू शकत नाही. आततायी घातचक्रांनी नि अनर्थांनी भरलेल्या आपल्या शतकात शोकनाट्य ह्या साहित्यप्रकाराने मौलिक अशी काहीच भर घातलेली नाही या वस्तुस्थितीचेही हेच कारण असावे. (मला वाटते तुम्ही ही कल्पना 'आण्विक रानटीपणा' ह्या शब्दांत व्यक्त केलेली आहे) फासिस्टांच्या आवसविटझ

छावणीत मुलांचे हालहाल केले, हिरोशिमात त्यांचा नायनाट केला. विएतनामात मुलांना लुळीपांगळी केली. अशामुळे मनुष्यांना उच्च वातावरणात नेऊन आत्मशुद्धी करणारे शोकनाट्य आज कसे शक्य आहे?

"मी तुम्हाला हे लिहिले याचे कारण म्हणजे सदप्रवृत्तीसाठीच असद्प्रवृत्ती नीट व स्पष्ट समजून घेणे आवश्यक असते. तुम्ही तुमच्या पुस्तकाच्या तयारीत असताना इटालियन पंडित बोनेली यांच्या प्रयोगाची माहिती तुम्हाला कोणी देऊ शकले नाही हे फार वाईट झाले. बोनेलीने एका विषारी सापाचे डोके तब्बल १६ वर्षे उघड्या हवेत व उन्हात ठेवून वाळविले. नंतर ३० वर्षांहून अधिक काळ ते स्पिरिट घातलेल्या बाटलीत ठेवून दिले. मग त्यातील दांत काढून त्या दांताने त्याने एका प्राण्याला टोचले. एका तासानंतर तो प्राणी मेला हा विषारी दांत आपल्याला जरून काही सांगतो असे मला वाटते."

"होय. ॲंदण्डरसनचे एक जग जरूर आहे आणि मलाही ते जग प्रिय आहे. पण वास्तव जगही एक आहे. ज्या जगात आम्ही दोघेही रहातो आहोत आणि ज्यात आवसविटझची अघोरी छावणीही आहे, हिरोशिमाचा सर्वनाशही आहे आणि 'सोंग माय' चा घातही आहे. ही जगे वेगळी आहेत हे जर का आपण विसरलो तर वास्तवांतल्या विषारी 'दांता' पासून संरक्षण करण्याचे आपल्यापाशी काही उरणार नाही. आज तरी तुम्हाला किंवा मला दुष्ट चेटुकवाले अमर आहेत याविषयी शंका घेण्याचे कारण नाही."

खलकपटालाही कल्पकतेची जोड लागते? चौथ्या शतकांत बी. सी. हेरोस्ट्राटिस याने आर्तेमिस ऑफ एफेसुसचे महामंदिर जाळून टाकले. त्याने ते महामंदिर नष्ट करावयाचे ठरवले, कारण ते कृत्य करून त्याला अमर व्हावयाचे होते. ते महामंदिर हा जगातल्या सप्त चमत्कारातील एक चमत्कार होता. जगातला एक चमत्कार नष्ट करणाराला जग कधीच विसरणार नाही असा हेरोस्ट्राटिसचा होरा होता. (अविचारी वर्तनाचेही विचारी कारण होतेच तर) त्या महामंदिराचा नाश हे त्याला वैयक्तिक अमरत्वाचे साधन वाटले. आपल्याला लोक विसरतील ही कल्पनाच हेरोस्ट्राटिसला असह्य वाटत असावी. लोकांनी आपणाला विसरू नये, आपली उपेक्षा करू नये, म्हणून एकतरी आपण नवा चमत्कार घडवला पाहिजे किंवा पूर्वीचा चमत्कार तरी नासवला पाहिजे. नवा चमत्कार घडवण्याची सृजनशक्ती त्याच्यापाशी नसल्यामुळे त्याने दुसरा मार्ग पत्करला. हेरोस्ट्राटिसचे हे कृत्य कल्पकतेचेच द्योतक आहे. ज्याने अगदी गुपचुप तयारी करून, भले अधार्मिकतेने, पण धाडसाने ते कृत्य पार पाडले, त्याच्यापाशी वास्तविक अफाट कल्पकता होती असे म्हटले पाहिजे. आणि मग? मानवी मती गुंग करून सोडणारा, सौंदर्याने खुद्द पार्थनॉनशी बरोबरी करणारा कलात्मकतेचा व नमुनेदार आकृतिबंधांचा तो 'दैवी संगम' उध्वस्त झाला. लाकडी कोळशांचा नि पाषाणांचा ढीग बनला. कोणालाही हे मान्य करावेच लागेल की हे दुष्कृत्य नक्कीच कल्पकतेचे होते. नि हेरोस्ट्राटिस ह्या माणसापाशी ती कल्पकता होती.

तथापि 'दुष्ट कल्पकता' पूर्णतया निर्मितीहीन शक्ती असते. ती कशालाच जन्म देऊ शकत नाही. आणि कधीकधी परिणामकारक पद्धतीने ती नाशक बनत असल्यामुळे धोकेबाज बनते. कल्पकता म्हणजे मनुष्याची सृजनशीलता असे जर आपण धरले, तर दुष्टतेच्या 'कल्पकताविरोधा'- बद्दल बोलणे अधिक सयुक्तिक ठरेल. दुष्टता संपूर्णपणे अविधायक आहे. आणि ही गोष्ट मानवी व्यक्तिमत्त्वाच्या एका रहस्याशी प्रत्यक्षपणे निगडित आहे. सृजनशक्ती आणि नैतिकता यांमधला संबंध हे ते रहस्य आहे. गणिती काटेतोलपणाने हा संबंध व्यक्त करता येणार नाही. तसेच त्या संबंधीचे एक सूत्रही बनवता येणार नाही. पण आमची खात्री पटली आहे की सृजन नि नीती यामध्ये खरोखरीचा संबंध अस्तित्वात आहे. तो संबंध महान कादंबऱ्यांतून नि इतिहासाच्या खंडांतूनच दिसतो असे नव्हे, तर आमच्या जीवनातही तो स्पष्ट दिसतो.

अनुक्रमणिका

आमच्यापैकी कोण बुद्धिपुरस्पर किंवा अज्ञानाने दुष्कृत्ये करण्याचा प्रसंग आल्यानंतर सृजनशीलता हरवून बसलेला नाही?

पण आपण जेव्हा कमी अधिक वादग्रस्त असे काहीतरी तपासून पहातो, तेव्हा त्यात 'मी पाहिले' 'मला माहीत आहे.' अशासारखे गबाळ युक्तिवादही येतात. मग अशा परिस्थितीत घसघशीत नि वादातील नमुने निवडणे हेच श्रेयस्कर नाही काय?

चार्त्कोव हा पीटर्सबर्गचा एक तरुण नि गरीब कलाकार ज्या घडीला छुकिन कोर्टमध्ये असलेल्या आर्ट गॅलरीकडे थांबला, त्या घडीला त्याचे नशीब पालटले. त्याने विकत घेतलेल्या तसबीरीच्या चौकटीत त्याला एक हजार रुबल्स सापडले नि त्याचे फार दिवसांचे स्वप्न साकार झाले. दौलतीमागून कीर्ती वगैरे सारे त्याने मिळविले. बड्या समाजात त्याने प्रवेश करून घेतला. नि तो एक लोकप्रिय कलाकारही झाला. पण कलेच्या क्षेत्रातील आपल्या पूर्वीच्या कठीण साधनेकडे मात्र त्याने पाठ फिरवली. वाढते वयोमान नि शहाणपणाबरोबर त्याचे वजन वाढत गेले नि दुसरी निर्णायक घडी भवितव्यात दाखल झाली. एका कलाप्रदर्शनात त्याला आपल्या तरुणपणच्या मित्राने एक हुबेहुब रंगवलेली तसबीर दिसली. त्या कलाकृतींतील कलाविष्काराने तो दिगमूढ झाला. जीवनाच्या बाह्य अवडंबराला भुलून आपण केवढ्या थोर कलासिद्धीला मुकलो ते त्या घडीला त्याला अतिशय तीव्रतेने जाणवले नि तो व्यथित अंतःकरणाने घरी परतला. त्याने ब्रश उचलला नि स्वतःचीच परीक्षा घेण्याचे ठरविले. तरुणपणच्या चित्रांतील आपल्या प्रतिभेचा स्पर्श त्याला चांगलाच ठाऊक होता. ती चित्रे त्याच्या समोरच होती. पण ती प्रतिभा आता कुठली दिसायला? अरेरे! आता त्या प्रतिभेचा मागमूसही त्याच्या कुंचल्यात शिल्लक नव्हता. त्याचे त्यावेळचे दुःख म्हणजे कलाविष्कारासंबंधीच्या कलावंताच्या जिवंत यातना होत्या. आत्मा हरवून बसलेल्या त्या कलाकाराला आता विध्वंसाची तहान लागली. व वेड लागण्यापूर्वी त्याने ती तहान भागवून घेतली. प्रतिभावंत कलाकारांचे उत्कृष्ट नमुने त्याने खरेदी केले नि गुपचुप नष्टभ्रष्ट केले.

गोगोलची ही कथा आहे. ही कथा पैशासाठी कलेशी बेइमानी करणाऱ्या कलाकाराची कथा मानली जाते. वरवर पाहिल्यास ते बरोबरही आहे. पण खरे तर चार्त्कोवने कलेशी बेइमानी नाही केली. त्याने आत्म्याशी बेइमानी केली, नि मग कला त्याला सोडून गेली. गोगोलची ही कथा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विघटनाची कथा आहे.—उगाच नाही चार्त्कोवचा शेवट अखेर बुद्धिभ्रंशात होत. **मनुष्याला आपल्या प्रतिभेखातर सुद्धा नैतिक कर्तव्याची जाणीव आवश्यक आहे.**

ह्या गोष्टीतील करुण बोध हा नव्हे की, कलाकाराने सुस्थितीच्या जीवनाची आकांक्षा धरू नये, किंवा त्याला बड्या लोकांत मिसळण्याची हाव असू नये. (कधी कधी असे जीवन जगण्याचा मोह प्रतिभेची चमक अखेरपर्यंत शिल्लक राहिलेल्या कलाकारांनाही झाला आहे.)

यातील शोचनीय वंचना ही आहे की, जेव्हा तो मनुष्य आपल्यातील कलाकाराला टाकतो, विसरतो, तेव्हा मनुष्यातला कलाकार त्या मनुष्यालाच ठार करतो.—अलंकारिक रीतीने नव्हे, तर वस्तुतः ठार करतो—विफल सृजनशक्तीने उगवलेला तो सूड असतो.

अनुक्रमणिका

नैतिक पायापासून वंचित झालेली सृजनशक्ती विध्वसक बनते, 'आसुरी' बनते. नैतिक नि सृजनात्मक तत्त्वांचा विरोधविकास गोगोलने या कथेत तंतोतंत, जागच्या जागी आणि बरोबर दाखवून दिला आहे.

जेव्हा माणूस आपल्यातील कलाकाराचा गळा घोटतो, तेव्हा कलाकार माणसाचा गळा घोटतो.

मूलभूत नैतिक तत्त्वांना हरताळ न फासणे हा विषय महान रशियन साहित्याचा गाभा बनला विशेषतः दोस्तोवस्कीच्या साहित्याचा.

'क्राइम ॲण्ड पनिशमेंट' च्या पहिल्याच पानात मानवतेचे कल्याण साधावयाचे सामर्थ्य आपल्यापाशी आहे असे रास्कोलनिकोवला वाटते. परंतु हे महान कार्य साधण्यासाठी गहाणदारीचा धंदा करणाऱ्या एका 'कःपदार्थ' व्यक्तीचा जीव घेणे त्याला आवश्यक वाटते. ती व्यक्ती जगली काय, मेली काय, सारखेच समजून तो त्या व्यक्तीचा खून करतो. भौतिकदृष्ट्या तो एका 'कःपदार्थ' व्यक्तीचाच जीव घेतो खरा, पण आत्मिकदृष्ट्या, म्हणजे सृजनात्मक दृष्टीने तो स्वतःचाच खून करतो. आणि परिणामी तो एक भंगलेले, उद्ध्वस्त व्यक्तिमत्त्व बनतो व अंती ना तो मानवतेचे कल्याण साधू शकत, ना त्याच्या प्रिय बहिणीचे, ना त्याच्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीचे!

'दुष्ट चेटके अमर आहेत?' ह्या माझ्या पुस्तकात हान्स ख्रिस्तियान ॲण्डरसन यांच्या जगाविषयीच्या आकलनाचा विचार करताना 'विशाल हृदयांतून विशाल कल्पकता जन्म पावते' असे मी लिहिले. पण त्याचा मथितार्थ आपण ज्याला साध्या अर्थाने चांगुलपणा म्हणतो तो चांगुलपणा नसलेली व्यक्ती कला, विज्ञान आदी विषयांत मौलिक असे काहीच निर्माण करू शकत नाही असा नव्हे.

केवळ अनुभवात्मक ज्ञानाचाच आधार घेऊन विचार करावयाचा झाल्यास 'विशाल कल्पकता विशाल अंतःकरण सूचित करते' ह्या सूत्राचे खंडन करणे मुळीच कठीण नाही. असे म्हणतात की, बुनिन हा माणूस माणूस म्हणून चांगला नव्हता. पण दुसऱ्या बाजूला त्याच्या बुद्धिमत्तेचा 'हलका निःस्वास' देखील हेवा करावा असा होता.

पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर मला अनेक खंडन मंडनात्मक पत्रे आली. वादप्रतिवाद करण्याच्या भरात पत्रलेखकांनी बायरनचे आणि पुष्किनचेही उदाहरण त्यात गोवले नि त्यांनी केलेले पावित्र्य विडंबन नि त्यांच्या 'वेडां' चा पाढाही वाचला गेला. या संबंधात माझे विरोधक स्वाभाविकपणेच श्रेष्ठ नाटककार कीन ("प्रतिभा नि स्वैरता") तसेच फ्रांसुआ विय्यों (जो सद्‌गुणांपासून फार दूर गेलेला होता) आदी प्रतिभावंताना विसरते तरच आश्चर्य!

वरवर दिसते त्यावर आधारून केलेल्या वरील प्रकारच्या खंडनात, मानवाला समजून घेण्याबाबत, त्याचें काळाशी असलेले नाते समजून घेण्याबाबत, तसेच त्याचें भावनिक नि आत्मिक जीवन समजून घेण्याबाबत 'सखोलतेचा अभाव' जाणवल्याविना राहात नाही.

प्रतिभावंतांच्या हातून घडलेले 'पावित्र्य विडंबन' नि त्यांची तथाकथित 'वेडें' प्रतिभावंत कलाकार आपल्याला परकी असलेले सामाजिक वातावरण मानावयाला तयार नाही, आणि त्याविरुद्ध प्रतिकारार्थ तो

उभा राहतो, म्हणून घडलेली असतात. कधी कधी कलाकार उर्मटपणाने (लेर्मोन्तोव) तसे करतो, तर कधी कधी तो औदासिन्याने (ब्लोक) तसे करतो.

ब्लोकने जेव्हा कवीच्या औदासिन्याविषयी लिहिले तेव्हा त्याने फक्त स्वतःची आशा निराशा व्यक्त केली होती असे नव्हे. फइदियास, मोझार्त आणि पुष्किन ही उजेडाची संतती होती. तसेच फ्रांसुआ व्हिय्यों, कीन, बायरन आणि येसेनिन ही मंडळी देखील उजेडाची, ज्ञानाचीच संतती हें समजण्यासाठी आपण प्रथम कलाकाराची 'प्रच्छन्न प्रेरणा' शोधून काढली पाहिजे.

आणि आहे हे सगळे असे आहे, हे एकदा ध्यानात आले, की कोत्या अनुभवांवर आधारलेली खंडनें आपोआपच खंडित होतात.

वास्तविक, सखोल आकलनाची आज आवश्यकता आहे ती वैयक्तिक मानव समजण्याची नव्हे, मग तो बायरन असो, की मोझार्त असो, तर **माणसाचे जग** समजण्याची.

ह्या जगाच्या रचनेविषयीची महत्त्वाची नि भरीव माहिती मिळते ती विज्ञानाकडून नव्हे, तर साहित्याकडून. जरी भविष्यकाळात विज्ञान नि साहित्य यांचे संश्लेषणच शेवटी माणसाच्या आत्मिक जगात सर्वांत आधिक दडलेले काय आहे, किंवा 'अखेरची गुपितें' काय आहेत त्यावर प्रकाश टाकणार आहे.

मनुष्याच्या भावनिक नि आत्मिक जीवनामध्ये फरक आहे. तत्त्ववेत्ते नि साहित्यकार किंवा कलाकार हा फरक चांगला जाणतात. आत्मिक जीवन हे व्यक्तिमत्त्वाचे गुप्तकेंद्र असते. ते त्याचे मूळबीज असते, ज्यांतून नैतिक आत्म-जाणीवेचा कोंब फुटतो. वाढतो. तर भावनिक जीवन हे विभिन्न भावनांनी परिप्लुत असते. ते प्रक्षुब्ध होऊ शकते, यातनादायी होऊ शकते. परंतु केंद्रात जर प्राण असेल, बीज जर 'कार्यरत' असेल, तर व्यक्तिमत्त्व एकात्म नि अभंग रहाते. 'दी ब्रदर्स कारामाझोव' ह्या दोस्तोवस्कीच्या कादंबरीतील मित्या कारामाझोव आणि इवान कारामाझोव यांमधील फरक हा आहे, की मित्याचे भावजीवन 'विद्रोही' आणि यातनामय असले, तरी त्याचे आत्मकेंद्र सजीव असते. तर इव्हानचे आत्मकेंद्र गंभीरपणे जायबंदी झालेले असते आणि 'दि पझेसड' या त्याच्या दुसऱ्या कादंबरीतील प्योत्र वेर्कोवेन्स्कीचे आत्मकेंद्र मरतें. काही कलाकारांचे (व्हिय्यों किंवा मायकेल आंजेलो घ्या.) वैयक्तिक जीवन फार मोठे निर्मळ होते अशातला भाग नसूनही ते सृजनशीलतेच्या देणगीपासून का पारखे झाले नाहीत त्यावर प्रकाश पडावा म्हणून वरील प्रकारचा फरक विशद करून सांगावा लागला.

मानवी आत्मा मला आर्टेशियन विहिरीप्रमाणे वाटतो. ज्याच्या तळाला अमोलिक असे काहीतरी असते. एका वेगळ्या तऱ्हेने ही कल्पना करता येते : विमानाच्या खिडकीतून घनदाट मेघांच्या फटींत हिरवेगार वृक्ष, उद्यान, उपवनें दिसावी तसे मानवी आत्म्याचे आहे.

हे दृश्य फक्त कल्पनेतच पहाता येते असे नव्हे, परंतु ते वास्तवातही पहाता येणे शक्य असते. दि. ६-८-१९४५ रोजी हिरोशिमावरील मेघ एका ठिकाणी फुटले आणि अमेरिकन वैमानिक क्लॉड एथरलीने झाडें, बागा, उद्याने, उपवने पाहिली ..... आणि त्याने हुकूम दिला...

तत्क्षणी त्या शहरावर वीजा कडाडल्या. घनदाट काळोखाचा सागर सर्वत्र पसरला आणि फिरून सगळें जेव्हा स्तब्ध झाले, स्मशानवत् झाले, तेव्हा झाडें नव्हती, उद्याने नव्हती, उपवनेही नव्हती नि मुलेंही नव्हती. अनेक वर्षांनंतर देखील हिरोशिमाच्या स्त्रियांना होणारी मुले कोळ्यासारखी, वटवाघुळांसारखी असत. त्या काळातील आण्विक रानटीपणाने आपला विजय साजरा केला नि माजी मेजर एथरली मानसिक रोग्यांच्या लष्करी इस्पितळात दाखल झाला.

क्लॉड एथरलीची कहाणी ही विसाव्या शतकाची पुराणकथा आहे.

आपण लष्करी यंत्रणेतील एक सजीव खिळा. तथापि आपल्या हातून घडलेले दुष्कृत्य केवढे भयानक, त्यानें केवढा भयंकर अनर्थ जगावर कोसळला त्याच्या तीव्र जाणीवेच्या मर्माघाती वेदनांनी मरेपर्यंत तळमळणाऱ्या इथरलीने त्याला हिरोशिमाला पाठविण्यास जबाबदार असणाऱ्यांचा कठोर धिक्कार केला. प्राचीन पुराणकथेतील तरुण रूपवती स्त्री स्वतःला बलात्कारापासून वाचविण्यासाठी देवांची प्रार्थना करते, ‘देवा, माझें स्वरूप नष्ट कर रे!’ तर इथरली प्रार्थना करतो, ‘देवा माझें स्वरूप मला दे. मी मानव म्हणून जन्माला आलो. मला मानव बनव.’

यातनामय हिरोशिमात सर्वांआधी पोहोचलेल्या जपानी जनरलने जळलेल्या स्त्रीचा चेहरा पाहिला. बाजूलाच पडलेला तिचा जळलेला देह पाहिला आणि जवळच अजून जिवंत असलेले अजन्मित मूल पण पाहिले. रात्रीच्या वेळी पडणारी ही कुस्वप्ने बिछान्यावर पडलेल्या इथरलीला पडत राहिली. “बाळानो, बाळानो...”

मी इथरलीच्या दोन तसबिरी पाहिल्या आहेत. एकात तो उमदा, तडफदार मेजर दिसतो, ज्याला पाहून युद्धविषयक अमेरिकन चित्रपटातील विलक्षण अतिमानवाची आठवण येते. त्याचा चेहरा फिल्मी हिरोला उथळच वाटत असला तरी. दुसऱ्या तसबिरीत त्याचा तोंडावळा भलताच रुंदावलेला, मोठा करून दाखविणाऱ्या भिंगातून पाहिल्यासारखा वाटतो. हे असे होण्याच कारण म्हणजे, संभवतः किंचित सुरकुत्या पडलेल्या त्याच्या चेहऱ्यावर आता पूर्वीच्या निष्काळजी हास्याचा मागमूसही उरलेला नाही हे असेल.

त्याच्या चेहऱ्यावरील निश्चलतेचा भाव पूर्ण आशाभंग करणारा आहे. तो मेलाही आहे आणि जिवंतही आहे. तो मुखवट्यासारखा आहे.

वास्तविक दुसरा भयंकर चेहरा हा मुखवटा नव्हे, तर अविचारीपणाने हांसणारा पहिला चेहरा हा मुखवटा आहे. तो मुखवटा आहे, कारण तो त्या विशिष्ट माणसाचें जग व्यक्त करीत नसून, युद्ध मावळू लागताच ज्याची हानी कमीत कमी झाली होती व आत्मविश्वास अधिकाधिक वाढला होता त्या अमेरिकन लष्कराची वृत्ती व्यक्त करतो.

इथरलेने हा मुखवटा तोडण्याचे धाडस केले. म्हणून अमेरिकन लष्कराने त्याला वेडा ठरवून त्याची मानसिक रुग्णालयात रवानगी केली. वास्तविक तो वेडा झालेला नव्हता. मनोदेवतेची आर्त वेदना म्हणजे जर वेड लागणे असेल, तर लक्षावधी लोकांचा बळी घेऊन देखील त्यांच्या स्मृतीने अस्वस्थ न होणाऱ्या आयकमनला इतिहासातील सर्वांत अधिकतम निकोप बुद्धीची व्यक्ती म्हणून मानावे लागेल. इथरलेची आत्मजाणीव अतिशय आसुरी यातनांतून जन्मली. जशी हिरोशिमाच्या नरकतुल्य भूमीवर त्या

स्त्रीच्या छिन्नविछिन्न देहाजवळ ते मूल जन्मले तशी. ह्या घटनेमुळे आपल्याला असा विचार पडतो की, व्यक्तीची आत्मजागृती नंतर न होता आधी घडली पाहिजे. शोकनाट्याच्या दुसऱ्या अंकातच घडली पाहिजे. पांचव्या अंकात नव्हे, जेव्हा अनर्थ थांबविण्याच्या दृष्टीने त्या जागृतीचा काहीच उपयोग नसतो.

रुग्णालयात इथरलेने प्लेटोचे ‘संवाद’ परत परत वाचले. दुष्टतेचे कारण अज्ञान असते, ही सॉक्रेटिसची कल्पना त्याला अमूर्त कल्पना वाटली नाही. तर तो त्याला अस्सल शोध वाटला. कारण ते त्याचे वैयक्तिक सत्य होते. त्याने स्वतः शोधून काढलेले ते सत्य होते.

होय. तो अज्ञानाचाच बळी होता. त्या अघोरी शस्त्राविषयी जसा तो अज्ञानात होता (त्याला अज्ञानात ठेवण्यात आले होते. ते ‘अजब शस्त्र’ आहे एवढेंच त्याला सांगण्यात आले होते) तसाच तो स्वतःच्या आत्मकेंद्राविषयीही अज्ञानात होता; ज्या केंद्रावर त्याच्या हातून घडलेल्या अनन्वित दुष्कृत्याच्या जाणीवेने जबर आघात झाला होता.

‘गंभीर वेडा’ पर्यंत पोहोचलेल्या मानसिक रोग्यांसाठीच्या त्या सुनसान ‘वॉर्डा’तील त्या रोग्याने सॉक्रटिसबरोबर काय काय चर्चा केली असेल बरे? सॉक्रटिसला त्याने असे सांगितले असेल काय, की अंतःकरण हा तत्त्ववेत्त्यांचा केवळ एक शोध नसून ते अग्नी, आप, तेज, आदी ‘विश्वाच्या मूलतत्त्वां’हून मुळीच कमी वास्तव सत्य नव्हे? की कदाचित त्याने अमरत्वाविषयी चर्चा छेडली असेल? जर अडीच हजार वर्षांनंतर जनरलांनी वेड्याच्या इस्पितळात डांबलेल्या, ॲटमबॉम्बचा द्वेष करणाऱ्या व आपल्या हातून घडलेल्या पापांपासून मुक्ती मिळवण्याचे स्वप्न पहाणाऱ्या क्लॉड इथरलेला सॉक्रटिसशी संगत करावीशी वाटली, तर त्याचा अर्थ चिरंजीवित्व हा सुद्धा केवळ शोध नसून ते एक वास्तव सत्य आहे असा नाही का होत? ज्या सॉक्रटिसने विषाचा प्याला तोंडाला लावण्याआधी आपल्यावर निःस्सिम प्रेम करणाऱ्यांशी प्रखर वादविवाद करून चिरंजिवित्वाची गोष्ट त्याना पटवून दिली त्याने त्याना खोटे आमिष दाखवून नक्कीच फसविलेले नसणार.

आत्महीन पाश्चिमात्य संस्कृतीच्या सध्याच्या अवस्थेतून ‘इथरली घटना’ जन्म पावली आहे, जी समग्र मानवतेच्या दृष्टीने अपरंपार नैतिक महत्त्वाची आहे. कारण काहीतरी मूलभूत असे ती व्यक्त करते—संक्रमण कालातील मानवजातीच्या नैतिक जाणिवेची घडण ती व्यक्त करते. ह्या घडणीत जसा सॉक्रेटिस आहे, तशीच आणखी हजारो वर्षांनी जन्मणारी ती जन्मरुग्ण मुलगीही आहे, जिच्या रक्तात तिच्या पूर्वजावर घडलेल्या अंधःकारी वीजेच्या भयंकर आघातामुळे निर्माण झालेले जननगुण (जीन्स) आहेत.

ऑस्ट्रियाचा तत्त्ववेत्ता ग्युथेर ॲरण्डरसनने इथरलीविषयी म्हटले आहे, ‘यंत्रयुगात अंतःप्रज्ञा जिवंत ठेवण्याचा त्याचा प्रयत्न आहे.’ ‘इथरली घटने’चे हे महत्त्व आहे की, ‘यंत्रयुगातील त्याच्या दुःस्वप्नांनी मानवाची नैतिकता आणि त्याची निर्मितीशक्ती यांमधल्या संबंधांविषयीचा विशाल प्रश्न जगासमोर ठेवला आहे. हीच गोष्ट मानवतेच्या नीती आणि निर्मितीविषयीची पण आहे. हिरोशिमा आणि नागासाकी जमीनदोस्त करणाऱ्या आण्विक तुफांनानी दुष्ट कल्पकतेची शक्ती दाखवली आहे;’ नैतिक अंकुश नसलेली निर्मिती-शक्ती अतोनात विनाश करू शकते हे दाखवले आहे.

निर्मिती व नैतिकता यांमधील संबंधाला जगाच्या किंवा प्रत्येक व्यक्तीच्या भवितव्यात आजच्याएवढे यापूर्वी कधीही महत्त्व प्राप्त झालेलें नव्हते. गोगोलच्या कथेतील चार्त्कोवने एकांतात उत्तमोत्तम कलाकृती

नष्ट केल्या. पण आजचा चार्त्कोव अख्खा म्युजियमच जमीनदोस्त करू शकतो. सगळे शहर नष्ट करू शकतो. पुरा देश नष्ट करू शकतो खंडच्या खंड नष्ट करू शकतो ...

या सगळ्याचा विचार करीत असताना मी 'विशाल कल्पकता विशाल अंतःकरणाचे द्योतक आहे' असे लिहिले. हे सूत्र कदाचित गांवढळ भोळेपणाचे असेलही, पण ते एका बालरोग तज्ञापुरतेच नसून सर्वसाधारण लोकांच्या सदसद्‌विवेकविषयक चिंतनाला प्रेरणा देण्यासाठी आहे.

"तुम्हाला वाटते आहे की, तुम्ही मानवाबाबतच्या उपयुक्ततावादी धारणेविरुद्ध संघर्ष करता आहात. पण 'विशाल कल्पकता ही विशाल अंतःकरणाची द्योतक' हे तुमचे मत हेच मुळी उपयुक्ततावादी आहे. कम्युनिझमच्या पद्धतीत मानवाच्या शक्तीचा विकास हे ध्येय झाले पाहिजे आणि होणार ह्या मार्क्सच्या कल्पनेचा आज सतत पुनरुच्चार होत असतो. तुम्ही देखील त्याविषयी लिहिता आणि कोठल्याही परिस्थितीत 'न मानुषात् श्रेष्ठतरंहि किंचित' हे त्याला जोडायला विसरत नाहीत.

मला वाटते ही कान्टची कल्पना असावी. कोणाचीही असो. ती वादातीत आहे हे नक्की. पण मुख्य म्हणजे विशाल कल्पकता ही विशाल अंतःकरणाची द्योतक आहे ही तुमची कल्पना वरील दोन्ही मुख्य कल्पनांशी जुळणारी नाही. आता मला सांगा : नैतिक तत्त्वांचा विकास हेच मानवाचे अंतिम ध्येय का असू नये हो? चांगले किंवा चांगुलपणा हेच मनुष्याचे सर्वेसर्वा ध्येय का ठरू नये? पण तुमच्या मताप्रमाणे माणसाने शहरे उभारण्यासाठी, नवे नवे शोध लावण्यासाठी, चांगले असले पाहिजे. त्यासाठी त्याने योग्य तऱ्हेने विचार केला पाहिजे. योग्य कल्पना केल्या पाहिजेत. म्हणजे माणसाने चांगले असले पाहिजे याचे कारण तो चांगला नसला तर त्याचे सुप्त, सृजनसामर्थ्य वाया जाईल. त्याच्या हातून भरीव निर्मिती होणार नाही वगैरे.

परंतु तोल्स्तोयच्या मारीया बोलकोन्स्कायाने ना काही लिहिलेले, ना काही शोध केलेले. ती चांगली होती, कारण ती वेगळी काही असूच शकत नव्हती म्हणून. तिला दया यायची नि ती मदत करावयाची. तिचे अंतःकरण विशाल असूनही विशाल कल्पकता काही तिच्यापाशी नव्हती. तोल्स्तोयने ती आंद्रेय बोल्कोन्स्की या गृहस्थाला दिली आहे. जो तिच्याएवढा चांगला नाही. तुमच्या मताप्रमाणे मारीया बोल्कोन्स्काया ही न-सृजनशक्तीची व्यक्ती आहे काय?

"माझ्या पत्राचा प्रारंभ वाचल्यानंतर तुमच्या डोक्यात लेखकाची एक प्रतिमा उभी राहिली असण्याचा संभव आहे. ती ही की ही व्यक्ती संपूर्णतः अपयशी ठरलेली असणार. 'सृजनशील व्यक्ती' म्हणून शून्य असणार. जिच्यासमोर मारिया बोल्कोन्स्कायाची प्रशंसा करणे हा एकच मार्ग उरलेला असणार. पण माझ्यावर विश्वास ठेवा. सन्मार्गाचे महत्त्व हे माझ्यासाठी आत्मसमर्थनाचे किंवा आत्मगौरवाचे साधन नव्हे. मी आता ३२ वर्षाची आहे. जीवशास्त्रातील डॉक्टरेट मी मिळविली आहे. मला आवडणाऱ्या, उज्ज्वल भवितव्य असलेल्या क्षेत्रात मी काम करते आहे. तोल्स्तोयच्या साहित्यविश्वातील मारीया बोल्कोन्स्काया ही माझी अत्यंत आवडती व्यक्ती आहे."

"बालपणी एका जुन्या पुस्तकात वाचलेली एक हृदयस्पर्शी कथा मला आज आठवते. त्यांतील मुख्य भाग असा : पॅरिसमधल्या कलांविषयक म्युजियममध्ये एक उत्तम पुतळा आहे; हा पुतळा एका गरीब शिल्पकाराने केलेला आहे. ह्या पुतळ्याच्या रूपाकाराचा चिकणमातीचा सांचा तयार झाला, तेव्हा पॅरिसला

अनुक्रमणिका

भयंकर गोठवणाऱ्या थंडीचा तडाखा बसला. शिल्पकाराला हे ठाऊक होते की, त्या सांच्यात जर का पाणी गेले, तर त्याचा रूपाकार खचित बिघडल्याशिवाय रहाणार नाही. तेव्हा त्यानें आपल्या अंगावरचे कपडे काढले नि आपल्या कलानिर्मितीभोवती गुंडाळले. दुसऱ्या दिवशी सकाळी कलाकार मृतावस्थेत आढळला. पण त्याची कलानिर्मिती अभंग राहिली. दुसऱ्याच्या हातून मग ती संगमरर्मर मध्ये ओतली गेली.

"लहान मुलांच्या कल्पनेवर प्रभाव पाडण्याचा वरवर उद्देश असलेल्या या कथेने मला मात्र तेव्हा प्रभावित केले नव्हते. नंतर मोठेपणी जेव्हा मी परत त्याविषयी विचार केला, तेव्हाही मला माझ्या अनास्थेचे कारण कळले नाही. पण त्या गरीब कलाकाराने आपल्या पोटमाळ्यावरच्या गारठलेल्या खोलीत जे सजीव नाही त्याला ऊब दिली, हे जेव्हा विशेषत्वाने माझ्या ध्यानात आले, तेव्हाच मला त्यात आस्था निर्माण झाली. मुलांना प्रतिभाजन्य नि प्रतिभाशून्य यातील फरक जाणवत नाही. पण सजीव, नि जे सजीव नाही, त्यातील फरक मात्र त्यांच्या वास्तवाच्या ग्रहणात अतिशय बटबटीत असतो. कलाकाराचे प्राण जर सजीवाला—एखाद्या वृद्धाला, मुलाला, कुत्र्याला, चिमणीला वाचविण्यात गेले असते तर ते कळले असते.

"हा माझा 'शोध', स्वहित अत्यंत उदात्त असले तरीसुद्धा त्याकडे मी विरोधी वृत्तीने का पहाते, तसेच मारीया बोल्कोन्स्कायाकडे माझी खास ओढ का त्यावर प्रकाश पाडू शकेल. मारीया जीवनाला ऊब देते. मला ती अशा जीवन-कलाकारासारखी वाटते, जो सजीवाला ऊब देण्यात गारठून मरण आले तरी ते पत्करतो. प्लास्टरच्या नमुन्याला ऊब देण्याहून ते श्रेयस्कर समजतो. आता माझ्या हे लक्षात येऊन चुकले आहे की, पॅरिसमधल्या एका पोटमाळ्यावरील खोलीत घडलेल्या नाट्याविषयीची माझी अनास्था जीवन हा चमत्कार आहे अशा तऱ्हेच्या जीवनविषयक आकलनाची उफराटी बाजू आहे. जीवनाचे चमत्कारप्रधान आकलन बालपणात विशेषच तीव्र स्वरूपात असते.

"त्याचबरोबर 'विशाल कल्पकता विशाल अंतःकरणाची द्योतक असते' ह्या तुमच्या ठाम विधानाला माझा विरोध का तेही हा माझा शोध स्पष्ट करतो. तुमच्या विधानात मला काहीतरी उदात्त आणि कदाचित त्याचमुळे 'स्वार्थरहित नसलेले' दिसते. आणि यांतच तर फार मोठा धोका आहे असे मला वाटते."

आज आमच्या काळांत हा स्वार्थ कधी खूप कल्पकतेने नटलेला असतो. आमच्या कॉलेजच्या ज्ञानमंडळात 'सर्वांगीण उन्नती' च्या कार्यक्रमानुसार 'विक्षिप्त कल्पना' असलेल्या मंडळींच्या नियमित सायंकालीन बैठका होत. जीवशास्त्रज्ञ असलेल्या आमच्या एका साथीने भुरळ पडावी अशी एक भविष्यकालीन कल्पना प्रतिपादन केली. मानवी जननाची गुणसूत्रेंच बदलून टाकावयाची ती कल्पना. ग्राम्य भाषेंत आम्ही त्याला 'जननसंहिता फोडून टाकण्याचा कार्यक्रम' असे म्हणत असू. मानवतेला मानसिक रोगांतून बव्हंशी मुक्त करण्याचा हा चोख मार्ग आहे असे त्याचे समर्थन. पण आमचा तत्त्वज्ञ साथी या गोष्टीला कबूल होईना. 'जीवशास्त्राने अत्याचार केलेल्या' जगात मुळी रहावयालाच तो तयार होईना. त्याच्या मते 'जनन-संहिता फोडणे' म्हणजे 'व्यक्तित्वा' वरच घाला घालणे. अखेंर आपला अंतिम युक्तिवाद त्याने हाणलाच. तो म्हणाला, 'तुमच्या जगात दोस्तोएवस्कीला स्थान नाही.'

मग मी कसली चूप बसते - "हजारो रोगी जे प्रतिभावान नसतात, काय त्यांच्या यातनांना, त्यांच्या आयाबहिणींच्या दुःखांना, त्यांच्या बायकांच्या वेदनांना दोस्तोवस्कीसमोर काहीच किंमत नाही?"

अनुक्रमणिका

“तुम्हाला दोस्तोवस्कीविना मानवतेच्या इतिहासाची कल्पना का करता येऊ नये ? मगच दोस्तोवस्कीसाठी चुकती करावयाची किंमत अति होते किंवा काय ते तुम्ही ठरवू शकाल.”

“पण तुम्ही असे का म्हणून समजता, की भविष्यकाळात नवीन बौद्धिक रचना प्रतिभेच्या नवीन रूपांना जन्म देणार नाही? आणि आजही कलात्मक प्रतिभेखातीर फेफरेची गरज आहे (दोस्तोवस्कीला फेफरे येत असे) असे कोण सिद्ध करू शकेल?”

“परंतु माझ्या एकाही युक्तिवादाचा तत्त्वज्ञानाच्या त्या विद्यार्थ्यावर परिणाम झाला नाही. त्याची ही ठाम समजूत राहिली आहे की, भविष्यांत जर दुसरा दोस्तोवस्की पैदा होणार नसेल तर मानवतेला मानसिक रोगांपासून मुक्त करण्यासाठी जननगुण बदलणें योग्य ठरणार नाही. खरे तर हा देखील उदात्तिकृत स्वार्थच नव्हे का? कारण आम्ही प्रतिभावंताविषयी, आत्मिक संपन्नतेविषयी, तसेच कलात्मक नि नैतिक मूल्यांविषयीही जे बोलतो आहोत, त्याचे कारणही तो नवा प्रतिभावंत जगाला काही देणार आहे म्हणूनच.”

“उदात्तिकृत स्वार्थ-उपयुक्ततावादाची सर्वात अधिक धोकादायक तऱ्हा-अनेक रूपांनी येत असतो...”

मला वाटते सद्प्रवृत्ती किंवा चांगुलपणा एकमेव, स्वयंसिद्ध, स्वयंप्रेरित ध्येय म्हणून, (मारीया बोल्कोन्स्काया प्रमाणे) स्वीकारायचा झाला तर अंती चांगुलपणाचाच अस्त होईल. कारण सृजनशील शक्तीच जर नाहीशा झाल्या, तर चांगुलपणा देखील नाहीसा होईल. व विकासक्रमाने वर चढणारे मानवी अस्तित्व उतरंडीच्या मार्गाला लागेल.

‘विशाल कल्पकता विशाल अंतःकरणाची द्योतक’ हे सूत्र मी एकांगी अर्थाने घेंत नाही. माणसाची सृजनशील कल्पकता हृदयाकडून पोषण घेते. तर नुसती कल्पकता त्याच्या उच्चतम अवस्थेत-सृजनशील कृतींत-हृदयाला समृद्ध करते. कृतीविना आत्मिक निराशावाद आणि नैतिक ऱ्हास अटळ आहे. जीवन अद्‌भुतरम्य आहे अशा प्रकारचे आकलन निष्क्रीय, नकर्ते किंवा उदासिन असून भागत नाही. कारण जीवनाच्या कृतिशील आकलनातूनच नीतीमत्तेला पोषण मिळते आणि अशा कृतिशील विचारसरणीचे शिखर आहे क्रांतिकारकांची नीतिमत्ता.

जीवन अद्‌भुतरम्य आहे, नि मानव अनुपम मूल्य आहे, या विचाराच्या पलीकडे जाते ‘सौन्दर्याच्या नियमांप्रमाणे चालणारे जग’ पहाण्याची इच्छा. या जगात मानवाला नि जीवनाला विरूप करणारे काहीही नसावे ही इच्छा. ही इच्छा स्वाभाविक आहे. आणि तशीच सामायिक आहे. क्रांतिकारी कार्याची इच्छा नि गरज यातूनच क्रांतिकारी कार्य जन्म घेते नि जगाला पालटत जाते.

अशा विचाराची शक्ती महान क्रांतिकारकांना नेहमीच जाणवली आहे. चेर्निशेवस्की, लेनिन, दजेर्झिन्स्की यांना तर ती विशेषच जाणवली होती. दर्जेर्झिन्स्कीच्या पत्नीने पतीला तो कारावासात असताना लिहिले की ‘त्यांचा तीन वर्षांचा मुलगा यासिक हिरवळ पाहून उल्लसित होतो. पक्षांच्या गाण्यांनी सुखावतो. फुलांच्या रंगसुगंधाने उत्फुल्ल होतो.’ त्या क्रांतिकारकाने पत्नीला पाठवलेल्या उत्तरात लिहिले, ‘तो क्रांतिकारक होणार.’

अनुक्रमणिका

होय. तो क्रांतिकारक होणार. कारण सृष्टीसौन्दर्याने मोहीत होणारी व्यक्ती मानवी जीवनातील सौन्दर्याखातीरही यत्नशील असते.

परंतु एक प्रज्ञावंत महिला जेव्हा अगदी ठामपणे 'चांगुलपणा हेच स्वयंप्रेरित उच्चतम ध्येय' झाले पाहिजे असे म्हणते, तेव्हा तिला खरोखरच हे समजत नसावे काय? पण तसे नव्हे. तिला ते खात्रीने समजते. कारण तिच्या पत्रांत एक लहानसा पण महत्त्वाचा धागा आहे. तिने प्रथम 'चांगलेपण' असे लिहिले. आणि मगच तिने ते खोडून "खरे तर, चांगुलपणा" असे केले आहे.

मला वाटते 'चांगलेपण' हेच अंतिम ध्येय झाले पाहिजे ही गोष्ट 'निरूपाधिक आज्ञे'प्रमाणे सर्वमान्य होण्यासारखी आहे. कारण 'चांगलेपण' म्हणजे अस्तित्वाची श्रेष्ठतर अवस्था होय. (प्राचीन ग्राम्य कथांत घडलेले असते तसे मानवाचे परत नाही लाकूड बनत) माणूस मागे नाही जाऊ शकत. चांगलेपण म्हणजे खालच्या अवस्थेतून वरच्या अवस्थेतील पदार्पणाचा विजय. 'चांगलेपण' आहे नव्या मानवाची नि नव्या जगताची निर्मिती. पण मानवाच्या संदर्भात ही गोष्ट आपोआप घडेल काय?

आमच्या जीवशास्त्रज्ञ महिलेने ते पत्र पाठविले त्याचे कारण तिला सीध्यासाध्या, दंभरहित अशा चांगुलपणाच्या जीवनाचा ध्यास लागलेला आहे. वास्तविक पूर्वीचे बाळबोध जीणे व स्वयंप्रमाण, स्वयंप्रेरित मूल्य असलेला तो 'चांगुलपणा', आपणा सर्वांनाच हवा आहे. पण त्या 'चांगलपणा'ला भक्कम करण्यासाठी सृजनशीलतेच्या मार्गानेच वाटचाल करणे आवश्यक असते. (या ओळी सुद्धा 'उदात्त स्वार्था' च्या आरोपाला काहीशा पोषक आहेत हे मला माहीत आहे.)

आमच्या बालरोगतज्ञाने वर बोनेलीच्या प्रयोगाचा उल्लेख करून सापाच्या त्या विषारी दांताप्रमाणें माणसांतील 'कधी न मरणाऱ्या खलत्वाकडे' बोट दाखविले आहे म्हणून मला अमर बीजाचें उदाहरण द्यावेसे वाटले. हे पहा. एका ममीच्या घट्ट आवळलेल्या मुठीत तब्बल चार हजार वर्षांचें धान्य सापडले आहे, जे रुजत घातल्यावर विपुल तेजाळ कणसं आली!

***

अनुक्रमणिका